सन १९२५

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र.

REFBK-0002816

गझनीच्या

# महमुदाच्या स्वाऱ्या

मध्ययुगीन भारत भाग ३ यातील सातवें पुस्तक

इ. स. ९९७ ते १०२९

हा ग्रंथ


चिंतामण विनायक वैद्य, एम्. ए. एलएल बी.

आनररी फेलो मुंबई युनिव्हर्सिटी


श्रीरामचरित्र श्रीकृष्णचरित्र महाभारत उपसंहार,
मध्ययुगीन भारत या पुस्तकांचे कर्ते


REFBK-0002816



सर्व हक्क ग्रंथकर्त्यांनें स्वाधीन ठेविले आहेत



प्रथमावृत्ति

सन १९२५

किंमत १ रुपया

हे पुस्तक **पुणें** येथें **श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स** मध्यें छापिलें
आणि
ग्रंथकर्त्यानें **पुणें** येथे सदाशिव पेठ घर नंबर ३१२ येथें प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना.

मध्ययुगीन भारत भाग ३ च्या प्रारंभींच्या सातव्या पुस्तकांत महमुदानें हिंदुस्थानावर केलेल्या स्वाऱ्यांचा इतिहास देणें प्राप्त झालें; कारण या स्वाऱ्यांमुळें पंजाब–काबुल प्रदेश हिंदुस्थानांतून या काल–विभागाच्या आरंभीं ( इ. स. १०००–१२०० ) तुटून वेगळे झाले. हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासास येथून प्रारंभच झाला. पंजाब–काबुल कां पडलें व हिंदूंना मुसलमानांचा तेथें प्रतिकार कां करितां आला नाहीं, हा प्रश्न आधुनिक काळांत महत्वाचा होऊन बसला आहे. या साठीं या स्वाऱ्यांचा इतिहास देऊन या उच्छेदाच्या कारणांची मीमांसा करणें जरूर पडलें त्याप्रमाणें या पुस्तकांत ती केली आहे. यामुळें हें पुस्तक हिंदुस्थानचा आधुनिक विचार करणाऱ्यांसहि वाचनीय वाटल्यावरून तें निराळें काढून मीं प्रसिद्ध करीत आहे. महमुदाच्या स्वाऱ्यांचा इतिहास इंग्रजी ग्रंथांतून दिलेला असतो तो केवळ मुसलमानी लेखकांच्या आधारें असतो त्यांचा व इकडे नवीन संशोधनानें सांपडलेल्या हिंदु कोरींव लेखांचा मेळ घालून, तसेंच परकी लेखांतील हकीकतीची शक्याशक्यतेच्या दृष्टीनें छाननी करून, हिंदु दृष्टीनें हा इतिहास लिहिला असल्यानें तो बराच नवीन व मनोवेधक वाटेल असा मला भरंवसा आहे. मोठ्या ग्रंथाची किंमत देण्यास न लागतां एवढाच महत्वाचा भाग थोड्या किमतींत मिळावा असाहि हें पुस्तक निराळें करण्यांत हेतु आहे. सारांश हें पुस्तक लोकादरास व लोकाश्रयास पात्र होईल अशी आशा प्रदर्शित करून ही अल्प प्रस्तावना संपवितों.

पुणें ता. १ आक्टोबर सन १९२५. — चिंतामण विनायक वैद्य.

# विषयानुक्रमणिका.

प्रकरण. पृष्ठ.


१ हिंदुस्थानची राजकीय भूगोलिक माहिती. १
टि. राजशेखरकृत हिंदुस्थानचें भूगोलिक वर्णन ११
२ बुखाऱ्याचें सामानी बादशहा व गझनी राज्याची स्थापना. १५
टि. १ हिंदुस्थानचा राजा जयपाळ २ मोह्याल ब्राह्मण. ३३
३ सबुक्तगीन आणि जयपाळ. ३४
४ महमूद आणि जयपाळ. ४५
५ भाटियावरील स्वारी. ५२०
६ मुलतानवरील स्वारी. ५९
७ संयुक्त हिंदूंची शेवटली लढाई. टि. संयुक्त लढाईचें ठिकाण. ७४
८ नगरकोटची स्वारी. टि. कांगडा येथील किल्ला व देवळें. ७९
९ १ पंजाबचें मांडलिकत्व, २ पंजाब खालसा झाला. ८५, ८९
टि. नंदनचा किल्ला, उत्तर शाही राजांच्या दुरुस्त केलेल्या तारखा. ९५
१० ठाणेश्वरावरील स्वारी. ९८
११ मथुरेची लूट. १०४
१२ कनोज पडलें. ११२
१३ कालंजरवरील स्वारी, टि. १ व २ शाही राजे १२०
१४ सोमनाथावरील स्वारी, टि. १ सोमनाथ; २ सादी व सोम. १३२
१५ महमुदाचा मृत्यु, त्याचें स्वभाववर्णन व राजनीतिनिपुणत्व. १४१
टि. महमूद किंवा शिवाजी लुटारु होते काय ? १५३
१६ पंजाब--काबूलचा उच्छेद, भासणारीं कारणें. १६२
१७ पंजाब--काबूलचा उच्छेद संभवनीय कारणें. १७३
टि. १ आक्षेपांचें निरसन २ पंजाबांतील धर्मशैथिल्य दाखविणारे महाभारतांतील उल्लेख. १८५
१८ महमुदाच्या मागूनचे राजे. टि. गझनवी राजांचीं नाणीं. १९५
परिशिष्ट १ हिंदूंची मूर्तिपूजा; २ कांहीं मुसलमानी नांवाचे उच्चार व अर्थ; ३ सालवारी. २१३

# मध्ययुगीन भारत.

## भाग ३ रा.

पुस्तक-सहावें.

रा. क. २८१६

## गझनीच्या महमुदाच्या स्वाऱ्या.

### प्रकरण १ लें.

### हिंदुस्थानची राजकीय भूगोलिक माहिती.

हणजे
हे केन्द्र
सर्वांत श्रेष्ठ

(इ. स. १८३०, अल्बेरूनी.)

." दुसऱ्या

या भागांतील इतिहास चांगला निश्चित होण्यास हिं र्व कुल कनोजेत राजकीय भूगोलिक माहिती प्रसिद्ध आरब ग्रंथकार अल ची सार्वभौम राज- आपल्या 'इंडिया' या ग्रंथांत दिलेली श्री वर्षांच्या वैभवामुळें, पडणारी असून फार महत्वाची आहे. केन्द्र बनलें होतें. संपन्न, पहिल्या भागास म्हणजे इ. स. ६००-८.० होत. तेव्हां हें साहजिकच जसें चिनी प्रवासी ह्युएनत्संग याचें प्रवा हेती कनोजला मुख्य धरून व पडलें, तसेंच महत्वाचें हिंदुस्थानचे आहे. (रामायणांत हिंदुस्थानचा वर्णन या कालविभागास म्हणजे १०० दिला आहे). किंबहुना राजशेख-

|

योगी आहे. दोघेहि परस्थ होते, दोघांनीं हिंदुस्थानांत राहून व प्रवास करून संस्कृताचा अभ्यास केला होता आणि दोघेहि बुद्धिवान आणि ऐतिहासिक चिकित्सक बुद्धीचे होते. अल्बेरूनी दोघांमध्यें ज्यास्तच भरवंशाचा ठरेल. कारण तो मुसलमान होता तरी सुद्धां आग्रह-रहित त्याची दृष्टि स्पष्टपणें दिसते; ( ह्यूएनसंग बौद्ध असून हिंदू-विषयीं थोडासा दूषित मनाचा दिसतो ). अल्बेरूनीनें हिंदू लोकां-विषयीं, त्यांच्या धर्माविषयीं, त्यांच्या तत्वज्ञानाविषयीं, त्याचें शास्त्रज्ञान व कलाज्ञान याविषयीं अनादरबुद्धि दाखविली नाहीं. दोघांनींहि हिंदुस्थानांत राहून हिंदुस्थानच्या पंडितांपासून माहिती मिळविली होती. ( ह्यूएनत्संग हा नालंदा मठांत कित्येक वर्षे राहिला होता ). अल्बेरूनीनें आपली माहिती मुलतान व पेशावर या दोन ठिकाणी राहून हिंदु पंडितांपासून संपादन केली होती. हिंदुस्थानच्या भूगो-लाविषयीं माहिती त्यानें हिंदु व मुसलमान प्रवाशांपासून संपादन करून त्याची जांचहि केली होती. तो मूळचा राहणारा ख्वारिझमचा होता. जेव्हां महमुदानें तो देश जिंकला तेव्हां त्या देशांतील कैद्यां-

१ गेबर महमूद त्यास गझनी येथें घेऊन आला. अल्बेरूनी तेव्हांच
१४
१५ म न, विशेषतः गणिती व ज्योतिषी होता. ज्योतिष—गणित व
टि. म ीक लोकांकडून आरबांस मिळालें होतें तें सर्व तो शिकला
१६ पंजाब- वेळीं हिंदु ज्योतिष ग्रीकांच्याहि पुढें निदान बरोबरीचें होतें,
१७ पंजाब--की मोठ्या हौसेनें येथें शिकला. हिंदुस्थानच्या समग्र
टि. १ आक्षेपाचनाच्या वेळीं आम्हांस अल्बेरूनीच्या या पुस्तकाचा
महाभारतांतागार आहे; कारण त्यानें हिंदूचें शास्त्र, तत्वज्ञान,
१८ महमुदाच्या मागूनच्चे अनेक विषयांवर माहिती मिळवून नमूद
परिशिष्ट १ हिंदूंची मूर्तिपूजा; येथें आम्हीं प्रथम हिंदुस्थानची भूगोलिक
उच्चार व अर्थ; ३ साल आहों. कारण त्यावेळची राजकीय परि-
उपयोगीं आहे. ती माहिती अल्बे-

रूनीनें हिंदु भूगोलिक पुस्तकांवरून, त्याचप्रमाणें जाणकार हिंदु व मुसलमान प्रवाश्यांकडून मिळवून दिलेली दिसते. राजशेखर याचा भूगोलाचा ग्रंथ बहुधा अल्बेरूनी समोर असावा. आह्मी एका टिप्पणींत राजशेखराच्या ग्रंथाचाहि सारांश देत आहो. प्रवाशांकडून मिळालेली अन्तरांची माहितीहि अल्बेरूनी देतो पण, हीं अन्तरें त्यानें फरसाख (फारशी योजन) मध्यें दिलेली असल्यानें बरींच संशयित आहेत. एक फरसाख ४ इंग्लिश मैलांबरोबर सरासरी मानतात. एवढी प्रस्तावना करून अल्बेरूनीच्या वरील ग्रंथांतील भूगोलिक अध्यायावरून आम्ही पुढील माहिती उध्दृत करतों. हा ग्रंथ अल्बेरूनीनें इ. स. १०३०त पुरा केला. महमूद त्यावेळीं नुकताच मेला होता.

आरब ग्रंथकारांनीं नेहमीं हिंदुथानचे सिंध आणि हिंद असे दोन भाग पाडले आहेत. आरबांनीं सिंध पूर्वींच जिंकून आपल्या राज्यांत व धर्मांत सामिल केलें होतें; अर्थात् ते हिंदुस्थानापासून निराळें पडलें होतें. हिंदुस्थानचा मुख्य भाग म्हटला म्हणजे मध्यदेश (हें नांव महाभारतांतहि आहे) आणि मध्य देशाचा मध्य म्हणजे कनोज शहर. यावेळीं कनोज हिंदुस्थानचें राजकीय दृष्टयाहि केन्द्र होतें. अल्बेरूनी म्हणतो "कनोज हें हिंदुस्थानांतील सर्वांत श्रेष्ठ असलेल्या राजाची राजधानी व राहण्याचें ठिकाण होतें." दुसऱ्या भागांत सांगितल्याप्रमाणें यावेळीं प्रतिहार सम्राटाचें कुल कनोजेत राज्य करीत होतें. किंबहुना कनोज हिंदुस्थानची सार्वभौम राजधानी हर्षापासूनच झाली होती. अर्थात् चारशें वर्षांच्या वैभवामुळें, हिंदु संस्कृति, विद्वत्ता व कला यांचेंहि तें केन्द्र बनलें होतें. संपन्न, विद्वान आणि शूर लोक तेथें ओढले गेले होत. तेव्हां हें साहजिकच आहे कीं हिंदुस्थानची भूगोलिक माहिती कनोजला मुख्य धरून व त्याच्या दिशेनें अल्बेरूनीनें दिली आहे. (रामायणांत हिंदुस्थानचा भूगोल कुरुक्षेत्रास मुख्य धरून दिला आहे). किंबहुना राजशेख-

रानें आपल्या काव्यमीमांसेंत कनोजपासून अन्तरें व दिशा सांगाव्या असें स्पष्ट म्हटलें आहे. या म्हणण्यास अनुसरूनच अल्बेरूनीनेंहि हिंदुस्थानचा भूगोल सांगितला आहे. गंगायमुनेमधील प्रदेश अन्तर्वेदि हिंदुस्थानचा खरोखर मध्य आहे, तेव्हां पूर्वाचार्यांनीं अन्तर्वेदीला मध्य बिन्दु धरून भूगोल सांगावा असें म्हटलें तें योग्य आहे. अन्तर्वेदीचाहि मध्य बिन्दु कनोज आहे आणि तेथें प्रतिहार साम्राटाचा राजकवि या नात्यानें राजशेखर राहत असे तेव्हां अर्थात् त्यानें आणखी कनोज मध्य धरून भूगोल सांगावा असा नियम ातला हेहि ठीक आहे. " गंगायमुनयोर्विनशनप्रयागयोरन्तरमन्त-ी। तदपेक्षया दिशो विभजतेत्याचार्याः। तत्रापि महोदय-धेकृत्येति यायावरीयः" ( महोदय म्हणजे कनोज आणि याया-ीय म्हणजे राजशेखर हें येथें सांगितलें पाहिजे ).

असो, प्रथम अल्बेरूनी असें सांगतो कीं "जर तुम्हास सिंधला याचें आहे तर तुम्ही सिजिस्तान मधून गेलें पाहिजे, पण हिंदला याचें असेल तर काबूलवरून गेलें पाहिजे" ( आरब लोकांक-अल्बेरूनी सांगतो आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच ). "हिंदु-नच्या सरहद्दीवर अनेक हिंदु किंवा त्यासारख्या जाती आहेत त्या ाय अशिक्षित असून नेहमीं बंडें करितात" यावरून हें स्पष्ट आहे कीं, या सरहद्दीवरील आफ्रिदी वगैरे शूर जाति अद्याप मुसलमान झाल्या नव्हत्या आणि हल्लीप्रमाणें त्या तेव्हांहि सम्राटास त्रास देत. अशा रस्त्यानें कनोज पोंचून तो म्हणतो "कनोज गंगेच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे. पण हल्लीं हें शहर उध्वस्त आहे ( महमुदानें ते लुटलें व मोडले होतें. ) हल्लीची राजधानी गंगेच्या पूर्वेस बारी येथें एक दिवसाच्या मजलीवर ( २४ किंवा ५० मैल ) आहे" हें बारी शहर हल्लीचें कोणतें हें अद्याप निश्चित झाले नाहीं. असो, याप्रमाणें कनोज मुख्य धरून प्रथम आग्नेयीकडील शहरें सांगताना

जाजमहु वगैरे ठिकाणें सांगून त्यानें प्रयाग येथील गंगायमुना-संगमावरील वृक्षाचा उल्लेख केला आहे. यावरून हा वटवृक्ष अद्याप तेथें असून त्यावरून जिवाला कंटाळलेले लोक संगमांत जलसमाधि घेत असें दिसतें ( हल्लीं अलाहाबादाच्या किल्ल्यांत ह्या वटवृक्षाचें खोड दाखविलें जातें ). प्रयागापासून दक्षिणेकडे समुद्र—किनाऱ्यापर्यंत अल्बेरूनी गावें (मुख्य) सांगतो. आणि शेवटीं दारुर देशाच्या जोर राजाचें राज्य आहे असें वर्णन करतो, अर्थात द्रविड देशाच्या चोल राजांचें हें खरोखरीचें यावेळीं साम्राज्य असून त्यांच्या अमलाखालीं कांजी, (कांची), मलय,आणि कुंक (कोंकण) असल्याचें त्यानें सांगितलें आहे तात्पर्य बहुतेक हल्लीचा मद्रास इलाखा त्यावेळीं चोलांच्या साम्राज्य खालीं असून त्यांत कांहीं लहान संस्थानें म्हणजे मांडलिक राज्यें हो

यानंतर बारीच्या पुर्वेकडील भूगोल सांगण्यास तो वळतो अ अयोध्या, बनारस, पाटलिपुत्र व मोंगीर ही शहरें उल्लेखितो. मों म्हणजे मुद्गगिरि. येथें बंगालच्या पाल राजांची राजधानी य मा-होती. पुढें चंपा डुगमपुर ( ? ) आणि शेवटीं गंगासाग लागतें समुद्रास गंगा मिळते, त्यानें सांगितलें आहे.

पुन्हा बारीपासून पूर्वेस ( म्हणजे ईशान्येस थोडेसें ) रून पर-तें. कोकणांत भूतान आणि तिबेट लागतें, येथील लोक काळे अ लेलें चांगलें प्रसिद्ध सारखे बसक्या नाकांचे आहेत. नंतर त्याच्य पाहणारच आहों. आणि उलट दिशेस नेपाळ व त्यापलीकडे सर्वांत उ मुद्र किना-श्वर आहे. ाची

“ आतां कनोजहून नैऋत्य दिशेस जातां प्रथम जज गुज-लागते. याची राजधानी खजुराहो आहे आणि यांत दोन मजबू किल्ले कालंजर व गवालियार आहेत.” चंदेल्ल राजांच्या अमला-खालील बुंदेलखंडचें ( हल्लीचें ) राज्य येथें बरोबर वर्णिलें आहे. “ याच्याहि दक्षिणेंस डाहालचे राज्य असून त्याची राजधानी तेऊर

( त्रिपुर ) आहे आणि गांगेय हल्लीं राजा आहे " हेंहि यावेळच्या हैहयांच्या चेदि राज्याचें बरोबर वर्णन आहे. आणि यावरून हें सिद्ध होतें की यावेळीं (स. १०३०) चेदीचा प्रसिद्ध राजा गांगेय-देव हयात व राज्यावर होता. अल्बेरूनीच्या ग्रंथांत यावेळच्या दोनच हिंदु राजांचें नांव आलें आहे, गांगेय आणि भोज ( धारचा परमार राजा ).

" पुन्हा कनोजहून नैऋत्य-पश्चिमेस जाता असी, सहन्य, जेन्द्र, राजोरी आणि गुजरातची राजधानी बझान लागतात. " हें शहर कोणते हें ठरविणें अशक्य आहे, पण गुजरात म्हणजे हल्लीचें गुज-रात नसून त्याकाळीं कोरीवलेखांवरून हें नांव जयपुरच्या भोंव-तालच्या भागास होतें. हा इलाखा हल्लीच्या मारवाडांत मोडतो. बझान आमच्या मतें भिनमाल असावें. कुचलो अथवा गुजरातची ल्युएन्संगनें हींच राजधानीं सांगितली आहे. कारण अल्बेरूनी असेंहि येथें सांगतो कीं बझान शहर वैराण असून तेथील लोक जडीरा नांवाच्या श[illegible]म गेले होते. " वझानास मुसलमान लोक नरेना म्हणतात. "

य अ[illegible]ारण असें दिसतें कीं बझान भिनमाळ येथें सूर्याचें ( नारा-

नच्या [illegible]सिद्ध देवालय होतें ( भाग १ पा.५०) व भिनमाल याचेंच

[illegible]य आ[illegible]आणि श्रीमाळी ब्राह्मण व वाणी हल्लीं प्रसिद्ध उप-

आहे कीं, या सरह[illegible]ल्बेरूनी असे सांगतो की "कनोजहून मथुरा जितकी

झाल्या नव्हत्या [illegible] मथुरेहून बझान दूर आहे. " कदाचित् या शहरानें

अशा [illegible]न सांबरच्या चाहमानाच्या राज्याचा उल्लेख केला आहे. अजमेर

कि[illegible]याप स्थापन झालें नव्हतें व तेथें चौहानाची राजधानीहि नव्हती

ते [illegible]व्हां अजमीर अल्बेरूनी सांगत नाहीं हें ठीकच आहे.

येथें

मथुरेहुन थेट दक्षिणेस उज्जनीस नेतांना वाटेनें दोनचार शहरें अल्बेरूनीनें सांगितली आहेत तीं निश्चित करतां येत नाहींत. भैल-स्वामि अथवा भेलसा हें नांव आपल्या ओळखीचें आहे. पण भैल-

स्वामि नांवाचा तेथें देव आहे म्हणून त्या शहरास हें नांव आहे, ही माहिती नवी व महत्त्वाची आहे. भैलस्वामि हें नांव त्यावेळच्या कोरीव लेखांतहि आलें आहे, पण या नावांचें कारण आपल्यास अल्बेरूनींत सांपडतें. स्वामी या पदावरून हा देव विष्णु होता असें दिसतें. भेलशाजवळ एक प्रसिद्ध विष्णुमंदिर असून त्याच्या पुढील गरुडस्तंभावर यवन बौद्ध राजाचा इ. स. पू १०० च्या सुमाराचा लेख सांपडला आहे हें विदित असेलच. पण संस्कृत वाङ्मयांत भेलशाचे नांव विदिशा असें येतें हें सांगितलें पाहिजे.

" आतां बझान पासून दक्षिणेस मेवाडचें राज्य आहे. त्याची राजधानी जित्रोर ( चितोरगड ) आहे. तेथून दक्षिणेस माळव्याची राजधानी धार आहे. धारेच्या पूर्वेस ७ फरसाखावर उज्जनी आहे आणि उज्जनीच्या पूर्वेस दहा फरसाखावर भेलसा आहे. " माळवा आणि त्यांतील मुख्य शहरें याचें हें बरोबर वर्णन आहे.

धारच्या दक्षिणेस कांहीं शहरें सांगितलीं असून त्यांत गोदावरी वरील वंगर आणि नर्मदेवरील नेमार याचा उल्लेख आहे. " नेमा-वरच्या दक्षिणेस ' मराठ ' देश लागतो आणि मग कोंकण लागतें त्याची राजधानी ठाना समुद्र–किनाऱ्यावर आहे. " यावरून पर-कीय लोकांच्याहि तोंडीं या वेळी मराठ देश हें नांव झालें होतें. कोकणांत ठाना राजधानींत शिलाहाराचें राज्य यावेळीं असलेलें चांगलें प्रसिद्ध होतें.त्याची ख्याति काश्मीरापर्यंत होती हें आपण पुढें पाहणारच आहों.

बझान पासून नैर्ऋत्येस अनहिलवाड आहे आणि समुद्र किना-ऱ्यावर सोमनाथ. अनहिलवाडच्या दक्षिणेस लाडदेश व त्याची राजधानी भडोच. व समुद्रकिनाऱ्यावर रिहंजूर. ( या प्रान्तास गुज-रात नांव नव्हतें, लाट प्रसिद्ध संस्कृत नांव होतें ).

" बझानच्या पश्चिमेच मुलतान आणि भाटी आणि पश्चिम–नैर्ऋत्य अरोर, बाह्मनवा, मनसूर आणि पुढें सिन्धुनदीच्या मुखा-

वर लहरानी. ” हीं शहरे सिंध मध्यें होतीं आणि आरबांच्या ताब्यांत सिंधप्रान्त होता.

येथोन अल्बेरूनी पुन्हा कनोजला येतो आणि कनोजच्या उत्तर वायव्येस डोंगरांत शीर्षारह व पिंजोर असून त्यासमोर मैदानांत थानेश्वर आहे. डोंगराच्या पायथ्याशीं जलंदरची राजधानी डहमाल. नंतर बल्लावर, पश्चिमेस ल्द्दा व किल्ला राजगिरि, पुढें काश्मीरची हद्द.

पश्चिमेस कूती, आनार, मीरत, पानिपत, “ दोहोंच्या दरमियान यमुना वाहते ” कावठल आणि सुनाम. नंतर उत्तरेस जातां आदितहौर, जाजमीर, लुहावरची राजधानी मन्दहकुर रावी नदीवर, चन्द्रभागा, बिआस, नंतर कंधरची राजधानी वहिंड सिंधु नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर, परशावर, डुनपुर, काबुल आणि शेवटीं गझनी.

यापुढें अल्बेरूनीनें काश्मीरचें वर्णन दिलें आहे. तो म्हणतो, “ काश्मीरांत घोडे किंवा हत्ती नाहींत. श्रीमंत लोक पालखींतून फिरतात. ज्यू लोकांशिवाय दुसऱ्या कोणासहि काश्मीरांत येऊं देत नाहींत. जेलम नदीवर बारामुला सांगून ही नदी जेथून गंगा निघते तेथूनच निघते असें त्यानें सांगितलें आहे. तेथें बर्फ कधीं वितळत नाहीं. जेलम काश्मीरांत आल्यावर तिच्या दोन्ही कांठावर राजधानी वसली आहे. नंतर नदी एका दलदलीत शिरते. तेथोन बाहेर पडून एका दरींतून मैदानांत येते. या दरीच्या दरवाज्यावर पहारा असतो.

“ सिंध नदी कुलर्जक पर्वतापासून निघते, तेथें गिल्गिट वरून पोंचतात. तेथें भट्ट तुर्क राहतात. त्यांच्या राजांस भट्ट शहा अशी संज्ञा आहे. त्यावरून असें दिसतें कीं हे तुर्क लोक अद्याप हिंदु होते. गिल्गिटमध्यें अद्याप वैदिक संस्कृति बाकी आहे हें डाक्तर सर-ग्रीयर्सन ( हिंदी-भाषा-कोविद ) यानें दाखविलें आहे. किंबहुना वैदिक भाषाहि येथें अवशिष्ट आहे. काश्मीरच्या दक्षिणेस लाहूर आणि राजगिरि आहेत. “सर्वांत अत्यंत मजबूत असे हेच दोन किल्ले

मी पाहिल्यांत आहेत. ही हिंदुस्थानची उत्तर सीमा; पश्चिमेस अफगाण जाती राहतात.

हिंदुस्थानची दक्षिण सीमा समुद्र आहे. लहान मोटी सिन्धूची मुखें सोडली म्हणजे समुद्रकांठानें प्रथम कच्छ लागतें व सोमनाथ. ह्या दोन्ही ठिकाणीं चांचे फार आहेत. समुद्र कांठचीं शहरें एणेंप्रमाणें, तवल्लेश्वर, लोहरानी, कच्छ, बरोर, सोमनाथ, कंबाया, असाविल, बहरिज, सिन्दान, सोपारा, ठाना. नंतर लारां देश मुख्य शहर जिसूर नंतर वल्लभ, दरवाड, शेवटीं सेरेदिब (सिलोन). अल्बेरूनीनें शेवटीं रामेश्वरचें मर्णन सेतूसह पश्चिम व पूर्व समुद्रांचे संगमावर असल्याचें केलें आहे. व त्यानें दीव बेटांचेहि वर्णन केलें आहे. "हीं बेटें बाहेर येतात व पुन्हा बुडतात" (हा चमत्कार पुष्कळांना नाकबूल आहे.)

अल्बेरूनी म्हणतो "मुलतान येथें पाऊस मुळींच पडत नाहीं. पण डोंगरांजवळ पाऊस आषाढापासून चार महिने पडतो. आणि खुद्द हिमालयांत श्रावणापासून अडीच महिने पाऊस असतो. हिमालयापलीकडे पाऊस मुळींच पडत नाहीं. काश्मीरांत माघ महिन्यांत बर्फ पडतें व चैत्रांतहि कांहीं बर्फाची वृष्टि होते. अल्बेरूनीनें हिंदु महिन्यांचीं नांवें सांगितलीं आहेत, कारण ऋतूंचा बदल त्यांत होत नाहीं. मुसलमानी महिने सर्व ऋतूंत फिरतात म्हणून तो मुसलमानी महिने वापरीत नाहीं हें साहजिक आहे. शिवाय हिंदुज्योतिषाची त्यास पूर्ण माहिती होती.

दुर्दैवानें त्यानें कोणत्याहि राज्यांचीं नांवें किंवा तेथील राजाचीं नांवें दिलीं नाहींत. त्याचप्रमाणें त्यावेळीं चाललेल्या राजकीय घडामोडीबद्दलहि तो उल्लेख करीत नाहीं. त्यांजविषयीं त्यास माहिती असलीच पाहिजे. महमुदाच्या कोणत्याहि स्वारीचा तो उल्लेख करीत नाहीं. कनोज वैराण झालें आहे एवढेंच तो म्हणतो पण महमुदाच्या लुटीमुळें तसें झालें हें सांगत नाहीं. तसेंच सोमनाथ

सांगतांना महमुदाच्या नुकत्याच झालेल्या विलक्षण स्वारीचा, देऊळ उध्वस्त केल्याचा किंवा मूर्ति फोडल्याचा तो बिलकुल उल्लेख करीत नाहीं. प्रत्यक्ष समोर घडलेल्या अशा महत्त्वाच्या वृत्तांचा उल्लेख न करणें अशक्य आहे असें कोणासहि वाटतें. तथापि कोणतेंच राजकीय वृत्त तो उल्लेखीत नाहीं हें निश्चित दिसतें. हें त्याचें मौन जाणून बुजून असावें. यामुळें या मौनामुळें अशा वृत्तांच्या सत्यतेविषयीं प्रतिकूल अगर अनुकूल कोणतेंच अनुमान निघूं शकत नाहीं.

तथापि त्याच्या वरील भूगोलिक वर्णनावरून हिंदुस्थानची त्यावेळची राजकीय स्थिति आपल्यासमोर चांगली उभी राहते यांत शंका नाहीं. प्रथम प्रतिहाराचें बलिष्ठ साम्राज्य त्यावेळीं अस्तित्वांत होतें, आणि त्याच्या पूर्वेस बंगालच्या पालांचें मोंगीरचें राज्य होतें. भूतान, नेपाळ, वामरूप आणि तिरहूत याही राज्यांचा उल्लेख निघतो. दक्षिणेकडे केवळ चोलांचे नांव त्यानें सांगितलें आहे. यावेळीं मद्रास इलाख्याभर चोलांचे साम्राज्य निश्चित होतें. कालंजरचें चन्देल्लांचें राज्य आणि त्रिपुरच्या चेदींचें राज्यहि दिसून येतें. त्याचप्रमाणें मेवाड व माळवा यांच्या चितोड व धार राजधान्या उल्लिखित आहेत. नाहरवाला ( पाटण ) लाट, व कोंकण या तीन राज्यांचाहि चांगला निर्देश आहे. कच्छ व सिंधहि उल्लेखित आहेत. बझान या शहरानें आमच्या मतें सांबर अथवा मारवाडच्या चौहान राज्याचा निर्देश होतो. कनोजच्या उत्तरेस ( वायव्येस ) पानिपत, मीरत, थानेश्वर आणि कपित्थल यांचा उल्लेख योग्य रीतीनें आला आहे. येथें दिल्लीचा उल्लेख नाहीं हें योग्यच आहे. दिल्ली त्यावेळीं क्षुद्र जागा होती. कदाचित् हें शहर अस्तित्वांतहि नव्हतें आणि तोमर राजेहि त्यावेळेस महत्त्वाचे नव्हते, लाहोर त्यावेळीं एका राज्याची किंवा महत्त्वाच्या प्रान्ताची राजधानी होती. जलन्धर आणि राजोरी ही निराळीं राज्यें असावीं. यावेळीं काश्मीर बलाढ्य राज्य होतें आणि

कास्मीरचें विस्तृत वर्णन येथें आहे. यानंतर कन्दाराची राजधानी वहिंद, सिन्धूच्या पश्चिम किनाऱ्यावर सांगून शेवटीं काबूल व गझनी सांगितलीं आहे. यावेळीं हिंदुस्थानचें जे राजकीय विभाग होते त्यांचें वर यथायोग्य वर्णन आहे. महाराष्ट्र व कर्नाट राज्यांचा उल्लेख यांत आला नाहीं हें आपल्या लक्षांत येतें; पण आमच्या मतें त्यांचा निर्देश 'मराठ देश नर्मदेच्या दक्षिणेस' या शब्दांत तसेंच वल्लह व दरवाड म्हणजे चालुक्यांचें धारवाड या शब्दांत येतो.

## टिप्पणी राजशेखरकृत हिंदुस्थानचें भूगोलिक वर्णन.

कनोजचा महीपाल (प्रतिहार सम्राट्) याचा गुरू आणि राजकवि राजशेखर यानें (९१०-९४०) आपल्या काव्यमिमांसा ग्रंथांत हिंदुस्थानचा विस्तृत भूगोल सांगितला आहे. बहुधा हा ग्रंथ किंवा यांत उल्लेखिलेला त्याचाच 'भुवनकोश' हा ग्रंथ शंभर वर्षानंतर (१०३०) अल्बेरूनीनें आपला ग्रंथ लिहिला तेव्हां त्यापुढें असावा असें वाटतें. अलंकारशास्त्रावरील ग्रंथांत हिंदुस्थानचा भूगोल कशाला आला याबद्दल कदाचित कोणास आश्चर्य वाटेल. परंतु कवींनीं भूगोलिक चुक्या करूं नये, कारण श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या मनाला धक्का पोंचतो हें सांगून त्यानें हें भूगोलिक वर्णन केलें आहे. (उ. काशी वर्णन करतांना गोदेच्या पाण्याचें वर्णन ऐकणारास कसेंसेंच वाटेल). काशीं हिंदुस्थानच्या पूर्वभागांत आहे किंवा हिंदुस्थानच्या निरनिराळया भागाच्या लोकांचा वर्ण भलताच दाखविणें हेहि चुकिचें आहे असें त्यानें स्पष्ट म्हटलें आहे. (भूगोलाच्या चुक्या कवीनें करूं नये, इतिहासाच्या केल्या तरी चालतील). कालिदासानें रघुवंश ६ सर्गमध्यें रामाचा पूर्वज अज यास स्वयंवरांत इंदुमतीनें वरिलें त्यावेळीं तिच्या दासीच्या तोंडीं कृष्णाचा उल्लेख घातला आहे ही ऐतिहासिक चुकी आहे. पण सामान्य लोकांस इतकें ज्ञान नसतें. काशीजवळ गोदा सांगितली तर ती त्यांस तात्काळ चमत्कारिक वाटेल). असो एवढें निश्चित आहे कीं काव्यमिंसेतील हा

भूगोलिक अध्याय ( सबंद्ध असो वा नसो ) फार महत्त्वाचा आहे. ज्याप्रमाणें आमच्या पहिल्या काल विभागाच्या ( ६००--८०० इ. स. ) इतिहासास वराहमिहिराचें भूगोल-वर्णन महत्त्वाचें आणि दुसऱ्या कालविभागाच्या इतिहासास ( ८००--१००० इ. स. ) स्कंधपुराणांतील हिंदुस्थान-वर्णन महत्त्वाचें, त्याचप्रमाणें या तिसऱ्या कालविभागांस ( १०००--१२०० ) हें राजशेखरकृत भूगोलवर्णन फारच उपयोगाचें आहे. मात्र एवढें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं आमचे हे स्वदेशी ग्रंथकार अल्बेरूनीइतके विश्वसनीय नाहींत. कारण पूर्ण चौकस बुद्धीनें ते लिहीत नाहींत. प्राचीन परंपरागत गोष्टी चालत आल्या तशा हल्ली असोत किंवा नसोत, ते धुसडुन दिल्या शिवाय रहात नाहींत. त्याप्रमाणें राजशेखरनें पुष्कळ जुन्या देशांची नांवें आपल्या यादींत दिलीं आहेत. एवढी प्रस्तावना करून काव्यमीमांसा अध्याय १७ यांत राजशेखरनें दिलेली हिंदुस्थानची भूगोलिक माहिती पुढें देतों.

हिमालयापासून दक्षिण समुद्रापर्यंत भरतखंडास जो जिंकितों त्यास सम्राट् म्हणतात. आणि कुमारीपुरीपासून बिंदूसरापर्यंत सर्व देश जो जिंकेतो त्यास चक्रवर्ती म्हणतात,

हिंदुस्थानांत मलयादि सात पर्वत ( कुलपर्वत ) आहेत. पूर्व पश्चिम समुद्रांमधील व हिमालय-विंध्य पर्वतामधील प्रदेशास आर्यावर्त म्हणतात- ( या लक्षणांत आर्यावर्ताची मर्यादा पूर्वेस वाढवून त्यांत बंगाल सामील केला आहे ) या देशांतील लोकांपासून आचार शिकावा.

यापैकीं बनारसच्या पूर्वेकडील भागास पूर्वदेश म्हणतात. तेथील लोक म्हणजे देश अंग, कालिंग, कोसल. उत्सल मगध मुद्गर विदेह नेपाल पुड्र प्राराज्योतिष ताम्रलिप्ति मलद मत्त वर्तक सुह्म ब्रह्मोत्तर इत्यादि आहेत. मोठे नद शोण आणि लौहित्य आणि नद्या गया करतोया कशिपा इत्यादि आहेत, तेथील मुख्य वस्तु लवली ग्रंथपर्णिका अगरु द्राक्ष, कस्तूरी वगैरे आहेत.

माहिष्मतीच्या दक्षिणेस दक्षिणापथ आहे. तेथील लोक महाराष्ट्र माहिषक अश्मक, विदर्भ, कुंतल, क्रथकैशिक, शूर्पार, कांची, केरल, कावेर, मुरल वनवासिका, सिंहल, चोड, पाण्डव, पल्लव, गंग नासिक्य

कुंकण, कोल्लगिरि, वल्लर, वगैरे आहेत तेथील नद्या नर्मदा, तापी, पयोष्णी, गोदावरी, कावेरी, भीमरथी, वेणा, वंजुरा, तुंगभद्रा, ताम्रपर्णी, उत्पलवती, रावण, गंगा वगैरे होत उत्पन्न होणारे विशेष पदार्थ म्हणजे मलयावरील चन्दन आणि मोतीं.

देवसभा नदीच्या पश्चिमेस पश्चिमदेश. तेथील लोक म्हणजे देवसभा सुराष्ट्र, दासेरक, त्रवण, भृगुकच्छ, कच्छ, आनार्त, अर्बुद, ब्रह्मवथ, यवन वगैरे होत नद्या सरस्वती प्रभावती, मही, हुंडिरा वगैरे आहेत, तेथिल विशेष उत्पन्न होणारे पदार्थ करीर, पीलु, गुगुल, खर्जूर व क्रमेलक ( उंट ) होत.

पृथूदकाच्या उत्तरेस उत्तरापथ–तेथील लोक शक, केकय, बोकण, हूण, वपायुज, काम्बोज, वाल्हिक, बल्लव लिम्पाक; कुलूत; कीर; तंगण; तुषार; तुरुष्क, हारहूण, हूहूण, साहुड, हंसमार्ग, रामठ; करकण्ठ इत्यादि राहतात. नद्या गंगा, सिन्धु, सरस्वती, शतद्र, चन्द्रभागा, यमुना, ऐरावती, वितस्ता, विशापा, कुहा देविका इत्यादि. उत्पन्न होणाऱ्या विशेष वस्तु सरळ देवदारु, रुद्राक्ष, कुंकुम, चमर, अजिन, सौवीर, स्रोतोंजन सैंधव आणि घोडे.

"या चार देशांच्यामधील प्रवेश मध्यदेश होय." दुःखाची गोष्ट ही कीं मध्यदेशाबद्दल त्यानें वरप्रमाणें सविस्तर वर्णन न करतां एवढेंच म्हटलें आहे कीं, येथिल लोक, नद्या व उत्पत्तीचे पदार्थ सर्वांस ठाऊकच आहेत. यामुळें पुढीच काळाचे लोक या महत्त्वाच्या माहितीस मुकले.

"गंगा यमुना मधील प्रदेश विनशनाच्या पूर्वेस आणि प्रयागाच्या पश्चिमेस अन्तर्वेदी होय. या देशाला उद्देशून दिशा सांगाव्या असें प्राचीन ग्रंथकार सांगतात. मी ( यायावर गोत्री ) असें आणखी सांगतो कीं यांतहि महोदय ( कनोज पासून दिशा व अन्तरें सांगावीं.

निरनिराळया देशांतील लोकांचे वर्ण येणें प्रमाणें. पूर्वेकडील लोकांशा सांवळा, दक्षिणेकडी लोकांचा काळा, पश्चिमेकडील लोकांचा पाण्डु आणि उत्तरेकडील लोकांचा श्वेत. कवीच्या वर्णनांत सांवळा आणि काळा यांत फारसें अन्तर नाहीं. तसेच पांण्डु व श्वेत यांत नाहीं. विशेष गोष्ट हीं कीं पूर्वेकडील देशांतील रजपूतादि स्त्रियांचा वर्ण गौरच दाख-

वावा पाण्डु किंवा श्वेत ). त्याप्रमाणें दक्षिणेकडील लोकांतहि दाखवावा.

वरील वर्णासंबंधींची विधानें महत्त्वाचीं आहेत. यावरून असें दिसतें कीं पूर्वेकडील व विशेषतः दक्षिणेकडील लोकांत जास्त भरणा द्रविडी-वंशाच्या लोकांचा असतो. आणि पश्चिमेकडीकडे व विशेषतः उत्तरेकडे आर्य वर्णाचें लोक जास्त आहेत. दक्षिण व पूर्व इकडेहि वरिष्ट जातीचे लोक रजपूत-ब्राम्हण वगैरे पाण्डु किंवा गौर वर्णाचे असत हें विधान आजमितीस या चारी प्रान्ताच्या लोकांस लागू पडतें,

उत्तरेकडील लोकांत काश्मीर व काबूल मुख्य आर्यदेश यांचा उल्लेख नाहीं याचें आश्चर्य वाटतें. आणि जे लोक सांगितले आहेत ते बहुतेक तुराणी जातीचे किंवा तुराणी-आर्य मिश्र जातीचे आहेत. यवनांचा उल्लेख पश्चिमेकडे आहे, अर्थात ते सिंधचे आरब मुसलमान होत. दहाव्या शत-काच्या प्रारंभीं काबुल अद्याप यवनानीं किंवा तुर्कांनीं जिंकलें नव्हतें. ज्या वेळीं राजशेखरानें हा ग्रंथ लिहिला त्या वेळीं काबूलनें अद्याप पंजाब जिंकलें नव्हतें, परंतु काश्मीरचा उल्लेख येणें जरूर होतें. त्याचप्रमाणें त्रिगर्तजालंदराचा. पंजाबच्या नद्या सर्व सांगितल्या आहेत; ( काबुल नदी ) ही सांगितली आहे; व उत्पन्नांत मीठ व केशर पंजाब व काश्मी-रच्या वस्तु यांचा उल्लेख आहे.

# प्रकरण २ रे.

## बुखाऱ्याचे सामानी बादशहा.

गझनीच्या तुर्की राज्याची संस्कृति आणि शक्ति नीट लक्षांत येण्यासाठीं ज्या सामानी बादशाहीखालीं गझनीचें राज्य उत्पन्न होऊन वृद्धि पावलें त्या बादशाहीची माहिती वाचकांस होणें अवश्य आहे. रा. ए. सो. च्या जर्नल बंगाल जिल्द १५ भाग १ मध्यें एका लेखकानें उतबीय इतर इतिहासकार यांतून माहिती एकत्र करून सामानी बादशाहा संबंधें एक लेख लिहिला आहे, त्यांतून पुढील त्रोटक हकीकत आम्ही देतों. हें साम्राज्य एका पारशी जरतुष्ट धर्मी पण पुढे मुसलमान झालेल्या एका सरदारानें स्थापिलें. त्याचें नांव असद. त्याचा पुत्र अहमद हा ज्यास्त पराक्रमी होऊन त्यानें समरकंद, बुखारा, आणि या प्रान्तावर सत्ता बसविली. त्याचा पुत्र नस्र. त्याचा पुत्र इस्माइल हा सामानी वंशाचा पहिला प्रख्यात बादशाह इ स. ९०३ मध्यें गादीवर आला. यानें शास्त्र आणि वाङ्मम ( पर्शियन व आरबी ) यांचा पुरस्कार केला आणि बोखारा शहर प्रख्यातीस आणिलें. या बादशहांस अमीर म्हणत. ही संज्ञा पुढें छोटे जागीरदारहि घेऊं लागले. सबुक्तगीनानेंहि हीच पदवी धारण केली व तेथून हिंदुस्थानांत हम्मीर या स्वरूपानें आली. इतिहासकारानीं इस्माइलापासून प्रत्येक अमीरास एक विशिष्ट विशेषण लाविलें आहे. या पहिल्या बादशहास अमीर 'माजी' असें म्हणतात. याचा पुत्र अहमद, अमीर शहीद ( धर्म युद्धांत मेल्यानें ) या नांवानें प्रसिद्ध आहे. याचा पुत्र नस्र ( दुसरा ) अमीर

सईद किंवा गंभीर हें नांव पावला. या राजाच्या अमदानींत एक तांब्या पितळ्याचे काम करणारा (कासार) याकूब-इ-लेस या नांवाचा मोठा धाडसी उपद्व्यापी वीर उनाड लोकांची टोळी जमवून हिंदुस्थानावर चालून आला. त्यानें प्रथम हिरात घेतलें ( २०१ हि. ९१२इ. स.). या वेळचें हिंदुस्थान म्हटलें म्हणजे बहुतेक सर्व अफगाणिस्तान व्यापून होतें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. या सिन्धु-पश्चिम भागांचे काबुलिस्तान व झाबुलिस्तान असे दोन प्रान्त होते. ह्मणजे काबुल व झाबुल यापैकीं उत्तरेकडील काबुल प्रान्तांत लल्लिय यांनें स्थापित केलेला ब्राह्मण शाही वंश राज्य करीत होता. ( लल्लिय ऊर्फ कल्लर भाग १ पृ. पाहा ) दक्षिणेकडील झाबुल प्रान्तांत भाटी जातीचे (बहुधा) क्षत्रिय राजे राज्य करीत होते. याकुब इ लेसने झाबुल घेतले इतकेच नव्हे तर काबुलहि घेतले आणि त्या दिवसापासून काबुलचा किल्ला मुसलमानांच्या ताब्यांत राहिला, हिंदूनी परत घेतला नाहीं. काबुलच्या शाही हिंदु राजांनीं शहर परत घेतलें आणि त्यांनीं आपली राजधानी सिन्धु नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील वाहिंड ( उदभांड) येथे केलीं. या राजधानी विषयी आम्ही पुढें अधिक सांगणार आहों याकूब इचेस यानें गझनी ( एक लहान खेडें ) जवळ किल्ला बांधून गझनी शहराचा पाया घातला. भोंवतालचा सर्व झाबुलिस्तान प्रान्त जिंकून रजपूतांस पूर्वेस हाकून दिलें. हे भाटी रजपूत सिंधु ओलांडून पंजाबांत येऊन राहिले. हा हल्लीच्या अफगाणिस्थानाचा भाग त्या वेळच्या इतिहासांत रहभुतांचा देश म्हणून प्रसिद्ध आहे. पर्शियन लिपींत रजपूतबद्दल रहभूत वाचलें गेले असल्यानें ही चुकी स्पष्टपणें झालेली दिसते ( रॅव्हर्टीचा अफगाणिस्थान पहा ). परंतु याकुब इलेस यास सामानी राज्यास हाकून देता आले नाहीं किंवा गझनी येथें राजा स्थापिता आले नाहीं. तो धूमकेतूप्रमाणें कांहीं दिवस तपली आणि मग अदृश्य झाला.

नस्र दुसरा याचा पुत्र नुह यास अमीर हमीद संज्ञा आहे. या शद्बाचा अर्थ स्तुत्य असा आहे ( ३३४ हि=९४३ इ.). याच्या वेळीं प्रथम तुर्की गुलाम नोकरींत राहून वर्चस्व स्थापूं लागले. प्रथम सामानी राजांनीं यांस आपले रक्षक ( Guards ) म्हणून ठेविले. जक्झर्तीस नदी सरहद्द असून पलीकडील तुर्क लोक सैन्यांतहि भरती होऊं लागले. तुर्की मुलें गुलाम म्हणूनहि विकत घेतले जात आणि शूर आणि धाडसी वीर तरुण तुर्की गुलाम फौजेंत अधिकाराच्या जागेवरहि नेमले जाऊं लागले. प्राच्य देशांच्या इतिहासांत परकी लोक रक्षक म्हणून किंवा सैन्यांत भरती होऊं लागले म्हणजे रक्षिताचा किंवा नेमणाऱ्यांचा नाश अखेर होतो असें दिसतें. याप्रमाणें बुखारा येथील पर्शियन ( सामानी ) राज्याचा तुर्कांनीं नाश केला व गझनी येथें आपले राज्य स्थापिलें; या गझनीच्या राज्याचा नाश ( दिल्ली येथील ) अफगाणांनीं केला; दिल्ली येथे अफगाणांचा अशाच रीतीनें मोंगलांनीं रक्षक होऊन नाश केला, मोंगलांचा मराठ्यांनीं आणि मराठयांचा इंग्रजांनीं पुणें येथें केला. तात्पर्य जें राष्ट्र किंवा राजकुल परकीयांस सैन्यांत भरती करून त्यावर आपली भिस्त ठेवतें तें लयास गेलेंच पाहिजे, मग तें सैन्य थोडें का असेना ?

नूहच्या अमदानींत घडलेली एक मनोरंजक गोष्ट येथें सांगण्यासारखी आहे; त्यावरून एखादा न्यायी पण कडक मंत्री असंतुष्ट सरदारांच्या रोषास कसा बळी पडतो हें वाचकांस दिसेल. राजवाड्याचा समोर दोन सुरूचे वृक्ष होते त्यांस जोरानें वाकवून एका अप्रिय झालेल्या नूहच्या मंत्र्याच्या दोन्ही पायांस बांधले आणि मग ते सोडून दिले, तेव्हां साहजिकच ते सरळ उभे होऊन त्या मंत्र्याचें शरीर वर उचललें जाऊन फाडलें गेलें. इतिहासकार म्हणतो

कीं "न्यायीपणाचा अतिरेक अथेन्सप्रमाणें बुखारा येथेंहि प्राणघातक झाला."

नूहच्या पश्चात् त्याचा पुत्र अबदुल मलिक बादशाह झाला. यास अमीर रशीद (धर्मस्थिर) असें नांव मिळालें आहे व त्याच्या नंतर मनसूर गादीवर आला (३४९ हि० ९५९ इ.). यास अमीर सदीद (धीर) म्हणतात. याच्या वेळीं बलिष्ठ तुर्की सरदार स्वतंत्र लहान राज्यें स्थापूं लागले. अबदुल मलिक याचा हाजिब (द्वाररक्षक) अलप्तगीन तुर्क होता त्यानें याप्रमाणें गझनीचे लहान स्वतंत्र संस्थान स्थापिलें. याचा गुलाम सबुक्तगीन हाहि कांहीं दिवस सामानी बादशहांचा प्रतिहार होता.

मनसूरच्या मागून नूह दुसरा राज्यावर आला याने ९८६ इ. पासून १००१ इ. पर्यंत राज्य केलें. यापूर्वींच अल्पतगीन मरण पावून त्याच्या नादान मुलास बाजूस सारून तुर्की अमलदारांनीं त्याचा जावई सबुक्तगीन यास गझनीच्या राज्यावर बसविले होतें. सबुक्तगीन मोठा शूर असून अत्यंत न्यायी होता. ही योजना नूहनेंहि मान्य केली. पुढें जेव्हां काशगार येथील तुर्कांचा राजा इलेकखान यानें बुखाऱ्यावर स्वारी केली तेव्हां नूहने सबुक्तगीनची मदत मागितली. आणि आपल्या धन्याच्या मदतीस सबुक्तगीन मोठी फौज आणि हिंदुस्थानच्या राजापासून मिळविलेले तीनशे हत्ती (याची हकीकत पुढें येईल) घेऊन स्वतः गेला. या युद्धांत सबुक्तगीनचा पुत्र महमूद हा लहान होता तरी हाजर होता व त्यानें लढाईच्या कसबांत आपला पहिला धडा घेतला. या लढाईत इलेकखानाचा पराभव झाला. आणि बादशाह नूहने संतुष्ट होऊन सबुक्तगीनास नसीरुद्दोला (दौलतीचा आधार) ही पदवी दिली आणि महमुदास सैफुद्दौला (दौलतीचा खड्ग) ही पदवी दिली.

काशगारच्या तुर्कांचा याप्रमाणें पराभव झाला तरी सामानी बाद-

शाहांचें दिवस मोजके बाकी होते; व राज्यांत नोकर झालेले तुर्क आणि राज्यावर बाहेरून स्वाऱ्या करणारे तुर्क यांनीं त्यांचें राज्य लौकरच लयास नेलें. या नाशाच्या पायऱ्या मनोवेधक आहेत. नूह मरण पावून त्याचा पुत्र मनसूर गादीवर आला परंतु लौकरच त्याच्या अधिकाऱ्यांनीं त्याचे डोळे काढले आणि गादीवर एक मूल अब्दुल मलिक बसविलें. ही संधि साधून इलेकखानानें बुखाऱ्यावर पुन्हा स्वारी केली आणि शहर काबिज करून बादशाहीच्या प्रत्येक वारसास पकडून कैदेंत टाकलें. पण मुंतसिर नांवाचा एक वारस राजपुत्र स्त्रीच्या वेशानें कैदेंतून पळाला. त्यानें राज्य परत मिळवि-ण्यासाठीं शूरत्वानें अनेक प्रयत्न केले. परंतु दारा शिकोह प्रमाणेंच तो दुर्दैवी असल्यानें त्याला जागजागीं अधिकाऱ्यांनीं, किंबहुना महमुदाच्याहि अधिकाऱ्यांनीं विरोध केल्यामुळें एका शहरांतून दुस-ऱ्यास या प्रमाणें सारखें पळावें लागलें. शेवटीं जंगलांत एक अरबांचा तांडा पडला होता त्यांत आश्रय घेण्यास तो गेला. रात्रीं तांड्याच्या मुख्यानें त्याजवर हल्ला करून त्यास ठार केलें. आपल्या पूर्वीच्या मालकाबद्दल महमुदास बराच आदर असल्यानें त्यानें या गुन्हेगारास पकडून त्यास हालहाल करून मारिलें. याप्रमाणें सामानी वंशाचा आणि राज्याचा अन्त झाला.

सामानी राज्याची संस्कृति व राज्यव्यवस्था साहाजिकच गझनीच्या राज्यांत वारसदारीनें आली. सामानी साम्राज्य फार मोठें असून त्यांत खोरासान आणि मवारुन्नहर हे मुख्य प्रान्त असून शिवाय सीस्तान, कर्मान्, जुर्जान, रे, तबरिस्तान वगैरे आणखी मुलूख सामील होते. सामानी राजांच्या राज्यकाल इस्माईलपासून शंभर वर्षें असून वर दोन वर्षें आणि १६ दिवस असा नक्की, तारीख-इ–यमीनी ( यमीन म्हणजे महमूद याचा इतिहास ) या ग्रंथांत उतबीनें दिला आहे. ( उतबीनें प्रत्येक राजाचें नांव व पदवी

व दिवसांसह राज्यकाल आपल्या ग्रंथांत दिला आहे). म्हणजे इ. स. ९०३ पासून सुरू होऊन १००५मध्यें हें साम्राज्य लयास गेलें. या साम्राज्याचे पुष्कळ भाग महमुदानें जिंकून आपल्या राज्यास जोडले हें साहजिकच होतें. मुख्यतः खोरासान आणि ख्वारिझम हे सुपीक भाग या अर्वाचीन पार्शियन साम्राज्याच्या संस्कृतीचे केन्द्र होते, ते महमुदानें प्रथम जिंकून आपल्या सत्तेखालीं आणिले. पार्शियन भाषा या प्रान्तांतील विद्वानांनीं या वेळीं फार उर्जित स्थितीस पोंचविली. अर्थात् हिंदुस्थानच्या मध्ययुगीन काळांत अन्तर्वेद आणि काश्मीर व त्याहून अर्वाचीन काळांत महाराष्ट्र ज्याप्रमाणें पंडितांचे प्रान्त होते त्याप्रमाणें सामानी काळांत खोरासान व ख्वारिझम हे प्रांत विद्वानांचें वसतिस्थान होतें. अर्थात् विद्वान लोक या प्रांतांतून गझनीच्या दरबारांत व पुढें दिल्लीच्या दरबारांत येत राहून मान व अधिकार पावत. यामुळेंच सरकारी कामाची सामान्यभाषा गझनी व दिल्ली या दोन्ही ठिकाणीं पर्शियन होती आणि आरबी भाषा धार्मिक कामाची व परराष्ट्रीय किंवा विशेष महत्त्वाच्या राजकीय लेखांची भाषा होती. राजव्यवस्थेची पद्धत आणि अधिकाऱ्यांचीं नांवें बोखाऱ्यांतूनच घेतलीं गेलीं यांत नवल नाहीं. या स्थितीचें आणि भरतखण्डांत मध्ययुगीन कालांत असलेल्या स्थितीचें बहुतेक साम्य आहे. मध्ययुगीन हिंदुराज्यांत संस्कृत (आरबीप्रमाणें) राजकीय महत्त्वाच्या लेखांची भाषा होती. दरबारांत विद्वान लोक प्राकृत भाषा (पर्शियन प्रमाणें) बोलत आणि सामान्य लोक यावेळीं अस्तित्वांत आलेल्या संस्कृत-प्राकृत-मिश्रित हल्लींच्या लोकभाषा हिंदी, मराठी वगैरे बोलत. गझनीमध्यें तीन भाषा या वेळीं चालत. धर्माकरितां आरबी, वरिष्ठ लोकांच्या दरबारी व्यवहारांत पार्शियन आणि फौज व गुलाम यामध्यें तुर्की भाषा चाले. बेहकीच्या

ग्रंथावरून असें दिसतें कीं महमूद सुद्धां नोकरांशीं जेव्हां कांहीं खासगी बोलावयाचें असे तेव्हां तुर्की भाषेंत बोले.

## गझनी राज्याची स्थापना.

जें गझनीचें राज्य पुढें महमुदाचे वेळीं इतकें बलिष्ट झाले कीं, पश्चिमेकडे खुरासान, ख्वारिझ्म वगैरे प्रांत व पूर्वेकडे सबंध पंजाब प्रान्त त्याच्या सत्तेखालीं आले, तें प्रारंभीं अल्पतगीन यानें स्थापिलें हें वर आलें आहे. बुखाऱ्याचा सामानी बादशहा मनसूर याचा तो सरदार होता. महमुदाचा इतिहास शिवाजीच्या इतिहासाशीं इतका जुळता आहे कीं त्यांचे बाप व आजे यांचेहि इतिहास सारखे आहेत. भोसल्याच्या राज्याचें केंद्र महाराष्ट्रांतील जागा जशी प्रथम मालोजीला मिळाली, त्याप्रमाणें गझनीच्या साम्राज्याचें केंद्र गझनीची जागीर प्रथम अल्पतगीनानें संपादन केली. तो प्रथम मनसूरचा बाप अबदुल मलिक याचा हाजिब ( द्वाररक्षक ) होता. तो नंतर खुरासानचा सुभेदार झाला. अबदुल मलिक वारल्यावर गादीवर मनसूर बसते वेळीं त्यास त्यानें विरोध केला, त्यामुळें त्यास सामानी साम्राज्य सोडावें लागलें. हिंदुस्थानाच्या प्रान्तांत शिरून त्यानें प्रथम गझनी येथें लहान राज्य स्थापिलें. त्याचा गुलाम सबुक्तगीन प्रथम त्याप्रमाणें सामानी बादशहाचा द्वाररक्षक होता; व त्यास त्यानें आपली मुलगी दिली होती.जरी गझनीची जागीर त्यानें स्वतः कमाविलेली होती तरी तो आपल्यास सामानी बादशहांचा मांडलिक समजत असे. शहाजीनें त्याचप्रमाणें पुणें व सुपे ही जागीर स्वपराक्रमानें निजामशाहींतून मिळविली होती तरी तो आपल्यास व आपल्या जागीरीस विजापुरकराच्या सत्तेखालील मानीत असे. सबुकतगीनाजवळ चांगली तयार फौज असल्यामुळें त्याचा मान व अधिकार सामानी दरबारांत मोठा असे; त्याचप्रमाणें शहाजीजवळहि निवडक व कसलेली फौज

असल्यानें विजापुर दरबारचा तो एक महत्त्वाचा महाली होता. आणि सबुक्तगीन सामानी दरबारच्या शत्रूशीं लढण्यांत नेहमीं गुंतला असे, ज्याप्रमाणें शहाजी विजापुरकराच्या शत्रूशीं नेहमीं लढण्यास जाई. यामुळें शहाजीप्रमाणें सबुक्तगीनासहि बऱ्याच आणखी विस्तृत जागिरी मिळाल्या. बहूतेक अंशीं ते दोघेहि स्वतंत्र सत्ताधारी होते तरी दिसण्यांत ते आपल्या वरिष्ठ बुखारा किंवा विजापुर येथील सत्तेचे मांडलिक असत. दोघांनींहि स्वतंत्र राज्याचा पाया घालून त्याची जरूरी सामुग्री (फौज व मुलूख ) संपादन केली होती; परंतु त्या दोघांनीं आपल्या आयुष्यांत स्वातंत्र्य पुकारण्याची महत्त्वाकांक्षा धरली नाहीं. हे कार्य दोघांनींहि आपल्या पुत्रांवर टाकून स्वातंत्र्यस्थापनेचें श्रेय पुत्रांस दिलें.

सबुक्तगीनाची नेहमींची पदवी अमीर असून इलेकखान तुर्कांचा पराभव करण्याबद्दल बादशहा नूहनें त्यास नासिरुद्दीन हा खिताब दिला होता. महमुदाचा समकालीन इतिहासकार अल्उतबी सबुक्तगीनास नेहमीं नासिरुद्दीन या नावानें संबोधितो. त्याच्या न्यायीपणाची आणि शिस्त राखण्याची उदाहरणें पुढें देऊं. एका तुर्की शिपायाच्या हातांत कोंबड्या पाहून, कोठून आणल्या विचारतां विकत घेतल्या असा जबाब मिळाला. दाखविलेला विकणारा विचारपूस करतां म्हणाला " तुर्क शिपाई कधींच पैसे देत नाहींत." तेव्हां सुबुक्तगीनास अतिशय राग येऊन त्यानें त्या तुर्की शिपायास सर्व फौजे समोर उभा करून त्याच्या कानास भोकें पाडून त्या कोंबड्या त्याच्या कानांस लटकावल्या. अर्थात् त्यांच्या फडफडण्यानें त्याचा जीव अर्ध मेला झाला. अशा कडक शिस्तीनें त्या अडदांड तुर्कांस त्यानें आपल्या कह्यांत ठेविलें आणि लोकांच्या उत्कर्षांत भर टाकली.

अशा न्यायी राजास आणि विशेषतः महमुदाच्या बापास उत्तम कुळांत घालणें हें लोककल्पनेला साहाजिक पसंत वाटलें.

असें मानतात कीं सबुक्तगीन हा अल्पतगीनचा गुलाम असला तरी तो एका तुर्की सरदारांच्या कुलांत जन्मला असून हें कुळ पर्शियन लोकांचा शेवटचा बादशाह यज्दगिर्द याच्या एका मुलीपासून उत्पन्न झालें होतें. ही गोष्टहि शहाजीप्रमाणेंच दिसते, आणि शहाजीच्या कालींच तो शिसोदिया रजपुतांच्या वंशांतील आहे असें मानलें गेलें. उच्च वंशात सबुक्तगीन जन्मला असल्याची हकीकत खुद्द महमुदानें सांगितली (तबकात नासिरी). महापुरुषाची उत्पत्ति एखाद्या विख्यात कुलांतच झाली पाहिजे अशी अवश्यकता नाहीं. परंतु राष्ट्राच्या महापुरुषांना विख्यात कुलोत्पत्ति, कल्पित किंवा खरी, सांगितल्याशिवाय लोकसमजुतीचें समाधान होत नाहीं. असो, ही यज्दगिर्दाच्या वंशातील उत्पत्ति खरी असो वा खोटी असो शहाजी व सबुकतगीन यांचें साम्य याहि बाबींत दिसतें.

लोकसमजुतीनें ज्याप्रमाणें शिवाजीस देवाचा अवतार मानतात त्याचप्रमाणें मुसलमान लोक महमुदाच्या जन्मासंबंधानेंहि दैवी अंश मानतात. कारण जसा हिंदूंना शिवाजी धर्मदृष्ट्या प्रिय आहे तसा धर्मदृष्ट्या मुसलमानांना महमूद प्रिय वाटतो. सबुक्तगीन शिकारीस गेला असतां एक हरिणाचें पाडस त्यास मिळालें. तें घोड्यावर घेऊन तो घरीं येऊं लागला. त्या पाडसाची माता घोड्यामागें दूरवर धांवत येत असलेली पाहून सबुक्तगीनाच्या अन्तःकरणांत दया उत्पन्न झाली व त्या मातेची कींव करून त्यानें तें पाडस सोडून दिलें. त्यास स्वप्नांत रात्रीं पैगंबर दिसून त्यानें त्याच्या या दयाशील कृत्याची प्रशंसा केली व त्यास मोठें राज्य मिळेल असा आशीर्वाद दिला. अशीहि आख्यायिका आहे की, महमुदाचा जन्म झाला त्या रात्रींहि सबुक्तगीनास एक भाविवैभवसूचक स्वप्न पडलें व आपल्या स्वयंपाक घरांतून एक प्रचण्ड वृक्ष उत्पन्न झाला असें दिसलें. हें स्वप्न तो मंत्र्यास सांगत असतां महमुदाच्या जन्माची त्यास खबर पोंचली.

पैगंबर ज्या वारीं उत्पन्न झाला तो वार ते दिवशीं असल्यानें सबुक्तगीन उद्गारला, " मी पुत्राचें नांव महमूद ठेवितों. " अशा गोष्टी वीरांबद्दल त्यांच्या महत्वप्राप्तीनंतर उत्पन्न साहाजिकपणें होतात हें सांगावयास नको. तिसरी आख्यायिका अशी आहे कीं ज्या दिवशीं महमूद जन्मला त्या दिवशीं वहिंड शहरांतील मुख्य देवालय खालीं पडलें. मुहम्मद पैगंबराच्या जन्माबरोबर पर्शियन बादशहांच्या राजवाड्यांतील आतशघर धरणीकंपानें नष्ट झाले या आख्यायिकेसारखी ही गोष्ट असून यावरून असें सूचित केलें जातें कीं हिंदु लोकांच्या मूर्तिपूजेवर महमूद आपल्या आयुष्यभर हल्ला चढविणार. या आख्यायिका नमूद केल्यावर ऐतिहासिक दृष्ट्या वर्णन करावयाचें म्हणजे तबकातनासिरीमध्यें महमुदाची जन्मतिथि हिजरी स. ३६१ मोहरम ता. १० अशी दिली आहे. ही तिथि म्हणजे इ. स. ९७१ आक्टोबर २ होय (इलियट २ पा. २६१). परंतु फिरिश्ता हि. ३५७ मुहरम ८ ही तिथि देतो (सदर). ही तारीख चार वर्षें सुमारें अगोदर पडते. (आश्चर्याची गोष्ट कीं शिवाजीच्याहि जन्ममिती बद्दल दोन मतें असून त्यांत तीन वर्षांचा फरक आहे.)

सबुकतगीनानें ९७७ इ. पासून ९९७पर्यंत राज्य केलें. त्यानें आपलें राज्य दक्षिणेकडे कन्दहार व झाबुलिस्तानची राजधानी बस्त जिंकून वाढविलें होतें. पूर्वेकडे हिंदुस्थान होतें तिकडेहि राज्य वाढविण्याचा त्यानें प्रयत्न केला होता. हिंदूंचा आणि तुर्कांचा लढा मुख्यतः सबुक्तगीनच्या वेळीं सुरू झाला. या बाजूकडील त्याचा शेजारी समकालीन राजा जयपाळ हा होता. या जयपाळाचें वर्णन मुसलमानी तवारिखांत हिंदुस्थानचा राजा, काबुलचा राजा, आणि लाहोरचा राजा असें निरनिराळ्या तऱ्हेचे येतें. तेव्हां हा राजा कोण व कोठील होता हें पुढील टिप्पणींत ठरविलें आहे. कारण सर व्हिन्सेंट

स्मिथ पर्यंत सुद्धां हा प्रश्न अनिश्चित दिसतो आणि निरनिराळीं मतें आपल्या दृष्टीस पडतात.

## टिप्पणी–हिंदुस्थानचा राजा जयपाळ.

मुसलमान इतिहासकारांनीं सांगितलेला " हिंदुस्थानचा राजा जयपाळ " हा कोण व कोठील होता ? आमच्या मतें स्पष्टपणें हा काबूलचा शाही ब्राम्हण राजा जयपाल होय. पूर्वभाग (पृ. १५७ पा. २०२) यांत वर्णिलेल्या लल्लिय राजानें स्थापिलेल्या शाही राजघराण्यांतील चौथा राजा जयपाल हाच मुसलमान तवारिखांचा जयपाल होय असें स्पष्ट दिसतें. परंतु हें स्पष्ट व साहजिक अनुमान हल्लीं आधारभूत मानलेल्या सर व्हिन्सेंटस्मिथ यांच्या हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास या पुस्तकांत अमान्य केलें आहे. या पुस्तकाच्या १९१५च्या तिसऱ्या आवृत्तींत पुढील मजकूर आहे. " या काळांत जयपाल नांवाचा राजा पंजाबांत राज्य करीत असून याची राजधानी भटिंडा होती. हें शहर लाहोरच्या दक्षिण नैऋत्य दिशेस आणि पतियाळाच्या पश्चिमेस आहे. याचें राज्य सिन्धु नदीचें वरील खोरें तसेंच पंजाबचा बहुतेक प्रदेश सिन्ध प्रान्ताच्या उत्तरेस पश्चिमडोंगरापासून पूर्वेस हक्रा नदीपर्यंत इतक्या मुलुखांवर होतें. " हें या प्रदेशाचें वर्णन जरी बहुतेक बरोबर आहे तरी यांत गर्भित रीतीनें असें दाखविलें आहे कीं हा राजा आणि पूर्व–वर्णित काबुलचा ब्राम्हण राजा जयपाल ह्या भिन्न व्यक्ति होत. या पानावरील (पृ. ३८२ खालच्या) टिपेंत स्मिथ आणखीं असें म्हणतो कीं " हल्लींच्या मताविरुद्ध असलेलें हें संक्षिप्त विधान रॅव्हर्टीच्या मतानुसार दिलें आहे " याचा ज्यास्त खुलासा स्मिथनें इं. अॅ. व्हा. ३७ (१९०८) यांत चन्देलांविषयीं जो लेख लिहिला आहे त्यांत केला असून तेथें " तबकात–इ–नासिरी ' या ग्रंथाचे रॅव्हर्टीनें केलेल्या भाषान्तराचा हवाला ' वाहिंडा वरील टीपेंत असा दिला असून आपल्या टीपेंत आणखी असे म्हटलें आहे कीं जयपाल म्हणजे वाहिंडचा जयपाल असें जें मिस डफनें आपल्या "Chronology" या पुस्तकांत म्हटलें तें चुकीचें आहे, हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास पृ. ३८३ खालील टिपेंत स्मिथ आणखीं

असें म्हणतो कीं ओहिंड येथील राजवंश आणि भटिंडा येथील राजवंश यांचा इलियटनें घोंटाळा केला आहे. आणि यामुळें त्यानें दिलेली सर्व हकीकत दुर्बोध झाली आहे." परंतु रॅव्हर्टीनें दिलेली वरील टिपेंतील प्रमाणें व त्याचप्रमाणें या विषयावर जो पुरावा हल्लीं उपलब्ध आहे त्यां-तील प्रमाणें यांचा विचार करतां आम्हास असें वाटतें कीं या जयपा-लाचें जें एक निराळें राज्य स्मिथनें स्थापित केलें आहे तें चुकीचें असून पूर्वींचें इलियट व मिस डफ या लेखकांचें मत ग्राह्य आहे. याची मिमांसा पुढील प्रमाणें.

प्रथम हें सांगणें अवश्य आहे कीं रॅव्हर्टी यानें जो हा नवीन राजा कल्पिला याचें कारण असें दिसतें कीं नासिरी ग्रंथांत वाहिंडच्या ऐवजीं वामंड असें वाचलें गेलें. हा शब्द प्रथम नासिरी ग्रंथांत पुढील वाक्यांत आला आहे." ज्या दिवशीं महामुदाचा जन्म झाला त्या दिवशीं पर्शावर-मधील इंडस्नदीच्या कांठीं वामंड शहरांत एका मूर्तीचें देवालय पडलें" रॅव्हर्टीनें हें देवालय सिन्धुनदीच्या पूर्वेस असलें पाहिजे असें मानून वामंड हें नांव निरनिराळ्या तऱ्हेनें वाचण्याचा प्रयत्न केला. येथें हें सांगितलें पाहिजे कीं पार्शियन लेखांत व कित्येकदां आरबी लेखांतहि हिंदी नांवांचा योग्य उच्चार करण्यांत टिंबें गाळलीं गेल्यानें वारंवार चुक्या होतात; कारण ब, प, त, न हीं अक्षरें विशिष्ट टिंबें गळल्यानें सारखींच दिसतात, तसेंच व आणि द यांचाहि घोटाळा होतो आणि ह, च, ज यांचा भेद राहत नाहीं. कित्येक तर्क केल्यावर कर्नल रॅव्हर्टीनें शेवटीं हें शहर बाथिंडा असलें पाहिजे असें ठरविलें व याला आधार जम्मूच्या राजांचा एक पार्शियन भाषेंतलि इतिहास घेतला. हा इतिहास एका हिंदुलेखकानें लिहिला असून त्यांत असें विधान आहे कीं जय-पालची राजधानी व राहाण्याचें ठिकाण 'बथिंडा' होतें. हा इतिहास कोठें आहे व कधीं लिहिला गेला याचा खुलासा नाहीं. आणि हें शक्य आहे कीं या इतिहासाच्या प्रतींत वाचतांना किंवा लिहितांना बाथिंडा हा शब्द पार्शियनमध्यें मुळच्या वाहिंडच्या ऐवजीं वाचला गेला किंवा लिहिलाहि गेला. शिवाय हा जम्मूचा बखरकार अलीकडील लेखक दिसतो; महमुदाचा समकालीन नसावा. अर्थात् त्यानें हे विधान पूर्वील

एखाद्या पर्शियन इतिहासावरून केलें असावें, आणि त्यानें स्वतःच चुकीनें वाहिंडच्या ऐवजीं बाथिंडा वाचलें असावें. रॅव्हर्टीसारख्या माहितगार इतिहाससंशोधकांचीं या जम्मुबखरीमुळें दिशाभूल झाली याचें आम्हास आश्चर्य तर वाटतेंच, पण त्याहिपेक्षां रॅव्हर्टीच्या टिप्पणीं- तील या विधानानें सर व्हिन्सेंट स्मिथची दिशाभूल व्हावी याचें आम्हास जास्त आश्चर्य वाटतें. असो, या समजुतीविरुद्ध ज्या प्रमाणभूत गोष्टी आपल्या समोर येतात त्यांचा आपण विस्तारानें ऊह करूं.

पहिली गोष्ट ही कीं महमुदाचा समकालीन व विश्वासार्ह इतिहास- लेखक अल्बेरूनी हिंदुस्थानचा भूगोल वर्णितांना या जयपालाच्या राजधानीचा बिलकुल उल्लेख करीत नाहीं. आम्हीं मुद्दाम अल्बेरूनीच्या हिंदुस्थानावरील ग्रंथांतून हा भूगोलविषयक अध्याय पुस्तकाच्या आरंभीं दिला आहे त्या वरून वाचकांस महमुदाच्या वेळीं हिंदुस्थानची राज- कीय परिस्थिति कशी होती हें कळेल. अल्बेरूनीनें वाहिंडचा कंधारची राजधानी म्हणून स्पष्ट उल्लेख केला आहे आणि कंधार म्हणजे गांधार हें सांगावयास नको. वाहिंड सिन्धूच्या पश्चिमकिनाऱ्यावर आहे असेंही त्यानें सांगितलें असून वाहिंडहून पेशावर, तेथून काबूल, तेथून गझनी अशीं शहरें दिलीं आहेत. त्यानें "रावीच्या पूर्वेस लोहावरची राजधानी मन्दहकूर" असें लिहिलें आहे. हें मन्दहकूर कोणतें ठिकाण हें ठर- वितां येत नाहीं. पण मन्दहकूर हें बंथिडा नव्हे, कारण तसें तें चुकीनेंहि वाचतां येणार नाहीं. आणि शिवाय ते रावीवर पूर्वेसहि नाहीं. (कदाचित् येथें भाषांतरांत मन्दहकुरची राजधानी लोहावर रावीच्या पूर्व किनाऱ्यावर असें असलें पाहिजे होतें तें चुकीनें उलटें झालें असावें ). वाहिंड आणि लाहोर यांच्या दरम्यान महत्वाचें दुसरें शहर नसावें आणि यावरून असें दिसतें कीं काबुलचेच राजे पंजाबावर राज्य करीत होते. मुसलमानी तवा रिखांवरून स्मिथनें दिलेला जयपालाच्या राज्याचा विस्तार बरोबर आहे. सिन्धुनदीच्या पश्चिमेकडील डोंगरापासून हें राज्य घग्गर नदीपर्यंत म्हणजे मुसलमानाची हक्रा नदी येथपर्यंत पसरलें होतें. परंतु हें राज्य काबूल—वाहिंड राज्यापासून निराळें करतां येत नाहीं; म्हणजे दोन्ही राज्यें एकच होत.

दुसरी गोष्ट अशी कीं अल्बेरूनी पूर्वी कांहीं वर्षांनीं लिहिणारा आरबी इतिहासलेखक अल–इद्रिसी सांगतो कीं गंगेवरील अन्नसा हा एक कनोज राज्याचा सरहद्दीवरील मजबूत किल्ला आहे व कनोजची हद्द काबूल-लोहावर पर्यंत लागली आहे. यावरून त्यावेळीं काबूल व लाहोर एकच राज्य होतें असें दिसतें व त्याचीं हद्द व कनोजची हद्द एक होती. हिंदुस्थानचे राजकीय विभाग अल्बेरूनीच्या लेखावरून दिसतात. त्यांत पंजाबचें निराळें राज्य दिसत नाहीं. अरबप्रवासी अल-मसूदी लिहितो कीं ( ९५३ इ. स. ) सिन्धु नदी सिन्ध, कनोज, काश्मीर, गांधार आणि ताफन या मुलुखांतून येते. यांत फक्त चार राज्यें सांगितलीं आहेत; त्यांपैकीं कंधार म्हणजे गांधार होय व त्याची राजधानी पशावर (पेशावर) प्राचीन पुरुषपुर ही होती. शेवटीं हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं तबकात-इ-नासिरीमध्येंहि वामंड ( म्हणजे वाहिंड ) परशावरमध्यें म्हणजे पेशावर प्रान्तांत आहे असेंच सांगितलें आहे. जेथील देऊळ पडलें ती जागा पेशावर प्रान्तांतील. वाथिंडा सतलजच्या दक्षिणेस आहे.

वर दिलेल्या भूगोलिक प्रमाणांप्रमाणेंच ऐतहासिक प्रमाणेंहि हेंच अनुमान सिद्ध करतात. प्रथम हें कीं तिन्ही राजांचीं नांवें दोन्ही ठिकाणीं एकच आहेत आणि त्यांचा क्रमहि तोच आहे. काबुल–वंशांत जयपाल त्याचा पुत्र आनन्दपाल व त्याचा पुत्र त्रिलोचनपाल आहेत आणि या कल्पित बथिंडा राजवंशांतहि तेच राजे त्याच क्रमानें सांगितले जातात-स्मिथनें आपल्या इ० अं. व्हॉ ३७ मधील लेखांत तिसऱ्याचें नांव ब्राह्मण-पाल असें दिले आहे. परंतु हीहि पर्शियन लिपींत भलतेंच वाचण्याची चुकी आहे. आरंभीचा त, ब वाचल्यानें व पुढील ह च वाचल्याने त्रिलो-चनपालच्या ऐवजीं ब्राह्मणपाल वाचलें गेलें आहे. असें वाचलें जाणें किती साहाजिक आहे हे कोणाहि पर्शियन लिपि जाणणाऱ्यास कळणारें आहे. हेंच मुसलमानी इतिहासांत दिलेलें नांव कित्येकांनीं प्रथम तिरो-जनपाल असें वाचलें. ब्राह्मणपाल हें नांव हिंदुलोकांत दिसत नाहीं आणि हें नांव त्रिलोचनपाल असावें अशी शंका अनेक युरोपीय पंडितांसहि आली होती. ( हें नांव राजतरंगिणीवरून प्रथम निश्चित कळलें आहे ).

असो; तिन्ही नांवें एक आणि एकाच क्रमानें आल्यामुळें दोन्ही राज्यें एकच आहेत हें निश्चित दिसतें.

दुसरें, मुसलमानी तवारीखांत हे " हिंदुस्थानचे राजे " ब्राह्मण होते असेंच बहुतेक सर्वत्र दिलेलें असतें; आणि काबुलचे शाही राजे हे ब्राह्मण होते हें अल्बेरूनीवरून ठरतें. यावेळीं फक्त काबुलांत ब्राह्मण राजे होते, इतरत्र सर्व ठिकाणीं रजपूत राजे होते; यावरूनहि हीं दोन्ही राज्यें एक असावीं. तिसरें, वाहिंड संस्कृत उदभांड येथील शाही राजांच्या वैभवाचें जें वर्णन राजतरंगिणीकार कल्हणानें केलें आहे, तें त्याचें राज्य लहानसें काबूल–पेशावर पुरतें मानलें तर जुळत नाहीं. आणि ज्याच्या नाशाविषयीं त्यानें इतकें दुःख केलें आहे, त्यांचे राज्य विस्तृत असून पंजाबभर पसरलें होतें असें मानलें तरच त्याचें वैभव मोठें होऊं शकतें. आणि शेवटली गोष्ट ही कीं, मुसलमानी बखरकार जेव्हां असें वर्णन करतात कीं पेशावर जवळील युद्धांत जयपालाचा पराभव केल्यावर महमुदानें एकदम वाहिंडवर हल्लाकरून ती राजधानी हस्तगत केली, तेव्हां आपल्यास बहुतेक निश्चय होतो कीं हें वाहिंड पेशावरजवळ सिंधच्या पश्चिमेस असलें पाहिजे. तें बाथिंडा असूं शकत नाहीं, कारण बाथिंडा येथें पोंचण्यास महमुदास पंजाबच्या पांची नद्या ओलांडून सतलजच्याहि दक्षिणेकडील पतियाळाच्या पश्चिमेपर्यंत जावें लागतें. तात्पर्य, हिंदुस्थानचा राजा जयपाल याची राजधानी वाहिंडच ठरते.

मुसलमानी ग्रंथांत जयपाल यास कधीं हिंदुस्थानचा कधीं काबूलचा राजा आणि पुष्कळदां लाहोरचा राजा असें म्हटलेलें आढळतें. याचें कारण काय हें येथें दाखविणें मनोरंजक होईल. प्रथम हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं दहाव्या शतकांपर्यंत हेलमंड नदीच्या पूर्वेकडील सर्व भाग हिंदुस्थान समजला जाई. जेव्हां याकूब–इ-लेस यानें गझनी प्रथम घेतली त्यावेळीं ती हिंदुस्थानांतच मोडत होती ( भाग १ पृ. १९१ पहा ). आणि कन्दहारहि हिंदुस्थानांतच होतें. त्यास राजपुतांचा देश म्हणत. ( अलमसऊदी ९५३ इ० ). गझनी राज्य प्रथम स्थापित झालें तेव्हां ते हिंदुस्थानांतून निराळें पडलें. तरी त्याच्या उत्तर, पूर्व, दक्षिण, आणि पश्चिमहि बाजूस हिंदुस्थानचीच हद्द होती. सबुक्तगिनानें जवळचे चारी

दिशांकडील थोड थोडे भाग जिंकून गझनी राज्यांत सामिल केले. गझनीच्या पूर्व व उत्तर बाजूस जयपालचें राज्य होतें या प्रदेशास हिंदुस्तानच म्हणत आणि येथील लोक अद्याप हिंदु होते. लल्लिय यानें स्थापित केलेला ब्राह्मण राजवंश आरंभीं काबुल येथें राज्य करीत होता. याकूब-इ- लेस यानें काबुल जिंकून काबुलचा किल्ला जेव्हां आपल्या ताब्यांत घेतला तेव्हां असें दिसतें कीं काबुलच्या शाही राजांनीं आपली राजधानी वाहिंड येथें केली. तथापि काबुलच्या शहराचा कबजा त्यांनीं सोडला नाहीं, किल्ला मात्र मुसलमानांच्या ताब्यांत राहिला. भोंवतालचा मुलूखहि त्यांच्या कबज्यांत होता. काबुलचा किल्ला मूसलमानांकडे कां त्यांनीं राहूं दिला हें एक गूढ आहे. काबुलचा किल्ला मुसलमानांच्या ताब्यांत राहिला याबद्दल शंका नाहीं, कारण मुसलमानी लेखक तसें स्पष्ट सांगतात. कदाचित् काबुलच्या शाही ब्राह्मण राजांनीं मुसलमानांची साम्राज्यसत्ता कांहीं वेळ मान्य केली असावी (भा. १ पृ. १९२ पहा). एक काबुल शहा गझनीच्या वरिष्ट मुसलमानी सत्तेस तुर्कांविरुद्ध मदत करण्यासहि तयार झाला होता हें आपण पहिल्या भागांत पाहिलेंच आहे (पृ. सदर). कारण कोणतेहि असो, काबुलच्या शाही ब्राह्मण राजांस आपली राजधानी सिन्धूच्या पश्चिम किनाऱ्यावरील वाहिंड (उदभाण्ड-कल्हण) येथें नेणें सोइस्कर वाटलें.

पण काबुल शहराचा ताबा त्यांकडेच होता आणि ही आपली जुनी राजधानी अशी त्यांची तिजविषयीं सादर श्रद्धा होती. मुसलमानी इतिहास-लेकक असें लिहितात कीं, काबुलच्या प्रत्येक शाही राजाचा राज्याभिषेक काबुल येथेंच होतो. "असें झाल्याशिवाय लोक त्यास राजा म्हणून मान्य करीत नाहींत." (भा. १ पृ. २०१). यावरून असें दिसतें कीं हे ब्राह्मण शाही राजे वाहिंड येथें नेहमीं राहत असले तरी राज्याभिषेकासाठीं काबुलास जात. ह्या त्यांच्या पद्धतीची योग्य कल्पना येण्यास

---

× अलमसऊदीचें भाषान्तर स्प्रेंन्गर यानें केलें आहे त्यांत पुढील वाक्य आहे. "हिंदु लोक खुरासानच्या पर्वतापासून तिबेटच्या पर्वतापर्यंत पसरले आहेत.

अलीकडील इतिहासांतील पेशव्यांचें उदाहरण पुरे आहे. पेशवे पुण्यास रहात पण पेशवाईची म्हणजे कारभाराची वस्त्रें घेण्यास साताऱ्यास नामधारी राजांकडे जात. पेशव्याप्रमाणेंच काबुलचे ब्राह्मण राजे मुळांत तेथील क्षत्रिय राजाचे सेनापति होते ( स्फलपति ही त्यांची संज्ञा असे ). अर्थातच शाही राजांनीं काबुलास येऊन राज्याधिकार धारण करावा अशी जरूरी लोक समजत. तात्पर्य मुसलमानी ऐतिहासिक लेखकांचे वरील विधान सकृद्दर्शनी विलक्षण वाटतें. पण मूळ राजधानी कबूल होती नवी वाहिंड होती हें लक्षांत घेतलें म्हणजे यांतील चमत्कारिकपणा नाहींसा होतो.

काबुलच्या शाही राजांची सत्ता पंजाबावर दहाव्या शतकांत प्रस्थापित झाली, अगोदर नव्हे असें दिसतें. नवव्या शतकांत ललियास जिंकून काश्मीरनें कांहीं दिवस काबुलवर कबजा केला होता हें आपण पहिल्या भागांत पाहिलेंच आहे. पंजाबांत त्यावेळीं एका टांक राजाची तसेंच काश्मीरची आणि कनोजच्या प्रतिहार राजांचीहि सत्ता होती. मुलतानच्या मुसलमानी राजांची सत्ता मुलतानजवळील कांहीं भागावर असणेंहि संभवनीय आहे. अल्मसऊदीच्या पुराव्यावरून असें दिसतें कीं दहाव्या शतकांत काबुलच्या राजांची सत्ता लाहोरवर असून त्यांच्या राज्याची सीमा कनोजच्या राज्यास लागून होती. पंजाबांतील त्यांची राजधानी लाहोर असावी. हें शहर प्रथम कोणी वसविलें हें सांगतां येत नाहीं. लोकदन्तकथेंत त्याची स्थापना लवानें केली असें सांतितलें जातें ( लाहोर गॅझेटियर ). ऐतिहासिकरीत्या विचार करतां ज्या अर्थी ह्युएनत्संगने याचा निर्देश केला नाहीं त्याअर्थी त्यानंतर हें शहर अस्तित्वांत निदान प्रसिद्धीला आलें असें ठरतें. बहुधा या शाहीराजांच्या अमदानींतच तें प्रसिद्धि पावलें, यामुळेंच या राजांस हिंदुस्थानचे राजे, काबुलचे राजे, वाहिंडचे राजे व लाहोरचे राजे असे मुसलमानी तवारिखकार निरनिराळे नांव देतात. प्राचीन मुसलमानी लेखांत लाहारचें रूप लोहावुर आणि लोहुर असें आढळतें, हा स्पष्टपणें लोहपुरचा प्राकृत अपभ्रंश होय.

आर्किआलॉजिकल सुपरिटेंडेंट राय ब. दयाराम साहनी यांनीं स. १९१७ सालच्या आर्किआलाजिकल रिपोर्टांत या राजांचे तीन शिलालेख वर्णिले

आहेत. या राजांस साहानी काबुल-पंजाबचे राजे म्हणतात हें योग्यच आहे. हे शिलालेख लाहोरच्या म्यूझिअममध्यें ठेविले आहेत. पहिला लेख भीमाचा असून त्यास या लेखांत " राजाधिराज गदाधारी भीमदेव कलक (म) लवमंन्नूचा पुत्र " असें वर्णिलें आहे. दुसरे दोन लहान लेख जयपालचे असून त्याचें वर्णन 'भीमदेवपुत्र जयपालदेव' असें आहे. रायबहादर साहनी 'कमलवर्मन्' शब्दावरून असें अनुमान काढतात कीं 'हा क्षत्रिय होता, अल्बेरूनी म्हणतो किंवा अल्बेरूनीवरून समजूत करून घेणारे इतिहास-लेखक म्हणतात त्याप्रमाणें तो ब्राह्मण नव्हता.' परंतु आमच्या मतें अल्बेरूनीसारख्या चौकस व माहितगार समकालीन लेखकाचें विधान बाजूस सारणें योग्य नाहीं. हे राजे क्षत्रिय असते तर अल्बेरूनी ब्राह्मण कां म्हणतो याचें कारणहि ध्यानांत येत नाहीं. हिंदु नांवाचें उपपद, मग तें वर्मा, गुप्त, किंवा दास असो, जातीसंबंधानें निरुत्तर पुरावा नव्हे. कारण हीं उपपदें मन्वादि स्मृत्यनुरूप क्षत्रिय, वैश्य, व शूद्र यांचीं अनुक्रमें असलीं तरी प्राचीन काळापासून अनुलोमरीत्या पाहिजेल त्या जातीचा मनुष्य धारण करी असें दिसतें. × त्याप्रमाणें ब्राह्मणांनींहि केल्याचीं उदाहरणें आहेत. शिवाय कमलु वगैरे शाही राजे क्षत्रिय कर्म करीत किंबहूना ते बहुतेक सर्वस्वी क्षत्रिय होते. तेव्हां कमलूचे नांव कमलवर्मन् असें शिलालेखांत दिलें आहे यांचें आश्चर्य नाहीं. तात्पर्य हे राजे वर्णानें ब्राह्मण होते असें अद्यापहि मानण्यास हरकत नाहीं. त्यांच्या मुली क्षत्रियांस दिल्या जात व ते क्षत्रिय कन्या करीत यांतहि कांहीं वावगें नाहीं.

---

× ऋग्वेदाचें ऐतरेय ब्राह्मण सांगणारा महीदास ऐतरेय हा ब्राह्मण होता. इतरायाः पुत्रः ऐतरेयः अशा व्युत्पत्तीनें हा शूद्रापुत्र होता अशी आख्यायिका रचली आहे. पण शूद्रापुत्र असला तरी त्यावेळच्या वर्ण नियमानुसार व्यासाप्रमाणें तो ब्राह्मणच ठरतो. ऋग्वेदांतील सुदास कित्येक लोक चुकीनें शूद्र राजा समजतात पण, सूर्यवंश व चंद्रवंश दोन्हींत सुदास राजा येतो. पंचतंत्राचा लेखक विष्णुगुप्त हा ब्राह्मण होता. चन्दनदास वैश्य नारायणदास ब्राह्मण वगैरे आणखीं उदाहरणें अनेक आहेत.

## टिप्पणी २—मोह्याल ब्राह्मण.

मोह्याल ब्राह्मण सारस्वत ब्राह्मणांची एक शाखा असून पंजाब प्रान्तांत बहुतेक सर्वत्र, वायव्य सरहद्दीवरील प्रान्त, आणि अफगणिस्तान या प्रदेशांत राहतात. मोह्याल ब्राह्मण असें मानतात कीं जयपाल व आनंदपाल मोह्याल ब्राह्मण होते. ही त्यांची समजूत योग्य व न्यायाची दिसते. कारण मुसलमानांच्या, शिखांच्या व ब्रिटिशांच्याहि अमदानींत शिपाई व फौजी आफिसर या नात्यानें त्यांनीं आपलें नांव गाजविलें आहे. त्या ब्राह्मणांचा असा दावा आहे कीं, आम्हांस दान घेणें किंवा व्यापार करणें निषिद्ध आहे. महाभारतांतील प्रसिद्ध ब्राह्मण योद्धे अश्वत्थामा, कृपाचार्य वगैरे पासून आपली उत्पत्ति आहे असें ते मानतात. ही गोष्ट खरी असो वा नसो, काबुलच्या ब्राह्मणशाही राजांच्या वेळेपासून ही ब्राह्मणजात क्षत्रियधर्म वागवूं लागली आणि नांवालौकिकास चढली यांत संशय वाटत नाहीं. ही यांची परिस्थिति अलीकडील इतिहासांतील चित्पावन ब्राह्मणांच्या परिस्थितीशीं जुळते. पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ याच्या वेळेपासून चित्पावन ब्राह्मण क्षत्रिय धर्म चालवूं लागले. आणि ते पेशव्यांच्या सर्व अमदानींत फौजी व मुलकी अम्मलदारीच्या जागा करीत होते. पैकीं मुलकी नोकऱ्या अजूनहि ब्रिटिश अमदानींत ते बजावीत आहेत. हल्लीं फौजी नोकऱ्या करीत नाहींत हें साहजिक आहे.

मोह्याल ब्राह्मणांचीं सात कुलें आहेत, व ते कुलाच्या बाहेर पण जातीच्या आंतच लग्नें करतात. या कुलांचीं नांवें दत्त, वैद्य, बाली, छिब्बर, मोहन, बमवाल आणि लव अशीं आहेत. जयपालादि ब्राह्मण राजे दत्त कुलांतील असून त्यांचें गोत्र भारद्वाज आहे, हें येथें सांगण्यासारखें आहे. प्रसिद्ध रामभुज दत्त चौधरी हे मोह्याल ब्राह्मण होते. माजी अफगाणिस्तानचे अमीर यांचे मुलकी कारभारी दिवाण नरंजनदास हे भेराचे राहणारे असून मोह्याल ब्राह्मण आहेत व अद्याप काबुलांत हयात आहेत. हीं दोन नांवें सांगितलीं म्हणजे मोह्याल ब्राह्मण पंजाब व काबूल येथें कसे नामांकित आहेत हें वाचकांस कळून येईल. ज्या अनेक मोह्याल वीरांनीं मुसलमानी व शीख अमदानींत कीर्ति मिळविली त्यांचीं नांवें येथें देणें अवश्य नाहीं.

# प्रकरण ३ रें.

## सबुक्तगीन आणि जयपाळ.

हिंदुमुसलमानांच्या झगड्याचा, विशेषतः महमुदाच्या हिंदुस्थानांतील स्वाऱ्यांचा इतिहास मुसलमानी ग्रंथकारांनीं महमुदाचा समकालीन अल्उत्बीपासून दक्षिणेस १५०० इ. स. सुमारें झालेल्या फिरिश्तापर्यंत, तसेंच पाश्चात्य ग्रंथकारांनीं प्रतिभाशाली गिबनपासून इलियट व एल्फिस्टन व लेनपूल व स्मिथपर्यंत, त्याचप्रमाणें नामांकित फ्रेंच व जर्मन इतिहासकारांनीं लिहिला आहे. डॉ. व्हिन्सेंट स्मिथ यानें तर हिंदुस्थानांतील कोरीव लेख व नाणीं यांपासून मिळणाऱ्या माहितीचाहि प्रकाश या इतिहासावर अधिक पाडला आहे. तरीहि या इतिहासाची हिंदी दृष्टीनें व हिंदुस्थानांत झालेल्या अलीकडच्या संशोधनावरून पुनः विचार करण्याची आवश्यकता आहे. ऐतिहासिक शक्याशक्यतेच्या मुशींत घालून ऐतिहासिक टीकेच्या अग्नींत हा इतिहास तावून सुलाखून घेतला पाहिजे. कांहीं नवीन माहिती मिळणें शक्य नाहीं, पण जुन्या चमत्कारिक गोष्टी व कल्पना काढून टाकणें शक्य आहे. हेंच आम्ही पुढील प्रकरणांत करणार आहों आणि या इतिहासावर हिंदुस्थानांतील अलीकडील संशोधनाचा प्रकाश पाडून हिंदु लोकांच्या दृष्टिकोनानें त्याजकडे पाहून आमचे विचार वाचकांपुढें मांडणार आहों. हें सांगणें नको कीं समकालीन इतिहासकार उत्बी नंतर झालेल्या लेखकांपेक्षां जास्त भरवंशालायक आहे; पण उत्बीचीहि विधानें ऐतिहासिक टीकेच्या कसोटीवर घासून घेतलीं पाहिजेत.

सबुकृतगीन गझनी येथील लहानशा राज्यांत स्थिर झाल्यावर तें राज्य वाढविण्याच्या प्रयत्नास साहजिकच लागला. गझनीची लहानशी मांडलिकी हिंदू—समुद्राच्या पाण्यावरील लहानशा तैल-बिंदूसारखी होती. पण हें तेल चारी बाजूंस प्रसरण पावलें. तें इतकें कीं, त्याचा पुत्र महमूद याच्या वेळीं अफगाणिस्थान, पंजाब व खुरासान वगैरे प्रांतभर तें पसरिलें. सबुकूतगीनानें प्रथम कंदहार व रजपूत राज्याची राजधानी बस्त ही जिंकून घेतली. त्यानें नंतर अल्रुखज् म्हणजे ग्रीकांचा अराचोसिया प्रांत, ज्याला पार्थियन लोक ' पांढरें ' हिंदुस्थान म्हणत ( भाग १ पान १९१ ), तो जिंकून घेतला. त्याचप्रमाणें त्याची राजधानी कसदार जिंकून तेथील राजास मांडलिक बनवून त्याच्या नाण्यावर आपलें म्हणजे सबुक्तगीनाचें नांव घातलें ( उत्बी. पान ३३ ). याप्रमाणें आपली पिछाडी मजबूत करून त्यानें पूर्व व उत्तर जिंकण्याची महत्त्वाकांक्षा धरली. तेव्हां अर्थातच वाहिंड व काबूल यांचा राजा जयपाळ याशीं त्याचा झगडा सुरू झाला.

प्रथम आगळीक कोणीं केली हें पाहण्याचीं जरूरी नाहीं. कारण राजे लोकांचा किंबहुना राष्ट्रांचा, मागील काळांतच नव्हे तर हल्लींच्या विसाव्या शतकांतहि, कायदा व जनावरांचा कायदा एकच आहे. जो सशक्त असेल त्यानें अशक्तांस लुबाडावें; किंबहुना ठार मारावें. उत्बी एवढेंच लिहितो कीं, कसदार जिंकल्यावर विधर्मीयांकडे सबु-क्तगीनानें आपलें लक्ष फिरविलें. ' मुलुख जिंकण्याच्या बरोबर, खऱ्या ईश्वरभक्तांची धर्मश्रद्धाहि वाढली. परमेश्वरास तुष्ट करण्याच्या शुद्ध हेतूनें आणि खऱ्या अन्तःकरणाच्या धर्मभावनेनें त्यानें या पवित्र लढाईचे श्रम सोशिले. आणि त्या दूरदेशांतील पुष्कळ किल्ले व गढ्या हस्तगत केल्या. ' ' त्यानें आपल्या राज्याची सीमा हे किल्ले व प्रांत जिंकून वाढाविली. पण हिंदुस्थानचा राजा जयपाल यानें

जेव्हां या गोष्टी पाहिल्या आणि आपली सरहद्द एकसारखी मागें हटत आहे हें लक्षांत आणलें आणि आपल्या राज्यावर हरक्षणीं अनेक प्रकारचें नुकसान कोसळत आहे असें जाणलें, तेव्हां दुःखानें तो बेचैन झाला. (उत्बी पान ८४).यासाठीं त्यानें आपलें सर्व सैन्य सबुक्तगीनास विरोध करण्यासाठीं जमविण्याचा उद्योग मांडिला. अनेक दोस्तांचें सैन्य घेऊन सबुक्तगीनाच्या राज्यांत तो शिरला.त्यास टक्कर देण्याकरितां सबुक्तगीन गझनीहून पुढें आला. आणि एक भयंकर लढाई पुष्कळ दिवस चालली. उत्बी वर्णन करतो कीं, " महमुदानें आपल्या बापास शेवटीं एक युक्ति सुचविली ती अशी कीं, शत्रूच्या छावणीजवळ एका झऱ्याचें उत्तम पाणी आहे. त्यांत जर एखादी अशुद्ध वस्तु टाकली, तर एकदम प्रचंड वारें वाहूं लागतें आणि अतिशय कडक थंडी पडते असा गुण आहे." हें ऐकून नासिरुद्दीन (सबुक्तगीन) यानें दारूचे कित्येक घडे त्या झऱ्याच्या पाण्यांत फेकाविले. अर्थात् एकदम आकाशांत धूम्र वर्णाचें धुकें दिसूं लागलें. अतिशय थंडी पडली. आणि जयपाळाच्या सैन्याचे फार हाल होऊं लागले. तेव्हां त्यानें तहाचें बोलणें लाविलें; व असाहि धाक घातला कीं, तह न झाला तर सर्व रजपूत आपल्या तलवारी घेऊन लढून धारातीर्थी देह ठेवतील. तेव्हां सबुक्तगीनानें या अटीवर तह केला कीं, कांहीं द्रव्य व कांहीं हत्ती आणि जयपाळाच्या राज्यांतील कांहीं किल्ले मुसलमानांस द्यावे. तेव्हां जयपाळ आपल्या हद्दींत परतून गेला, पण स्वराज्यांत पाहोंचतांच त्यानें किल्ले देण्याचें नाकारिलें. आणि किल्ल्यांचा कबजा घेण्यास जे लोक आले होते त्यांस कैदेंत टाकलें. हें ऐकून सबुक्तगीन गझनीस परतला होता, तो पुनः उलटला, आणि जयपाळाचा प्रांत लुटीत, लोक ठार मारीत, पोरेंबायका गुलाम करीत चालला (उत्बी पान ३९). त्यानें लम्घानचा मुलूख अगदीं

नागवा केला, आणि तो कबजांत घेऊन त्यांतील देवळें पाडून तेथें माशिदी बांधिल्या."

"जयपालानें या प्रमाणें आपल्या राज्याचा नाश पाहिला व तहाचें बंधन विश्वासघातानें मोडल्याचें फळ भोगलें, तेव्हां तो अगदीं हताश झाला. शेवटीं त्यानें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राजे लोकांस पत्रें पाठवून मदत मागितली. एक असंख्य फौज जमा होऊन गझनी-वर चालून आली. आपली फौज शत्रूहून थोडी आहे हें पाहून अमी-रानें आपल्या घोडेस्वारांच्या कित्येक टोळ्या करून, त्यांकडून शत्रू-वर एकामागून एक हल्ले करविले. अशा रीतीनें त्यानें शत्रूस मागें हटविलें आणि त्यास घाबरून सोडिलें. शेवटीं सर्व टोळ्यांनीं एक-दम हल्ला केला, आणि कित्येक कैदी केले व बाकीचे लोक हत्यारें टाकून पळून गेले." येथें कुराणांतील वाक्य उत्बीनें उध्दृत केलें आहे. "ईश्वराचा न्याय जे त्याच्या मार्गांतून भलतीकडे जातात त्याविरुद्ध असतो. आणि हा विरुद्ध हुकूम टाळतां येणें अशक्य आहे" हिंदूंनीं पुनः सबक्तगीनावर स्वारी केली नाहीं. आणि त्यांचा हा प्रांत इस्लामाच्या राज्यास कायमचा जोडला गेला. आणि तेथील रहिवाशी "त्यांचा उत्कर्ष करणाऱ्या काळजीच्या छत्रा-खालीं आणले गेले. आणि ज्या ज्या वेळेस त्यास ( सबुक्तगीनास ) जरूर लागेल, त्या त्या वेळेस एक हजार घोडेस्वार त्याच्या तैना-तीस राहूं लागले."

सबुक्तगीन आणि जयपाल यांच्यामधील झालेल्या लढायांचें उत्-बीनें वरप्रमाणें वर्णन केलें आहे. या लढाया दोन झाल्या असें दिसतें. यापेक्षां जास्त लढाया सांगण्यासारख्या सबुक्तगिनानें जय-पालाशीं केल्या नाहींत. त्याचें लक्ष पश्चिमेकडे आपला सम्राट् म्हणजे सामानी राजा मनसूर बिन नूह यास मदत करण्याकडे, त्याच्या दर-बारांत आपलें वजन वाढविण्याकडे व जाहगिरीदाखल कित्येक प्रांत

मिळविण्याकडे गुंतलें होतें. या दोन्ही लढायांत व पश्चिमेकडील सामानी राज्यांतील खटपटींत महमुदानें आपल्या बापास मदत केल्याचें वर्णन आहे.

उत्बीनंतरचे मुसलमानी इतिहासकार या हकीकतींत बरीच आणखी भर घालतात. ती सोडून दिली तरी उत्बीची ही हकीकत सुद्धां शक्याशक्यतेचा विचार व ऐतिहासिक टीका यांच्या कसोटीस लावून पाहिली पाहिजे. उतबीनें या लढायांच्या तारखा दिल्या नाहींत. उत्बीनें दिलेल्या तारखाहि पुष्कळदां चुकीच्या असतात. (इलि-२). सबुक्तगीन इ. स. ९७७ पासून ९९७ पर्यंत राज्य करीत होता; या दृष्टीनें ही हकीकत इ. स. ९८० पासून इ. स. ९८५ पर्यंत झाल्याचें मानतां येईल. जर महमुदाचा जन्मकाल इ. स. ९७१ ऑक्टोबर धरला, तर तो वयानें या वेळीं लहान असून या लढायांत भाग घेऊं शकणारा नव्हता. परंतु जन्मकाल चार वर्षे अगोदर मानला तर त्याचें वय १४पासून १७पर्यंत येतें. आणि या वयाचा तरुण राजपुत्र विशेषतः प्राच्य देशांत लढाईस योग्य मानला जातो आणि प्रत्यक्ष युद्धांतहि तो पाठविला जातो. परंतु त्याच्या बापास त्यानें सल्ला मसलत दिली असें मानणें योग्य होणार नाहीं. आणि अलीकडील मुसलमान इतिहासकार जे लिहितात कीं, महमुदानें शेवटपर्यंत लढाई चालविण्याचा आग्रह धरिला तें तर संभवनीय दिसत नाहीं. दुसरी गोष्ट या हकीकतींत जो दैवी चमत्काराचा भाग आहे तो टाकून दिला पाहिजे. अतिशय थंडी पडली, धुकें उत्पन्न झालें, किंबहुना बर्फ पडूं लागलें आणि पहिल्या लढाईंत हिंदूंची गाळण उडाली ही गोष्ट संभवनीय आहे, पण ती निसर्ग-नियमानें झाली, झऱ्यांत कांहीं दैवी गुण होता त्यानें झाली नाहीं. झऱ्याचें पाणी हिंदु लोकांच्या छावणी जवळील मुसलमानांनीं अशुद्ध केलें हें मानतां येईल. शत्रूचें पाणी खराब करणें ही लढा-

ईंतील एक चाल आहे. आणि त्या वेळचे रजपूत, विशेषतः राज्य करणारे राजे, दारू पीत नसत ही गोष्ट तत्कालीन अरबी प्रवाशांनींहि लिहून ठेविली आहे ( भाग इ. २ पान १८५ पहा ). विशेषतः जयपाळ ब्राह्मण असल्यानें दारू न पिणारा असला पाहिजे. शत्रूचें पाणी बिघडविण्याची युक्ति महाभारतांतहि सांगितली आहे. पाश्चात्य लढायांच्या वर्णनांतही ती अवलंबिलेली दिसते. गेल्या युरोपीय महायुद्धांत तिचा प्रकार झाला. शुद्ध पाणी पिण्यास न मिळाल्यानें आणि एकाएकीं पडलेल्या थंडीच्या कडाक्यानें त्रस्त होऊन ( अशा हवेची संवय उत्तर सपाट हिंदुस्थानांतून आलेल्या शिपायांस नसणें साहाजिक आहे ) हा हिंदूंचा जमाव या कारणांनीं आपलें कार्य करूं शकला नाहीं. तथापि त्याचा पराभव झाला नव्हता आणि जरूर पडल्यास रजपूत प्राणांतिक युद्ध करण्यास तयार होते. यामुळें असें मानणें जरूर आहे कीं, या वेळीं ठरलेल्या तहाच्या अटी दोन्ही पक्षाच्या इज्जतीस संभाळून होत्या. बहुधा कांहीं नगदी रक्कम व कांहीं हत्ती देऊनच दोस्त राजे परतून घरोघर गेले असावे.

ही अशी हकीकत हिंदुस्थानांतील कोरीव लेखांच्या पुराव्यावरून जास्त मजबूत होते. पूर्वी भाग २ यांत दाखविल्याप्रमाणें असें दिसतें कीं, चंदेल्लराजा धंग या हिंदु राजांच्या जमावांत आला होता. त्याचें वर्णन शिलालेखांत ‘ हम्मीरसम ’ असें केलें आहे. यावरून ही लढाई बरोबरीची झालेली दिसतें,व असह्य थंडीमुळें केवळ हिंदु परतले. ही लढाई इ. स. ९८० मध्यें झाली असें मानलें पाहिजे. धंग इ. स. ९५० च्या सुमारास राज्य करूं लागला व इ. स. १००० पर्यंत त्यानें राज्य केलें; मरणसमयीं त्याचें वय १०० वर्षांवर होतें.

फिरिश्ता व इतर अलीकडील लेखक लिहितात कीं, दिल्ली, अजमीर, कनोज, कालंजर वगैरे राजे या लढाईंत होते. पण यांत

निःसंशय अतिशयोक्ति आहे. कारण यांत नंतर प्रसिद्ध झालेल्या राज्यांचींहि नावें आहेत. आपण पाहिलेंच आहे कीं, इ. स. ९८० त दिल्ली क्षुल्लक होती. आपल्या भुगोलिक वर्णनांत अल्बेरुनीनें दिल्लीचा उल्लेख केलेला नाहीं. आणि अजमीरची ह्या वेळेस स्थापनाहि झाली नव्हती. सांभरचे चौहान राजे अजून इतके सामर्थ्यवान् नव्हते कीं ते कांहीं मदत पाठविते. माळव्याचा भोज तर इ. स. १०१०त गादीवर आला. उत्बीनें हिंदुस्थानांतून कोण कोण राजे मदतीस आले होते याचा तपशील दिला नाहीं. हिंदुस्थानांतील कोरीव लेखांच्या पुराव्यांत केवळ धंगाचें नांव मिळतें. प्रतिहार सम्राट् कनोज या लढाईंत सामील होणें संभवनीय आहे. चंबा गॅझेटियरवरून असें दिसतें कीं, या धार्मिक युद्धांत चंबाचा राजा साहिलवर्मन् होता.

दुसऱ्या लढाईचें वर्णन जें उत्बीनें दिलें आहे तें मात्र संशयित दिसतें. पहिली गोष्ट ही कीं, पहिल्या लढाईंत हिंदूंचा नांवाला पराभव झाला होता. तेव्हां जयपालाच्या हद्दींतील कित्येक किल्ले मुसलमानांना देण्याची अट घातली गेली नसावी, निदान ती मान्य झाली नसावी. ती मान्य झाली असती तर विश्वासघात करून मोडण्याइतका नीतिभ्रष्ट जयपाल नव्हता. हे काबूलचे ब्राह्मण राजे किंवा सर्व हिंदुस्थानांतील रजपूत राजे सच्चे इमानाचे होते. खुद्द अल्बेरूनीनें या काबूल राजांच्या उदात्त स्वभावांचें वर्णन केलें आहे. जरी हा ग्रंथकार मुसलमान होता, तरी त्यानें हिंदूंच्या स्वभावाचें यथार्थ वर्णन केलें आहे. त्यानें काबूलच्या शाही राजांच्या सत्यनिष्ठेचें आणि चांगुलपणाचें पुढील प्रमाणें प्रशंसायुक्त वर्णन केलें आहे ( सचाऊ भाग २ पान १० ); " यांच्या सर्व व्यवहारांत जें योग्य व न्याय्य आहे तेंच करण्याच्या उत्कट इच्छेंत हें कधीं मंदावले नाहींत. उदात्त विचार आणि उदात्त आचार करणारे हे पुरुष आहेत. " अर्थात

जयपाळानें शर्त मानून तंढाईंत महमुदाचें वैयक्तिक शौर्य प्रथम गोष्ट हिंदुस्थानच्या निरानिसर्वत्र झाली. याच लढाईंत महमुदानें फुकट गेल्यानंतर पुनः इतक्या लोक घेतले होते. अन्यत्र आम्हांस नाहीं. तिसरी गोष्ट, संयुक्त सैन्य इतकें प्रहिंदु शिपाई बापडे जो शेंकडों हत्ती असले पाहिजेत आणि सबुक्तगिनानें पांचपाचशें घोड्यांच्या टोळ्या करून वारंवार हल्ले चढविण्याची जी युक्ति योजिली ती सिद्धीस जाणें संभवनीय वाटत नाहीं व हिंदूंचा भयंकर पराभव होणें शक्य नाहीं. पोरसशीं झालेल्या लढाईंत अलेक्झांडरनें हीच चाल चालविली होती असें सर व्हिन्सेंट स्मिथनें म्हटलें आहे. पण अलेक्झांडरचें घोडदळ शिस्त शिकलेलें होतें. सबुक्तगिनाचें अश्वसैन्य अलेक्झांडरच्या सैन्यासारखें शिस्तीचें नसावें. याशिवाय रजपूतांचीहि प्रसिद्धि त्यांच्या अश्वसैन्याबद्दल होती व आहे. आणि एवढया मोठ्या हिंदु सैन्याच्या जमावांत हिंदूजवळ अश्वसैन्य नव्हतें ही गोष्ट संभवनीय नाहीं. खुद्द आरबी लेखकांच्या लेखांवरून कनोजचे प्रतिहार राजे त्यांच्या मोठ्या व कर्तबगार घोडदळाबद्दल प्रसिद्ध होते. उत्तर हिंदुस्थानचा प्रसिद्ध सम्राट् व जयपालाचा शेजारी असा कनोजचा राजा जयपालाच्या मदतीस आलेल्या राजांमध्यें असलाच पाहिजे; व मुसलमानी इतिहासकारांनीं कनोजचा राजा मदतीस आला होता असें लिहिलेंहि आहे. असें संभवनीय दिसतें कीं, या दुसऱ्या लढाईचें वर्णन अतिशयोक्तीचें आहे. आणि त्यांत पहिल्या लढाईंतील अनेक राजे जमा झाल्याची पुनरुक्ति केली आहे. जयपाळ परतल्यावर व संयुक्त फौजा घरीं गेल्यावर कांहीं निमित्त काढून सबुक्तगिनानें जयपाळच्या राज्यावर पुनः स्वारी केली असावी. किंबहुना प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें अशा प्रसंगीं सबब दाखविण्याचीहि आवश्यकता नाहीं. अर्थात् आपल्याच राज्यांतून जयपाळास जितकी फौज जमवितां आली, तितकी त्यानें जमविली

निःसंशय अतिशयोक्ति आहे. कारण ... असावा. त्याचा सिंधु-
राज्यांचींहि नावें आहेत. आपण पा... वेळीं गेला. परंतु हल्लींचा
त दिल्ली क्षुल्लक होती. आप... जे गांधारचा प्रांत गेला नसावा.
दिल्लीचा उल्लेख केलेला ... म्हणजे बन्नू गेला असला तरी उत्त-
रेकडील भा... ...यम राहून पशावर व वहिंड येथें
जयपाळ पुढेंहि राज्य करीत असल्याचें आपल्यास दिसतें. सबुक्-
तगिनानें जिंकलेल्या मुलुखास तेथील रहिवाशांस जबरदस्तीनें मुस-
लमान करून पूर्णपणें आपल्या राज्यास जोडलें. इलियटचें असें
मत आहे कीं, या दोन्ही लढाया लम्घान अथवा जलालाबादच्या
खोऱ्यांत झाल्या ( इलियट २ पान ४३३ ). आणि लम्घान व का-
बूल नदीच्या उत्तर-दक्षिणचा भाग जयपाळाच्या राज्यांतून कायमचा
निघून गेला. काबुलचा कोतवाल अथवा अस्पहदाद याच्या धर्मां-
तराची जी मजेशीर हकीकत अल्बेरूनीनें सांगितली आहे, ती या-
वेळीं घडली असावी. कित्येक लोक अल्प्तगिनाच्या वेळेस ती
झाली असें जें मानतात ( ईलि. २ पा. ४२० ) तसें नसावें असें
वाटतें. कारण कित्येक काळपर्यंत जयपाळास काबूलचाहि राजा
वर्णिलेलें आढळतें.

यानंतर उत्बी म्हणतो कीं, सबुक्तगिनाचें लक्ष सामानी राज्यां-
तील घडामोडीकडे वेधलें, आणि हें शक्य दिसतें. कारण त्याच्या
राज्याची पूर्वेकडील सीमा सिंधूपलीकडील डोंगराची ओळ ही होऊन
ती सुरक्षित होती. या सुमारास मनसूरहि वारला, आणि त्याचा
पुत्र नूह गादीवर बसला. नूहनें आपल्या कित्येक प्रांतांतील बंडें
मोडण्याकरितां सबुक्तगिनाची नोकरी सांगितली, व ती त्यानें आनं-
दानें व स्वामिभक्तीनें बजावून हीं बंडें मोडलीं. या नोकरीबद्दल
त्यास खुरासानाची अधिकाऱ्याची जागा मिळाली व त्यानें ती
महमुदास दिली. या प्रांतावर असतां एक बंडखोर अबूअली महमुदावर

चालून आला; आणि या लढाईंत महमुदाचें वैयक्तिक शौर्य प्रथम दिसून येऊन त्याची कीर्ति सर्वत्र झाली. याच लढाईंत महमुदानें आपल्या तर्फें हिंदु शिपाई व हत्ती घेतले होते. अन्यत्न आम्हांस वर्णन करणें जरूर पडणारच आहे कीं, हिंदु शिपाई बापडे जो कोणी तनखा देईल त्याच्या वतीनें लढण्यास कोणतीहि हरकत मानीत नाहींत. पण येथें मुख्य गोष्ट सांगावयाची ती ही कीं, महमुदास हत्तींचा उपयोग उत्तम करतां आला, आणि त्याविरुद्ध शत्रूच्या घोडदळास कांहीं करतां आलें नाहीं. “लढवय्ये हत्तींनीं घोडेस्वारांस आपल्या सोंडांनीं धरून त्यांच्या पाठी आपल्या पाया-खालीं मोडल्या, आणि अगणित लोक याप्रमाणें या लढाईंत मेले. (उत्बी पान. १६२)

शेवटीं सामानी साम्राज्यांत आपल्या कसलेल्या जबरदस्त सैन्यानें सबुक्तगीन इतक्या वजनास चढला कीं, तो बुखारा येथें वझीर नेमूं लागला व बरखास्त करूं लागला. अशाच प्रकारें शहाजीलाहि निजामशाहींत सुलतान बसवतां व काढतां आले. व ज्याप्रमाणें शहाजीचा दरारा विजापुरास होता, त्याप्रमाणें सबुक्तगिनाचाहि सामानी बादशहा नूह याच्या दरबारांत राहिला. सबुक्तगीन गझनी सोडून बल्ख येथेंहि अलीकडे राहूं लागला. आणि शेवटीं त्याचा तेथेंच अन्त झाला. त्याच्या मनांत गझनी येथें परत जावयाचें होतें, परंतु ईश्वरी इच्छा निराळी होती. त्यानें आपल्या शेवटच्या मृत्यु-पत्रांत गझनीचें राज्य आपला पुत्र इस्माइल यास दिलें. महमूद खुरासान प्रांताची राजधानी निशापूर येथें रहात असे तो खुरासान प्रांताच्या अधिकाऱ्याच्या जाग्यानें संतुष्ट राहील असें सबुक्तगिनास वाटलें असावें. ही हकीकत शहाजी–शिवाजीसारखीच झाली. शहाजीनें नवीन संपादलेलें बंगलोरचें राज्य आपल्या दुसऱ्या पुत्रास दिलें आणि शिवाजीला पुण्याच्या जाहगिरीनें संतुष्ट ठेविलें. महमूद

आणि शिवाजी अधिक कर्तृत्ववान् होते तरी आपल्या भावांपेक्षां पित्यास कमी प्रिय होते असें दिसतें. दोन्ही हकीकतींत अधिक कर्तृत्ववान् पुत्रानें आपला हक्क शेवटीं बजावला आणि तो एकंदर राज्याचा मालक झाला. महंमुदानें गझनीच्या राज्यावर आणि तेथें जमा असलेल्या खजिन्यावर आपला हक्क सांगितला, व विरोध उत्पन्न झाल्याबरोबर तो गझनीवर चालून गेला. शहराखालीं त्याची व इस्माईलची लढाई झाली व शेवटीं इस्माईलचा पराभव होऊन तो कैद झाला वगैरे हकीकत विस्तारानें सांगण्याची जरूरी नाहीं. एवढें मात्र सांगण्यासारखें आहे कीं, या लढाईत इस्माइलच्या बाजूनें हत्तींचे काळेकुट्ट झुंडच्या झुंड लढले पण त्यांचा उपयोग झाला नाहीं. हत्तींचा उपयोग कांहीं एका मर्यादेंत आहे. सबुक्तागिनानें व इतर मुसलमान सेनापतींनीं हत्ती ठेवून त्यांचा लढाईत उपयोग केला आहे. यावेळीं सबुक्तागिनाचे हत्ती इस्माईलच्या कबजांत होते. पण त्याच्या नालायकीनें त्यांचा परिणामकारक उपयोग त्यास करतां आला नाहीं. या लढाईनें महमूद गझनीच्या राज्याचा पूर्ण मालक झाला (इ. स. ९९७).

# प्रकरण ४ थें.

## महमूद आणि जयपाळ.

गादीवर बसल्यावर कांहीं काळ महमुदाचें लक्ष पश्चिमेकडे वेधलें होतें. आपल्या बापाचे मानमरातब व अधिकार आपल्याकडे चालावेत अशी त्यानें सामानी बादशाहा नूह यास विनंति केली व नूहनें ती मान्य करून बल्ख, हिरात, बोस्त व सरमध येथील राज्यकारभार त्याचे हातींच चालूं ठेवला. निशापूरची ( खोरासान ) सुभेदारी व सेनापतित्व हीं मध्यंतरीं बेक्तुझून यांस देण्यांत आलीं होतीं. बेक्तुझून हा राजनिष्ठ आणि कर्तृत्ववान् होता व नूहच्या गादीवर नुकताच आलेला त्याचा पुत्र बादशहा मनसूर यानें तीं बेक्तुझूनकडेच चालू ठेवावींत असें ठरविलें. परंतु महमूद यास हें खपलें नाहीं आणि तो आपलें सैन्य घेऊन बेक्तुझूनवर चाल करून गेला. परंतु मनसूर स्वतःच आपल्यावर चाल करून येत आहे असें पाहतांच राजनिष्ठ महमुदाला त्याच्या विरुद्ध शस्त्र उचलवलें नाहीं; तो माघारा फिरला व एका सुरक्षित जागीं त्यानें आपला तळ ठोकला. सामानी राज्याला आतां पक्की उतरती कळा लागली होती. उलट्या काळजाच्या कांहीं अधिकाऱ्यांनीं तरुण बादशहा मनसूर यास पकडलें आणि त्या अल्पवयी व सुंदर राजाचे डोळे काढले. या गोष्टीनें महमुदास त्वेष आला व त्यानें या बंडखोर अधिकाऱ्यांवर स्वारी केली. तेव्हां मनसूरच्या जागीं त्यांनीं ज्याला गादीवर बसविलें होतें त्या नवीन राजाला बरोबर घेऊन ते पळूं लागले. या बेगडी बादशहाचें आधिपत्य अर्थातच महमुदानें नाकबूल केलें आणि खोरासन व गझनीचे आपण स्वतंत्र राजे झालों आहोंत अशी त्यानें द्वाही

फिरविली. बगदादचा खलिफा कादर बिल्ला यानें महमुदास स्वतंत्र राजा म्हणून मान्यता दिली, त्याला अधिकाराचीं वस्त्रें पाठविलीं आणि यमीनुद दौलत् व अमीनुल खिलत् म्हणजे पातशाहीचा उजवा हात आणि धर्माचा संरक्षक अशी पदवीहि दिली. खलिफाच्या संदेश–वाहकांचें महमूदनें मोठ्या आदरानें स्वागत केलें. त्याच्या बापानें व त्यानें अमीर ही पदवी पूर्वींच वापरण्यास सुरुवात केली होती. स्वतंत्र राजा झाल्यावर जी पदवी त्यानें धारण केली ती अमीर ही नसून सुलतान अशी होती. सुलतान ही पदवी त्या पूर्वीं कोणत्याहि मुसलमान राजानें वापरली नव्हती. यापुढें हीच पदवी प्रचारांत आली आणि अमीर म्हणजे हाताखालचा एखादा सरदार असा अर्थ होऊन बसला. उत्बीनें असें लिहून ठेविलें आहे कीं महमूदनें खोरासानमध्यें न्यायानें व शहाणपणानें राज्य केलें आणि आपल्या प्रजाजनांस सुखांत ठेविलें. पूर्वींच सांगितल्याप्रमाणें सामानी पातशाहीची राजधानी बोखारा ही काश्गरचा तुर्की राजा इलेक्खान यानें हस्तगत केली व सामानी घरण्यांतील सर्व वारसांस त्यानें कैद केलें. त्यांस पुढें बहुधा मारूनही टाकण्यांत आलें असावें. अशा तऱ्हेनें महमुदाच्या कारकीर्दीच्या सुरुवातीस सामानी घराणें नष्ट होऊन गेलें. या वृतांतांत आणि विजापूरच्या राज्याच्या अंताच्या वृत्तान्तांत केवढें साम्य आहे ! गागाभट्टाकडून राज्याभिषेक करवून घेऊन शिवाजी महाराजांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. महमुदाच्या स्वतंत्र राज्यपदाला धर्माची आवश्य ती मान्यता देऊन बगदादच्या खलीफानें जशी त्याला सुलतान ही पदवी दिली तशीच गागाभट्टानें शिवाजीस अभिषेक करून छत्रपति ही पदवी अर्पण केली. त्यानंतर थोड्याच दिवसांत हिंदुस्थानचा इलेक्खान म्हणजे अवरंगजेब यानें शिवाजीचा स्वामी विजापुरचा राजा याचा मोड करून राज्याच्या शेवटच्या वारसास दिल्लीस नेलें आणि विजापुरचा

उरलेला प्रांत मोगल साम्राज्यांत सामिल करून घेतला. मानवी स्वभाव हा सगळीकडे सारखाच व त्यामुळें त्याच्या करवीं आपलें कार्य करून घेणाऱ्या नियतीच्या खेळांतहि सगळीकडे साम्य दिसावें हेंहि स्वाभाविक आहे.

प्रारंभींच्या गोष्टी इ. स. ९९७ व १००० यांचे दरम्यान घडल्या ( पुढें पांच वर्षांनीं १००५ मध्यें सामानी राज्याचा पूर्ण अंत झाला ); आणि महमूदच्या राज्यछत्राखालीं सामानीं राज्याचा बराच मोठा भाग आला. खोरासानाचा समावेश त्यांत झालेलाच होता. सामानी राज्यांतील सिस्तान हा प्रांत जिंकण्याच्या तो गडबडींत असतां जयपाल सैन्याची जमवाजमव करीत आहे अशी महमुदास बातमी आली. बहुधा त्याच्या सेनापतींनीं जयपालाच्या मुलुखावर स्वारी केली असावी आणि त्यामुळें जयपाल लढाईची तयारी करीत असावा. शिवाजीप्रमाणेंच ताबडतोब निश्चय करण्याबद्दल आणि त्वरेनें सैन्याच्या हालचाली करण्याबद्दल महमुदाचीहि ख्याति आहे. याहिवेळीं या गुणांचा उपयोग करून त्यानें पश्चिमेकडून आपलें तोंड पूर्वेकडे फिरविलें आणि १५००० घोडेस्वार घेउन झपाट्यानें तो जयपालाच्या राज्यांत घुसला. अशा त्वरेच्या हालचाली करावयास घोडदलच फार उपयोगीं पडतें आणि महमूद काय आणि शिवाजी काय अशा प्रसंगीं घोडदळाचाच उपयोग करीत, असें आपल्यास दिसून येतें. “ परशावर ( पेशावर ) त्यावेळीं हिंदुस्थानच्या भूमीच्या केंद्रावर होतें ” ( उत्नी. पा. २८० ). या विधानावरून असें दिसून येतें कीं, अजूनहि सिंधूच्या पश्चिमेकडील प्रदेशावर जयपालाचें राज्य चालू होतें. ( हा प्रांत म्हणजे अर्वाचीन वायव्य सरहद्दीचा प्रांत होय व त्याची राजधानी वहिंद येथें होती. ) जयपालाची लढाईची तयारी पूर्ण झाली नव्हती असें दिसतें. त्यानें मागून येणारें सैन्य रणक्षेत्रावर येऊन दाखल व्हावें म्हणून लढाईचें

तोंड सुरू करण्याचें लांबणिवर टाकलें (उत्बी. ८१). परंतु सुलतानानें ही अनुकूल संधि ओळखिली आणि ताबडतोब जयपालावर हल्ला केला. लढाई निकराची झाली आणि मध्यान्हाच्या सुमारापर्यंत ५००० हिंदूंची मुंडकीं तरवारीनें रणक्षेत्रांत पडलीं. जयपाल, त्याच्या बायका, त्यांचीं मुलेंबाळें, त्याच्या कुटुंबांतील इतर लोक व त्याचे सरदार यांच्यासह कैद झाला. लुटींत अगणित दागदागिने सांपडले. पाडाव केलेल्या राजघराण्यांतील माणसांच्या गळ्यांत आणि जखमी झालेल्या व मेलेल्या शिपायांच्या अंगावर हिरे, माणकें व मोतीं यांनीं खचित केलेले हार इतके सांपडले कीं, इस्लामी फौजेस अमर्याद संपत्ति लाधली. हिंदी राजे व सरदार यांच्या दागिन्यांच्या सोसाचा उल्लेख अरबी प्रवाश्यांनींहि केला आहे (भाग २ पान १८७ पहा). परंतु जयपाल, त्याचे सरदार व सैनिकही लग्नांतील मिरवणुकींतल्याप्रमाणें दागिन्यांनीं नटून रणक्षेत्रावर युद्धास जावेत हें विचित्र आहे. बहुधा ते लढण्याच्या तयारींत नसतांच तळावरच त्यांच्यावर हल्ला करण्यांत आला असण्याचा संभव आहे. त्या प्रांतांत हजारों तरुण पुरुष, मुलें व मुली हस्तगत करण्यांत आलीं आणि "खोरासानच्या बाजूच्या [ म्हणजे सिंधूच्या पश्चिमेकडील ] सर्व हिंदी प्रांतांनीं सुलतानाची सत्ता मान्य केली" "हा जय हि- ३९२ (इ. स. १००१) च्या मोहोरमच्या ८ व्या तारखेस मिळाला आणि त्याची बातमी अत्यंत दूरच्या प्रदेशांतहि पसरली."

पेशावरच्या मैदानांत इ. स. १००१ मध्यें अशा प्रकारचें हें संस्मरणीय युध्द झालें आणि त्यामुळें सिंधुनदीच्या पश्चिमेकडील प्रांतांवरील हिंदु राज्याचा अंत झाला आणि तेथील लोकांचें हिंदुत्वहि नाहींसें झालें. आपल्या जयाची पूर्णता करण्यासाठीं सुलतान रेटीत रेटीत जयपालाची राजधानी वहिंड येथें चालून गेला आणि त्यानें ती सर करून हस्तगतहि केली. कांहीं लेखकांचें म्हणणें असें आहे

कीं भातिंडा हेंच वहिंड होय; परंतु हें शक्य दिसत नाहीं. कारण भातिंडा सतलज नदीच्या दक्षिणेस असल्यामुळें पेशावरपासून फार दूर होईल. पूर्वीच म्हटल्याप्रमाणें आणि ईलियटनें फारा दिवसांपूर्वीच निर्देश केल्याप्रमाणें (२ पा. ४३८) महमुदाला आपलें लहानसें सैन्य घेऊन सबंध पंजाब प्रांत ओलांडून भातिंडा येथें जाणें शक्य नव्हतें. सिंधूच्या पश्चिमेचा सर्व प्रदेश, किंवा उत्बीच्या म्हणण्याप्रमाणें 'खोरासानच्या बाजूचा प्रदेश' महमुदाच्या राज्यांत सामील करण्यांत आला आणि तेथें मुसलमानी राज्य स्थापन करण्यांत आलें, इतकेंच नव्हे तर लोकांस जबरीनें मुसलमानी धर्माची दीक्षा देऊन "तेथील किळसवाणा अधार्मिकपणा नाहींसा करून तो सबंध शुद्ध करण्यांत आला." "ज्या हिंदी वीरांनीं सरहद्दीवरील डोंगरांत व किल्ल्यांत बंड उभारून दुष्टपणा केला त्यांच्यावर तरवार चालवून त्यांना शिक्षा करण्यांत आली." पेशावरावर जातांना अर्थात् त्यास खैबर वगैरे घाटांतून जावें लागलें आणि हल्लीप्रमाणेंच त्यावेळीं सरहद्दीवरील जातीनीं महमुदासहि त्रास दिला आणि त्यानें त्यांचें निष्ठुरपणें पारिपत्य केलें. त्यांना आणि सिंधूच्या पश्चिमेकडील लोकांना बाटविण्यांत आलें तें या वेळीं. महमुदाला जिंकलेले प्रांत आपल्या राज्यांत सामील करण्याचें माहीत तर होतेंच, परंतु शिवाय सामील केलेल्या प्रांतांतील लोकांस बाटवून आपलें राज्य चिरस्थाई कसें करावें हेंहि माहीत होतें. या विषयावर पुढें आम्ही ज्यास्त लिहिणार आहों.

आतां आपण जयपालाकडे वळूं. असें सांगतात कीं महमुदानें जयपालास व त्याच्या कुटुंबास खोरासान मधील एका किल्ल्यांत कोंडून ठेवण्याचा हुकूम दिला. जयपालास इतक्या लांबच्या जागीं नेलें असो किंवा नसो, त्याच्यापासून खंडणीदाखल ५० हत्ती घेऊन व त्याच्या मुलास ओलीस ठेवून घेऊन त्यानें जयपालास लवकरच

४

सोडून दिलें, आणि त्याला आपल्या राज्यांत जाऊं दिलें. तें राज्य आतां सिंधूच्या पूर्वेस होतें. आपल्या राज्यांत परत येण्याऐवजीं चितेंत जळून तो भस्मसात् झाला. शत्रूनें आपल्याला पाडाव करून कैद केलें यामुळें झालेली अप्रतिष्ठा त्याला सोसवली नाहीं. त्या काळांत पुष्कळ लोक, राजे देखील, अशा तऱ्हेनें प्राणत्याग करीत. आपण फार वृद्ध झाल्यामुळें राज्य करण्यास नालायक आहोंत असेंहि त्यास वाटलें असावें. उत्बीनें असें म्हटलें आहे कीं, महमुदाकडे ओलीस असलेल्या मुलास त्याच्या या प्राणत्यागाबद्दल पत्र आलें होतें. बहुधा त्याचा हा मुलगा आनंदपाळ असावा. त्यास महमुदानें सोडून दिलें व आपल्या राज्यांत जाऊन शांतपणें राज्य करूं दिलें. जयपालाच्या या शोचनीय अंतामुळें आणि दुर्दैवी दीर्घ जीविताामुळें त्याच्या-बद्दल कींव वाटल्याखेरीज राहात नाहीं व त्याच्या तेजस्वी प्राण-त्यागाबद्दल तर आदरच वाटतो.

या प्रसंगानंतर सुलतान महमुदानें पश्चिमेकडील आपली सत्ता दृढ करण्यासाठीं तुर्की राजा इलेक्खान याच्याबरोबर तह केला. या पूर्वींच इलेकखानानें बोखारा आपल्या ताब्यांत घेतलें होतें. खोरासान वगैरे आक्सस नदीच्या दक्षिणेकडील प्रांत महमुदास मिळाले आणि नदीच्या उत्तरेकडील मवरुन्नहर प्रांत आणि सामानी राज्याची राज-धानी बोखारा हीं इलेकखानाकडे राहिलीं. आपल्या मुलास इलेक्-खानाची मुलगी करून घेऊन हा तह महमुदानें बळकट केला असावा असें दिसून येतें. आपल्या राज्याच्या पश्चिम बाजूस अशा तऱ्हेनें सुरक्षितता झाल्यामुळें महमुदाला आपलें लक्ष हिंदुस्थानाकडे द्यावयास मोकळीक झाली. " तेथील संपत्तीनें त्याचा लोभ आणि मूर्तींनीं त्याचा धर्मोत्साह प्रदीप्त केला." तथापि हिंदुस्थानच त्याच्या विचाराचें ध्येय किंवा सार होतें असें मानण्याची जरूरी नाहीं. कारण त्याच्या कर्तृत्वाला आणि त्याच्या उत्साहाला पूर्वेप्रमाणेंच उत्तरे

कडेही क्षेत्र मिळण्याची आवश्यकता होती व तो वाव त्याला मिळा-लाहि. उत्बीनें दोहोंकडील स्वाऱ्यांचें सारख्याच विस्तारानें वर्णन केलें आहे. परंतु आम्हांला आमचें लक्ष हिंदुस्थानांतील त्याच्या काम-गिरी पुरतेंच मर्यादित करणें उचित आहे. कित्येक वेळां असें भास-विण्यांत येतें कीं दरसाल हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा महमुदानें पणच केला होता. वस्तुतः ही गोष्ट खरी नाहीं. महमुदाच्या हिंदु-स्थानी वृत्तान्त-लेखकांस मागाहून सुचलेली ही कल्पना आहे. उत्बीनें अशा पणाचा उल्लेख केलेला नाहीं.

दा. क्र. २८९६

# प्रकरण ५ वें.

## भाटियावरील स्वारी.

उत्तरकालीन इतिहासकारांनीं महमुदाच्या बारा स्वाऱ्यांची गणती केली आहे आणि युरोपीय इतिहास-कारांतही हि संख्या परंपरेनें कायम झाली आहे. या स्वाऱ्या बारा पेक्षां अधिक होत्या यांत संशय नाहीं. आपल्या दुसऱ्या भागाच्या परिशिष्टांत ईलियटनें सतरा स्वाऱ्यांची गणती दिली आहे. या स्वाऱ्यांच्या संख्येबद्दल विवरण करण्याची या ठिकाणीं जरूरी नाहीं. तो प्रश्न महत्त्वाचाहि नसून केवळ पांडित्याचा आहे; आणि म्हणून या स्वाऱ्यांचा अनुक्रम लावीत न बसतां आम्ही या स्वाऱ्यांचें सविस्तर वर्णन देत आहों. पेशावरवहिंड घेतल्यानंतर महमुदानें ज्या स्वारीची तयारी केली ती भाटिया वरील स्वारी होय. दुर्दैवानें भाटियाची नक्की भौगोलिक स्थिति अजून निश्चित करितां येत नाहीं. कारण या बाबतींत इतिहासकारांत महत्त्वाच्या बाबींबद्दल मतभेद आहे. आणि अमुक एका स्थळालाच भाटिया म्हणावें तर त्या मताच्या समर्थनाला भक्कम असा पुरावा नाहीं. पहिल्यानें उत्बीनें जें या स्वारीचें वर्णन केलें आहें तें देऊं ( पा. ३२२-२४ ). " सीस्तान मधील कारभाराची व्यवस्था लागल्यानंतर भाटिया जिंकण्याचा संकल्प पार पाडण्याचा सुलतानानें निश्चय केला. त्यानें सिहून ( सिंधु ) ओलांडली, मुलतानचा प्रांत बाजूस टाकला आणि भातियापुढें आपला तळ दिला. त्या शहराचे तट इतके उंच होते कीं गरुडांनांच फक्त त्यांवर जातां येई; आणि त्या तटांवरील पहारेकऱ्यांस मनांत आल्यास शुक्राच्या चांदिणीच्या ओष्टांवर आपल्या चुंबनाचा ठसाहि उमटावितां आला

असता ( !!! ). त्याच्या भोंवताली समुद्राप्रमाणें विस्तीर्ण आणि खोल अशा खंदकाचें वलय होतें. आपल्या विख्यात योद्धयांच्या पराक्रमाची घमेंड असलेला तेथील राजा शहराबाहेर पडला आणि त्यानें लढाई-दिली. सुलतानानें तीन दिवस युद्ध केलें. चौथे दिवशीं सूर्य आकाश-सागराच्या मध्यावर आला असतां 'अल्लाहो अकबर' या आरोळ्यांनीं आकाश दुमदुमून गेलें, मुसलमानांनीं हल्ला चढविला आणि त्यांत काफिरांचा काळेपणा धुतला गेला. बहुतेक सर्व शत्रूचे वीर किल्ल्यांत पळून गेले. परंतु धर्माच्या संरक्षकांनीं किल्ल्याचा रस्ता मागोमागच हस्तगत केला. सैन्यांतील तरुण लोकांनीं खंदक भरून काढला आणि रस्ता रुंद केला. किल्ल्याच्या तटावरून दोर सोडून त्यावरून विजयराज खालीं उतरून डोंगराच्या विवरांत निसटला आणि त्यानें जंगलाचा आश्रय केला. तेथें त्याचा पाठलाग करण्यांत आला. इतक्यांत आपला खंजीर काढून त्यानें आपला जीव घेतला. त्याच्या सैन्याचा मोठा भाग तरवारीला बळी पडला व एकशें साठ हत्ती पाडाव करण्यांत आले. त्या देशांतील मूर्तिपूजेचें पाप धुवून काढावें म्हणून त्या शहरांत सुलतानानें आपलें ठाणें वसविलें. त्यानें लोकांस मुसलमान केलें, मशिदी बांधण्याची व्यवस्था केली आणि इमाम नेमून दिले. तो परत जात असतां त्याच्या सैन्यावर अनेक अनर्थ कोसळले. माणसें मेलीं व सामानाचाहि नाश झाला. कित्येक अप-कीर्तीनें मेले आणि कित्येक भीतीनें हैराण झाले. सुलतानाचे अमूल्य प्राण मात्र वांचले. महमुदाच्या विश्वासांत असलेल्या अबुल फत बो-स्तीनें त्याला उत्कृष्ट सल्ला दिला आणि असल्या आकांक्षांच्या आणि साहसांच्या विरुद्ध आपलें मत दिलें, परंतु सुलतानानें त्याचा सल्ला मानला नाहीं."

उत्बीच्या लेखणींतून उतरलेलें हें लांब लचक वर्णन आम्ही येव-ढ्याच करितां दिलें आहे कीं त्यामुळें त्याच्या वर्णनाची काव्यमय

पद्धति वाचकांच्या ध्यानांत यावी आणि या वर्णनावरून उत्पन्न होणाऱ्या अडचणींची कल्पना व्हावी. या गोष्टी उत्बीच्या प्रत्यक्ष नजरेखालून गेल्या नाहींत. महमुदाचा चिटणीस या नात्यानें मिळालेल्या माहितीवरून त्यानें त्या लिहिल्या आहेत. ही येवढ्या लांबच्या प्रांतावर स्वारी करण्याचें महमुदानें कां ठरविलें हेंच कळणें प्रथम कठिण आहे. उत्बीनें त्याचें कांहींच कारण दिलें नाहीं. पुढें झालेल्या इतिहासकारांनीं असें म्हटलें आहें कीं विजयराज हा जयपालाचा सामंत होता आणि महमुदाला धावयाच्या खंडणीपैकीं त्याच्या वांटयाचा भाग त्यानें दिला नाहीं. परंतु महमुदानें विजयराजावर स्वारी करावयास हें कारणच होऊं शकत नाहीं. शिवाय जयपालाची महमुदानें मुक्तता केली तेव्हां त्यानें महमुदाला कोणतीही खंडणी देण्याचें कबूल करून घेतलें असावें असें दिसत नाहीं. आनंदपालालाहि सोडून दिलें तें खंडणी देण्याच्या अटीवर नव्हे. वस्तुतः महमुदानें जयपालाच्या राज्याचा बराचसा मोठा भाग लुबाडला होता; आणि तो त्याच्या मुक्ततेबद्दल पुरेसा मोबदला होता. तेंव्हां या स्वारीचें कारण या खंडणीपेक्षां काहीं तरी निराळें असावें. उत्बीच्या बखरींत त्याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. बहुधा भाटियाचा राजा हा मुलतानच्या नैऋत्येस एक प्रबळ व स्वतंत्र राजा असावा, व त्यानें सिंधूच्या पश्चिम बाजूच्या मुलुखावर आपला हक्क सांगून तेथील लोकांस चिथाविलें असावें. आपण मागेंच पाहिल्याप्रमाणें भट्टी राजे हे सुरुवातीला झाबुलिस्थानचे मालक होते. जयपाळ, आनंदपाळ वगैरे राजे ब्राह्मण नसून भट्टी होते अशी जी एक कल्पना आहे ती आमच्या मतें बरोबर नाहीं. शाही ब्राह्मण घराण्यांत नांवाच्या शेवटीं लावावयाचें मानपद जरी 'देव'चे ऐवजीं 'पाल' झालें असलें तरी तेवढ्यावरून राजघराण्यांतच पालट झाला असावा असें होत नाहीं. क्षत्रिय राजानींहि पालप्रमाणेंच देव हें मानपदहि

लाविलें आहे आणि शाही राजे जरी ब्राह्मण असले तरी व्यवहारांत ते क्षत्रियच बनले होते. त्यांनीं आपल्या मुली क्षत्रिय कुमारांनां दिल्या होत्या आणि क्षत्रिय मुली आपल्या कुलांत करून घेतल्या होत्या. सारांश, भाटियाचा राजा हा जयपालाचा कोणी संबंधी असून त्यानें कांहीं अपराध केल्यावरून महमुदानें भाटियावर स्वारी करण्याचें ठरविलें असावें असें दिसत नाहीं.

ही लांबची आणि दुःसाध्य स्वारी करण्याचें महमुदानें कोणत्याही कारणानें ठरविलें असो, ती त्यानें आपल्या नेहमींच्या उत्साहानें पूर्णपणें पार पाडली. बिजेराय (विजयराज) हि शौर्यानें लढला. त्यानें आपल्याला कैद करूं दिलें नाहीं. जयपालाप्रमाणें आपली अवमानना होण्यापूर्वींच आपल्या छातींत खंजीर भोंसकून घेऊन प्राणत्याग केला. भाटियाच्या लढवय्या नागरिकांनीं प्रायः आपले प्राण धारातीर्थीं अर्पिले. इतर लोक मुसलमान झाले. लोकांना कैद केल्याचें किंवा लुटालूट केल्याचें वर्णन येथें आढळत नाहीं. तेव्हां ही स्वारी लुटीसाठीं किंवा एखादी प्रसिद्ध मूर्ति फोडण्यासाठीं करण्यांत आली असावी असें वाटत नाहीं. भाटियाचे लोक आणि त्यांचा प्रांत सिंधु नदीच्या पूर्वतीरावर गझनी प्रांताच्या अगदीं जवळ होता. यामुळें तें काळजीचें स्थान होतें आणि म्हणूनच तो प्रान्त पूर्णपणें ताब्यांत आणून बाटविण्यांत आला असावा.

परंतु भाटिया शहर कोठें असावें ? तें शहर महत्वाचें होतें यांत शंका नाहीं. कारण अल्बेरुनीनें आपल्या भूगोलांत बझानच्या पश्चिमेस मुलतान, पलीकडे भाटिया होतें असा उल्लेख केला आहे. मुलतान हें बझानच्या अगदीं पश्चिमेस नसून थोडेसें वायव्येस आहे आणि भाटिया हें मुलतानच्या वायव्येस नसून नैऋत्येस असावें. तेव्हां तें भावलपूर नसावें. शिवाय भावलपुराशेजारीं पर्वतहि नाहींत. बाकी येथें हेंहि नमूद करून ठेवणें जरूर आहे कीं भाटिया शह-

राच्या किंवा किल्ल्याच्या वर्णनावरून असें दिसून येतें कीं भाटिया हें अगदीं पर्वताजवळ नसावें. कारण, डोंगरी किल्ल्याचें तट गगन-चुंबी असले तरी त्याच्या भोंवतीं खोल खंदक असणें शक्य नाहीं. उत्बीचीं वर्णनें स्वतःच्या माहितीनें लिहिलेलीं नसून तीं काव्यमय आहेत हें उघड आहे. महमुदानें मुलतान प्रांत बाजूस टाकला असें वर्णनांत आहे तेव्हां तो मुलतानच्या नैऋत्येस आला असावा. त्यानें फक्त सिंधु नदी ओलांडली, दुसरी कोणतीही नदी ओलांडली असें या स्वारीच्या वर्णनांत नाहीं; तेव्हां हें शहर मुलतानच्या नैऋत्येस सिंधु व सतलज यांचें दरम्यान कोठें तरी असावें. अल्बेरुनीनें त्याची जी जागा दिली आहे तिच्याशीं ही कल्पना जुळती आहे. बिजेरायानें सिंधूच्या तीरावरील डोंगरी अरण्यांत आश्रय घेतला असें जें फेरिस्तानें म्हटलें आहे तेंहि भाटिया हें सतलज व सिंधु यांचे दरम्यान होतें असें मानल्यास बरोबर ठरतें.

ईलियटच्या मतें मात्र भाटिया हा पाठ चुकला असावा, व तो शब्द भाटिया नसून भेरा असावा. त्याच्या म्हणण्याप्रमाणें हें शहर झेलमच्या डाव्या किनाऱ्यावर मुलतानच्या वायव्येस मिठाच्या डोंग-रांजवळ कोठें तरी असावें ( पान ४४० ). जयपाल--आनंदपालादि वाहिंडचे पाल हे भाटी असून बिजयरायाचे नातलग होते अशी त्याची कल्पना आहे. परंतु वर सांगितल्याप्रमाणें ही कल्पना बरोबर नाहीं व तिची आवश्यकताहि नाहीं. या स्वारीसाठीं महमूद बन्नूच्या खिंडीनें कुरम खोऱ्यांतून येऊन त्यानें सिंधु नदी ओलांडली आणि मुलतानच्या प्रांतांत न शिरतां त्याच्या कडेनें तो भाटियावर आला असें जें ईलियटनें म्हटलें आहे तें निःसंशय बरोबर आहे. आनंद-पालाच्या किंवा मुलतानच्या परकीय शत्रूच्या प्रांतांत घुसून आपल्या मार्गांत अडचणी उत्पन्न करून घेण्याची महमुदाला इच्छा नव्हती आणि म्हणून तो आड वळणाच्या लांबच्या मार्गानें आला

हें आपल्याला लवकरच दिसून येईल. परंतु यावरून भाटिया मुलतानच्या वायव्येस येत नाहीं, कारण तसें असतें तर महमुदाला मुलतानच्या कडेनेंही जावें लागलें नसतें. बिजेरायानें डोंगरावरील अरण्यांत पळून जाऊन आश्रय घेतला असें उत्बीनें जें वर्णन केलें आहे, त्यामुळें उत्पन्न झालेला पेंच उत्बीचें वर्णन अतिशयोक्तीचें आहे; भाटियाजवळ पर्वत नसून केवळ डोंगऱ्या होत्या असें म्हणटल्यानें सहज सुटण्यासारखा आहे. कसेंही असो, कोणतेंही अर्वाचीन शहर हें भाटिया होय असें दाखवितां येण्यासारखें नाहीं. अल्बेरुनीच्या काळांत तें शहर प्रसिद्ध असून तें मुलतानच्या नैऋत्येस सिंधु व सतलज नद्यांमध्यें होतें येवढेंच सांगून ते आजच्या भूगोलांत निश्चित न करतां स्वस्थ बसणें भाग आहे.

## टिप्पणी–भाटिया.

१ भापलपूर गॅझेटिअरमध्यें भाटिया म्हणजे भातिंडा होय असें मानून पुढें असें म्हटलें आहे कीं "इ. स. १००४ मध्यें महमुदानें भतिंडा सर केलें. तेथील राजा बिजयराज यानें आपला सम्राट् आनंद–पाल याच्या विरुद्ध बंड केलें होतें व महमुदाच्या अधिकाऱ्यांस त्रास दिला होता" "पुढील स्वारींत भतिंडाचें मार्गानें महमूद मुलतानवर चालून आला" महमुदाच्या स्वारीचें उत्बीनें जें वर्णन केलें आहे त्यावरून ही दोन्हीही विधानें संभवनीय वाटत नाहींत.

२ भाटनेर, (हनुमानगड) बिकानेर संस्थान; या नावाखालीं इंपीरिअल गॅझेटिअरमध्यें असे म्हटलें आहें कीं, महमुदानें या स्थळावर इ. स. १००४ मध्यें स्वारी केली अशी समजूत आहे." परंतु याबद्दल शंका आहे असेंही पुढें म्हटलें आहे.

(३) बिकानेर गॅझेटिअरमध्येंहि अशातऱ्हेचा उल्लेख असून आणखी असेंहि म्हटलें आहे कीं राजा दलचंद नांवाच्या एका भट्टी राजापासून तैमूरनें हा किल्ला घेतला. तो किल्ला अति मजबूत असून

त्याची चांगली तटबंदी केलेली होती. " तो सर्व हिंदुस्थानांत प्रख्यात होता " असें त्याचें वर्णन केलेलें आहे ( पा. ३९७ )

४ जैसलमिर गॅझेटिअरमध्यें भट्टींची प्राचीन परंपरा अशी दिली आहे:—" ते यदूचे वंशज होते. यादव मथुरा सोडून गेल्यानंतर ते सिंधु नदीच्या पलीकडे गेले आणि गज नांवाच्या एका राजानें गझनी हें शहर वसविलें. एका खोरासान राजानें त्यांचा पराभव केला व ते पुनः सिंधु ओलांडून परत आले व पंजाबांत वसती करून राहिले. त्यांनीं गझनी पुनः सर केली, परंतु बलंद राजाच्या वेळीं त्यांना पुनः गझनी बाहेर हांकून देण्यांत आलें. बलंदाचा मुलगा भट्टी यानें भोंवतालचे अनेक राजेरजवाडे जिंकले. त्याच्या माागून त्याचा मुलगा मंगळराव त्याच्या गादीवर आला. परंतु त्याचें भाग्य त्याच्या बापासारखें थोर नव्हतें. गझनीच्या राजानें त्याच्यावर स्वारी केली तेव्हां त्यानें आपलें राज्य सोडून दिलें. सतलज ओलांडून तो पळून गेला व त्यानें राजस्तानच्या वाळवंटांत आश्रय घेतला. तेथेंच त्याचे वंशज तेव्हांपासून आपलें घर करून राहिले आहेत. " भाटिया नांवाचें एक शहर सिंधु व सतलज यांच्या दरम्यान कोठें तरी होतें या म्हणण्याला या लोककथेनें दुजोराच मिळतो. या शहराचा तुर्कांनीं विध्वंस केला तेव्हां भट्टींनीं सतलज ओलांडली आणि वाळवंटांत शिरून ते जैसलमीर येथें येऊन राहिले.

# प्रकरण सहावें.

## मुलतानवरील स्वारी.

महंमूद हा दूर हिंदुस्थानांत लढाईंत गुंतला आहे असें पाहून इलेक्खानानें महंमुदाच्या पश्चिमेकडील प्रांतांवर स्वारी केली; व चीनच्या कादिरखानास सहायाला घेऊन तो जेहून ( आक्सस ) नदी ओलांडून आला. ही बातमी कानावर येतांच महंमूद विद्युल्लतेच्या वेगानें गझनीस परतला व तेथून बल्खमध्यें गेला. इलेक्खानाबरोबर घनघोर लढाई होऊन त्याचा पूर्ण मोड झाला व तो आक्सस पलीकडे पळून गेला. उत्बीनें असें नमूद केलें आहे कीं, या लढाईंत महमुदाच्या सैन्यांत तुर्क, खिलजी, अफगाण व हिंदू लोक होते; सैन्याच्या मध्यभागीं त्यानें पांचशें हत्ती उभे केले होते; तो स्वतः एका मस्त हत्तीवर बसला होता; व त्यानें इलेक्खानाच्या निवडक पांचशें संरक्षकांवर हल्ला करून आपल्या हत्तीकडून त्यांतले बरेच लोक मारविले. यावरून असें दिसून येतें कीं जी साधनसामुग्री कर्तृत्वहीन नेत्याच्या हातांत कुचकामाची ठरली तिचाच उपयोग करून कर्तबगार सेनापतीनीं यश मिळविलें. ज्या हिंदूसैनिकांस व हत्तींस जयपालास यश मिळवून देतां आलें नाहीं त्यांचाच उपयोग महमुदानें आपल्या स्वतःच्या तुर्कांविरुद्ध अत्यन्त यशस्वी तऱ्हेनें केला.

गझनीस परतल्यावर मुलतानच्या धर्मभ्रष्ट राज्याधिकाऱ्यास मुलतान काबीज करून तेथून हांकून लावावयाचें असें त्यानें ठरविलें. मुलतान हें त्यावेळीं स्वतंत्र राज्य होतें सिंधच्या मुसलमानी प्रान्तात उत्तरेला मुलतान आणि दक्षिणेला मनसुरा अशीं दोन राज्यें होतीं.

मुलतानचा राजा मुसलमान होता; परंतु तो करमाती पंथाचा होता. हा पंथ अबदुल्ला बिन मैमान नांवाच्या एका परशियन उपदेशकानें स्थापिला होता. सातवा इमाम अल्ली हा शेवटचा इमाम असें तो आपल्या उपदेशांत सांगे. मृत आत्म्याचें कल्पान्ती पुनरुत्थान होतें ही कल्पना त्याला मान्य नव्हती व अवतारावर त्याचा विश्वास होता. इराणांतून या पंथाचें उच्चाटन जेव्हां करण्यांत आलें तेव्हां त्या पंथाचे लोक हिंदुस्थानांत आले व त्यांस येथें पुष्कळ अनुयायी मिळाले. ( बहुधा हीं दोन्हीं तत्वें हिंदुधर्मावरूनच घेतलीं असावींत ). सात आणि बारा या संख्यांचें पावित्र्य, दीक्षेच्या निरनिराळ्या पायऱ्या, गूढ खुणा व अर्थ, इत्यादि विशेषतः हिंदुस्थानांतील साध्या भोळ्या धार्मिक माणसांस आवडणारीं गूढ तत्त्वेंहि त्या पंथांत होतीं. मुलतानचा राजा व तेथील पुष्कळ लोक करमाती पंथाचे होते. महमूद हा कडवा मुसलमान होता. ही धर्मभ्रष्टता हिंदुस्थानांतूनहि नाहींशी करावयाची असा त्यानें निश्चय केला. किंबहुना असेंहि दिसून येतें कीं मुलतानच्या गव्हर्नराच्या बापाला सबुक्तगीननें खोरासान मधून हांकून दिलें होतें.

मुलतानला जाण्याच्या समोरच्या मार्गांतील अडचणी आणि धोके महमुदाला माहीत होते. मागें सांगितल्याप्रमाणें भाटियाहून परत जातांना त्याच्या सैन्यास त्रास देण्यांत आला होता. त्याचें सामानसुमान नाहींसें झालें व त्याचा जीवहि धोक्यांत पडला होता. दरबारी उत्बीनें याचा खलासा हि केला नाहीं, मग वर्णन कोठचें ? या इतिहासलेखकानें महमुदाच्या विजयाची काव्यमय वर्णनें विस्तारानें लिहिलीं आहेत; परंतु त्याचे पराजय वर्णितांनां तो अगदीं संक्षेपानें लिहितो. बहुधा आपल्या राजाच्या व राजधानीच्या झालेल्या शोचनीय अन्तामुळें चिडून जाऊन भातिया प्रांतांतील लोकांनीं महमूद परत जात असतां त्याच्या विरुद्ध उठावणी करून त्याच्या सैन्याला

त्रासवून सोडलें असावें.किंवा हल्लींच्या वायव्य प्रान्ताच्या सरहद्दीवरील दऱ्याखोऱ्यांत व गिरिकंदरांत राहणाऱ्या टोळ्यांनीं महमुदावर हल्ले केले असावेत; हें अधिक संभवनीय आहे. या अडचणीचें खरें स्वरूप कोणतेंहि असो, या वेळीं लांबच्या व वळणावळणाच्या परंतु कमी त्रासदायक मार्गानें जाण्याचें त्यानें ठरविलें आणि पंजाबचा राजा आनंदपाल याला त्याच्या प्रांतांतून जाण्याबद्दल परवानगी मागितली. यावरून आनंदपालाचें राज्य पंजाबांत तरी खास होतें व तो स्वतंत्र राजा होता असें निश्चितें ठरतें. परंतु मुलतानचा अधिपति आनंदपालाचा दोस्त असल्यामुळें त्यानें परवानगी दिली नाहीं. मुलतानच्या अधिपतीनें सबक्तगिनाबरोबर झालेल्या लढाईत जयपालाला सहाय्यहि केलें असें म्हणतात. महमूद आनंदपालानें परवानगी दिली नाहीं म्हणून स्वस्थ बसणारा नव्हता. त्यानें अगोदर आनंदपालावर आणि नंतर मुलतानवर स्वारी करण्याचें ठरविलें. आनंदपालाचा पराभव झाला व काश्मीरपर्यंत त्याचा पाठलाग करण्यांत आला. ही लढाई पेशावर प्रांतांत झाली असें ईलियट म्हणतो; परंतु पेशावर महमुदाच्याच ताब्यांत होतें. या लढाईचें रणांगण पंजाबांत सिंधुनदीच्या पूर्वेस कोठें तरी असावें. उत्बीनें लढाईच्या स्थळाचा मुळींच उल्लेख केलेला नाहीं. तो फक्त इतकेंच म्हणतो कीं, " तेव्हां सुलतानानें शहरें व खेडीं लुटून उध्वस्त करून जाळून टाकण्याचा सैन्याला हुकूम दिला. त्यांनीं आनंदपालावर संकटामागून संकट उभें केलें व शेवटीं त्याला काश्मिरांत हांकून दिलें. " आनंदपालाची अशी दशा झालेली पाहतांच अबदुल फतेहनें आपली सगळी संपत्ति गोळा करून उंटाच्या पाठीवर घालून सेरेंदिब (सीलोन) येथें पाठवून दिली व तो स्वतः मुलतान सोडून पळून गेला.

महमुदानें मुलतानमध्यें प्रवेश केला व तेथील नागरिक धर्मभ्रष्ट झाले आहेत असें पाहून त्यांच्यावर जबर दंड बसविला. " या धर्म

स्थापनेचा वृत्तान्त सर्व शहरांत पसरून इजिप्तमध्येंहि पसरला आणि त्या सर्व भागांतील अश्रद्धा आणि पाखंडीपणा यांचें मुख्य उगमस्थानच म्हणजे मुलतानचें बंड तोडून टाकण्यांत आलें." (उत्बी ३२८-३२९). करमाती नास्तिकवादाप्रमाणें खिलाफती बद्दलचाहि वाद त्या वेळीं अस्तित्वांत होता. कांहीं लोक बगदादचा खलीपा हा खरा खलीपा म्हणून मानीत तर इतर इजिप्तच्या खलीफाचें पुढारीपण कबूल करीत व खुत्व्यांत (काझीच्या प्रार्थनेच्या वेळीं राजाचें व खलिपाचें नांव घेतात त्यास खुत्बाम्हणतात) त्याचेंहि नांव घालीत, महमूद स्वाभाविकपणेंच बगदादच्या खलीफाच्या बाजूचा होता. यावेळीं इजिप्तच्या खलीफानें पाठविलेलीं सन्मानाचीं वस्त्रें त्यानें स्वीकारिलीहि नाहींत.

महमूद मुलतानला कोणत्या मार्गानें गेला व कोणत्या मार्गानें तो परत गेला हें उत्बीनें नीट सांगितलेलें नाहीं. परंतु पुढील इतिहासकार तो भतिंडाच्या मार्गानें गेला असें म्हणतात; तसा तो गेला नसावा असें वाटतें. भेराच्या म्हणजे उत्तर मार्गानें परत गेला असें ईलियटनें म्हटलें आहें तें योग्य आहें (ई. पा. २ पा. ४३२). ही स्वारी कोणत्या वर्षीं झाली हेंहि नक्की कळत नाहीं. कांहीं इतिहासकारांच्या मतें ती इलेक-खानाच्या पराभवानंतर झाली, कांहींच्या मतें आधीं झाली. उत्बीला प्रमाण मानून ती अगोदर झाली असावी असें इलियटला वाटतें. परंतु उत्बीचा वृत्तान्त कालानुरोधानें लिहिलेला नाहीं आणि त्यानें या स्वारीचें साल दिलेलें नाहीं. परंतु इलेक्खाना बरोबरची लढाई आम्ही या स्वारीच्या पूर्वीं दिली आहे. कारण, आम्ही अपल्या इतिहासाच्या पहिल्या भागांत (पा. १९९) उध्दृत केलेल्या अलबरुनीनें दिलेल्या आनंदपालाच्या पत्रानें (अल्बेरुनी भा. २ पा. १०) या महत्वाच्या प्रसंगाच्या वृत्ताची सरणी व्यवस्थित रीतीनें जुळते.

" तुर्कांनीं तुमच्या विरुद्ध बंड केलें आहे असें मी ऐकितों. तुमची इच्छा असेल तर मी स्वत: येईन किंवा ५०० घोडे १००० सैनिक व १०० हत्ती बरोबर देऊन मी आपल्या मुलाला पाठवीन. माझा तुम्ही पराभव केला आहे. दुसऱ्या माणसानें तुमचा पराभव करूं नये अशी माझी इच्छा आहे. " मुलतानवर स्वारी कर- तानां निष्कारण स्वारी होऊन पराभव झाल्यानंतर आनंद- पालानें अशा तऱ्हेचा दाक्षिण्ययुक्त मदत करण्याचा प्रस्ताव केला असता असें वाटत नाहीं. आंतरराष्ट्रीय भाषेंत बोलावयाचें तर खुद्द अल्बेरुनीच्या म्हणण्याप्रमाणें आनंदपालाचेंच वर्तन जसें नेह- मींच न्याय्य व योग्य असे तसेंच याहि वेळीं होतें. त्यानें तेव्हां आप- ल्याला मित्रस्थानीं असलेल्या मुलतानसारख्या राज्यावर किंवा एखाद्या त्रयस्थ राष्ट्रावरहि स्वारी करण्याला आपल्या हद्दींतून महमदा- ला जाऊं देण्याचें नाकबूल केलें हें न्यायाचें व योग्यच होतें; परंतु फ्रान्सवर स्वारी करण्याकरितां जर्मनी आपल्या सरहद्दींतून जात असता बेलजमनें जर्मनीला जाण्याची परवानगी न दिल्यामुळें जर्म- नीची स्वारी आपल्यावर ओढून घेतली त्या वेळीं जर्मनीनें ज्याप्र- माणें तो अडथळा मानला नाहीं त्याप्रमाणेंच बलिष्ठ राष्ट्रें किंवा राजे असली अडचण मानीत नाहींत. महमुदानें जर्मनी सारखेंच वर्तन केलें. त्यानें अगोदर आनंदपालाला गांठला व त्याचें शासन केलें. महमुदाच्या अशा तऱ्हेच्या उघडाउघड अयोग्य वर्तनानंतर आनंद- पालानें वरील पत्र लिहिणें संभवनीय नाहीं. अल्बेरूनीनें म्हटल्या- प्रमाणें तो महमुदाचा हाडवैरी बनला. अल्बेरूनीनें त्याचे कारण निराळें दिलें आहे. " जेव्हां त्याच्या मुलाला कैद करण्यांत आलें तेव्हां याच आनंदपाल राजाच्या मनांत अगदीं विरुद्ध अशा भावना उत्पन्न झाल्या. त्याचा मुलगा त्रिलोचनपाल बापाहून अगदीं निराळा होता ". ह्मणजे मुसलमानांशीं तो स्नेहभावानें वागला आणि त्याला

त्यांच्याबद्दल प्रेम व आदर वाटत असे. त्रिलोचनपालाला कधीं कैद करण्यांत आलें तें निश्चित करितां येत नाहीं. तो या मुलतानच्या स्वारींत देखील महमुदाच्या हातांत पडला असेल व शेवटीं त्याला महमुदानें सन्मानानें सोडून दिलें असेल, व त्यामुळें त्याची मनोरचना निराळ्या प्रकारची बनली असेल. हें पत्र देतांना " त्यांचे परस्पर संबंध हें पत्र लिहितेवेळीं शिथिल होत चालले होते " असें अल्बेरुनीनें लिहिलें आहे हें खरें, परंतु त्या वाक्यांत महमुदानें स्वारी करून आनंदपालाला जागोजाग त्याचा पाठलाग करून काश्मिरांत हांकून लाविलें या सर्व गोष्टींचा अंतर्भाव होण्यासारखा नाहीं. त्यानें फक्त पूर्वींचे साधे संबंध--जे कधींच स्नेहाचे नव्हते तें--दाखविले जातात असें आम्हांस वाटतें.

मुलतानहून परत आल्यावर महमुदानें जरी आनंदपालाचा मुलुख पूर्वीं सांगितल्याप्रमाणें लुटून उध्वस्त केला होता तरी तो आपल्या ताब्यांत घेतल्याचें दिसत नाहीं. महमूद सिंधूच्या पलीकडे गेल्यावर आनंदपाल आपल्या राज्यांत परत आला असला पाहिजे. आपल्या पराभवाचें शल्य त्याच्या हृदयास टोंचून राहिलें व त्यानें यझनीच्या राजाची सत्ता नाहींशी करण्याचा जोराचा प्रयत्न करण्याचा निश्चय केला. त्याचें वर्णन पुढील प्रकरणांत करण्यांत येईल.

# प्रकरण सातवें.

## संयुक्त हिंदूंची शेवटली लढाई.

आनंदपालानें आपल्या मदतीला हिंदुस्थानच्या अनेक राजांना बोलावलें. आपल्या धर्मावरील व स्वातंत्र्यावरील या वाढत्या संकटाचा नायनाट करण्यासाठीं हिंदुस्थानानें एकत्र होऊन केलेल्या या शेवटच्या प्रयत्नाचें फेरिस्तानें फारच अतिशयोक्तिपूर्ण वर्णन केलें आहें. परंतु उत्बीनें या प्रयत्नाला अशा तऱ्हेचें व्यापक स्वरूप दिलेलें नाहीं. नेहमीप्रमाणेंच सत्य या दोहोंच्यामध्यें आहे. आपल्याला हें माहितच आहे कीं काल जसा मागें पडत जातो तसतशा बखरा जुन्या प्रसंगाचें वर्णन अतिशयोक्तीनें करितात. मागाहून येणारा प्रत्येक बखरकार अद्भुततेंत भर घालीत असतो. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासालाहि हीच गोष्ट लागू पडते; रामायणाच्या किंवा महाभारताच्या प्रत्येक नवीन आवृतींत मूळ गोष्टींत अद्भुत वृत्तांची अधिकाधिक भर पडत गेली आहे. मुसलमान इतिंहासका कांहीं या नियमाला अपवाद नाहींत, आणि त्यांनाहि विस्मयावह गोष्टींची भर घालण्याचा स्वाभाविक मोह आवरितां आला नाहीं. फेरिस्ता म्हणतो, ( ई. २ पा. ४४६ ):—

" महमुदानें हि. ३९९ ( इ. स. १००८ ) मध्यें आपलें सैन्य गोळा केलें, आणि हिंदस्थानांत स्वारी करून आनंदपालाचें पारिपत्य करण्याचा निश्चय केला. मुलतानच्या मागल्या स्वारीचे वेळीं आनंदपाल अतिशय उद्धटपणानें वागला होता. आनंदपालानें इतर हिंदूराजांची मदत मागितली. मुसलमानांस हिंदुस्थानांतून हांकून

देणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें त्यांस आतां वाटूं लागलें होतें. मदतीच्या निमंत्रणावरून उज्जनी, ग्वाल्हेर, कालंजर, कनोज, दिल्ली व अजमीरच्या राजांनीं संघ केला आणि सबुक्तगिनाविरुद्ध केव्हांहि उभारलें नव्हतें येवढें सैन्यें गोळा केलें. आनंदपालानें स्वतः सैनापत्य पतकरिलें आणि तो महमुदावर चालून गेला. दोन्ही सैन्यें पेशावर येथें भेटलीं आणि एकमेकांसमोर तळ देऊन राहिलीं. तीं अशा तऱ्हेनें ४० दिवस स्वस्थ पडून होतीं. कोणत्याहि बाजूला लढाईला सुरवात करावयाची उत्सुकता होईना. मूर्तिपूजकांच्या सैन्यांत दररोज भर पडत होती. काफिर गख्खारहि मोठें सैन्य घेऊन येऊन मिळालें. हिंदुस्त्रियांनीं आपले दागदागिनें विकले आणि लांब लांबच्या प्रदेशांतून या विक्रीचे आलेले पैसे आपल्या नवऱ्यांच्या आवश्यक गरजा भागविण्यासाठीं पाठवून दिले. ज्या गरीब होत्या त्यांनीं सूत कातून किंवा इतर श्रम करून सांचविलेल्या पैशांतून आपली मदत पाठवून दिली. ”

या लढाईचा समकालीन उत्बी यानें जो वृत्तांन्त दिला आहे त्याच्याशीं वरील वर्णन ताडून पाहिलें तर तें खरोखरच अतिशयोक्तिपूर्ण ठरलें “ सुलतान वामंद नदीवर आला तेव्हां वबाल बिन अद्ध-पाल हा त्याला मोठें सैन्य घेऊन आडवा झाला. युद्धाचा अग्नि-सकाळपासून संध्याकाळपर्यंत जळत होता. सुलतानाचें सैन्य पराभव पावून काफिरांच्या हातांत विजय पडतो कीं काय अशी वेळ आली होती. परंतु इस्लामी धर्माला जयाचें मिळालेलें आश्वासन खरें झालें. सुलतानानें आपल्या खास शरीरसंरक्षकांस घेऊन हल्ला केला आणि त्यापुढें बंडखोरांचे पाय तग धरूं शकले नाहींत (उत्बी, पा. २४०–४१)

आपले दागिने विकून आणि सूत कातून अथवा दुसरे कोणते तरी श्रम करून त्याची मिळालेली मजुरीची रक्कम पाठवून स्त्रियांनीं सैनिकांच्या खर्चाकरितां मदत पाठविली हें फिरिस्ताचें विधान शुद्ध

अतिशयोक्तीचें आहे. आपल्या सैन्याचा खर्च भागविण्या इतके हिंदू-राजे श्रीमंत होते. आणि जरूरच तर व्यापारी आणि देवळें यांच्या-पासून वर्गण्या गोळा करितां आल्या असत्या. उत्बीनें उल्लेख केला नसला तरी निरनिराळ्या अनेक हिंदू राज्यांतून फौजा आल्या, यावर विश्वास ठेवतां येईल. कारण गोळा झालेलें सैन्य इतके प्रचंड होतें कीं जयाचे पारडें हिंदूंच्या बाजूस कांहीं काळपर्यंत झुकत होतें. शिवाय कोरींव लेखांच्या पुराव्यावरूनहि कांहीं राजे आनंदपालाच्या मदतीला आले होते असें दिसून येतें. परंतु याहि बाबतींत उत्तरकालीन इतिहासाचें अधिष्ठान करून कल्पनेला सुचलीं त्या राज्यांचीं नावें फिरिस्तानें दिलीं आहेत. उज्जनीला जरी मालवाधिपति भोज राज्य करीत होता आणि सैन्य पाठविण्या इतका जरी तो प्रबळ होता तरी उज्जनी या लढाईंत सामील झाल्याचें दिसत नाहीं. परमारांच्या इतिहासांत सांगितल्याप्रमाणें भोजानें तुर्कांशीं युध्द केलें असा एका कोरींव लेखांत उल्लेख आहे; परंतु त्यांत त्याला जय मिळाला असें म्हटलें आहे. कालंजरनें या युध्दांत भाग घेतला यांत संशय नाहीं. धंगानें पूर्वीच्या संयुक्त प्रयत्नांत सबुक्तगिना विरुध्द झालेल्या लढा-ईंत भाग घेतला होता, त्याचें अनुकरण करून त्याचा मुलगा गंड या युध्दांत सामील झाला होता. कनोजला उत्तर हिंदुस्थानची सम्राट् पदवी असल्यामुळें तेथून सैन्य यावें हें स्वाभाविक. ग्वाल्हेर कालंजरच्या राजाचें मांडलिक होतें; तेथें कच्छपघात ( अर्वाचीन कच्छवाह ) कुलांतील समर्थ सामंत राजा राज्य करीत होता. आणि कोरींव लेखांत त्याचा उल्लेख नसला तरी ग्वाल्हेरहून हि फौज आली असावी. दिल्ली किंवा अजमीर यांचीं राज्यें त्यावेळीं स्थापित झालीं नसावींत किंवा त्यांना या युध्दांत भाग घेण्याची ताकद तरी नसावी. आनंदपालाच्या ताब्यांतील पुष्कळ पंजाबी रजवाड्यांनीं त्याला सहाय्य केलें असावें. फिरिस्तानें काश्मीरचा उल्लेख केलेला

नाहीं. आणि या प्रसंगीं आनंदपालाच्या मदतीला सैन्य पाठविण्यांत आलें, अशा तऱ्हेचा उल्लेख राजतरंगिणींतहि नाहीं. कसेंही असो, आपलें स्वातंत्र्य आणि आपला धर्म यांच्या नाशाचें संकट उभें करणाऱ्या गझनीच्या नव्या वाढत्या सत्तेपासून हिंदुस्थानचें रक्षण करण्यासाठीं केलेल्या या जोराच्या प्रयत्नांत आनंदपालानें प्रचंड सैन्य जमविलें होतें असें निःसंशय दिसून येतें.

ही हिंदुस्थानच्या भवितव्यतेचा निर्णय करणारीं लढाई पेशावरच्या मैदानांत झाली असें फिरिस्तानें म्हटलें आहे. परंतु ईलियटला हें संभवनीय वाटत नाहीं. उत्बीनें युद्धाचें क्षेत्र दिलेलें नाहीं. परंतु वाहिंड आणि सिंधूच्या पश्चिमेकडील प्रदेश महमुदाचे अमलाखालीं पूर्वींच असल्यामुळें निष्णात सेनापतीप्रमाणें शत्रु-सैन्याला त्याच्याच हद्दींत गांठण्याची तजवीज त्यानें केली असावी. उत्बीनें वमंद-नदीच्या तीराचा उलेख केला आहे ( पा. ३४० ). परंतु ही नदी कोणती हें निश्चित करितां येत नाहीं. ही नदी ओलांडण्यांत आली होती कीं नाहीं आणि असल्यास कोणी हेंहि त्यानें सांगितलें नाहीं. अटक जिल्ह्याच्या गॅझेटिअरमध्यें या लढाईची जागा त्या जिल्ह्यांतील अटक आणि हजरो यांच्या दरम्यान असलेल्या छच्छच्या मैदानांत होती असें म्हटलें आहे, व रावळपिंडीच्या गॅझेटिअरनें त्याचीच पुनरुक्ति केली आहे. दोहोंच्याहि मतें ही लढाई महमूद व शाहि-काबूल राजा आनंदपाल—तो पंजाबचाहि राजा होता—यांचे दरम्यान झाली. उत्बीच्या बखरींत हें नांव वबाल बिन अद्वपाल असें दिलें आहे. परंतु तो खास फारशी अक्षर वाचण्याचा दोष आहे. नावांतला शेवटला भाग तरी आनंदपालच असला पाहिजे. वबाल हें त्याच्या मुलाचें नांव असूं शकेल.

या लढाईचा प्रकार आणि तिचा कालावधि याचें फिरिस्तानें केलेलें वर्णन इ. स. १७६१ सालीं पानिपतच्या रणांगणावर हिंदू

मुसलमानांमध्येंच झालेल्या लढाईच्या हकीकतीशीं इतकें तंतोतंत जुळतें कीं फिरिस्तानें केलेलें वर्णन हें सदाशिवरावभाऊ व अहमद-शहा अबदाली यांच्यात झालेल्या लढाईच्या वर्णनावरून त्यानें नक्कल करून लिहिलें आहे, असा तर्क करण्याचा कोणासहि मोह झाला असता. परंतु ती दुसरी लढाई होण्यापूर्वींच दोनशेंपेक्षां अधिक वर्षें फिरिस्तानें आपलें पुस्तक लिहिलें असल्यामुळें आपल्याला फक्त इतिहासाची पुनरावृत्ति होते या नियमाची आठवण या युद्धामुळें होते. अटकनजीक छछच्या मैदानावर इ. स. १००८ मध्यें हिंदु व मुसलमान सैन्यें समबल असल्यामुळें दोन पहिलवान एकमेकांशीं भिडूनहि कांहीं वेळ हालचाल न करितां स्तब्ध राहतात, त्याप्रमाणें प्रतिपक्षावर सरशी मिळविण्याची योग्य संधि पहात चाळीस दिवस भोंवतालीं खंदक खणून एकमेकांसमोर तळ देऊन दोन्हीं सैन्यें बसलीं होतीं. ज्यांची संख्या अतिशयोक्तीनें तीस हजारपर्यंत फुगली आहे, अशा अर्धसंस्कृत व अनावृतशिर गख्खरांनीं* हिंदूंच्या सहाय्यास येऊन मात्र एकाएकी मुसलमानी खंदक ओलांडून मुसलमानांच्या तळावर हल्ला चढविला आणि दहापांच मिनिटांत दहापांच हजार मुसलमान शिपाई कापून काढले. झालें, लढाईस सुरवात होऊन दोन्हीं सैन्यें एकमेकांस भिडलीं आणि मध्यान्हापर्यंत उत्बीनेंहि म्हटल्याप्रमाणें हिंदूंची सरशी होती. परंतु यावेळीं भरती पूरी होऊन ओसरूं लागली. अकस्मात् असें होण्याला काय कारण घडलें तें उत्बीनें दिलेलें नाहीं, परंतु फिरिस्ता म्हणतो "गख्खरांचा आवेश

---

* गख्खार हे आतां मुसलमान झालेले असून विशेषत: रावळपिंडी जिल्ह्यांत आहेत. राजा जहांदादखान नावांच्या एका गख्खार संस्था-निकानें असें म्हटलें आहे कीं फिरिस्तानें खोक्करांऐवजीं गख्खार हें नांव चुकून दिलें आहे, हल्ला केला तो खोक्करांनीं. ही जातहि आतां मुसल-मान झाली आहे.

पाहून लढाई त्या दिवशीं थांबवावी म्हणून सुलतान स्वतः लढाईच्या धुमश्चक्रींतून बाहेर पडला. परंतु विधिघटना अशी कीं, आनंदपाल ज्या हत्तीवर बसला होता तो हत्ती त्याच्यावर फेंकलेल्या नक्तेलाच्या गोळ्यानीं आणि बाणांनीं एकाएकीं भडकला आणि तोंड फिरवून पळत सुटला. आपल्या सेनापतीनें ही पळण्याची इशारत दिली असें वाटून हिंदू सैन्यानें लढाई सोडून पळावयास सुरुवात केली. त्यांचा अबद्दला ताईनें पाठलाग केला आणि आठ हजार हिंदू कापून काढलें."

ही हकीगत उत्बीनें दिलेलीं नाहीं. परंतु त्यानें दुसरी एक गोष्ट सांगितली आहे व ती अधिक महत्त्वाची आहे. ती गोष्ट अशी "सुलतानानें आपल्या खास शरीरसंरक्षकांस घेऊन हल्ला केला व त्यापुढें काफिरांचा टिकाव लागला नाहीं." ही हकीकत मराठे व अफगाण यांच्या दरम्यान पानिपतांवर झालेल्या लढाईंत घडलेल्या हकीकतीबरहुकूम आहे. दोनप्रहरपर्यंत जय मराठ्यांकडे होता. इब्राइमखानाच्या पलटणींच्या तोफा आणि हुजुरातीच्या स्वारांचे हल्ले कहर करीत होते. अकस्मात् विश्वासरावाला गोळी लागली व तो आपल्या हत्तीवर मृत्यु येऊन पडला; आणि सेनापति पडला अशी बातमी पसरतांच मराठी सैन्य फुटलें. त्या हितावह क्षणांत महमुदाप्रमाणेंच अबदालीनें राखून ठेवलेलें ( रिझर्व ) अफगाण सैन्य घेऊन निकराचा हल्ला केला आणि मराठी सैन्य पराभव पावून पळूं लागलें. बहुधा शूर परंतु दुर्दैवी भाऊसाहेबाप्रमाणेंच आनंदपालहि हत्तीवरून उतरून लढाईच्या गर्दीत सामील झाला असावा व धारातीर्थी त्यानें आपला देह ठेविला असावा. कारण लढाईनंतर त्या दोघांचेंहि काय झालें तें आपल्याला नक्की माहीत नाहीं. ते जिवंत किंवा प्रेतावस्थेंत सांपडल्याचेंहि आपण वाचिलें नाहीं. हिंदू व मुसलमान यांच्या दरम्यान १००८ इ. स. मध्यें झालेलें हें अत्यंत महत्त्वाचें युद्ध अशा तऱ्हेचें असून सात शतकांनंतर होणाऱ्या त्यांमधील युद्धाची

पूर्वावृत्तिच होतें. पानिपतच्या लढाईनंतरहि हिंदूंचें सामर्थ्य जसें कांहीं काळ टिकलें तसेंच या युद्धानंतरहि हिंदूंचें प्राबल्य कांहीं कालपर्यंत पंजाबांत होतें. परंतु हा मर्मी घाव बसला आणि मुसलमानांस हिंदुस्थानांतून हांकून देण्याचें हिंदूंचें सामर्थ्य या दोन्ही लढायांत कायमचें नष्ट झालें.

आमच्या इतिहासाचें कथन पुढें चालू ठेवण्यापूर्वी येथें थोडें थांबून हिंदूंच्या परभावाच्या कारणांचा विचार करणें अवश्य आहे. पानिपतांत काय किंवा छच्छच्या मैदानांत काय मनुष्यबळाची हिंदूंस कमतरता नव्हती, किंबहुना असेल तर संख्याबल त्यांच्याच बाजूला अधिक होतें. पानिपतप्रमाणें येथेंहि हिंदू शौर्यानें आणि जिवावर उदार होऊन लढले. तिसरी गोष्ट, कोणत्याहि लढाईंत मुसलमानांचीं शस्त्रास्त्रें हिंदूंच्या शस्त्रास्त्रांपेक्षां अधिक तेजस्वी नव्हतीं. पानिपतास दोघांच्याहि जवळ तोफा होत्या आणि हिंदूंचाच तोफखाना अधिक कारगर होता. छच्छच्या लढाईंत तोफा किंवा बंदुका कोणाहि कडे नव्हत्या. त्यांचा त्यावेळीं शोधच लागला नव्हता. दोघांकडेही तींच शस्त्रें म्हणजे तरवार व भाले हीं होतीं. हिंदूंचे भाले आणि तरवारी मुसलमानांच्या भाले-तरवारींपेक्षां अधिक तीक्ष्ण नसले तरी कमीहि नव्हत्या. छच्छमध्यें आणि त्याचप्रमाणें पानिपतालाहि दैवच मुसलमानांस अनुकूल झालें असें कदाचित् म्हणतां येईल. दैव हें जय मिळवण्याच्या कारणांपैकीं एक कारण आहे असें जे कबूल करीत नाहींत त्यांना असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, दैवरूपी कारणाचा संबंध या मानवी जगांतील प्रत्येक प्रसंगाशीं निगडित झाला आहे. परंतु दैव अनुकूल किंवा प्रतिकूल आहे असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां म्हणण्याचा आशय असा असतो कीं मनुष्याच्या हातांत नसलेल्या अशा कांहीं आकस्मिक गोष्टी विजयीपक्षाला मदत करितात आणि पराजित पक्षाची निराशा करितात.


सबुक्तगिनाशीं यापूर्वीं सिंधु नदीच्या पलीकडे झालेल्या लढाईंत एकाएकीं बर्फाचें वादळ उठलें आणि उष्ण देशांत राहणाऱ्या हिंदु लोकांस तसल्या थंड हवेची संवय नसल्यामुळें त्यांची दैना उडाली. या लढाईंत आनंदपालाचा हत्ती बाणांच्या व नक्तेलाच्या गोळ्यांच्या तडाक्यांत बेफाम झाला आणि तोंड फिरवून पळूं लागला. परंतु आपल्याला हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं लढाऊ हत्ती असल्या अस्त्रांचा मार सहन करण्यास शिकविलेले असतात. बाण किंवा गोळे नवे किंवा विलक्षण नव्हते. ते या लढाईंतच प्रथम उपयोगांत आणले होते असें नाहीं. या अपघातांत आणि पानिपनतच्या लढाईंत विश्वासरावास प्राणास मुकविणाऱ्या अपघातांत काडीचें अंतर नाहीं. हत्तींच्या लढाईची कांहींहि माहिती नसलेल्या अशा हल्लींच्या लोकांस अनेक शतकांचें अंतर पडलेल्या अशा त्या कालांत सेनापतींनीं आणि विशेषतः स्वतः सैनापत्य अंगिकारिलेल्या राजांनीं हत्तींवर बसून गोळे, बाण आणि विशेषतः बंदुकीच्या गोळ्या यांस सहजासहजीं बळी पडावें हें खरोखर विलक्षण आहे असा शेरा मारण्याचा मोह होतो. परंतु बल्खनजीक इलेकखानाशीं लढतांना स्वतः महमूदहि हत्तीवरच स्वार झाला होता असें आपणांस पूर्वींच दिसलें आहे. तेव्हां आनंदपालानें हत्तीवर बसण्यांत घोडचूक केली अशी आपल्याला कल्पना करितां येणार नाहीं. परंतु विश्वासरावानें पानिपतास हत्तीवर बसून आपल्यावर बदुकीच्या गोळ्या घालण्याची शत्रूस मुभा दिली ही घोर चूक केली असें म्हणतां येतें. आनंदपालाच्या काळांत बंदुका नव्हत्या. त्याच्यावर जीं अस्त्रें फेंकतां आलीं असतीं तीं बाण आणि नक्तेलाचे गोळेच होते आणि त्यांपासून रक्षण करण्यास त्याचें व त्याच्या हत्तीचें चिलखत पुरेसें होतें.

दैव प्रतिकूल झालें व हत्ती फिरला असें मानलें तरी इतिहासकाराला असें म्हटल्याखेरीज गत्यंतर नाहीं कीं, अकस्मात् एखादी

प्रतिकूल गोष्ट मार्गांत आडवी आली असतां शूर व कणखर माण-सांनीं जें धैर्य व जो युक्तिबाजपणा दाखवावा अशी आशा करण्यांत येते तसें धैर्य किंवा तसा युक्तिबाजपणा केव्हांहि हिंदूंनीं दाखविला नाहीं. हा आमचा दोष आम्ही पूर्वींच भाग २ (पा. २४६) मध्यें दाखविलेला आहे.आणि पुष्कळदां खरोखर पराजय झाला नसतांहि नायकत्व करणाऱ्या राजाला एखादा अपघात झाला असतां हिंदु-स्थानांतील सैन्यें पळूं लागून जी विचित्र वर्तणूक करितात तें राष्ट्री-यत्वाच्या कल्पनेचा पूर्ण अभाव असल्यामुळें हिंदी सैनिकांस लढाईंत जय मिळविण्यांत स्वतःचें असें कांहींच हित वाटत नसतें म्हणून असें दाखवून दिलें आहे. कसेंहि असो, हिंदी स्वभावांतील किंबहुना हिंदु व मुसलमानहि लोकांचा हा दोष नमूद करण्यास हरकत नाहीं कीं, पाश्चात्य आणि विशेषतः ब्रिटिश सैनिकांचा या गुणाबद्दल लौकिक आहे; तसा आपत्काळीं कणखरपणें लढण्याचा हा गुण हिंदी लोकांच्या अंगीं नाहीं. सेनापतीला अत्यंत आवश्यक असलेला हा गुण महमुदाच्या ठिकाणीं होता यांत संशय नाहीं. शिवाजी-प्रमाणें तोहि दैव प्रतिकूल दिसलें असतां कधीं निराश न होतां चिकाटीनें लढे. शिवाय महमूद हा खरोखरच विख्यात सेनापति होता. अहमदशाहा अबदालीप्रमाणें त्याच्या जवळहि निश्चयी आणि शूर शरीरसंरक्षकाचें राखून ठेवलेलें ( रिझर्व ) पथक होतें. गझनीचे राजे व विशेषतः महमूद हें पथक फार खर्च करून जय्यत तयारीनें बाळगीत असत. अहमदशाहा अबदालीप्रमाणें महमुदानें योग्यक्षणीं या शरीरसंरक्षकांस घेऊन स्वतः हल्ला केला आणि त्या संस्मरणीय युद्धांत शेवटीं जय मिळविला. त्या जयानें अखिल हिंदुस्थानचें नसलें तरी पंजाबचें नशीब कायम ठरविलें आणि हा प्रान्त लवकरच मुसल-मानांच्या ताब्यांत गेला.

## टिप्पणी–संयुक्त लढाईचें ठिकाण.

पूर्वी सांगितलेंच आहे कीं फिरिस्ताच्या मते ही लढाई पेशावराजवळ झाली आणि कित्येक हिंदी ग्रंथकार पेशावर व जमरूद यांच्या दरमियान ही लढाई झाली असें नक्की ठिकाण सांगतात. प्रत्येक बाजूस निदान लाख फौज अशा प्रचण्ड संख्येमधील लढाईइतकें हे मैदान विस्तीर्ण आहे हेंहि खरें. पण अटक आणि रावळपिंडी जिल्ह्याच्या गॅझेटीयरमध्यें ही लढाई सिंधु नदीच्या पुर्वेंकडील छछच्या मैदानांत हजरोजवळ निश्चितपणें झाल्याचें विधान आहे. किंबहुना अटक जिल्ह्याच्या प्राथमिक शाळांत चालू असलेल्या भुगोलांत ही लढाई हजरोजवळ झाली असेंच स्पष्ट लिहिलें आहे. आमच्या मतें गॅझेटियरचें हें विधान मान्यकरण्याजोगें आहे. हें विधान कोणत्या आधारावर केलें आहे याचा अद्याप आम्हास ठाव लागला नाहीं. उत्बीनें एक वामंड नदी उल्लेखिली आहे व ती सुलतानाने वलांडली. पेशावर प्रांन्तांत या नांवाची नदी नसल्यानें आपल्यास येथे दुरस्ती करून नदी (सिन्धु) वहिंड येथें वलांडली, असें धरतां येईल. या लढाईत व इ. स. १७६१ च्या पानिपतच्या लढाईत पुष्कळ साम्य असल्याचें आपण पाहिलें आहे; त्यावरून असें सुचतें कीं ज्याप्रमाणें भाऊसाहेब यमुना उतरून अन्तर्वेदींत अबदालीस गाठण्याचा



विचार करीत आहेत तोंच अबदाली यमुना उतरून भाऊसाहेबांसमोर झाला त्याप्रमाणें महमूद स्वतः सिन्धु उतरून आनंदपालास आडवा झाला असावा; बहुतेक आनंदपाल दाक्षिणेकडून चाल करीत हजरोस पोंचून वाहिंड जवळ सिन्धु उतरण्याचा विचार करीत असावा. पुढें दिलेल्या नजरी नकाशावरून येथील लढाईच्या ठिकाणाची स्थिति वाचकांच्या लक्षांत येईल. शत्रूचें भारी सैन्य व मजबूत ठिकाण पाहून महमुदानें आपल्या-भोंवतीं खंदक खोदला. आनंदपालानें महमूद सिंधु उतरत असतां त्यास कां अडथळा केला नाहीं याचें कारण असें दिसतें कीं महमूद सिन्धु उतरून इकडे येईल असें त्यास वाटलें नसावें, किंवा त्यास योग्य वेळी बातमी नसावी किंवा सिन्धूच्या पूर्वेकडेंसच त्याशीं लढावें अशी त्याची इच्छा होती. चचानें महंमद कासमास सिन्धु उतरताना विरोध केल्याचें वर्णन जसें सिन्धच्या इतिहासांत आढळतें तसें येथें आनंदपालानें केल्याचें आढळत नाहीं. कदाचित् आनंदपाल येऊन पोंचण्यापूर्वींच महमूद सिन्धु नदी उतरून आला असेल. या कल्पनेत हजरोचा कबजा महमुदाचा असावा. हजरोच्या दाक्षिणेकडील छछचे मैदान अशा प्रचण्ड फौजांच्या लढाईला योग्य असें विस्तीर्ण आहे. या मैदानांत जवळ, १०।१५ फुटावर विपुळ पाणी लागतें. मैदानांत खाच खळगे किंवा उंचवटे नसून पानिपतच्या ( किंवा कुरुक्षेत्राच्या ) मैदानासारखें तें सपाट आहे आणि घोडदळांच्या हालचालींस योग्य आहे. हल्लींहि या मैदानांत ब्रिटिश फौजांच्या कवायती होतात.

# प्रकरण आठवें.

## नगरकोटची स्वारी.

हिंदु संयुक्त सैन्याचा धुव्वा उडवून त्याला उधळून लावल्यावर महमुदानें त्या अनुकूल परिस्थितीचा फायदा घेतला व नगरकोटावर एकदम चाल केली. तेथील विख्यात मूर्ति आणि अगणित संपत्ति याबद्दल नगरकोट प्रसिद्ध होतें. केवळ अमर्याद लूट मिळविण्याच्याच एका हेतूनें महमुदानें केलेली अशी ही पहिलीच स्वारी. केवळ लुटीसाठीं महमुदानें हिंदु देवालयांवर हल्ले केले याबद्दल त्याला दोष देतां येईल किंवा नाहीं याचें विवरण पुढें करण्यांत येईल. येथें येवढेंच सांगितलेंलें पुरे कीं त्यानें शिवाजीप्रमाणें वाकबगार अशा बातमीदारांचें स्वतंत्र खातें बाळगून लूट कोठें मिळेल याची बरोबर माहिती गोळा केलेली असली पाहिजे. उत्तरहिंदुस्थानांतील हिंदुराज्यांत त्याचे बातमीदार उघडपणें किंवा गुप्तरीतीनें फिरत असावेत. नगरकोट हा कांगडा राज्यांतील किल्ला होता. तेथें एक प्रसिद्ध मूर्ति होती. ती कोणत्या देवतेची होती तें कोठें आढळत नाहीं. ज्वालामुखी देवळाचा व या देवळाचा कांहींवेळां घोंटाळा करण्यांत येतो पण ज्वालामुखी हें निराळेंच देऊळ आहे. आणि ज्वालामुखी नगरकोटपासून पंधरा मैलांवर आहे; तेथें एका टेंकडीच्या शिखरापासून वायूचे ( गॅसचे ) उत्क्षेप उडतात व यात्रेकरूं आले असतां पुजारी ते पेटवितात. येथें बहुतकरून दुर्गेचें देऊळ असावें. ज्वालामुखीप्रमाणेंच नगरकोट येथील मूर्तीची पूजा करण्यासाठीं दूरदूरचे लोक येत व मौल्यवान वस्तू देवाला अर्पण करीत. तेथील किल्ला फार मजबूत असल्यामुळें मुसलमानी इतिहासकारांनीं

म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थानचे राजे आपले खजिनेहि तेथें ठेवीत. नगरकोट हें अर्वाचीन नांव आहे. प्राचीन नांव भीमनगर होतें. महाभारतांतील वीर पुरुष भीम यानें तें शहर वसविलें असें सांगतात. परंतु बहुश: तें काबूलच्या ब्राह्मणशाही भीमदेवानें वसविलें असावें. उत्बीनें त्याचें नांव " बहीम किल्ला " असें दिलें आहे. फारशींत बहीमच्या ऐवजीं भीम सहज वाचतां येईल. उत्बीनें या स्वारीचा वृत्तांत दिला आहे तो असा:—

" आणि मग तो (महमूद) बहीमबगरा ( भीमनगर ) किल्ल्याच्या पायथ्याशीं येऊन पोंचला. हा किल्ला पाण्यांत पर्वताप्रमाणें उंच आहे. हिंदुस्थानांतील राजांनीं आपल्या प्रसिद्ध मूर्ति तेथें आणून ठेविल्यामुळें तो त्यांचा खजिनाच बनला होता. मौल्यवान वस्तु आणि जवाहिर यांचीं ओझींच्या ओझीं मुक्ति मिळण्यासाठीं तेथें पाठविलीं होतीं. सुलतानानें त्या किल्ल्याला चोहोंबाजूनें वेढा दिला. किल्ल्यांतील लोक किल्ल्याचें रक्षण करण्यासाठीं निश्चयानें व चिकाटीनें लढूं लागले. ........शेवटीं........ते शरण आले. आणि त्यांनीं सुलतानाच्या छत्राखालीं नोकरी करण्याचें मान्य केलें. जवाहीर, हिरे आणि दूर्मिळ संग्राह्य वस्तु सुलतानास इतकीं सांपडली कीं हातांनीं तीं मोजतां आलीं नाहींत आणि हिशेबाच्या वह्या त्यांची नोंद करावयास पुरेनात. सोनें व रुपें सुलतानाने आपले खजिनदार अलतूनताश व इस्तरजिन यांचे ताब्यांत दिलें आणि जवाहीर आपल्या स्वत:च्या ताब्यांत ठेवून तें सर्व उंटांच्या व माणसांच्या पाठीवर घालून नेलें. त्यांतील जेवढ्याची गणती करितां आली तेवढ्यावरून दिऱ्हमचीं १०७० पुडकीं आणि ७००८०० मण सोनें व रुपें त्या लुटींत सांपडलें असें दिसतें. रेशमी कापड व कपडे याविषयीं म्हणाल तर तीं इतकीं होतीं कीं सरकारी कारकुनांस त्यांची व्यवस्थित मोजदादच करितां येईना. अशा तऱ्हेचें कसब व रम्य बनावट

आपण कोठेंच पाहिलीं नाहीं असें लोकांनीं कबूल केलें. त्यांना एक रुप्याचें प्रशस्त सबंध घर सांपडलें. तें साठ हात लांब व पन्नास हात रुंद होतें. त्यांत दोरांच्या सहाय्यानें अशी योजना केली होती कीं सर्व घरांत एकच दालन करावें किंवा निरनिराळ्या खोल्या पाडाव्या. तें घर लहान मोठें करितां येत असे. त्यांत ग्रीकपद्धतीचे जरतारीचे काम केलेले रेशमी पडदे होते. शिवाय दोन सोन्याचे व दोन रुप्याचे पुतळे होते. अत्यंत विश्वासु असा अधिकारी किल्ल्याच्या रक्षणासाठीं ठेवून सुलतान गझनीला परतला. तेथें एका दिवाणखान्यांत गालिच्यावर त्यानें हिरे, मोत्यें, पुष्कराज व पाचू यांचें प्रदर्शन केलें आणि निरनिराळ्या देशाचे मांडलिक रजवाडे व प्रांतांतून आलेले प्रतिनिधि आणि तुर्कांच्या राज्याचे वकील यांनीं तें पाहून आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. " महमुदाला त्याच्या स्वाऱ्यांत कशा अवाढव्य लूटी मिळत याची वाचकांस कल्पना यावी व अशा तऱ्हेचीं वर्णनें पुनः पुनः द्यावीं लागूं नयेत म्हणून नमुन्यादाखल हें लुटीचें वर्णन आम्हीं दिलें आहे. येथें हें हि वाचकांच्या नजरेस आणावयास हरकत नाहीं कीं, शिवाजीप्रमाणें महमुदहि लुटींत जी संपत्ति तो मिळवी तिचा तपशीलवार हिशोब ठेवीत असे. त्या लुटीची योग्य तऱ्हेनें किंमत करण्यांत येत असे. सरकारचा एक मोठा विशिष्ट भाग काढून ठेवून बाकीची लूट शिपायांत वांटण्याबद्दलचें कांहीं नियम पाळण्यांत येत असले पाहिजेत. नवीन धर्माच्या प्रसारार्थ सुरुवातीला आरबानीं केलेल्या लढायांत सरकार किंवा खलिफा आणि शिपायी यांत लुटीची विभागणी करण्याचे जे नियम होते ते कडकपणें पाळण्यांत येत असत. सारांश, शिवाजीच्या अमदानींतल्याप्रमाणें लूट करण्याला व ती वांटून घेण्याला एक पद्धत होती.

नगरकोट किल्याभोंवतालीं जें दुस्तर पाणी होतें तें ईलियटच्या मतें बाणगंगा व बियाही नद्यांचें. भीमनगर किल्ल्यापासून सुमारें एक

मैलावर आहे, हल्लीं जेथें भवानी (देवी) आहे, तेथें होतें (ई. २ पा. ४४'५). ही नगरकोटची स्वारी छछहजरो येथें संयुक्त हिंदु सैन्याचा पराभव झाल्या बरोबर करण्यांत आली असली पाहिजे. कारण उत्बीनें योजिलेल्या 'आणि मग' या शब्दांनीं तोच अर्थ स्पष्टपणें दर्शविला चातो. परंतु कांहीं इतिहासकारांनीं ती इ. स. १००९ मध्यें दिली आहे.

## टिप्पणी—कांगडा येथील किल्ला व देवळें.

कांगडा हें एक हिमालयांतील उंचावर मैदान आहे. त्याच्या पाठीशीं बर्फाच्छादित रांग आहे; व त्यांतून तीन चार खड्ड म्हणजे लहान नद्या बारा महिने वाहणाऱ्या वाहतात. हा प्रदेश अतिप्राचीन काळीं आर्यसंस्कृतीखालीं आला असावा. आणि महाभारताच्या काळापासून येथें चंद्रवंशी क्षत्रिय राजे (त्यांस हल्लीं कटोच म्हणतात) राज्य करीत आले, हें आपण पाहिलेंच आहे. त्यांची आश्रयाची मजबूत जागा म्हणजे कांगड्याचा किल्ला हा एक पुराणा किल्ला आहे. ज्यावेळेस तोफा माहीत नव्हत्या, त्यावेळेस हा किल्ला अजेय होता. दोन खोल खड्ड उर्फ नद्या, बाणगंगा आणि मनूनी, यांच्या संगमावर हा किल्ला आहे. ह्या खोल नद्यांच्या संगमाच्या ठिकाणीं त्यांच्या दरम्यान फारच अरुंद जमीनीची पट्टी आहे. नदीच्या कडेची किल्याची बाजू बहुतेक उभी सुमारें तीनशें फूट उंच आहे. नद्यांमधील अरुंद जमीनीच्या पट्टींत एक मोठा खंदक खोदला आहे आणि किल्यांत जाण्याचा दरवाजा या कृत्रिम खोलीच्या पलीकडे आहे. या ठिकाणीं थोड्याशा संरक्षकांस किल्याचे संरक्षण करितां येईल. मुसलमानी इतिहासकारांच्या लेखांवरून या किल्यांत एक प्रसिद्ध देऊळ होतें, हें देऊळ कोणाचें होतें हें ठिकाणावर मिळविलेल्या माहितीवरून व इ. स. १९०५ च्या ऑर्किआलॉजिकल सर्व्हे रिपोर्टावरून आपण ठरविण्याचा प्रयत्न करूं. या रिपोर्टांत इ. स. १९०५ च्या धरणीकंपापूर्वी जीं देवळें कांगडांत होतीं त्यांची विस्तृत माहिती दिली आहे.

या रिपोर्टांत ह्या किल्याचा इतिहास येणेंप्रमाणें दिला आहे. (पा. ११) "अजेय महमुदानें इ. स. १००९ त हा किल्ला घेतला. इ. स.

१३३७ त तो पुनः महंमद तघलकानें आणि इ. स. १३५१ त त्याच्या पुढील सुलतान फिरोजशहा यानें पुनः घेतला. मुसलमानांच्या हातांत जेव्हां तो जहांगीरनें १६५१त जिंकला, तेव्हां तो कायमचा पडला. जेव्हां मोंगलांची सत्ता कमी झाली तेव्हां तो संसारचंद दुसरा यानें पुनः परत घेतला. कर्नल जनकचंद जम्मू व काश्मीर कौन्सिलचे मेंबर ( हें स्वतः कटोच आहेत ) यांच्या मतें संसारचंदाचा बाप घमंडचंद यानें किल्ला परत घेतला ( इ. स. १७८६ ). तो त्यांनीं पुनः रणजीतसिंगास इ. स. १८०९ मध्यें दिला. शीखांनीं तो ब्रिटिशांस इ. स. १८४६ त दिला. ब्रिटिश फौज इ. स. १९०० पर्यंत किल्यावर रहात होती." (हल्लीं तो धरणीकंपानें पडला आहे.)

किल्यांतील मुख्य संस्मरणीय ठिकाणें म्हणजे लक्ष्मीनारायण आणि शीतला यांचीं देवळें होत. हीं दोन्ही परवाच्या धरणीकंपांत पडलीं. आपल्यास असें गृहीत धरतां येतें कीं, महमुदानें हा किल्ला लुटल्यानंतरची हीं देवळें होतीं. अंबिकेचें देऊळ ( अद्याप येथें पूजा होते ) ही एक साधी इमारत आहे. धरणिकंपानें तें बिघडलेलें नाहीं. या देवळाच्या कृतीवरून असें दिसतें कीं, तें मुसलमानी अमदानींत बांधलें गेलें. अंबिकेच्या दक्षिणेस दोन जैन मूर्ति आहेत. एक नुसती पादुकाची आहे. दुसऱ्यावर आदिनाथाची बसलेली मूर्ति आहे. त्याखालीं अंशतः नष्ट झालेला एक लेख आहे. कानिंगहमच्या मतें त्याजवर १५२३ संवत् ( १४६६ इसवी ) मिती दिली आहे. अर्थात् तो संसारचंद पहिला याच्या वेळचा आहे. (पान १५)


" तिसरें चित्र कांगडा शहरांतील इंद्रेश्वर देवळाचें आहे. हें देऊळ शिवालय असून तें इंद्रचंद्रानें बांधलें असें म्हणतात. कल्हणानें अनंतदेवाचा ( इ. स. १०२८-१०६३ ) समकालीन म्हणून ज्या इंद्रचंद्राचें नांव सांगितलें आहे, तोच हा इंद्रचंद्र असें मानलें तर हें देऊळ अकराव्या :शतकापासून आहे असें दिसतें. या देवळाच्या बाजूलाहि दोन जैन मूर्ति आहेत. त्यापैकीं एकावर 'लोककाल' ३० ही मिति दिलेली आहे. बैजनाथ देवळांतील प्रशस्तीच्या समकालीन हा लेख आहे असें प्रथम समजलें गेलें. अर्थात् तो इ. स. ८५४ चा मानला गेला पण

हल्लीं बैजनाथ लेख संवत् १२०४ चा ठरला आहे, तेव्हां ही मूर्ति इ. स. ११५४ मधली असावी. चार खांबावर असलेला देवळाचा मंडप धरणीकंपानें जमीनदोस्त झाला आहे. पण बाकीचें देऊळ जैन मूर्तींसह जसेंच्या तसें आहे. ( पा. १६ )

"कांगडा जिल्ह्यांतील सर्वांत प्रसिद्ध पूज्यस्थान म्हटले म्हणजे वज्रेश्वरीचें देऊळ होय. हें कांगडा शहराचा एक बाहेरचा भाग भवन नांवाचा आहे त्यांत आहे. प्राचीन काळापासून हें ठिकाण पवित्र आहे. पण भूकंपांत जें देऊळ पडलें तें प्राचीन नव्हतें. जुन्या देवळाचा दरवाजा कायम असून त्यांत एक लेख आहे त्यावरून 'श्रीमहंमदाच्या वेळीं' हें देऊळ बांधलें असें दिसतें. कार्निंगहॅनच्या मतें हा दिल्लीस इ. स. १५२३ पासून १५४६ पर्यंत राज्यकरणारा महंमद सय्यद होय. हें देऊळ बांधलें त्यावेळेस कांगडयांत संसारचंद राजा होता." हें देऊळ हिंदु-समाजानें आतां पुनः बांधलें आहे हें सांगितलें पाहिजे.

वरील माहितीवरून असें ठरतें कीं, जें देऊळ महंमुदानें पाडलें तें किल्ल्यांतील लक्ष्मीनारायणाचें किंवा शीतळादेवीचें देऊळ नव्हे; किंवा शहरांतील इंद्रेश्वराचें देऊळ नव्हे. कारण या तीन्ही इमारती महमुदानंतरच्या आहेत. बाकी राहतात किल्यांतील अंबिकेचें देऊळ व भवन येथील वज्रेश्वरीचें देऊळ. हें वज्रेश्वराचें देऊळ पुनः बांधतांना हिंदू समाजानें जें एक छापिल प्रसिद्धिपत्र काढलें आहे, त्यांत असें म्हटलें आहे कीं, महमुदानें हें देऊळ इ. स. १००९ मध्यें तोडलें. तें कांगड्याच्या एका राजानें इ. स. १०४३ त पुन्हां बांधलें. इ. स. १३३७ त महंमद तघलकानें तें पुनः तोडलें. तें हिंदूनीं पुनः बांधलें; पण फिरोजनें इ. स. १३६०त पुनः तोडलें. इ. स. १४४०त संसारचंद पहिला यानें पुनः बांधलें; पण शेरशहाचा सेनापति खवासखान यानें इ. स. १५४० त तें पुनः तोडलें. तें राजा धरमचंद यानें अकबरच्या वेळेस पुनः बांधलें. हल्लींचे गुलेरचे महाराज बहुश्रुत आणि विद्वान् असून मोठ्या सभ्य चालीचे आहेत; त्यानीं आम्हांस असें सांगितलें कीं, "महमुदानें जें देऊळ तोडलें तें भवनमधील वज्रेश्वरीचें देऊळ होय. आणि पूर्वकाळीं भवनाच्या

भोंवतीं कोट होता." पुष्कळांचें मत असेंच आहे. पण आम्हांस असें वाटतें कीं, वज्रेश्वरीचें पहिलें देऊळ संसारचंद पहिला यानें बांधलेलेंच होय. या मताचीं कारणें पुढील प्रमाणें आहेत. मुसलमानी लेखकांच्या सर्व वर्णनांत महमुदानें कांगडाचा किल्ला घेऊन तेथील देऊळ तोडलें असें येतें. वज्रेश्वरीचें देऊळ किल्यांत नाहीं; भवन येथें आहे. हा भाग कांगडा किल्ला किंवा कांगडानगर यापासून दोन मैल दूर आहे. तेथील जागेची स्थिति वाचकांच्या लक्षांत येण्यासाठीं आम्ही एक कोट कांगडा,




कोट कांगड्याचा नजरी नकाशा

नगरकोट आणि भवन यांची स्थिति दाखविणारा नजरी नकाशा येथें देत आहों. भवनाभोंवतीं कोट असला तरी तो मजबूत नसावा. त्यास घेणें कोट कांगड्याइतकें कठीण नसावें. तघलकानें जें देऊळ मूर्तीसह पाडलें तेंहि किल्यांतच असून हा किल्ला त्यानें घेतल्याचें दिसतें. कटोच राजांनीं किल्ला परत घेतला, आणि पुनः देऊळ बांधलें. पण फिरोज तघलकानें पुनः किल्ला घेतला. अशा वारंवार आपत्तीनंतर संसारचंद पहिला याच्या वेळीं हिंदूनीं हें देऊळ भवनमध्यें खालीं आणलें असें वाटतें.

ही आणखी गोष्ट सांगितली पाहिजे कीं, हल्लीच्या वज्रेश्वरी देवळांतील मूर्ति हातांनीं केलेली नसून स्वयंभू मूर्ति आहे. म्हणजे जमीनींतून थोडेसें वर आलेल्या एका दगडास डोक्याचा निदान डोळ्यांचा आकार

आहे. देवीची स्वयंभू मूर्ति आम्ही हीच प्रथम पाहिली. या स्वयंभू स्थानाविषयीं अशी आख्यायिका आहे कीं, एक शेतकरी शेत नांगरीत असतां नांगराचा फाळ देवीस लागून रक्त बाहेर आलें, त्यामुळें ही देवी सांपडली. स्वयंभू देवाच्या प्रकट होण्याची गोष्ट नेहमीं अशीच असते. असें संभवनीय दिसतें कीं, बनारस किंवा उज्जयिनी येथें मुसलमानी सत्ता स्थापन झाल्यावरहि ज्याप्रमाणें तोडलेल्या जुन्या देवाच्या शेजारीं त्याच देवाचें दुसरें देऊळ हिंदूंस बांधूं दिलें, त्याचप्रमाणें कांगड्यांतहि किल्ला मुसलमानांच्या ताब्यांत राहून हिंदूंस त्याच देवतेचें भवन येथें एक निराळें देऊळ बांधण्यास परवानगी मिळाली. हें वज्रेश्वरीचें देऊळ संसारचंद पहिला यानें इ. स. १४४०त बांधलें. पण मूर्तिभंजक शेरशहा यानें शंभर वर्षांनंतर तें तोडलें. धर्मासंबंधीं समतोल बुद्धि ठेवणारा अकबर यानें धरमचंदास तें देऊळ पुनः बांधूं दिलें. वरील मनोरंजक इतिहासावरून कांगड्याच्या कटोच राजांची उत्कट हिंदुधर्मश्रद्धा चांगली दिसून येते. इ. स. सोळाशेंच्या सुमारें धरमचंदानें बांधलेलें देउळ इ. स. १९०५च्या भूकंपापर्यंत कायम होतें. हिंदु समाजाच्या जोरदार धर्मभावनेनें हें देऊळ पुनः बांधलें गेलें आहे. फक्त कळसावर सोनें चढणें बाकी आहे.

ही गोष्ट आणखी सांगितली पाहिजे कीं किल्ल्यावरील अंबिकेच्या देवळांत अजून कटोच रजपूत पूजा करण्यास जातात. किंबहुना किल्ल्यांतील अंबिका देवीसमोर प्रत्येक कटोच गोदान संस्काराच्या वेळीं कापलेले आपले केस नेऊन ठेवावितो असें आम्हांस कळलें. या गोष्टीवरून आणि वज्रेश्वरी देवीच्या प्रकट होण्याच्या कथेवरून आम्हांस असें वाटतें कीं, महमुदानें तोडलेलें कांगडांतील प्रसिद्ध देवालय अंबिकेचें असावें, ( हल्लींचें अंबिकेचें देवालय ऑर्कियालॉजिकल संर्व्हेच्या रिपोर्टाप्रमाणें महमुदाच्या नंतरचें आहे ) किंवा तें किल्ल्यांतील वज्रेश्वरीचें मूळचें देऊळ असावें. अंबिकेच्या देवालयांतील हल्लीची मूर्तीहि हातानें न केलेली म्हणजे स्वयंभू आहे. अशा देवळांत चलमूर्ति निराळ्या असतात आणि उत्बीनेहि स्पष्ट सांगितलें आहे कीं या ठिकाणीं हिंदुस्थानच्या लोकांनीं आपल्या अनेक मूर्ति आणून ठेवल्या होत्या.

उत्बीनें जें वर्णन केलें आहे कीं, 'बहीमबग्राच्या किल्ल्याजवळ महमूद पोहोंचला तो किल्ला पाण्यामध्यें पर्वतासारखा उंच होता आणि तेथें अलंघ्य खाडा होता' (पा. ३४१), तें या दोन नद्यांच्या संगमावर असलेल्या या किल्ल्याला बरोबर लागू पडतें. बहीमबग्रा हा शद्ब भीमनगर असा वाचला पाहिजे. काबूलच्या भीमशहानें भवन शहर वसविलें अशी समजूत आहे; पण उत्बीचें पुढचें वर्णन भवनास लागू पडत नाहीं. तेव्हां भीमनगर या शब्दांत नगरकोट, भवन आणि कांगडा किल्ला या तिहींचा समावेश करावा.

# प्रकरण नववें.

## (१) पंजाबचें मांडलिकत्व.

पूर्वी सांगितलेंच आहे कीं, महमुदाचें लक्ष पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे सारख्याच सावधगिरीनें विभागलेलें असे. त्याची दूरदृष्टि आणि त्याची अविश्रांत चळवळ दोन्ही दिशांस सारख्याच जागरूकतेनें चालत असे. किरमान आणि कोहिस्तान या पश्चिमेकडील व उत्तरेकडील दोन प्रांतांतील उद्भवलेल्या अडचणींचा बंदोबस्त करून पंजाबचा प्रश्न कायमचा सोडविण्याकडे त्यांनें लक्ष दिलें. पंजाबच्या राजाला त्यानें वाकविलें होतें आणि त्याच्या राज्यांतील एक मजबूत किल्ला कांगडाकोट आपल्या कबजांत घेतला होता. पंजाब राजाच्या आश्रयाचा दुसरा किल्ला नारदीन घेण्याच्या उद्योगास तो आतां लागला आणि हिंदुस्थानाच्या प्रांतांत घुसून ( उत्बी वर्णन करतो ) "त्या प्रांताचा विध्वंस करण्यास, मूर्तिपूजकांना शिक्षा देण्यास, मूर्ति फोडण्यास व गरीब व श्रीमंत लोकांस त्रास देण्यास त्यानें प्रारंभ केला. त्या लोकांचा राजा त्यानें नरकास पाठविला ( ठार मारिला ). हा प्रकार जेव्हां 'हिंदच्या' राजानें पाहिला आणि आपले जवळचे व दूरचे प्रांत उध्वस्त झालेले पाहिले तेव्हां शरण जाऊन महमुदाचें मांडलिकत्व कबुल करण्यास त्यानें आपले नातेवाईक त्याकडे पाठविले" ( उत्बी पान ३६१ ). उत्बीनें या स्वारीचें असें थोडक्यांत वर्णन केलें आहे. या भागाच्या मथळ्यांत नारदीन हल्ला करून घेतलें असें जरी त्यानें म्हटलें आहे, तरी त्या हल्याचें त्यानें वर्णन केलेलें नाहीं. उत्बीनंतर लिहिलेल्या बखरींवरून इलियटनें असा तर्क केला आहे कीं "या स्वाऱ्या दोन होत्या, कित्येक

इतिहासकार म्हणतात त्याप्रमाणें एक नव्हती; आणि नारदीन शब्दांत गुजराथची राजधानी नहरवालाकडे उत्बीचा रोख दिसतो. दुसरी स्वारी नंदन किल्यावरील होय." हिचें वर्णन फिरिस्ता आणि इतर इतिहासकार यांनीं केलें आहे तें पुढें येणारच आहे. उत्बीच्या लेखांवरून दोन स्वाऱ्या झाल्याचेंहि स्पष्ट दिसतें; आणि दुसरीचें वर्णन त्यानें पुढें केले आहे. पण नारदीन म्हणजे नहरवाला असा एकीभाव करणें कठिण आहे. कारण मध्यंतरीचा पंजाब काबीज केल्याशिवाय महमुदास इतकें दूर दक्षिणेस जाणें शक्य नव्हतें. आमच्या मतें नारदीन म्हणजे पंजाबांतलीच एक जागा असावी, आणि महमुदानें ती घेऊन पंजाबची नासाडी केल्यानें पंजाबच्या राजास त्याचें मांडलिकत्व कबुल करणें भाग पडलें असावें. या राजाचें नांव काय होतें हें उत्बीनें सांगितलें नाहीं, आणि एक राजा ठार झाल्याचेंहि त्यानें वर्णन केलें आहे. यावरून असें संभवनीय वाटतें कीं, आनंदपाल स्वत: या युद्धांत मारला गेला असावा, आणि त्याचा पुत्र त्रिलोचनपाल यानें मांडलिकत्व कबूल केलें असावें. अल्बेरूनीच्या सांगण्याचा उल्लेख पूर्वीं आलाच आहे कीं, आनंदपाल हा अलीकडे महमुदाचा कट्टा शत्रु बनला होता, पण त्याचा पुत्र त्रिलोचनपाल याची मन:स्थिति महमुदाविषयीं अनुकूल होती. या सर्व गोष्टींवरून आम्हांस असें वाटतें कीं, संयुक्त हिंदूनीं केलेल्या पूर्वींच्या लढाईंत मारला न जातां आनंदपाल यावेळीं मारला गेला (इ. स. १००९ किंवा १०१०) आणि त्रिलोचनपालानें मांडलिकत्वाच्या शर्ती मान्य करून महमुदाशीं तह केला. या शर्तीमुळें पंजाब गझनवी साम्राज्याचा एक प्रांत बनला. या शर्ती उत्बीनें अशा दिल्या आहेत:-

"(१) पंजाबच्या राजानें खंडणी देण्याचें कबूल केलें आणि गझनवी राज्याचें मांडलिकत्व मान्य केलें. (२) ही खंडणी साठ हत्तीचे जोड (?) आणि एक नगदी रक्कम दोन्ही पक्षाच्या संमतीनें ठरेल

ती पंजाबच्या लोकांनीं व सरदारांनीं गझनीच्या खजिन्यांत भरावी. ( ३ ) गझनीतर्फे आम्हीं राज्य करितों हें दाखविण्यासाठीं गझनी येथें दोन हजार फौज नोकरीस ठेवावी. ( ४ ) दर वर्ष, महिना व दिवस आपलें मांडलिकत्व जाहीर करावें. ( ५ ) पुढील येणाऱ्या राजानींहि पुढें याच शर्ती चालवाव्या. सदर शर्तीवर सुलतान राजी झाला ! ! आणि ही ठराविक रक्कम गझनवी साम्राज्याच्या फडणिशी दप्तरांत एक मोठी उत्पन्नाची बाब होऊन गेली. या तहानें व्यापारी व जाणारे येणारे लोक यांचे तांडे खुरासान व हिंदच्या प्रांतामध्यें सुरक्षित रीतीनें जाऊं लागले." ( पा. ३६२ )

हरएक राज्याच्या उच्छेदाच्या पायऱ्या एकामागून एक वरप्रमाणें ठरलेल्याच आहेत. आठशें वर्षानंतर झालेल्या मराठी राज्याच्या उच्छेदाची येथें आपणांस आठवण होते. प्रारंभीं इ. स. १८०३मध्यें मराठे आणि इंग्रज यांजमध्यें कडाक्याचें युद्ध झालें. ज्याप्रमाणें हिंदूंच्या संयुक्त सैन्याचा पराभव इ. स. १००८मध्यें हजरोजवळ महमुदाच्या सैनापत्याच्या कौशल्यानें झाला, त्याचप्रमाणें इ. स. १८०३ मध्यें असईच्या लढाईंत मराठी संयुक्त फौजेचा पराभव इंग्लिशांचा कुशल सेनापति वेल्स्ली यानें केला. ज्याप्रमाणें त्रिलोचनपालानें मांडलिकत्व कबूल केलें व तैनाती फौज ठेविली, त्याचप्रमाणें बाजीरावानेंहि मांडलिकत्व कबूल करून ब्रिटिश शिपायांची एक तैनाती फौज पुणें येथें ठेविली. या तैनातीचा प्रकार मात्र दोन्ही ठिकाणीं उलट होता. आनंदपालाच्या पुत्रानें त्या वेळच्या अंकित राजांच्या पद्धतीप्रमाणें गझनी येथें मुसलमानी साम्राज्याच्या चाकरीसाठीं आपल्या खर्चानें दोन हजार आपली फौज ठेविली. याच्या उलट ब्रिटिशांची तैनातीची पद्धत होती. त्यांनीं अंकित राजाच्या दरबारीं म्हणजे राजधानींत ब्रिटिश फौज अंकिताच्या खर्चानें तैनात ठेवण्यास भाग पाडलें. शेवटचा उच्छेद करण्यास ही दुसरी पद्धत

फार पीरणामकारक आहे हें सांगावयास नकोच; आणि यांत एका प्रकारची जबरदस्त खंडणी आणखीं उत्पन्न होते. असो, हा शेवटचा उच्छेद त्रिलोचनपालावर लौकरच म्हणजे चार वर्षांतच कोसळला हें आपण पुढच्या प्रकरणांत पाहूं. बाजीरावाच्या समान उदाहरणांत शेवटच्या उच्छेदानें सुमारें पंधरा वर्षांनंतर बाजीरावास गांठलें.

अशा प्रकारानें पंजाबचे कांहीं दिवस मांडलिकत्व कबूल करून घेणें महंमुदास जरूर होतें. कारण पश्चिमेकडे ज्या अडचणी उत्पन्न झाल्या त्यांजकडे यामुळें स्वस्थ चित्तानें त्यास लक्ष देतां आलें. यापैकीं मुख्य अडचण आम्हीं येथें वर्णन करितों. कारण हिंदी वाचकांस तिचें महत्व आहे. गझनीस पश्चिमेकडे लागूनच घोरचा एक लहानसा डोंगराळ प्रदेश आहे. यांत एका कडव्या अफगाण लोकांची जात रहात असे, व ती प्रवाशी व व्यापारी यांच्या तांड्यास नेहमीं त्रास देत असे. हा प्रांत गझनीला जवळच असल्यानें हा प्रकार महमुदाच्या नाकावर माशी बसल्याप्रमाणें महमुदास त्रासदायक होई. हे लोक विधर्मी असून मोठे कुरेबाज असत आणि व्यापाऱ्यांच्या व यात्रेकरूंच्या तांड्यांपासून आपल्या कठिण डोंगरांच्या आश्रयानें जबरदस्त खंडण्या वसूल करीत. अर्थात् त्यांचा पक्का बंदोबस्त करणें महमुदास भाग पडलें. त्यांच्या कठिण चढावाच्या जाग्यांत त्यांजवर हल्ला करण्याचा महमुदानें आपल्या सैन्यास हुकूम केला, व तो स्वतः आपले शरीरसंरक्षक घेऊन गेला. अडचणीच्या घाटांतून घुसून घोरच्या राज्याच्या किल्ल्याजवळ तो जाऊन पोहोंचला. तेथें घनघोर युद्ध झालें आणि महमुदानें नेहमीच्या युक्तीप्रमाणें आपल्या शिपायांस पाठ फिरवून पराभव पावून पळत असल्याचा देखावा दाखविण्यास इशारा केला. उत्बी लिहितो, “ ते दैवहत फसले. त्या हिंदूंस स्थिर राहवेना, व लुटण्याच्या इच्छेच्या

मोहानें डोंगर सोडून ते मैदानांत आले. सुलतानानें फौजेचें तोंड फिरवून त्या सर्वांस जमिनीवर निजाविलें. त्या लोकांच्या मुख्याचा पुत्र कैद झाला व त्या किल्ल्यांत पिढ्यानुपिढ्या मिळविलेली लूट व हत्यारें आणि संपत्ति महमुदाच्या हातीं लागली. त्या पुत्रानें आपल्या आंगठींत असलेलें विष चोखून प्राण दिला." (पा. ३६४–६५). हें वर्णन आम्हीं मुद्दाम विस्तारानें दिलें आहे. वाचकांचें लक्ष दोन तीन महत्वाच्या मुद्याकडे वेधेल. या घोरच्या दरींत राहणारे लोक अजून हिंदु होते. यांनींच पुढें मुसलमान झाल्यावर बाराव्या शतकांत हिंदुस्थानवर स्वारी करून हिंदुस्थान जिंकलें. महमुदानें या वेळीं त्यांस जिंकून जबरदस्तीनें बाटविलें. ते कडवे मुसलमान बनून त्यांनीं पुढें हिंदुस्थानच नव्हे तर गझनीच्या तुर्कांचें राज्यहि जिंकलें. दुसरी गोष्ट ही कीं, शिवाजीप्रमाणेंच महमूदहि लढाईंत गनीमी काव्याचा उपयोग करी. तिसरी गोष्ट ही कीं उत्तम राज्यकर्त्यांच्या लक्षणाप्रमाणें महमुदाचें लक्ष व्यापाराच्या उत्कर्षासाठीं रस्त्यांच्या सुरक्षिततेकडे असे. खुरासानचा व्यापार वाढावा आणि खुरासान व हिंद यांचे दरम्यान व्यापाऱ्यांचे तांडे सुरक्षित फिरावे अशी त्याची इच्छा होती. त्यावेळीं अलीकडच्या काळाप्रमाणेंच डोंगरांतील रानटी लोक मध्यवर्ती राजसत्ता ढिली पडली म्हणजे या व्यापाऱ्यांच्या तांड्यांवर छापे घालून जबरदस्त दंड वसूल करीत. त्यांचा बंदोबस्त जितक्या दक्षतेनें व सक्तीनें हल्लीं ब्रिटिश साम्राज्य करितें, तितक्याच सक्तीनें व दक्षतेनें महमूद करी, ही गोष्ट वाचकांस दिसून येईल.

## (२) पंजाब खालसा झाला.

या पुढें चार वर्षेंपर्यंत पंजाब व हिंदुस्थान सुरक्षित राहिलें. बहुधा त्रिलोचनपालानें कबूल केलेली खंडणी तक्रार न करतां सालो-

साल दिली. शिवाय महमुदाचे लक्षहि पश्चिमेकडे गुंतलें होतें. खुरासान प्रांत व त्याची राजधानी निशापुर येथें दरम्यान एक भयंकर दुष्काळ पडल्याचें वर्णन उत्बीनें केलें आहे. तुर्कांचा राजा इलेक्खान यानें या अडचणीचा फायदा घेऊन कांहीं त्रास दिल्याचेंहि वर्णन त्यानें केलें आहे. गर्जिस्तान अथवा जॉर्जिया हा प्रांत सामानी साम्राज्याचा एक भाग होता, तेथील शॉर ( जॉर्जियाच्या राजास शॉर म्हणत, जसें हिंदूंच्या राजास राय, तुर्कांच्या राजास खान आणि ग्रीकांच्या राजास सीझर म्हणत ) महंमुदास जुमानीनासा झाला. तेव्हां महमुदानें नेहमीच्या तडकाफडकीनें व पूर्ण तयारीनें त्यावर झडप घालून त्यास जिंकलें. या अडचणीतून बाहेर पडल्यावर महमुदाला हिंदुस्थानकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला. पंजाब नुसता मांडलिक झाला आहे तो पुरा खालसा करण्याची इच्छा मानवी स्वभावाप्रमाणें त्यास होणें साहाजिकच होतें. आणि त्याच मानवी स्वभावानें बंड करून आपल्यावर घातलेलें जोखड फेकून देण्याची इच्छा त्रिलोचनपालास होणेंहि साहजिकच होतें. तात्पर्य, एका पक्षानें किंवा दुसऱ्या पक्षानें कांहीं तरी सबब काढून युद्धास सुरवात केली. वर सांगितलेल्या समान उदाहरणांत इ. स. १८१८ मध्यें पुनः मराठा युद्ध अशाच तऱ्हेनें सुरू होऊन बापू गोखल्याचा पराभव झाल्यावर बाजीराव कायमचा राज्यभ्रष्ट झाला हें वाचकांस अवगत आहेच.

या युद्धाचें वर्णन उत्बीनें पुढील प्रमाणें केलें आहे. (पान. ३८९–३९२) "इ. स. १००९ मध्यें ( ४०० हिजरीमध्यें ) हिंदुस्थान जिंकून, तेथें मशीदी बांधून टाकल्यावर विधर्मीयांचा देश पूर्णपणें काबीज करण्याची इच्छा सुलतान करूं लागला. यासाठीं त्यानें आपल्या विजयी फौजा जमा केल्या आणि त्यांच्यावर मोठ्या सन्मानाचा पूर केला. हिंदुस्थानांत आल्यावर पुष्कळ बर्फ पडलेलें

पाहून तो गझनीस परतला. पण वसंतांत पुनः फिरला. हिंदुस्थानचा राजा एका डोंगराचा आश्रय घेऊन बसला होता, व घाटाच्या अरुंद रस्त्यांत त्यानें हत्ती उभे केलें होते. त्यानें आपल्या राज्यांतील घोड-दळ आणि पायदळ जमा केलें. एक मोठी विधर्मीयांची फौज हिंदुस्थान, सिंध व चारी दिशा येथून जमा होऊन माशांप्रमाणें गोंगाऊं लागली, व युद्ध सुरू होऊन रणांगणावर डोकीं चेंडूप्रमाणें उडूं लागलीं. जेव्हां जेव्हां हत्ती लढाईस पुढें येत, तेव्हां तेव्हां मुसलमानी फौज हत्तीच्या सोंडा तलवारीनीं तोडीत व गळे भाल्यांनीं भोसकीत. ज्या वेळेस आपला सरदार 'अबदल्लाताई' पेचांत पडलेला महमुदाच्या दृष्टीस पडला, तेव्हां त्यानें आपल्या निवडक गारदांपैकीं कांहीं तारे त्याच्या मदतीस पाठवून दिले. याप्रमाणें युद्धाचा अग्नि पेटत राहून शेवटीं विजयाच्या पाण्यानें विझला; आणि महमुदाच्या सुदैवाच्या एका फटकाऱ्यानें शत्रूंचे सर्व प्रयत्न धुळीसारखे उडून गेले, आणि मुसलमानांनीं त्यांची चीजबस्त व हत्ती लुटून घेतले........या रीतीनें हा प्रांत इस्लामाच्या राज्यांत उच्च दर्जावर येऊन बसला, आणि महमुदाच्या स्वाऱ्यांच्या रजिस्टरांत हा विजय नोंदला गेला."

वरील वर्णनावरून असें दिसतें कीं त्रिलोचनपालानें अनेक हिंदुराज्यांतून फौजा जमवून महंमुदाला शेवटची टक्कर देण्यासाठीं तिसऱ्यानदां संयुक्त प्रयत्न केला. आणि एक जोराची भयंकर लढाई होऊन त्यांत महमुदाच्या चांगल्या नशीबानें व त्याच्या शरीररक्षकांच्या शौर्यानें त्यास पुन्हां जय मिळाला. ही लढाई ४०४ हिजरी अथवा इ. स. १०१३ मध्यें झाली, या तारखेबद्दल इलियटनें उत्बीचाच आधार घेतला आहे. पण कित्येक प्रतींत वर सांगितल्याप्रमाणें ४०० हिजरी हेंच वर्ष दिलेलें आढळतें, व तीच तारीख कित्येक इतर मुसलमान इतिहासकार देतात. ही लढाई कोठें झाली ह्याजबद्दलहि बराच वाद आहे. उत्बीनें आपल्या अध्यायाच्या मथळ्यांत नारदीन् शब्द दिला आहे.

दुसरे लोक नंदूना हें नांव देतात. कांहीं लोकांचें असें मत आहे कीं ज्यूडच्या डोंगरांत झेलम नदीवर असलेल्या बालनाथच्या टेकडीजवळ हें युद्ध झालें. पण इलियटचें असें मत आहे कीं ज्या घाटाचा उल्लेख उत्बीनें केला आहे, तो मर्गला घाट असावा (इलियटर पान. ४५१). याच लढाईचें निजामुद्दीन अहमद यानें ज्यास्त सविस्तर वर्णन दिलें आहे त्यावरून पुढील अधिक माहिती इलियट देतो.

"४०४ हिजरीमध्यें सुलतानानें बालनाथ डोंगरांत असलेल्या नंदुना किल्ल्यावर आपलें सैन्य चालविलें. पुरु-जयपाल त्याच्या रक्षणाकरितां निवडक सैन्य ठेवून स्वतः काश्मीरच्या दऱ्यांत निघून गेला. खालीं सुरुंग लावून व इतर रीतींनें किल्ला घेतल्यावर सुलतान पुरुजयपालावर चालून गेला. पण तो आणखी डोंगरांत पळून गेला. सुलतानाला पुष्कळ लूट आणि गुलाम मिळाले. अनेक काफरांस बाटवून आणि इस्लामधर्माचा प्रसार करून सुलतान गझनीला परत आला." इलियटचें असें मत आहे कीं, "नंदूना किल्ल्यांत लढणारा हिंदु अधिकारी जयपालाचा पुत्र भीम असावा. किंबहुना उत्बीमध्येंच हें नांव निडरभीम असें आलेलें आहे." ज्या भाषांतराचा आम्हीं येथें उपयोग केला आहे त्यांत आम्हांस हें नांव सांपडलें नाहीं. कदाचित् उत्बीच्या भिन्न प्रती उपलब्ध असतील. पुरुजयपाल हा कोण हें इलियटनें विवेचिलें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. हेंहि नांव चुकीनें वाचलें गेलें आहे हें स्पष्ट होय. कारण यावेळीं त्रिलोचनपाल हा राजा होता आणि पर्शियन किंवा आरबी लिपींत 'त्रिलोचनपाल' हा शब्द पुरुजयपाल असा वाचला जाणें शक्य आहे. जयपाल आणि आनंदपालहि यावेळेस जिवंत नव्हते. पंजाबातील शाहींच्या गादीवर त्रिलोचनपाल होता. त्याचा पुत्र भीम आणि त्रिलोचनपाल आपल्या निर्भय पुत्रास लढाई करण्यास ठेवून काश्मीरांत निघून गेला असें संभवनीय दिसतें. या लढाईंत निडरभीमा-

चाहि पराभव झाला. उत्बीनें पुढें जें वाक्य घातलें आहे त्यावरून असें दिसतें कीं, सर्व पंजाब निदान त्याचा मोठा भाग यावेळीं खालसा होऊन गझनीच्या राज्यास जोडला गेला. अल्बेरूनीच्या लिहिण्याप्रमाणें त्रिलोचनपाल यानंतर इ. स. १०२१ पर्यंत जिवंत होता; तेव्हां वरील दुसऱ्या हकीकतीचा मेळ घालून असें म्हणतां येतें कीं तो आणि भीम काश्मीरांत जाऊन काश्मीरच्या लगतच्या पंजाबच्या कांहीं प्रांतांत हिमालयाच्या पायथ्याशीं आणखीं सात वर्षें राज्य करीत होता.

राजतरंगिणीचा प्रकाशक स्टीन याचें असें मत आहे कीं, त्रिलोचनपाल आणि महमूद यामध्यें तौशी नदीवर जी महत्त्वाची लढाई झाली आणि ज्याचें विस्तृत वर्णन काश्मीरच्या वरील इतिहासांत कल्हणानें केलें आहे ती लढाई याचवेळीं म्हणजे हिजरी ४०४ किंवा इसवी १०१३ मध्यें झाली. ही नदी हजारा जिल्ह्यांत पश्चिमेकडून झेलमला येऊन मिळते. हा जिल्हा काश्मीरच्या सरहद्दीला लागून आहे. या लढाईंत काश्मीरची एक फौज तुंगाच्या हाताखालीं त्रिलोचनपालाच्या मदतीस आली होती. "या कावेबाज तुर्कांशीं संभाळून लढाई कर" असें त्रिलोचनपालानें तुंगास बजाविलें, व डोंगराच्या आश्रयानें त्यास लढाण्याची सल्ला दिली. पण महमुदानें आपल्या नेहमीच्या चालीप्रमाणें एक फौजेची तुकडी तौशी नदीपलीकडे पाठविली. तिचा तुंगानें पराभव केला आणि ती पळून नदी उतरून अलीकडे आली. या चालीनें फसून तुंगास जोर चढून तो नदी उतरून मैदानांत येऊन महमुदाशीं लढूं लागला. लढाई मोठया खडाजंगीची झाली. अनेक काश्मीरचे सरदार मृत्युमुखीं पडले व त्रिलोचनपालानेंहि स्वतः फार पराक्रम केला. परंतु हिंदूंची बाजू दुर्दैवानें पडणार असेंच ठरलें असल्यानें महमुदाचा जय झाला. त्रिलोचनपाल काश्मीरांत जो पळाला तो पुनः दिसला

नाहीं. काबूलच्या शाही राज्याचा येथेंच शेवट झाला, त्याविषयीं कल्हणानें जो काव्यमय दुःखोद्गार काढला आहे तो आम्हीं पहिल्या भागांत दिलाच आहे. त्रिलोचनपालानें इ. स. १०२१ पर्यंत राज्य केलें आणि भीमानें नंतर पांच वर्षें केलें असें जें अल्बेरूनीनें लिहिलें आहे, त्याचा मेळ दोन तीन तऱ्हेनें घालतां येईल. ( १ ) ही लढाई इ. स. १०२१च झाली असें मानावें. किंवा ( २ ) त्रिलोचनपाल हिमालयाच्या डोंगराशीं लगत असलेल्या एखाद्या क्षुल्लक पंजाबच्या प्रांतांत तेथपर्यंत राज्य करीत राहिला. किंवा ( ३ ) कनोजेस जाऊन तो १०२१ सालांत पुनः महमुदाशीं लढून मारला गेला.

झेलम गॅझेटियरमध्यें निंदूना म्हणजे मिठाच्या डोंगरांतील नंदन नांवाचा डोंगरी किल्ला होय अशी मनोरंजक माहिती दिली आहे. या ठिकाणीं काश्मीरच्या अमलाच्यावेळीं बांधलेल्या इमारतीचे अवशेष अद्याप आहेत. पान ६२ वर असें म्हटलें आहे कीं, हा जिल्हा प्रथम काश्मीरच्या ताब्यांत होता आणि नंतर काबूलच्या शाहींच्या ताब्यांत गेला. जयपाल आणि आनंदपाल असे जे मुसलमान इतिहासकारांनीं लाहोरचे राजे म्हणून वर्णिले आहेत ते वस्तुतः काबूलचे शाही राजे होत असेंहि ह्या गॅझेटियरमध्यें म्हटलें आहे. फिरिस्ताचा आधार देऊन हा नंदन किल्ला इ. स. १००८ मध्यें महमुदानें घेतला असें जें गॅझेटियरमध्यें म्हटलें आहे तें मात्र बहुधा चुकीचें आहे व ४०४ च्या ऐवजीं ४०० हिजरी चुकीनें वाचलें गेलें असावें. दुसरें, मिठाच्या डोंगरांतील रजपुतांचे मुसलमानी धर्मांतर शिहाबुद्दीन घोरीच्या वेळीं झालें असें ह्या गॅझेटियरमध्यें म्हटलें असून आणखी असें म्हटलें आहे कीं, येथील राजपूत, जाठ व इतर लोक ह्यांस महमुदानें जरी जबरदस्तीनें बाटविलें तरी त्याची पाठ फिरतांच ते पुनः हिंदु झाले असावे. पण हा जिल्हा महमुदाच्याच ताब्यांत

ह्यापुढें राहिला व त्याचे पुढचेहि राजे त्या जिल्ह्यावर राज्य करीत होते ही गोष्ट आपल्यास लक्षांत ठेवावयास पाहिजे. मिठाच्या डोंगरांतील मुसलमान झालेले जंजुआ राजपूत हे पंजाबचे फार जुने रहिवाशी आहेत. ययातीचा पुत्र अनु याचे ते वंशज आहेत असें मानतात. किंबहुना लाहोरचा जयपाळ हा जंजुआच होता अशी समजूत आहे ( झेलम गॅझेटियर )

उत्बीनें असें वर्णन केलें आहे कीं त्या देवळांत एक दगड सांपडला; त्यावरील लेखांत हें देऊळ चाळीस हजार वर्षांपूर्वी बांधलें असें म्हटलें होतें. तें ऐकून सुलतान उद्गारला, " केवढा मूर्खपणा! जगतांतलि सर्व शहाणे लोक जगच सातहजार वर्षांहून पुराणें नाहीं असें मानतात. " या विसाव्या शतकांत आपल्यास ह्या दगडावरचें विधान आणि त्यावरची महमुदाची टीका दोन्ही वेडसर वाटतील. बहुधा हा प्राचीन शिलालेख अशोकाच्या वेळचा असावा, व सभोंवतालच्या लोकांस त्याची खरी मिति माहीत नसल्यानें त्याचा अत्यंत प्राचीन काल त्यांनीं मानला असावा. असो, मिठाच्या डोंगरांतील नंदन हें ठिकाण अत्यंत प्राचीन असावें हें तेथील परिस्थिती वरूनहि दिसतें.

## टिप्पणी १–नंदनचा किल्ला.

झेलम गॅझेटियरमध्यें ह्या किल्ल्याचें वर्णन पुढील प्रमाणें आहे. ( पृ. ४६–४७ ). "चोआ सैदानशा याच्या थेट पूर्वेस चौदा मैलावर डोंगराच्या खालीं बादनवाला गांव व वर आरागांव यांच्या दरम्यान मिठाच्या बाहेरील डोंगरांच्या ओळीमध्यें एक मोठी खिंड आहे. ह्या खिंडींतून जाणाऱ्या रस्त्यावर जेथून पक्का मारा आहे अशी एक जवळ पाषाणमय उभी टेकडी आहे. त्या टेकडीवर एक देऊळ, एक किल्ला आणि एक मोठा गांव यांचे विस्तृत अवशेष आहेत. देऊळ पडकें आहे. याच ओळींतील इतर देवळाप्रमाणें हें देऊळ काश्मीरी पध्दतीचें आहे.

ज्या चबुतऱ्यावर हें देऊळ बांधलें आहे तो देवळाहून जुना, अतिशय प्राचीन काळचा आहे. देवळाच्या नंतरच्या काळांत देवळाजवळच एक मशीद बांधली गेली, तीहि अगदीं पडक्या स्थितींत आहे. देवळाच्या भोंवतालच्या आंगणांत बहुधा त्याच वेळचा एक शिलालेख आहे. त्याची अक्षरें इतकीं खराब झालीं आहेत कीं तो लेख आतां वाचणें शक्य नाहीं. गझनीच्या महमुदानें हा किल्ला घेतला होता, ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष झालें आहे ह्याचा चमत्कार वाटतो. ”

आणखी येथें असें सांगण्यासारखें आहे कीं, नंदनापासून सुमारें बारा मैलांवर भेरा शहर आहे. वहिंड गेल्यावर बहुधा आनंदपाल येथें राहिला असावा. हल्लींचें भेरा शहर झेलम नदीच्या पूर्वकांठावर आहे. परंतु पूर्वकाळीं जुनें शहर पश्चिम कांठावर होतें. त्याची जुनी जागा उंच ढिगारावरून अद्याप निश्चित दिसते. व तेथें जुनी नाणीं अद्याप सांपडतात. हल्लींचें भेरा शहर विद्वत्ता, व्यापार व कलाकौशल्य यांचें केंद्र असून तें पंजाबचें पुणेंच आहे. पंजाबांतील वकील एंजिनियर वगैरे विशिष्ठ बुद्धिवान् लोक पुष्कळसे भेरा येथीलच असतात. हे जातीनें क्षात्रिय ( खत्री ) असतात. यांनीं लष्करी पेशा सोडून मुलकी धंदे उचलले आहेत. भेरा येथें विद्वान् ब्राह्मणांचीहि वस्ती आहे. लाकूड, लोखंड आणि कापूस याची उत्तम कारागिरीहि येथें आहे. तात्पर्य प्राचीन राजधानीचीं सर्व लक्षणें भेरा येथें आहेत. लाहोर आणि वहिंड यांच्या दरम्यान बरोबर मध्यावर तें असल्यानें शाहीराजांची ही लाहोरच्या खालोखाल तिसरी राजधानी असावी. इंपीरियल गॅझेटियरमध्यें भेराशद्वाखालीं पुढील माहिती दिली आहे:—पुराणें शहर नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर होतें. तें महमुदानें लुटलें, व पुनः जंगिसखानाच्या एका टोळीनें लुटलें. नवीन शहर नदीच्या पूर्वेस असलेल्या एका मशिदी भोंवतीं इ० स० १५४९ त वसलें. हें हल्लीं एक मोठें रेल्वे स्टेशन आहे.

## टिप्पणी २–उत्तरशाही राजांच्या दुरुस्त केलेल्या तारखा.

भाग १ पान २०१ व भाग २ पान १५७ यांत शाहीराजांच्या प्रत्येक पिढीला वीसवर्षें सरासरी धरून अल्बेरूनीनें त्रिलोचनपालाचा

अन्त इ० स० १०२१ दिला. येथून मागें मोजीत, आम्ही शाही राजांच्या तारखा रकान्यांत दिल्याप्रमाणें धरल्या आहेत. त्या तारखा

जयपाल ९६० ते ९८०,
आनंदपाल ९८० ते १०००,
त्रैलोचनपाल १००० ते १०२१

हल्लीं निश्चित माहिती उत्बी व इतर मुसलमानी इतिहासकार यांवरून मिळते, तदनुरूप उत्तर राजांच्या मित्या दुरुस्त करावयास पाहिजेत. जयपाल इ० स० १००१ पर्यंत राज्य करीत होता हें आपण आतां पाहिलें आहे. तो अत्यंत वृद्ध झाल्यानें व शेवटीं मानहानि झाल्यामुळें चितेवर जळून मेला. तेव्हां त्याचें राज्य बरीच वर्षें टिकलें असें मानावयास हरकत नाहीं. मुख्य राजधानी वहिंड ही महमुदानें घेतल्यावर आनंदपाल राज्यांतील दुसरें शहर भेरा येथें रहात असावा. वहिंड पासून लाहोरच्या रस्त्यावर हजरोच्या मार्गें मर्गला खिंडींतून नेहमीं व्यापारी लोक काबूलचीं फळफळावळें लाहोर—मुलतानास व हिंदुस्थानचा कापड वगैरे माल काबूलास नेत असत. आनंदपाल नारदीनच्या लढाईत १००९ मध्यें मारला गेला. आणि त्रिलोचनपालानें महमुदाचें स्वामित्व कबूल करून इ० स० १०१४ पर्यंत राज्य केलें. त्यावर्षीं महमुदानें हिंदुस्थानावर स्वारी केली व त्रिलोचनपालानें मर्गला खिंडींत त्याचा विरोध केला. त्याचा पराभव होऊन तो काश्मीरांत निघून गेला. निडरभीम भेराच्या रस्त्यावरील नंदनाकिल्ल्यांत लढला पण तोहि पराभव पावून काश्मीरांत पळून गेला. आणि भेरा महमुदानें घेतलें आणि लुटलें. त्रिलोचनपालानें काश्मीराजवळील पंजाबच्या डोंगराळ प्रांतांत इ० स० १०२१ पर्यंत राज्य केलें. किंवा तात्काळ इ० स० १०१४ मध्येंच महमुदानें त्याचा पाठलाग करून तौशीनदीवरील लढाईत त्याचा पराभव केला. आणि तो काश्मीरांतून कनोजच्या राज्यपालाकडे गेला असावा. तथापि पुढील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें हें संभवनीय दिसत नाहीं. मुसलमानी इतिहासकार राज्यपालाच्या ऐवजीं चुकीनें हें नांव देतात. भीम कदाचित् कनोजेस गेला असावा आणि पुढें वर्णिलेल्या राहिब

नदीच्या लढाईंत तो मारला गेला असावा. या चार राजांचे दुरुस्त केलेले काळ येणेंप्रमाणेः—

जयपाल इ० स० ९६० ते १००१.

आनंदपाल इ० स० १००१ ते १००९.

त्रिलोचनपाल इ० स० १ ०९ ते १०२१.

भीम इ० स० १०२१ ते १०२६.

या घराण्यांतील पुढील एका राजानें माळव्याच्या भोजाचा आश्रय केला होता असा उल्लेख आढळतो.

# प्रकरण दहावें.

## ठाणेश्वरावरील स्वारी.

येथें थोडेसें थांबून गझनीचे प्रारंभीचे लहान राज्य यावेळीं किती मोठें झालें होतें तें आपण पाहूं. पुष्कळ विद्वान् लोक असें समजतात कीं महमुदानें केवळ लुटीसाठीं स्वाऱ्या केल्या, त्यानें राज्यें जिंकून एक बलिष्ठ राज्य स्थापन करण्याचा कधींच हेतु धरला नाहीं. परंतु महमुदाच्या राज्याचा विस्तार आतां पावेतों कसा झाला हें पाहतां ही समजूत चुकीची ठरते. त्यानें आपल्या राज्याचा समजून उमजून विस्तार केला आणि जबरदस्तीनें लोकांस बाटवून राज्याची मजबूती केली. ह्या बाटविण्यांत धार्मिक उत्साह तर होताच, पण राष्ट्राचें सामर्थ्य कोणत्या गोष्टींत असतें याचीहि त्यास चांगली कल्पना असावी त्यानें आपल्या राज्याच्या पश्चिमेकडील खुरासान व इतर प्रांत लगत असलेले प्रथम आपल्या राज्यास जोडले. या प्रांतावर सामानी साम्राज्याच्या वेळेपासूनच सबुक्तगीनाचा ताबा होता. महमुदानें यानंतर आपलें लक्ष पूर्वेकडे वळविलें. जलालाबाद आणि काबूल हे प्रांत ( लमघानात ) पूर्वींच जिंकून सामील झाले होते व

तेथील लोकांस जबरदस्तीनें मुसलमान केलें होतें. हल्लींच्या वायव्य सरहद्दीच्या प्रांतांतील बन्नूचा इलाखा महमुदानें प्रथम जोडला. हा हिंदूंचा प्राचीन प्रांत काबूलच्या शाहींच्या ताब्यांत होता. बन्नूजवळ मोठमोठाले मातीचे ढिगार आहेत. रामाचा भाऊ भरत यानें हा प्रांत प्रथम वसविला अशी आख्यायिका आहे. असा हा जुना हिंदु प्रांत काबूलशाहीच्या ताब्यांत होता. कारण या ढिगारांतून जुनीं नाणीं, इंडोसिथयन काळांतील अझीज व वासुदेव यांचीं, सांपडतात तशीच शेवटच्या काबूलच्या ब्राह्मणी राजांचीहि सांपडतात. परंतु कोणत्याहि मुसलमानी राजांचीं नाणीं या ढिगारांत सांपडत नाहींत. यावरून बन्नूचें जुनें शहर महंमुदानें विध्वस्त केलें असें दिसतें. हिंदुस्थानांत गझनीहून जाण्याचा जुना रस्ता बन्नूवरून कुरमखोऱ्यांतून होता. तो खैबर खिंडीतला रस्ता सुरू झाल्यापासून मागें पडला आहे ( बन्नू गॅझेटियर ). हा प्रांत महमुदानें प्रथम आक्रमून तेथील लोकांस जबरदस्तीनें बाटविलें व हिंदुस्थानांत सुलभतेनें जाण्याची सोय करून घेतली. नंतर पेशावर प्रांत वहिंडसह महमुदानें जयपाळाचा पराभव पेशावरच्या मैदानांत केल्यावर आपल्या राज्यास जोडला. काबूलच्या राज्याची वहिंड ही राजधानी होती. आणि हिंदुस्थानास जाण्याचा दुसरा रस्ता वहिंडखालून व सिंधु आणि काबूलनदीच्या संगमावर होता. क्रमु आणि कुभा ( कुरम आणि काबूल ) या दोन नद्यांची खोरीं ऋग्वेदांत सुद्धां प्रसिद्ध असलेलीं व वैदिक आर्यांच्या प्रथम वस्तींतील असलेली याप्रमाणें महंमुदानें आपल्या कबजांत घेतली, आणि हे देश मुसलमान केले. यानंतर महमुदानें सामानी साम्राज्याचे दूरचे प्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडले आणि पूर्वेकडे पूर्वीच मुसलमान झालेलें मुलतानचें राज्य आपल्या राज्यास जोडलें. पण त्यापूर्वी भाटियाचें राज्य जिंकून सामील केलें. हें राज्य पूर्वी सांगितल्याप्रमाणें मुलतानच्या नैऋत्येस

सिंधु आणि झेलम यांच्या दरम्यान होते. शेवटीं काबूलशाहीचा राहिलेला प्रांत पंजाब जिंकून त्यानें आपल्या राज्यास जोडला. या प्रांतांतील लोकांस जबरदस्तीनें मुसलमान करण्याची पद्धत महमुदानें सक्तीनें लाविली नाहीं. (त्याच्या कारणाचा विचार आपण पुढें करूं). तरी पण या प्रांतातहि पुष्कळ लोकांस त्यानें बाटविलें असें संभवनीय आहे. याप्रमाणें या मर्यादेपर्यंत आपलें राज्य जवळ जवळचे प्रांत हळुहळू खाऊन त्यानें वाढविलें. याच रीतीचा नमुना ब्रिटिश राज्याच्या वाढीचा कलकत्ता, मुंबई व मद्रास या केंद्रांतून हळुहळु लगतचे प्रांत सत्तेखालीं आणून झालेला आपल्यास दिसतो. प्रथम ब्रिटिश लोकांनीं बंगाल मिळविलें. नंतर बहार, नंतर यू. पी, व शेवटीं शिखांस जिंकून पंजाब. महमुदाप्रमाणेंच राज्य खालसा करण्याचा ब्रिटिशांचा रस्ता एकच होता. प्रथम पूर्वीची सत्ता जिंकून तीस कांहीं दिवस खंडणी देण्यावर कायम ठेवणें; नंतर शेवटचा उच्छेद करणें. असो, याप्रमाणें पंजाब जिंकून तेथें आपली सत्ता कायम केल्यावर पंजाबच्याहि पूर्वेकडे असलेले प्रांत लुटण्याकडे व जिंकण्याकडे महमुदानें आपलें लक्ष फिरावलें. अर्थात् पहिला लगतचा देश पंजाबच्या आग्नेयीस असलेला ठाणेश्वर, त्याजवर त्यास हल्ला करणें प्राप्त झालें.

ठाणेश्वर येथें एक स्वतंत्र राज्य असावें असें संभवनीय आहे. कारण अल्बेरूनीनें आपल्या भौगोलिक वर्णनांत ठाणेश्वरचा निर्देश केला आहे. (गंगा आणि यमुना याच्या दरम्यान एक आणि हल्लीं आहे तेथें पुनः ठाणेश्वरचा दोनदां उल्लेख आला आहे. बहुधा पहिलें नांव दुरुस्त करून घ्यावयास पाहिजे). त्याशिवाय ठाणेश्वरास एक प्रसिद्ध देव होता व हल्लींहि आहे. अलीकडील मुसलमान बखरकार याचें नांव जगसोम देतात. ह्या शब्दाचें योग्य संस्कृत रूपांतर करितां येत नाहीं. हिंदुस्थानचा प्रसिद्ध शेवटचा बौद्ध सम्राट् हर्ष

याचा बाप प्रतापवर्धन याचें राज्य येथेंच होतें. येथें कांहीं उत्तम हत्ती होते ते मिळण्यासाठीं महमुदानें ही ठाणेश्वरवर स्वारी केली असें म्हणतात. उत्बीनें ह्या हत्तींचें नांव सिल्मान असें दिलें आहे. त्या अलीकडील बखरकार त्यास मुसलमान म्हणतात. कारण गुडघे टेकून प्रार्थना करतांना जसें मुसलमान नमतात तसें हे हत्ती नमत असत. बहुधा महमुदाच्या स्वाऱ्यांचे सर्वच हेतु त्या स्वारींत होते. लूट मिळविणें, प्रसिद्ध हिंदु देवालयें फोडणें आणि जवळचें राज्य जिंकून नमविणें. उत्बीनें या स्वारीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे. " याप्रमाणें महमूद धार्मिक लढाईच्या शाळेंत शिकलेली आपली फौज घेऊन ठाणेश्वरवर चालला. व त्यास असें एक भयंकर रेतस्थान लागलें कीं, तेथील हवेंत एक पक्षीहि फिरकत नव्हता. परंतु परमेश्वरकृपेनें त्यास मदत मिळाली व तो त्या जागेस जाऊन पोहोंचला. समोर एक पाण्यानें भरलेली वाहती नदी होती. त्याच्यामागें एक उंच डोंगर आणि मध्यंतरीं अडचण करणाऱ्या मोठ्या धोंड्यांनीं भरलेली जमीन. शत्रू डोंगरांत जाऊन बसला. दोन उतारांनीं नदी उतरून सुलतानानें शत्रूवर हल्ला केला, आणि त्यास फत्तरामध्यें विस्कळून टाकलें. शत्रूचें भरंवशाचे आधार, पाय हपटणारे हत्ती ते जागेवरच सोडले. सुलतानाच्या हत्तीनीं त्यास वळवून मुक्कामावर आणलें. सैन्यानें युद्धांत इतकें रक्त काढलें कीं, नदीचें पाणी पिण्यालायक राहिलें नाहीं. "

ही हकीकत सरळ आहे. मोठ्या योद्धयाशीं(या राजाचें नांव दिलें नाहीं ) घनघोर युद्ध झालें. आणि ज्या हत्तीकरितां विशेषत: महमुदानें ही स्वारी केली होती ते हत्ती त्यास मिळाले. येथें एखादी मूर्ति तोडल्याच्या उल्लेख नाहीं. पण प्रारंभीं उत्बीनें मूर्ति तोडण्याचा हेतु ह्या स्वारींत होता असें वर्णन केलें आहे, या ठाणेश्वरचा निश्चय करणें शंकास्थान झालें आहे. कारणें एका रेंगस्थानां-

तून एका नदीवर पोहोंचल्याचें जें वर्णन आहे तें प्रसिद्ध ठाणेश्वराच्या परिस्थितीशीं जुळत नाहीं व दगडाळ जमीन व उंच पर्वतहि येथें नाहीं (इलियड. २ पान ४५२). पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं उत्बी स्वतःच्या माहितीनें लिहीत नाहीं आणि तो वर्णन नेहमीं अतिशयोक्तीचें करितो. ठाणेश्वराजवळ सरस्वती नदी आहे, व कर्नाळ जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्यें देशाचें वर्णन करितांना असें म्हटलें आहे कीं, ठाणेश्वरच्या उत्तरेस कांहीं डोंगराळ प्रदेश आहेत, त्यांतून वर्षाकाळांत भरणाऱ्या सरस्वती वगैरे नद्या येतात. ही लढाई ठाणेश्वराच्या अगदीं जवळ नव्हे पण तेथून थोड्या अन्तरावर झाली असावी. इ. स. १०१४ मध्यें ही लढाई झाली असें योग्यरीतीनें म्हणतात, व कर्नाळ गॅझेटियरमध्यें तसेंच म्हटलें आहे. पंजाब खालसा केल्यावर दुसऱ्याच वर्षी मुलतानच्या बाजूनें रेतस्थानांतून येऊन महमुदानें ठाणेश्वरवर अचानक छापा घातला असावा असें आम्हांस वाटतें. सर्व पंजाब त्याच्या कबज्यांत होता व त्यास पाहिजेल तो मार्ग घेणें शक्य होतें. यापूर्वीं मुलतानला दुसऱ्यानदां भेट देऊन कार्माती पाखंडांत पुनः पडल्याबद्दल तेथील मुसलमानांस त्यानें शिक्षा केली होती.

या स्वारीची फिरिस्तानें दिलेली हकिकत सर्वच काल्पपिक आहे असें आम्हांस वाटतें. तो चारशें दोन हिजरी म्हणजे इ. स. १०११ मध्यें ही स्वारी घालतो व असें वर्णन करितो कीं, ठाणेश्वरवर हल्ला करून तेथील प्रसिद्ध जगसोमदेव भ्रष्ट करण्याचा महमुदाचा विचार आनंदपालाला कळला, तेव्हां तो जरी महमुदाचा अंकित होता तरी त्याबद्दल त्यानें मोठ्या अदबीनें महमुदाचा निषेध केला, पण तो महमुदानें मानला नाहीं व त्यानें असें उत्तर पाठविलें कीं महमदी धर्माचे भक्त स्वर्गांत पुण्यफल मिळण्यासाठीं मूर्तिपूजा नष्ट करण्याचा नेहमीच प्रयत्न करितात. दिलीच्या राजानें हें ऐकून ठाणेश्वरच्या

मूर्तीचें रक्षण करण्यासाठीं सर्व हिंदुस्थानचे हिंदु बोलाविले. पण हे हिंदु जमण्यापूर्वीच महमुदानें ठाणेश्वरावर हल्ला केला. ठाणेश्वर काबीज केल्यावर दिल्लीवर चढाई करण्याची महमुदाची इच्छा होती; पण त्याच्या सरदारांनीं त्यास सांगितलें कीं, जोपर्यंत आपल्या पाठीवरील पंजाब आपण जिंकून घेतला नाहीं, तोंपर्यंत दिल्लीवर चढाई करणें सुरक्षित नाहीं. ही सर्व हकीकत कपोलकल्पित आहे. कारण दिल्ली यावेळीं अस्तित्वांत नव्हती. निदान तें राज्य हिंदुस्थानास निमंत्रण करील इतक्या मोठ्या पदवीस चढलें नव्हतें. तें एक मांडलिक लहान राज्य होतें. दुसरें उत्बीच्या वर्णनावरून नंदनच्या लढाईंत आनंदपाल मरून गेल्यावर व पंजाब खालसा झाल्यानंतर ही स्वारी झाली असें दिसतें. या स्वारीस मागील वर्षांत घालून फिरिस्तानें कल्पित, प्रशंसायुक्त एक वर्णन तयार केलें आहे. यमीनी मध्यें दिलेल्या हकीकतीवरून दिल्लीचा येथें कांहींच संबंध दिसत नाहीं. समकालीन लेखकांनीं दिल्लीचा कोठेंहि उल्लेख केलेला नाहीं. असें खुद्द इलियटनेंहि योग्य-रीतीनें येथें म्हटलें आहे. 'गझनी संबंधानें दिल्ली व तेथील राजे यांचा जो फिरिस्ता उल्लेख करितो तो पायाशुद्ध नाहीं. असेंहि इलियटनें म्हटलें आहे ( पा. ४५४ ). मुख्य कारण हें कीं, चार पांच शतकानंतर लिहिणाऱ्या लेखकांस आपल्या भोंवतालची परिस्थिति विसरणें अशक्य होतें; आणि आपल्या वेळीं प्रसिद्ध असलेल्या दिल्लीस त्यांना वगळतां येत नाहीं, कोठेंतरी घालावेसें वाटतें.

# प्रकरण अकरावें

## मथुरेची लूट.

मागील स्वारीवरून महमुदास कळून चुकलें कीं, मध्य हिंदुस्थानांत स्वारी करणें शक्य आहे. मध्य हिंदुस्थानांतील मथुरा शहर तेथील अनेक देवळें व त्यांतील अमोल संपत्ति याबद्दल प्रसिद्ध होतें. मध्यदेशाचा राजा राज्यपाल याविरुद्ध लढण्यास महमुदास कारणहि मिळालें होतें. कारण त्यानें पंजाबच्या राज्यास महमुदाविरुद्ध लढण्यास वेळोंवेळीं मदत केली होती. पण ही दूरची स्वारी करण्यापूर्वी त्यानें युद्धाची चांगली तयारी केली. आपली पिछाडी सुरक्षित राहण्यासाठीं पश्चिमेकडील प्रांतांतील अडचणींचा बंदोबस्त करणें जरूर होतें. उत्बीनें या अडचणींचें आपल्या ग्रंथांत विस्तारानें वर्णन केलें आहे. गझनी येथें प्रधानाची घालमेलहि त्यास करावी लागली. गझनी येथील राज्यपद्धति व्यवस्थित होती; आणि प्रांतावरील अधिकाऱ्यांवर महमूद करडी नजर ठेवी. विद्वत्तेचें केंद्र त्यावेळीं खुरासान होतें, व भाषा पर्शियन होती; पण नवा नेमलेला वझीर स्वतः कवि व विद्वान् असल्यानें त्यानें सर्व पत्रव्यवहार अरबींत करावा असा हुकूम सोडला. तुर्कांचा राजा इलेक्खान ह्याच सुमारास मरण पावला, व त्याचा भाऊ त्याच्या गादीवर बसला. महमूद हिंदुस्थानांतील मुर्तिपूजकांवर चढाई करून त्यास जिंकीत असतां चीनचें व मोंगोलियाचे मूर्तिपूजक काश्गर येथील मुसलमान तुर्कांवर एक लाख सैन्य घेऊन घसरले. ही पुढें होणाऱ्या चंगिसखान व तैमूर यांच्या भयंकर मोगली स्वाऱ्यांची दोनशें वर्षांपूर्वी सूचना होती. इलेक्खानाचा बंधु तोगनखान यानें सर्व महमदी राजांस या स्वारीस

विरोध करण्यासाठीं मदत करण्याविषयीं विनंति केली व महमुदानेंहि एक तुकडी मदतीस पाठविली. यावेळीं मोगल-तुर्कांचें घनघोर युद्ध झालें, आणि चीनच्या मूर्तिपूजकांचा हिंदुस्थानच्या मूर्तिपूजकांप्रमाणें पराभव होऊन बहुतेक सर्व मारले गेले. तोगनखानाच्या तुर्कांशीं महमुदानें पूर्वीप्रमाणेंच सख्यभाव ठेवला, आणि आपला मुलगा मसऊद याच्याशीं इलेक्खानाच्या मुलीचा विवाह करून हें सख्य वाढविलें. या मसऊदास त्यानें बल्कचा अधिकारी नेमिलें.

उत्बीनें आणखी असें येथें वर्णन केलें आहे कीं महमुदाची मुसलमानी धर्माच्या आस्थेविषयीं ख्याति पसरली. व त्याच्या बुद्धिमत्तेमुळें तो धर्म विवेचण्याचीहि त्यास पात्रता आहे असें लोक समजूं लागले. महमुदानें ठरलेलीं इस्लामीं मतें नवीन कल्पनांनीं बिघडलीं जाऊं नयेत याविषयीं पूर्ण लक्ष ठेविलें. पाखंडी लोक कोण कोण आहेत आणि ते कोठें सभा भरवितात हें शोधून काढण्यासाठीं त्यानें हेर ठेविले. राज्याच्या निरनिराळ्या प्रांतांतून व शहरांतून हे पाखंडी हुडकून दरबारांत आणीत आणि मग झाडावर खिळ्यांनीं खिळून किंवा दगडांनीं ठेंचून मारीत. अबूबकर एक धार्मिक व आदरणीय सरदार या कामांत सुलतानाला पाठिंबा देत असे. टाहिरटी नांवाचा एक मनुष्य इजिप्तचा राजा व खलीफा याजकडून मी वकील आलों आहे व बरोबर पत्रें व पोषाख आणला आहे असें म्हणत गिझनीस येत होता. हा आपल्यास सय्यदहि म्हणवी. पण महमुदाच्या हुकमानें त्यास हिरात येथेंच थांबवून खुरासानची राजधानी निशापूर येथें परत नेलें. पाखंडाबद्दल तेथें त्याची चौकशी झाली व बगदादचा खलिफा कादिरबिल्ला याच्या संमतीनें त्यास देहांत शिक्षा दिली गेली. आपल्या विस्तृत राज्यांत याप्रमाणें महमुदानें पाखंडाचा बंदोबस्त केला, इतकेंच नव्हे तर खिलाफतीचाहि तंटा नाहींसा केला. यामुळें सर्व मुसलमानी प्रदेशांत त्याची कीर्ति पसरली (पान ४४४).

धर्मोत्साहानें गझनी येथें काफिरांविरुद्ध केलेल्या स्वाऱ्यांत लढण्यासाठीं लढवई लोक जमा होऊं लागले यांत आश्चर्य नको. त्यांस मूर्तींचा भंग करून आणि देवळें लुटून परलोकांत आणि इहलोकांत या लढण्यानें फल प्राप्त होण्यास वाव मिळण्याची आशा होती.

" ख्वारिझम येथें बंड झालें होतें तें मोडून व तो प्रांत आपल्या राज्यास जोडून महमुदानें तिसरी धर्मविजयाची स्वारी करण्याचा विचार केला व बोस्त येथें येऊन आपल्या सुभ्यांचे त्यानें जमाखर्च पाहिले. हिंदु लोकांपासून जिंकून इस्लाम राज्यांत मिळविलेले प्रांत द्रव्यानें भरपूर होते, व काश्मीराशिवाय कोणत्याहि ठिकाणीं मूर्तिपूजेचा अंधकार उरला नव्हता. ऑक्सस नदी पलीकडील मवरुन्नहरच्या मैदानांतून वीस हजार लढवय्ये इस्लामी धर्मोत्साहानें आले. त्यामुळें सुलतानाचा विचार पक्का झाला आणि या लोकांसह कनोजवर स्वारी करण्याचा बेत कायम झाला. परदेशी राज्यांस हा कनोजचा मुलूख अगदीं अज्ञात होता. "

उत्बीनें कनोजवरील कूचाचें आणि मथुरेजवळील लढाईचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

" जिहून ( सिंधु ), झेलम आणि चंद्र नद्या ओलांडून तो थेट तिबेटास गेला. तो जेथें जेथें मुक्काम करी, तेथें तेथें लोकांचे वकील येऊन, अंकितत्व मान्य करून राजनिष्ठा जाहीर करीत. काश्मीरच्या हद्दीवर तो पोहोंचला तेव्हां काश्मीरचा सेनापति शासीन याचा पुत्र हबाली नोकरीस दाखल झाला. इस्लामी धर्म ज्यानें स्वीकारला नाहीं त्यास सैन्यांत जागा नाहीं असें त्यांस जेव्हां सांगितलें, तेव्हां पुढील बीनीच्या लुटारूंत सामील होऊन तो सैन्यापुढें चालूं लागला. एकामागून एक दऱ्या ओलांडीत फौज चालली तेव्हां पहाटेस कोंबडा आरवण्याबरोबर सनई व नगारे वाजूं लागत. ( भाग १ पान १४३ यांत दिलेलें हर्षाच्या कूचाचें वर्णन येथें स्मरतें ). हिजरी सन ४०९

(इ. स. १०१८)च्या रज्जबच्या विसाव्या तारखेस त्यांनीं यमुना मागें टाकिली, आणि हरून राजाच्या बरणच्या किल्ल्यास ते येऊन पोहोंचले. हा राजा हिंदुस्थानच्या राजांत फार मोठा होता. पण त्यानें जेव्हां महमुदाचा सेनासमुद्र पाहिला, तेव्हां त्यानें दहा हजार माणसांसह किल्ल्याखालीं उतरून इस्लामी धर्माचा स्वीकार केला. येथून फौज कलजंदच्या किल्ल्याजवळ पोहोंचली. या कलजंदजवळ अतिशय संपत्ति, मजबूत घोडदळ आणि मोठें पायदळ सैन्य होतें. त्यानें आपलें पायदळ, घोडदळ व हत्ती लाऊन तो एका अरण्यांत सुलतानाच्या येण्याची वाट पहात राहिला. या अरण्यांत झाडांची इतकी गर्दी होती कीं, सूर्याचे किरण त्यांत प्रवेशत नव्हते. वरून एखादी सुई पडती तर झाडांच्या फांद्यांतून व पानांतून ती खाली आली नसती. सुलतानानें अशा अरण्यांतहि घुसण्याचा आपल्या बिनीस हुकूम केला, व वरच्या किल्ल्याजवळून एक रस्ता काढला. जेव्हां हिरव्या सेनासमुद्रानें 'अल्लाहो अकबर' अशी आरोळी ठोकली, त्यावेळेस शत्रूचें सैन्य कांहीं वेळ कायम उभे राहिलें व त्यांनीं आपल्या ठिकाणावरून हल्लेहि केले. पण शेवटीं असें कळून आलें कीं, सर्व गोष्टी दैवाधीन आहेत आणि तरवार कितीहि चांगली असली, तिचा जोर कितीहि असला, तिची धार कितीहि तीक्ष्ण असली तरी ती जेव्हां मुसलमानाच्या रक्तापर्यंत पोहोंचते, तेव्हां ती दैवी हुकुमाच्या अंकित असते. शेवटीं निरुपाय झालेले शत्रु प्राण वांचविण्यासाठीं नदींत पडले. परंतु कित्येक तरवारीनें मेले व कित्येक बुडून मेले. याप्रमाणें पांच हजार मृत्युमुखीं पडले तेव्हां कल्जंदानें प्रथम आपल्या बायकोस खंजिरानें मारून आपलें पोट फाडून नरकगमन केलें. त्याच्या संपत्तीपैकीं एकशे पंचाऐशीं हत्ती व पुष्कळ उत्तम लूट मुसलमानांस मिळाली. शहरामध्यें हिंदु लोकांच्या पूजेचें एक स्थान होतें. तेथें सुलतान पोहोंचला तेव्हां आश्चर्यचकित करणाऱ्या

कल्पनेनें बांधलेले एक शहरच त्यास दिसलें. तें पाहतांच हें स्वर्गांतील भवन आहे असें त्यास वाटलें."

हें जें काव्यमय व संक्षिप्त वर्णन महमुदाचा शिरस्तेदार उत्बी गझनींत राहून करतो, त्यावरून या स्वारीचा प्रकार इतर लेखकांच्या मदतीनें आपल्यास निश्चित करतां येतो. महमुदाजवळ यावेळीं सुमारें एक लाख सैन्य होतें. त्यांत ऑक्सस नदीपलीकडील वीस हजार बिनाशिस्तीचे मौजेसाठीं आलेले तुर्की शिपाई होते. पण महमुदानें कूच करीत असतां कुशल सेनापतीप्रमाणें जरबेची शिस्त ठेविली होती. पहाटेस उठून तो दिवसभर चालत होता. आपल्या जलद चालीनें शत्रूस बेसावध गांठण्याचा त्याचा विचार होता. हिमालयाच्या पायथ्या पायथ्यानें तो चालला. बहुधा पंजाबांतील मोठ्या नद्या उगमाजवळ ओलांडण्याचा त्याचा हेतु असावा. रस्त्यांत जो जो किल्ला आला, तो तो या प्रचंड सैन्यासमोर तगला नाहीं. पण त्यानें हिंदु लोकांस अंकितपणा मान्य करण्याच्या सबबीवर आपल्या सैन्यांत मिळूं दिलें नाहीं. असें केलें असतें तर त्याच्या सैन्यांत एक विरोधी भावनेचें व वेळेस दगा देणारें अंग उत्पन्न झालें असतें. याचसाठीं काश्मीरच्या फौजेस त्यानें फौजेच्या पुढें चालण्यास हुकूम दिला. (काश्मीरांतून एखादी फौज खरोखरच आली असेल ह्याविषयीं आम्हांस शंका आहे, याजविषयीं पुढें जास्त लिहूं). रज्जबच्या विसाव्या तारखेस म्हणजे इ. स. १०१८च्या डिसेंबरांत यमुना नदी उतरून गंगा न उतरतां तो दक्षिणेस अन्तर्वेदींत घुसला. कारण कनोज गंगेच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे. व कनोजवर हल्ला करतांना दरम्यान गंगानदी ठेवणें इष्ट नव्हतें. कित्येक मांडलिक रजपूत सरदारांनीं त्यास हरकत केली. पण बरणच्या राजाप्रमाणें पुष्कळांनीं नमस्कारच केला असावा. बरण म्हणजे हल्लींचें बुलंदशहर होय यांत शंका नाहीं. हें नगर जुनें असून महाभारतांतील वारणावत होय असें मानतात. येथें

इ. स. पू. दुसऱ्या शतकांतील शकक्षत्रापांची व कुशनांचीं नाणीं सांपडलीं आहेत, व गुप्त काळांतील एक ताम्रपटहि सांपडला आहे. येथें एक मांडलिक राजा डोर रजपूत वंशांतला हरदत्त नांवाचा यावेळीं असावा. याचें नांव पर्शियनमध्यें हरून असें वाचलें गेलें असावें. या राजकुलाचा एक लेख इ. स. १०९६चा सांपडला आहे. त्यामध्यें या कुलाची वंशावळ दिली असून सातवा राजा हरदत्त हा महमुदास शरण गेला असावा (बुंदलशहर गॅझेटियर). दहा हजार अनुयायांसह हा मुसलमान झाला ही बहुधा उत्बीची अतिशयोक्ति आहे. येथून दक्षिणेकडे महमूद गेला, तेव्हां त्यास कल्जंदानें मोठ्याशा सैन्यानिशीं मथुरेजवळ विरोध केला; व त्यानें अत्यंत धैर्यानें व चिकाटीनें महमुदाच्या प्रचंड सैन्याशीं टक्कर घेतली. हा बहुधा कनोजचा प्रतिहार सम्राट् राज्यपाल याचा सेनापति व मांडलिक असावा.

हिंदूंचें विशेषतः वैष्णवाचें अत्यंत पवित्र मथुरा नगर प्रतिहारांच्या साम्राज्याच्या मध्यभागीं होतें. आणि प्रतिहार सम्राट् पुष्कळदां विष्णुभक्त असत. मथुरा शहर रामाचा बंधु शत्रुघ्न यानें वसविलें असून तें श्रीकृष्णाचें जन्मस्थान होतें. बौद्धांनाहि मथुरा पुण्यस्थान आहे. हिंदु काळांत तर मथुरेचें महत्त्व पूर्वीपेक्षांहि अधिक वाढलें. अर्थात् तेथें बांधलेलीं अप्रतिम देवालयें आणि त्यांत जमलेलीं अमूप संपत्ति विरोध केल्याशिवाय मूर्तिभंजक लुटारूंच्या स्वाधीन करणें शक्यच नव्हतें; आणि राज्यपाळ स्वतः समोर होण्यास जरी नाखुष होता, तरी त्यानें महमुदाशीं लढण्यास मोठें सैन्य पाठविलें असलें पाहिजे. ही लढाई एका अरण्यांत झाली असें वर्णिलें आहे. नकाशांत दिलेल्या महाबन गावांजवळ या लढाईचें स्थान ठरवितात. त्यावेळीं या गावांभोंवतीं मोठें अरण्य असावें. याच अरण्यांत नंद रहात असून त्यानें श्रीकृष्णास वाढविलें होतें. यामुळें अलीकडच्या कालापर्यंत हें वन तोडीत नसावेत. ही जागा मथुरेपासून सहा मैलावर आहे. या जंगलांत

शहाजहानानें वाघाची शिकार केल्याचें दाखले आहेत ( मथुरा गॅझेटियर ). येथें एक लहान टेकडी असून त्याजवर किल्लाहि आहे. या गांवचा वंशपरंपरेचा रक्षक कुलचंद्र असावा. तो आपल्या पायदळ, घोडदळ व हत्तींसह मोठ्या निकरानें लढला. उत्बीनें नेहमींप्रमाणें महमुदाच्या विजयाचें कारण देवाची इच्छा असेंच दिलें आहे. महमूद जरी एका प्रचंड अप्रतिकार सेनेसह आला होता, तरी महमुदाला आपलें पवित्र नगर लुटण्यास व विध्वस्त करण्यास, हिंदूंनीं त्यास बचावण्याचा जोराचा प्रयत्न केल्याशिवाय, मोकळें सोडलें नाहीं, ही गोष्ट हिंदूंस भूषणावह आहे. पण दैवाची गति चुकत नाहीं असें पाहून कुलचंदानें रजपुतांच्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें प्रथम आपल्या बायकोस ठार मारून नंतर आपल्यासहि मारून टाकलें. मथुरा नगरीचें केवळ अतिमानुष वैभव आणि महमुदास मिळालेली अवाढव्य संपत्ति याचें वर्णन उत्बीनें पुढीलप्रमाणें केलें आहे. “एक हजार किल्लेवजा मूर्तींचीं मंदिरें बांधलेलीं असून शहराच्या मध्यभागीं सर्वांहून उंच असें एक मंदिर बांधलें होतें. त्याच्या सौंदर्याचें आणि त्यावरील नक्षीचें वर्णन करणें लेखकांच्या लेखणीस किंवा चितान्यांच्या कलमास अशक्य आहे. या प्रवासाचा जो वर्णनात्मक लेख सुलतानानें लिहिला आहे त्यांत तो म्हणतो कीं ‘अशा प्रकारची इमारत कोणी बांधण्याचें हल्लीं मनांत आणील तर त्यास एक हजार दीनारांच्या एक लक्ष थैल्या त्यावर खर्च कराव्या लागतील. आणि अतिशय कुशल कारागिरांच्या मदतीनेंहि दोनशें वर्षांत ती पुरी करतां येणार नाहीं.’ मूर्तींचे जे ढीग सांपडले त्यांत पांच मूर्ति शुद्ध सोन्याच्या पांच हात उंचीच्या होत्या. आणि एका मूर्तीवर एक रत्न बसविलेलें मिळालें, तें इतकें उत्तम होतें कीं, बाजारांत पन्नास हजार दीनार देऊन सुलतानानें खुशीनें तें विकत घेतलें असतें. दुसऱ्या मूर्तीवर एक नीलवर्णाचा नीलमणि चारशें

मिसकाल वजनाचा मिळाला. एका मूर्तीच्या पायाच्या सोन्यांतून चार लक्ष चारशें मिसकाल वजनाचें सोनें मिळालें. चांदीच्या मूर्ति तर इतक्या होत्या कीं, त्यांचें वजन करतां करतां वजन करणारे लोक थकले. त्या सर्व नगराचा विध्वंस करून आपल्या फौजेचा मोठा हिस्सा तेथें ठेऊन सुलतान कनोजकडे गेला."

कनोजच्या प्रतिहार सम्राटांच्या उतरत्या काळांत महमुदानें केलेल्या मथुरेच्या लुटीची हिंदूंना हृदयद्रावक अशी ही हकीकत आहे. अशक्तांकडून सशक्तांकडे संपत्ति नेहमींच जात आली आहे. रोमन साम्राज्याच्या उतरत्या काळांत अलारिकनें केलेल्या रोमन लुटीची गिबननें रसभरित रीतीनें वर्णन केलेली हकीकत या ठिकाणीं आम्हांस स्मरते. "या बादशाही शहराच्या स्थापनेनंतर एक हजार एकशे साठ वर्षांनीं ज्या शहरानें मनुष्य जातीचा मोठा हिस्सा जिंकून सुधारला, तें शहर जर्मनीच्या आणि सिथियाच्या रानटी जातींच्या हल्ल्याच्या वावटळीच्या भक्ष्यस्थानीं पडलें. गॉथ लोक नुकतेच ख्रिस्ती झाले असल्यामुळें त्यांनीं व्हॅटिकन नामक (ख्रिस्ती) इमारतीचा बचाव केला व तेथें आश्रयास आलेले अनेक ख्रिस्ती झालेले रोमन लोक वांचविले. पण इतर रोमन लोकांची निर्दयपणें कत्तल झाली. सुवर्ण आणि रत्नें लुटली गेलीं. रोममधील अनेक राजवाड्यांतील बहुमोल सामान काढले गेले. शेंकडों मूर्ति त्यांतील किंमती धातूसाठीं आटविल्या गेल्या आणि अनेक सुंदर भांडीं लढाईच्या फरशूनीं फोडलीं गेलीं. जे दुर्दैवी लोक सन्माननीय स्थानापासून आणि उत्कर्षाच्या वैभवापासून एकदम कैद्यांच्या दुःखदायक स्थितीच्या रसातळास पोहोंचले, त्यांची संख्या सांगणें अशक्य आहे. रोममधून पळालेल्या लोकांनीं रोमचे प्रांत भरून गेले, आणि चकित झालेल्या रोमन साम्राज्यांत रोमच्या ह्या भयंकर दैवापघातानें दुःख आणि भीति पसरून दिली."

# प्रकरण बारावें.

## कनोज पडलें.

दुःख आणि भीति यांनीं उत्तर हिंदुस्थानचा सम्राट व्याप्त झाला. सम्राट राज्यपाल मथुरा किंवा कनोज येथें न राहतां, रोमचा बादशहा ऑनोरेरिअस याप्रमाणें जो पळत सुटला तो थेट गंगेच्या पलीकडे बारी येथें जाऊन पोहोंचला. हें ठिकाण अजून निश्चित झालें नाहीं. आपल्या वातमीदारांकडून हा सर्व वृत्तान्त महमूद यास कळलाच असावा. तथापि त्यानें कुराणावरून शकुन पाहिला, आणि थोडेसें सैन्य घेऊन राज्यपालाचा गंगेच्या पलीकडे पाठलाग केला. राज्यपालाला लढाई देण्याचा मोह पडेल अशी त्याची समजूत होती. राज्यपाल हा हिंदुस्थानांतील राजांत अग्रगण्य होता व इतर सर्व राजे त्याच्या पुढें मान वांकवीत आणि त्याचें सामर्थ्य आणि महत्पद मान्य करीत असें उत्बीनें जें वर्णन केलें आहे तें योग्य आहे. या राजाचें नांव राज्यपाल असें होतें हें आतां आपल्याला कळून चुकलें आहे. राज्यपाल याचे ऐवजीं फारशींत 'राजा जयपाल' किंवा हयपाल असें वाचलें जाणें अगदीं संभवनीय आहे. आपल्याला उपलब्ध झालेल्या कोरींव लेखांच्या पुराव्याच्या अभावीं हा राजा म्हणजे लाहोरचा मृत राजा जयपालच होय असें कित्येकांनीं ठरविलें यांत आश्चर्य नाहीं. लाहोरच्या जयपालाचें राज्य मध्य हिंदुस्थानांतहि असावें असें ईलियट यांस कदाचित् वाटलें असावें. पुढील काळांतील मुसलमान इतिहासकारांनीं त्याचा अनेक निरनिराळ्या नांवांनीं उल्लेख केला आहे. परंतु ते सर्व कल्पनेचे खेळ आहेत. कांहींनीं त्याला जयपालाचा पुत्र (मुलगा कुंवरपाल) असेंहि म्हटलें आहे. शाबानच्या ८ व्या तारखेस

( जानेवारी १०१९ ईलियट पा. ४५७ ) " महमूद कनोजला पोंचला. तेथें त्याच्या समोर एक पर्वत उभा राहिला. पळत असलेल्या सम्राटाचा पाठलाग करण्यासाठीं त्याचें सैन्य गंगा उतरलें. राज्यपालास बहुधा त्याला गांठता आलें नाहीं. तेव्हां महमुदानें गंगा नदीच्या किनाऱ्यावरील कनोजचे साती किल्ले सर केले"(उत्बी ४५७). "या किल्ल्याच्या आंत जवळ जवळ १०,००० देवळें बांधलेलीं होतीं आणि तीं दोन तीन हजार वर्षांपूर्वीं बांधलेलीं होतीं असें तेथील असत्यवादी मूर्तिपूजकांचें म्हणणें होतें." कनोज हें प्राचीन शहर आहें. पुराणांत वर्णन केलेला विश्वामित्राचा पिता राजा कुशिक तेथें राज्य करीत असे अशी कल्पना आहे. मथुरेप्रमाणेंच कनोजची पवित्रताहि विशेष मानण्यांत येत असे. या काळीं तें शहर भरभराटींत होतें. त्याच्या वैभवाला चारशें वर्षांपूर्वीं हर्षाच्या काळांत सुरुवात झाली होती. हुएनत्सँगनें वर्णिलेल्याप्रमाणें हर्षाच्या काळींच त्या शहराचा विस्तार फार मोठा जाहला होता. त्याचें वर्णन पहिल्या पुस्तकांत ( पान २८ ) उद्धृत केलें आहें. अर्धे अधिक लोकांनीं शहरांतून आधींच पळ काढला होता. सुलतानानें एकाच दिवसांत सर्व किल्ले घेऊन ते लुटून टाकले. कनोज मथुरे इतकें भव्य असावेंसें दिसत नाहीं. महमुदानें केलेलें रसभरीत वर्णन चुकून केव्हां केव्हां कनोजला लाविलें जातें; परंतु उत्बीच्या पुस्तकावरून असें स्पष्ट दिसून येतें कीं तें वस्तुतः मथुरेचेंच आहें. येथील देवळें मथुरेच्या देवळांप्रमाणें महमुदानें उध्वस्त केल्याबद्दल स्पष्ट उल्लेख आढळत नाहीं.

" कनोजहून महमूद मांज नांवाच्या तटबंदी केलेल्या ब्राह्मणांच्या किल्ल्याकडे वळला. ब्राह्मणांनीं थोडा काल त्याचा प्रतिकार केला. परंतु आपल्या प्रतिकाराचा कांहीं उपयोग नाहीं असें पाहिल्यावर

त्यांनीं किल्ल्यावरून खालीं उड्या टाकल्या. कित्येक जणांनीं भाल्यांनीं किंवा तरवारीच्या धारेनें आपल्यास मारून घेतलें." मांज कोणतें स्थळ आहे याचा अजून निर्णय लागलेला नाहीं. तें गंगा-नदीवर दक्षिणेकडे हल्लींच्या इटावा जिल्ह्यांत असलें पाहिजे. "तेथून सुलतान अस्तर किल्ल्यावर आला. तो किल्ला संतापी जंदबाल याच्या ताब्यांत होता. हा किल्ला एका अरण्यांत टेंकडीवर बांधलेला होता; व त्याच्या भोंवतालीं खोल खंदक खोदला होता." अस्तर म्हणून फत्तेपूर जिल्ह्यांत गंगा नदीच्या पश्चिम तीरावर मजबूत किल्ला आहे. या किल्ल्याचा मालक बहुधा कनोजचा मांडलिक असावा व त्याच्याकडून आपल्यास अडथळा होण्याचा संभव असल्यानें, त्याला जिंकून महमुदानें आपले मोर्चे "चंद्रराजाकडे वळविले. त्याच्या ताब्यांत एक फार मजबूत किल्ला होता." हा चंद्रराज म्हणजे चंदेल्ल राजा होय. कालंजरचा अजिंक्य किल्ला त्याच्या ताब्यांत होता. तो स्वतंत्र राजा होता. उत्बीनेंहि त्याचें असें वर्णन केलें आहे कीं 'त्यानें कधीं दुसऱ्याचें मांडलिकत्व कबूल केलें नाहीं. गर्व आणि आत्मश्लाघा यांखेरीज दुसरें कांहीं त्याला माहीत नव्हतें' (पा. ४'२०).

संतापी जंदबाल (हा बहुधा प्राचीन गौतम कुलांतील एक संस्थानिक असावा. या कुलाचे लोक अजूनहि फत्तेपूर जिल्ह्यांत वस्ती करून आहेत-फत्तेपूर गॅझेटिअर-अथवा तो यमुनेच्या दक्षि-णेस जालौन जिल्ह्यांतील जगमनपूरचे महाराजे म्हणून प्रसिद्ध असलेल्या सेंगार घराण्यांतील एक संस्थानिक असावा) आणि चंद्र-राय यांचे दरम्यान भांडण चाललें होतें असें उत्बीनें म्हटलें आहे. हें भांडण कशाबद्दल होतें तें कळत नाहीं. त्यांचें हें भांडण चालू असतांच महमूद चंद्रराजावर चालून आला. चंद्रराजानें "ज्यापुढें शत्रूला उभें राहवणार नाहीं असें आपलें प्रचंड सैन्य आणि आपला किल्ला यांच्या जोरावर सुलतानाला विरोध करण्याचा निश्चय केला.

परंतु "युद्ध करूं नको असा हयबालानें त्याला सल्ला दिला आणि तो आपलें सैन्य व खजिना घेऊन पर्वतांत मागें हटला." हयबालानें हा जो सल्ला दिला तो सुलतानानें चंद्ररायाचा पराभव केल्यावर काल्पीचा किल्ला आपण आपल्या ताब्यांत घ्यावा या दगलबाजीच्या हेतूनें दिला असें उत्बीचें म्हणणें आहे. परंतु किल्ला सर करण्याच्या भानगडींत न पडतां "महमुदानें सारखे तीन दिवस चंद्रराजाचा तो जाईल तेथें पाठलाग केला आणि पुष्कळ माणसांस मारून त्यांचीं हत्यारें व लढाईचा सरंजाम हीं पाडाव केली. त्यांनीं कांहीं हत्ती पकडून नेले व कित्येक हत्ती आपखुषीनें त्यांच्या बरोबर गेले, व त्यांस त्यांनीं खुदादाद म्हणजे देवानें दिलेलें असें नांव दिलें." "चंद्ररायाच्या खाजिन्यांत त्यांना सोनें, चांदी, जवाहीर व इंद्रनीलमाणि यांचीं तीन हजार पुडकीं सांपडली. त्यांना गुलाम तर इतके मिळाले कीं त्यांना प्रत्येकीं दहा दिऱ्हमापेक्षां अधिक किंमत आली नाहीं. सुलतान गझनीला परत आला आणि त्याच्या वैभवाची कीर्ति दिगंत पसरली."

कानपूर आणि काल्पीपर्यंत दक्षिणेस आलेली ही महमुदाची स्वारी त्याच्या सर्व स्वाऱ्यांत खरोखर अत्यंत लांबवर गेलेली, अतिशय फायद्याची, आणि अप्रतिम पराक्रमाची अशी होती. पुढील काळांतील मुसलमान इतिहासकारांनीं आणि विशेषतः फिरिस्तानें त्या काळच्या वास्तविक इतिहासाच्या आणि अंतरवेदीच्या भुगोलविषयक अज्ञानानें कित्येक गोष्टी विसंगत सांगितल्या आहेत व कांहीं गोष्टींत वाटेल ती भर दडपून दिली आहे. आणि फिरिस्तावर अवलंबून राहून महमुदाच्या हालचाली समजावून सांगतांना युरोपीय इतिहासकारांची धांदल उडाली आहे. परंतु ईलियटनें दाखवून दिल्याप्रमाणें हा सर्व घोंटाळा अधिक विश्वसनीय व समकालीन माहितीकडे लक्ष न देतां फिरिस्तावर सर्वस्वी अवलंबून राहण्यानें उत्पन्न झाला आहे (पा. ४०८). अशा तऱ्हेची

(ही नदी कोणती तें अजून ठरलें नाहीं ) येऊन तो उतरला. नदी-पलीकडे एका सुरक्षित ठिकाणीं राज्यपालानें आपला तळ दिला होता व तो कोणालाहि नदी उतरूं देत नव्हता. महमुदानें चामड्याचे मोठाले फुगे करावयास सांगितले. रात्रीच्या अंधारांत आठ पुरुष नदींत उतरले. राज्यपालानें त्यांना अडथळा करण्यासाठीं पांच हत्ती व एक पथक पाठविलें; परंतु महमुदाच्या शिपायांनीं त्यांस दाद दिली नाहीं. त्यांनीं हत्तींना बाण मारून जेर केलें आणि त्यांच्या बरोबरच्या लोकांना जमिनीवर लोळविलें. "सर्व आयुष्यभर विश्रांति उपभोगण्यासाठीं आपण एक दिवसाचे श्रम सहन केले पाहिजेत" असें सांगून सुलतानानें प्रत्येकाला उत्तेजन दिलें. घोड्यांची आयाळ धरून लोक नदी पोहून गेले. येथें कनोजवर हल्ला करितांना तिसऱ्या गोविंदानें केलेल्या अशाच एका अचाट पराक्रमाची आठवण होते. त्याचें वर्णन आमच्या दुसऱ्या भागांत (पा. १६७) आलें आहे. महमुदाच्या लोकांनीं राज्यपालाच्या पुष्कळ लोकांस ठार मारले व सत्तर हत्ती पाडाव करून जबरदस्तीनें धरून सुलतानाच्या गोटांत नेले. काफीर लोक आपला खजिना टाकून पळाले व सुलतानाला ती लूट मिळाली. सुलतानानें कुराणावरून शकुन घेतला होता, तो शकुन खरा ठरला. सुलतान आतां न्यायासना (राज्या)च्या उच्चपदावर निश्चल झाला आणि वाढत्या वैभवाची आणि साम्राज्याची त्याला खात्री येऊन चुकली." या स्वारीचा उत्बीनें दिलेला वृत्तान्त येथें संपला. परंतु येथें हि राज्यपालानें महमुदाचें स्वामित्व कबूल केलें किंवा महमूद गझनीला परत गेला असा उल्लेख त्यानें केला नाहीं. तथापि असें वाटतें कीं राज्यपालकडून आपलें स्वामित्व कबूल करून घेतल्याखेरीज महमूद परतला नाहीं. ('राज्याच्या उच्चपदावर निश्चल झाला' या वाक्यांत तो अर्थ गर्भित आहे). राज्यपालानें सुलतानाला दरसाल खंडणी देण्याचें कबूल केलें असलें पाहिजे.

याबद्दलचा उल्लेख पुढें येईल. चंद्राच्या आधिपत्याखालीं गाहडवालांनीं प्रतिहारांना उखडून काढिलें तोंपर्यंत प्रतिहार घराण्याचे राजे राज्य करीत राहिले तरी या नमण्यानें व करभार देण्यानें कनोजच्या वैभवशाली साम्राज्याचा अंत झाला.

इतर इतिहासकारांनीं पुरुजयपालाचा या स्वारींत संबंध आणला आहे. निझामुद्दिनानें त्याचा उल्लेख केला असून महमूद यमुना उतरून जात असतां पुरुजयपालानें त्याला विरोध केला असें म्हटलें आहें. फिरिस्तानें तो पंजाबचा राजा जयपाल याचा नातु होता असें लिहिलें आहे. येथें यमुनेचा उल्लेख राहिबच्या ऐवजीं चुकून करण्यांत आला असावा. राहिब ही घग्गर किंवा अवध प्रांतांतील दुसरी एखादी मोठी नदी असावी. बारीहि त्याच प्रान्तांत आहे. औंध कनोजच्या राज्यांत होतें हें सांगावयास नको. आणि ईलियटनें तर्क केल्याप्रमाणें तौशीच्या लढाईंत काश्मीरच्या सरहद्दीवर पराभव झाल्यानंतर त्रिलोचनपाल हा कनोजचा राजा राज्यपाल याच्या आश्रयास आला असणें शक्य आहे. अल्बेरूनीनें त्रिलोचनपाल इ. स. १०२१ ( हि. ४१२ ) मध्यें मरण पावला असें म्हटलें आहें. राहिब नदीवरील लढाई त्या सालीं झाली असावी आणि त्रिलोचनपाल हा त्या लढाईंत शौर्यानें लढून व शिकस्त करून धारातीर्थीं पतन पावला असावा.

# प्रकरण तेरावें

## कालंजर वरील स्वारी.

महमुदाचा समकालीन ग्रंथकार व त्याचा चिटणीस उत्बी यानें लिहून ठेवलेल्या वृत्तांताचा मार्गदर्शनाच्या कामीं होणारा उपयोग येथपासून पुढें आपल्यास होत नाहीं. आणि महमुदानंतर दोन किंवा तीन शतकांनी ज्यांनीं आपल्या हकीकती लिहिल्या त्या इतिहासकारांवर किंवा बखरकारांवर अवलंबून राहणें भाग येतें. ! उत्बीनें आपला वृत्तांत येथेंच कां थांबवावा हें सांगणें कठीण आहे. तो हि. ४२० पर्यंत किंबहुना त्याहिनंतर हयात होता यांत अणुमात्र शंका नाहीं. कारण त्या वर्षी काजी अबदुल्ला सय्यद मक्केच्या यात्रेला गेला असा त्यानें उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें तो परत आल्यावर त्याच्या व अबु बकरच्या दरम्यान जो वाद माजला त्याचाहि निर्देश त्याच्या पुस्तकांत आला आहे. या निर्देशाखालीं दिलेल्या पादटिपेंत त्याच्या भाषांतरकारानें असें म्हटलें आहे कीं, हें साल जर बरोबर असेल तर उत्बीच्या हयातीची जी समजूत आहे ती पेक्षां तो अधिक कालपर्यंत जगला असला पाहिजे ( पा. ४७४ ), आणखी, 'महमुद दीर्घकाल जगला' असें उत्बीनें एकेजागीं म्हटलें आहे; आणि भाषांतरकारानें पादटीपेंत असा शेरा मारला आहे कीं महमुदाच्या हयातीतील ज्या काळांत उत्बी मेला असावा असा समज आहे त्यापेक्षां अधिक दीर्घ काळपर्यंत तो जिवंत असला पाहिजे ( पा. ४८३ ). तेव्हां उत्बीनें आपला वृत्तांत हि. ४२० म्हणजे १०२९ इ. स. पर्यंत कां लिहूं नये हें गूढ आहे. कदाचित् महमुदाच्या भाग्याच्या पराकाष्टेच्या उत्कर्षाबरोबर ( इ. स. १०२०, उत्बीनें आपला वृत्तान्त थांबविला असावा. त्या वेळीं महमुदाचें साम्राज्य इतकें

विस्तारलें होतें कीं वायव्येस ख्वारिझम आणि जॉर्जियाचा समावेश करून कास्पियन समुद्रापर्यंत आणि अग्रेयीस पंजाब आणि ठाणेश्वर यांचा अन्तर्भाव करून सरस्वती नदीपर्यंत तें पसरलें होतें. शिवाय उत्तरहिंदुस्थानाच्या सम्राटाचा राहिब नदी वरील लढाईंत पराभव करून व त्याला हतगर्व करून त्याच्यावर महमुदानें वार्षिक खंडणी बसविली होती. आणि इकडे आक्झसनदीच्या पलीकडे तुर्की राजाचा बहुधा पराभव करून त्याच्याशीं त्यानें दोस्तीचा तह केला होता. शेवटची गोष्ट ही कीं, मथुरा व कनोजच्या स्वाऱ्यांत अगणित संपत्ति त्यानें मिळविली होती. मानवीस्वभावानुरूप ती संपत्ति गझनीस एक भव्य मशीद बांधून तिच्यावर खर्च करण्यास त्यास इच्छा झाली. मथुरेचीं अतिशोभायमान देवालयें पाहून त्याला ही प्रेरणा झाली असावी. हीं देउळें "उत्तम कारागिरासही दोनशें वर्षांत बांधतां आलीं नसावीं" असें त्यानें आपल्या खलित्यांत लिहिलें होतें. तेव्हां त्यानें गझनीला दैदीप्यमान्य मशीद बांधण्याचा संकल्प केला व त्याप्रमाणें ती बांधलीहि यांत आश्चर्य नाहीं. तेथें जी पूर्वीची मशीद होती तींत बेताच्या लोकांचा समावेश होई गझनीचें राज्य लहानसें असतांना ती बांधलेली होती. उत्बीनें गझनीच्या या विशाल मशिदीचें वर्णन असें केलें आहे " हिंदुस्थान आणि खोरासान येथील गुलाम तिच्यावर रातंदिवस खपत होते आणि सढळ हातानें पगार दिलेले अधिकारी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत त्यांच्यावर देखरेख करीत होते. हिंदुस्थान आणि सिंध यांमधून लांकूडकामासाठीं वृक्ष आणले होते. दूरदूरच्या प्रदेशांतून संगमरवरी दगडांच्या चौकोनी व अष्टकोनी प्रचंड शीला आणल्या होत्या. कारागिरांनीं सज्जांवरील घुमट इतके तंतोतंत वर्तूलाकार केले होते कीं 'त्यांच्याशीं तुलना केली असतां आकाशाच्या कमानीचा वर्तूळाकारहि काल्पनिक ठरावा.' तिच्यावर काढलेल्या रंगीत चित्रांत

आणि ठिकठिकाणीं दिलेल्या सोन्याच्या पाण्यांत शुद्ध सोनें हात सैल सोडून वापरलें होतें. सोन्याच्या मनुष्याकृति आणलेल्या मूर्ती बडवून दरवाज्यांत आणि भिंतींत पत्रे ठोकले होते. आपल्या स्वतःच्या बसण्याकरितां सुलतानानें तींत एक स्वतंत्र जागा बांधविली होती. इमारतीची रचना चौकोनी असून चारी बाजूस पुढें आलेलीं दालनें एकमेकांत गुंतलेल्या कमानींनीं जोडलीं होतीं. तिची फरसबंदी पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडांची केलेली होती. प्रार्थनेच्या मोठ्या दिवाणखान्यांतील भिंतीवर सोनेरी पाण्याचीं चित्रें काढलीं होतीं आणि त्यांत जागोजाग वैदूर्यमणि बसविले होते. ही इमारत पाहणारा प्रत्येक मनुष्य आश्चर्यानें तोंडांत बोट घाली आणि म्हणे 'ज्यानीं ज्यानीं दमास्कसची मशीद पाहून आश्चर्यानें थक्क होऊन अशा तऱ्हेची दुसरी इमारत बांधणें शक्यच नाहीं असें म्हटलें त्यांनीं गझनीची मशीद येऊन पहावी.' समोरच उत्सवांसाठीं आणि प्रार्थनांसाठीं विस्तीर्ण असा सभामंडप होता. त्यांत एकाच वेळीं सहा हजार ईश्वरसेवकांस आपलें काम करितां येत असें. मशिदी लगतच त्यानें एक पाठशाळा बांधून तींत मौल्यवान् आणि दुर्मिळ अशा अध्यात्मग्रंथांचा संग्रह करून दिला होता. विद्यार्जनाच्या या पुण्यस्थळीं इमाम,अध्यापक आणि विद्यार्थी हे गोळा होत असत. पाठशाळेला देणग्यांतून त्यांना जेवण व इतर आवश्यक पदार्थ मिळत. त्याना महिन्याच्या किंवा वर्षाच्या कांठीं कांहीं वेतनहि मिळत असे. सुलतानाच्या कारकीर्दींत गझनीचा विस्तार इतर सर्व शहरांपेक्षां वाढला व ती भव्य आणि मजबूत इमारतींनीं गजबजून गेली. इतर भव्य इमारतींत हजार हत्ती व त्यांचे महात व इतर नोकर राहतील अशी हजार खोल्यांची एक गजशाला होती. परमेश्वराच्या अशीर्वादानेंच देशाची ही सर्व भरभराट वृद्धिंगत झाली आहे." (उ. पा. ४६८–६९). सुलतानाच्या न्यायी कारकीर्दींचें व त्याच्या कनिष्ठभावाच्या खोरासानमधील राज्य-

कारभाराचें वर्णन शेवटीं देऊन उत्बीनें आपली बखर संपविली आहे. महमुदानें आपल्या धाकट्या भावास खोरासानचा अधिपति नेमलें होते; परंतु दुर्दैवानें तरुणपणींच तो मृत्यु पावला. महमूद अशा तऱ्हेनें वैभवाच्या शिखरावर पोंचला असतां तेथेंच उत्बीनें आपला वृत्तांत संपविला असावा. ग्रंथाचा शेवट अकस्मात रीतीनें येथेंच झालेला दिसत नाहीं. परंतु त्यामुळें आजच्या काळांत या कर्तृत्ववान् राजानें या पुढें केलेल्या पराक्रमांचा वृत्तांत उत्बीनें लिहिलेला वाचावयास न मिळाल्यामुळें आपला फार तोटा झाला आहे. ईलियटनें राहिव नदीवरील लढाई ही तेरावी स्वारी असें म्हटलें असून निझामुद्दीन आणि फिरिस्ता यांच्या आधारावर तिच्या नंतर आणखी चार स्वाऱ्यांचा उल्लेख केला आहे. निझामुद्दीन किंवा फिरिस्ता यांनीं कोणत्या आधारावर या स्वाऱ्यांची आपली हकीकत लिहिली तें ते सांगत नाहींत. तथापि फार मोठा काळ लोटल्यामुळें आणि या स्वाऱ्यांच्या स्थळांविषयीं गैरमाहिती असल्यामुळें त्यांनीं फार चुकीचीं विधानें केलीं असलीं तरी त्यांस खात्रीलायक माहितीचा आधार असण्याचा संभव आहे. स्वाऱ्यांच्या नोंदीचें रजिस्टर अथवा महमुदानें स्वतः लिहून ठेविलेल्या आठवणी अशा तऱ्हेच्या सरकारी लेखांचा उत्बीनें उल्लेक केला आहे. तसेंच त्या काळच्या बैहकी सारख्यांच्या हल्लीं अनुपलब्ध लेखांतूनहि त्यांना माहिती मिळाली असण्याचा संभव आहे. तेव्हां या पुढील काळच्या इतिहासकारांनीं केवळ स्वकपोलकल्पित गोष्टी लिहिल्या असाव्या हें संभवनीय वाटत नाहीं. त्यांचें वृत्तान्त आपण सावधगिरीनें मात्र वाचले पाहिजेत आणि ते हिंदुस्थानांतील कोरीव लेखांतील पुराव्यांशीं ताडून पाहिले पाहिजेत. उदाहरणार्थ, नंद नांवाच्या एका राजानें सुलतानाला शरण जाण्याबद्दल कनोजच्या राजाचा वध केला ( ई. भा. २ पा. ६३ ) हें तत्कालीन एखाद्या मुसलमान लेखकाच्या आधारावर निझामुद्दिनानें केलेलें विधान चंदेल्ल

आणि कच्छपघात शिलालेखांवरून खरें असल्याचें दिसून येतें. त्या शिलालेखांनीं या विधानाला दुजोरा आला आहे. गंडाचा मुलगा विद्याधर यानें कान्यकुब्जाच्या राजाचा नाश केला (ए. इ. १ पा. २२२) व या कृत्यांत त्याला भोज व कलचुरी राजा यांनीं मदत केली असें एका चन्देल्ल कोरीव लेखांत म्हटलें आहे. पुढें चंदेल्लाच्या इतिहासांत या शिलालेखाबद्दल अधिक उल्लेख येणारच आहे. या संयुक्त स्वारीचें नेतृत्व ग्वाल्हेरच्या एका कच्छपघात राजाकडे होतें. शिलालेखांत पुढें असेंहि म्हटलें आहे कीं दुबकुंडाच्या (ग्वाल्हेर प्रदेशांत) "अर्जुन नांवाच्या दुसऱ्या एका कच्छपघात सामंतानें त्या तुमुल युद्धांत विद्याधर राजाच्या सेवेंत राज्यपालाचा आपल्या बाणांनीं कण्ठच्छेद केला." मथुरेच्या मूर्तींचा विध्वंस करणाऱ्या एका परकीय राजाला राज्यपालानें शरण जावें ही गोष्ट त्यावेळच्या रजपूत राजांना आवडली नाहीं आणि चंदेल्ल, कलचूरी, परमार व कच्छपघात राजांच्या संयुक्त सैन्यानें कनोज येथें राज्य-पालावर हल्ला केला व त्याचा वध केला. यावरून त्या काळच्या रजपुतांच्या धर्माभिमानी वृत्तीची चांगली कल्पना येते. बहुधा त्यांनीं या पलीकडे अधिक कांहीं केलें नसावें आणि राज्यपालाचा मुलगा त्रिलोचनपाल सरळ वारशाच्या हक्कानें कनोजच्या राज्यावर बसला असावा.

अशा रीतीनें राज्यपालाच्या वधाची हकीकत खरी असली तरी ही हकीकत महमुदानें 'राजा जयपाला' (राज्यपाला) वर केलेल्या स्वारीच्या व मागें वर्णिलेल्या राहिबच्या लढाईच्या पूर्वी देण्यांत आणि आठ लोकांनीं खोल राहिब ओलांडली असें म्हणण्याऐवजीं त्यांनीं यमुना ओलांडली आणि तेथेंही पुनः 'पुरुजयपालानें' महमुदाला विरोध केला असें म्हणण्यांत निझामुद्दिनानें चूक केली आहे. पुढें निझामुद्दिनानें असेंही म्हटलें आहे कीं हे लोक बारीवर चाल करून

गेले. परंतु दुसऱ्या कोणत्याही लेखकानें या गोष्टींचा उल्लेख केला नाहीं (ई. २ पा. ४६४). राज्यपाल बारीला जाऊन राहिला होता असें अल्बेरुनीवरून दिसतें, तेव्हां बारीवरील स्वारी आणि बारीचा पाडाव हीं बरोबर असावींत. असो, वरील गोष्टी राहिबच्या लढाईनंतर झाल्या असल्या पाहिजेत आणि राज्यपालानें त्यावेळीं शरण जाऊन खंडणी द्यावयाचें कबूल केलें असावें. यानंतरच चंदेल्ल राजाच्या नेतृत्वाखालीं हिंदू राजांच्या संघानें राज्यापालावर स्वारी केली असली पाहिजे व त्यास ठार केलें असावें. आणि ही बातमी ऐकून महमुदानें चंदेल्लांचें व ग्वाल्हेरच्या राजांचें पारिपत्य करण्याचें योजिलें असावें. शेवटीं निझामुद्दिनाच्या म्हणण्याप्रमाणें चन्देल्ल राजावर महमुदानें दोनदां स्वारी केली. एकदां बारी जिंकल्यावर आणि दुसऱ्यांदा ग्वाल्हेर आणि कालंजरवर स्वारी केली तेव्हां. निझामुद्दिनाच्या आधारावर ईलियटनें ही दुसरी स्वारी म्हणून दिली आहे. राहिबच्या लढाईनंतर महमुदानें चंद्ररायावर स्वारी केल्याचा उल्लेख उत्बीच्या ग्रंथांत नाहीं, कारण त्यावेळीं राज्यपाल मारला गेला नव्हता. चंद्ररायावर दोन स्वाऱ्या न होतां एकच झाली असण्याचा संभव आहे.

महमुदानें १०२२ इ. स.मध्यें किरात, नूर, लोहकोट आणि लाहोर (ईलियटनें ही पंधरावी स्वारी म्हटली आहे) यांवर स्वारी केली. पहिलीं दोन ठिकाणें अनुक्रमें स्वात आणि बजौर होत. तेथें "हिंदुधर्म अजून थोडा बहूत शिल्लक उरला होता व तेथील लोक सिंहाचे उपासक होते." ईलियटच्या मतें हा सिंह म्हणजे शाक्य सिंह अथवा बुद्ध असावा. हा प्रांत ह्युएनसँगच्या काळांत कट्टा बौद्धधर्मी असला तरी या प्रदेशांत दहाव्या आणि अकराव्या शतकांत बौद्धधर्म पार विलयास गेला होता असें आमचें मत आहे. या सिंहाचा संबंध विष्णूच्या नर-सिंह अवताराशीं आहे. आम्ही आपल्या

पहिल्या भागांत नरसिंहाची भक्ति पंजाबांत प्रचारांत होती असें दाखविलें आहे. मुलतान हें प्रऱ्हादपूर म्हणजे नरसिंहभक्त प्रऱ्हाद याचें शहर म्हणून प्रसिद्ध होतें. महमुदानें हा प्रांत जिंकला आणि तेथील लोकांस मुसलमानी धर्माची दीक्षा दिली. नंतर तो लोहकोटला म्हणजे काश्मीरच्या आजिंक्य किल्ल्यावर चाल करून गेला. परंतु त्या दुर्गम देशांत जावयास मार्ग न मिळाल्यामुळें तो सोडून हिंदुस्थानांतील प्रांताची राजधानी जी लाहोर*तेथपर्यंत जाऊन तो परत फिरला. येथें त्याला कनोजची बातमी कळली असावी आणि त्यानें ग्वाल्हेर व कालंजरवर पुढील पावसाळ्यांत स्वारी करण्याचा निश्चय केला असावा.

ही पुढील स्वारी त्यानें हि. ४०४ (इ. स. १०२३) मध्यें केली. ग्वाल्हेरच्या राजाचें अगोदर पारिपत्य करावयाचें असल्यामुळें त्यानें यमुना ओलांडली असण्याचा संभव नाहीं. ग्वाल्हेरचा राजा लढाई न करतांच त्याला शरण आला. आणि तो कालंजरच्या राजाचा केवळ सामंत असल्यामुळें महंमूद तेथें फारसा न थांबतां गंडावर चाल करून गेला. मुसलमान लेखकांनीं त्याला चुकीनें नंद म्हटलें आहे. कांहीं युरोपीय ग्रंथकारांना ही स्वारी घडली असावी कीं नाहीं याबद्दल शंका आहे व या स्वारींत ग्वाल्हेरचा समावेश कां करण्यांत यावा याचा ईलियटला उलगडा करितां आला नाहीं (ई. भा. २ पा. ४६७). ग्वाल्हेर व कालंजर येथलि राजांनीं मिळून राज्यपालावर स्वारी केली होती हें आपणांस कोरीव लेखांवरून कळून चुकल्यामुळें आपल्याला ग्वालेरवरील स्वारीची सत्यता व आवश्यकता कबूल करावयास हरकत तर उरत नाहींच, पण ग्वाल्हेरवर सुरुवातीस

* लाहोर गॅझेटिअरमध्यें असें म्हटलें आहे कीं महमूद कधींच लाहोरला गेला नाहीं. वरील विधानानें त्याचें खंडन होतें. गॅझेटिअरमधील हें विधान विश्वसनीय दिसत नाहीं.

स्वारीकरून तेथील राजाचा पराभव महमुदानें कां केला हेंहि आपल्या ध्यानांत येतें. या स्वारीचें सविस्तर वर्णन करून निझामुद्दीन म्हणतो कीं महमुदानें कालंजरवर दुसऱ्यानदां स्वारी केली; परंतु ही केवळ पुनरुक्ति आहे. वस्तुतः कलंजरविरुद्ध ही पहिलीच स्वारी. (इ. स. १०१८त कनोज आणि मथुरा घेतल्यावर कालपीवर केलेली स्वारी ध्यानांत घेतल्यास ही दुसरी स्वारी होईल). यावेळीं गंड कालंजरपर्यंत मागें हटला. महमुदानें कालंजरला वेढा दिला. निझामुद्दीन म्हणतो "मजबुतीच्या दृष्टीनें हा किल्ला सर्व हिंदुस्थानांत अद्वितीय होता. नंदानें तीनशें हत्ती नजर केले आणि तहाचें बोलणें लाविलें." सुलतानाची स्तुति करणाऱ्या कांहीं कविताहि त्यानें पाठविल्या, त्या त्या देशांतील विद्वान् लोकांस आणि दरबारी कवींस दाखविण्यांत आल्या. त्यांनीं त्या कवितांची फार स्तुति केली. सुलतान खुष झाला, आणि कांहीं नजराणा पाठवून त्यानें नंदाला पंधरा किल्ले दिले. कालंजर किंवा ग्वाल्हेर सारखे किल्ले जिंकण्यांत आपली शक्ति वाया घालवावयाची नाहीं असेंच बहुधा महमुदानें शहाणपणानें ठरविलें. आणि तेथील राजांनीं त्याचें वर्चस्व मान्य केलें आणि कनोजच्या राजाला महमुदास खंडणी देण्यांत ते आडवे येणार नाहींत असे बहुधा कबूल करून घेतलें असल्यानें त्याचें समाधान झालें. राज्यपालामागून त्याच्या गादीवर आलेल्या त्रिलोचनपालानें बापानें कबूल केलेली खंडणी वर्षाचे वर्षास द्यावयाचें कबूल केलें असलें पाहिजे हें सांगावयास नको.

## टिप्पणी.

निझामुद्दिनानें दिलेला वृत्तान्त सर्वस्वी मान्य केल्यामुळें सरव्हिन्सेंट स्मिथनें इंडियन ॲंटिक्वेरी भाग ३७ (पा. १४२) मध्यें लिहिलेल्या चंदेल्लां वरील निबंधांत या प्रसंगाची निराळी आणि बहुशः चुकीची अशी हकीकत दिली आहे अशी आमची समजूत आहे. स्मिथनें असें

लिहिलें आहे कीं, " बाराव्या स्वारींत जानेवारी १०१९ मध्यें राज्यपाल शरण आला आणि त्यानें दहा लाख दिन्हेम आणि ३० हत्तींची खंडणी देण्याचें कबूल केलें. राज्यपालानें महमुदाचें हें वर्चस्व कबूल केलें म्हणून गंडाच्या पुत्रानें त्याचा १०१९ मध्यें वध केला. महमुदानें पुनः स्वारी केली आणि त्यावेळीं फारशी अक्षरांच्या अपूर्णतेमुळें ज्याचें नांव नीट लागत नाहीं परंतु जो हजार हिश्शांनीं राज्यपालाचा मुलगा त्रिलोचन-पाल असावा अशा गंडाच्या मित्रानें यमुनेवर त्याला विरोध केला. परंतु त्यांत त्याला अपयश आलें. महमुदानें नदी ओलांडली. बारी शहर घेऊन तें लुटलें आणि नंतर तो दक्षिणेस गंडाचें पारिपत्य करण्यास त्याच्या स्वतःच्या राज्यांत घुसला. नेहमींच्या हिंदु पद्धतीप्रमाणें गंडानें ३६००० घोडेस्वार, १,१५,००० पायदळ आणि ६४० हत्तींचें मोठें थोरलें सैन्य उभारलें. हें प्रचण्ड सैन्य पाहून सुलतान अस्वस्थ झाला आणि त्यानें एका उंच टेंकडीवर जाऊन त्याच्या सैन्याची पाहाणी केली. पण रात्रीं गंड पळुन गेला. शत्रूनें कदाचित् कपट केलें असेल अशा समजुतीनें सुलतानानें सावधगिरीनें हल्ला केला; आणि अगणित लूट मिळविली. शत्रूंचा भ्याडपणा आणि अवाढव्य लूट यामुळें या प्रदेशावर ग्वाल्हेर-मार्गानें पुनः स्वारी करण्याची महमुदाला इच्छा झाली. आणि त्यानें १०२३ इ. स. मध्यें कालंजरला वेढा दिला. गंडानें त्याला ३०० हत्ती आणि अमर्याद नजराणा दिला आणि त्याच्यापासून कालंजर आणि पंधरा किल्ले घेण्याचें कबूल केलें. हा महमुहानें मिळविलेला जय अगदीं सहजा-सहजीं मिळाला असतांही १८० वर्षें मुसलमानांनीं चन्देल्लांच्या राज्यावर स्वारी केली नाहीं आणि गंडाच्या वंशजांना आपलें राज्य स्वतंत्रपणें चालवूं दिलें. " वर सांगितल्याप्रमाणें स्मिथनें निझामुद्दिनावर निःशंकपणें विश्वास टाकल्यामुळें ह्या हकीगतींत अगदीं उघडाउघड दिसणाऱ्या विसंगत विधानांची गर्दी झाली आहे. निझामुद्दिनानें कालंजरच्या स्वाऱ्या एकी ऐवजी दोन दिल्या आहेत आणि त्या दोन्हीहि चन्देल्लानी राज्य-पालाचा पराभव करून त्याचा वध केला त्यानंतर दिल्या आहेत. यामुळें दुसरी स्वारी अगदीं अनवश्यक ठरते. कारण ती केवळ लुटीसाठीं आणि कोणतेही कारण नसतां ग्वाल्हेरच्या मार्गानें केली आहे. त्याचप्रमाणें

आपल्याजवळ मुसलमानापेक्षां फार मोठें सैन्य असतां गंडानें रात्रीं पळ काढला हें म्हणणें उघडाउघड वेडसरपणाचें आहे. उत्बीनें असली वर्णनें दिली नाहींत. परंतु हिंदु राजाकडे प्रचंड सेना असूनहि तो लढाई न कारितांच पळुन जातो अशा तऱ्हेच्या सामन्यांची कल्पना करण्याचा मोह पुढील काळच्या मुसलमान लेखकांस झाला यांत नवल नाहीं. गंड हा स्वतंत्र, अभिमानी आणि शूर राजा होता असें उत्बीनें देखील त्याचें वर्णन केलें आहे. निजामुद्दिनानें वर्णन केलेला प्रसंग केवळ काल्पनिक आहे. कारण त्याच्याच म्हणण्याप्रमाणें राज्यपालाच्या वधासाठीं कालंजर राजाला शासन करावें म्हणून ही स्वारी करण्यांत आली असेल तर यमुना उतरण्याची आणि कनोजवर चाल करून जाण्याची जरुरीच नव्हती. ज्याला त्याचा बाप शरण गेला होता त्या महमुदाला त्रिलोचनपाल विरोध करील हेंहि संभवनीय वाटत नाहीं. शेवटीं आठ बारा माणसांनी न जुमानतां जी तुफान नदी ओलांडली त्या राहीबच्या लढाईनंतर महमुदानें नंदाविरुद्ध स्वारी केली असें उत्बी म्हणत नाहीं. याचें योग्य स्पष्टीकरण असें आहे कीं, नंदावरील स्वारीचा उल्लेख याठिकाणीं करण्यांत आणि त्याचप्रमाणें नंदानें कनोज राजावर स्वारी करून त्याचा वध केला तो प्रसंग, राहीबच्या लढाईपूर्वी वर्णन करण्यांत निझामुद्दिनानें चूक केली आहे.

आमच्या मताप्रमाणें या प्रसंगाची संगति अशी आहे. कनोजविरुद्ध केलेल्या बाराव्या स्वारींत (१०१९) राज्यपाल शरण गेला नाहीं; तो बारीला पळून गेला. तेराव्या स्वारींत महमुदानें आपलें सैन्य राज्यपालावर बारीस नेलें आणि बारीच्या लढाईत त्याचा पराभव करून त्याच्याकडून खंडणी घेण्याच्या अटीवर त्याला त्यानें सोडून दिलें (१०२१) ग्वाल्हेरच्या साहाय्यानें मेमध्यें नंदानें राज्यपालावर स्वारी केली व त्याला मारून टाकलें. ही बातमी महमूदाला लाहोर येथें १०२२ च्या मार्चांत समजली आणि त्या वर्षी डिसेंबरांत त्यानें ग्वाल्हेर व कालंजर या दोहोंवर स्वारी केली आणि गंडाला १९२३ जानेवारींत शरण आणलें. ही संगति स्वीकारली असतां गंड हा मानी असून अगदीं भित्रा म्हणून दाखविला जातो तसा भित्रा दिसणार नाहीं.

## टिप्पणी–नं. २ काबुलपंजाबचे शाही राजे.

या राजांनीं काबूलपासून लाहोरपर्यंत राज्य केलें असें बहुतेक सर्व इतिहासकारांनीं कबूल केलें आहे. अल्बेरूनीच्या ग्रंथाचा भाषांतर करणारा सचाऊ यानें त्याच्या 'हिंदुस्थान' या ग्रंथाची प्रस्तावना लिहितांना म्हटलें आहे कीं, "काबुलिस्तानापासून पंजाबपर्यंत राज्य करणारें पाल घराणें अल्बेरूनीनें आपले ग्रंथ लिहिले तेव्हां इतिहासाच्या रंगभूमीवरून नाहींसें झालें होतें. आणि त्यांचें राज्य महमूद आणि त्याचे गुलाम अधिकारी यांच्या ताब्यांत पूर्णपणें गेलें होतें." त्यांनीं येवढ्या विस्तीर्ण प्रदेशावर राज्य केलें हें निर्विवादपणें सिद्ध झालें आहे. कारण या राजांचीं नाणीं सर्व पंजाबभर सांपडतात. लुधियाना जिल्ह्याच्या गॅझेटिअरमध्यें असें वाचण्यास सांपडतें कीं, काबूल आणि पंजाबचा राजा सामंतदेव याचीं नाणीं पडक्या सुनेत शहरांतील मातीच्या ढिगांत सांपडतात. कुशनप्रभृति प्राचीन राजांचीं नाणीं तेथें सांपडत असून दिल्लीच्या हिंदु किंवा मुसलमान राजांचीं नाणीं तेथें मुळींच सांपडत नाहींत. यावरून गझनीच्या महमुदानें सुनेतचा विध्वंस केला असें दिसून येतें.

शाही घराण्यांत सामन्त हा प्रख्यात राजा होऊन गेला. तो ९३५ मध्यें सिंहासनावर बसला असें थॉमस म्हणतो ( परंतु हें निश्चित नाहीं–ई. २ पा. ४२५ ). त्यानें पंजाब जिंकला असावा असें दिसतें. त्याचीं नाणीं तेथें अतिरिक्त सांपडतात. भीमाचीं नाणीं काबुलिस्तानांत सर्वत्र सांपडतात. परंतु पंजाबांत तीं क्वचितच आढळतात. त्यानें कोट कांग्राच्या खालच्या बाजूला भीमनगर वसविलें हें आपण पाहिलेंच आहे. काश्मीरची प्रख्यात निष्ठुर राणी दिद्दा हिचा तो आजा होय. जयपालाचें एकहि नाणें अजून सांपडलें नाहीं हें विचित्र आहे. परंतु आनंदपालाचीं नाणीं पंजाबांत आणि गंगेच्या दुआबाच्या उत्तरभागांत प्रभूतपणें सांपतात ( सदर ). त्रिलोचनपाल किंवा भीमपाल यांचें एकही नाणें सांपडत नाहीं. बहुधा पंजाबांत कोठेंच त्यांचें राज्य नसावें.

हे राजे शैव असावेत असें त्यांच्या नाण्यांवरून दिसतें. त्या नाण्यांवर नंदीची आकृति काढलेली आहे. परंतु पहिला भीम हा वैष्णव

असावा, कारण त्यानें काश्मिरांत केशवाचें देवालय बांधलें असा तरंगि-णींत उल्लेख आहे. याचा निर्देश पूर्वींच भाग २ मध्यें ( पा. २–६० ) आला आहे. त्या कालांत पंजाबांत व त्याचप्रमाणें काबुलिस्तानांतहि वैष्णवधर्म प्रचलित होता असें दिसतें.

शेवटचा राजा भीम यानें चंद्रराजाला ( बुंदेलखंडचा ) तूं महमुदाशीं लढाई करण्याच्या भानगडींत पडूं नको असा उपदेश करणारें पत्र लिहिलें असें इलियटनें म्हटलें आहे. आणि प्रमाण म्हणून उत्बीचा उतारा त्यानें दिला आहे ( पा. ४२७ ). तो उतारा पान ४८ वर दिला आहे ( इ. २ ), हें पूर्वींच सांगितलें आहे. यमीनीच्या निरनिराळ्या प्रतींत कांहीं ठिकाणीं विशेषतः नांवांच्या बाबतींत निरनिराळे पाठ पडले आहेत. आम्ही जें यमीनीचें भाषांतर उपयोगांत आणलें आहे त्यांत हें नांव आढळत नाहीं. हा चंद्ररायाला माघारा फिरण्याचा केलेला उपदेश कनोजच्या राज्यपालानें केला असावा असें आम्हीं धरलें आहे, तें अधिक संभवनीयहि आहे. कारण भीम दक्षिणेकडे इतका खालीं येणें शक्य नाहीं. त्याचा बाप त्रिलोचनपाल यानें ज्याप्रमाणें उपदेश केला असें म्हणतात त्याप्रमाणें भीमानेंही जर केला असेल तर तो महमुदाचा जसा मांडलिक झाला होता तसाच मित्रहि असला पाहिजे. त्याच्या चुलत्याला मुसलमान करण्यांत आलें असा उल्लेख एका प्रतींत आहे तो सेवक-पालाबद्दल असावा. जयपालाच्या या नातवानें ( मुलीच्या मुलानें ) मुस-लमानी धर्म स्वीकारला होता व महमुदानें त्याला पेशावरचा अधिकारी नेमलें होतें. पुढें त्यानें बंड केलें. महमुदानें त्याच्यावर हल्ला केला व शेवटीं तो मारला गेला.

# प्रकरण चौदावें.

## सोमनाथावरील स्वारी.

महमुदाच्या मूर्तिभंगाच्या व लुटालुटीच्या चरित्रांतील अत्यंत संस्मरणीय अशा वृत्तांताशीं आतां आपण येऊन पोंचलों आहोंत. तो वृत्तांत म्हणजे सोमनाथावरील स्वारी होय. शिवाचें अत्यंत पवित्र देवस्थान म्हणून सोमनाथाची त्यावेळीं ख्याति होती. ९ व्या शतकांतील स्कंद पुराणांत त्याचें सविस्तर वर्णन आहे. अल्बेरुनीनेंहि तीर्थक्षेत्र आणि चांच्यांचें निवासस्थान असें त्याचें वर्णन केलें आहे. सोमनाथावर हल्ला करून तेथील अपरंपार संपत्ति लुटावी असें महमुदास वाटण्याजोगें तें खास होतें. उत्बी हि. स. ४२० (इ. स. १०२९) पर्यंत म्हणजे या स्वारी नंतर चार वर्षें जिवंत असूनहि आपल्या पुस्तकांत दुर्दैवानें महमुदाच्या या महापराक्रमाचा उल्लेख करीत नाहीं. या नंतर दोन शतकांनीं आपली बखर लिहीत असतां रशीदुद्दीननें आणि त्यानंतर वीस वर्षांनीं लिहिणाऱ्या हमीदुल्लानें या स्वारीचा उल्लेख केलेला नाहीं (ई. २ पा. ४३०–४३१). या स्वारीचें पहिलें वर्णन सांपडतें तें इब्न् असीर याच्या पुस्तकांत. नंतरच्या लेखकांनीं हेंच वर्णन अधिक खुलवून दिलें आहे (ई. २ पा. ४६८). गुजराथच्या सोळंखी राजांचा इतिहास त्या घराण्याचा मूळ पुरुष मूलराज याच्या काळापासून गुजराथच्या जैन व हिंदु बखरकारांनीं पूर्णपणें दिला आहे. परंतु सोळंखी राजांच्या अत्यंत वैभवाच्या दिवसांत गुजराथवर आलेल्या या आपत्तीचें त्यांत नांवहि नाहीं. मूलराज हा अनहिलवाडच्या गादीवर ९६१मध्यें म्हणजे सबुक्तगीनच्या पूर्वी १६ वर्षें बसला, हा वृत्तांत पुढें एका प्रकरणात येणार आहे. आजपर्यंत जे कोरीव लेख उपलब्ध झाले

आहेत त्यांत या आपत्तीबद्दल एक अक्षरहि आढळत नाहीं. यामुळें गुजराथसारख्या लांबच्या प्रांतांत, जेथें जावयाचें तर एक विस्तीर्ण वाळवंट ओलांडणें आवश्यक तेथें, महमुदानें खरोखर स्वारी केली असेल कीं नाहीं याची शंका सहज उत्पन्न होते. तथापि आपल्या अत्यंत पवित्र देवस्थानावर आणि राजावर कोसळलेल्या या अनर्थाचा उल्लेख करण्याबद्दल हिंदु लेखक हे अनुत्सुक असणार व ज्या मुसलमान लेखकांनीं या स्वारीबद्दल लिहिलें आहे त्यांनीं तें शेंकडों वर्षांनीं लिहिलें असलें तरी त्यांच्या पुढें त्याबद्दलचा कांहीं तरी लेख असावा, त्यांनीं अगदींच काल्पनिक गोष्ट लिहिली असण्याचा संभव नाहीं, असा विचार मनांत आणून ईलियटनें इब्न् असीर याच्या पुस्तकांतून जो उतारा घेतला आहे त्यावर हा वृत्तान्त द्यावयाचें आम्हीं ठरविलें आहे ( ई. २ पा. ४६९ ).

सुरुवातीसच आम्हांस हें सांगितलें पाहिजे कीं या अतिशयोक्तिप्रचुर वृत्तातांत पुढील लेखकांच्या लेखांत विस्मयावहतेच्या बाबतींत अधिकाधिक भर पडली आहे. मुख्यतः महमुदाच्या धार्मिक गौरवाची खुलावट करण्याच्या इच्छेनें स्वकपोलकल्पित अशा गोष्टी त्यांनीं या वृत्तांताला जोडून दिल्या. उदाहरणार्थ सोमनाथाच्या मूर्तींत अगणित संपत्ति सांठविली होती, तेथील ब्राह्मणांनीं खंडणी दाखल कोट्यावधि रुपये महमुदास द्यावयाचें कबूल केलें, त्याच्या सेनापतींनीं ते घेण्याचा त्याला सल्ला दिला, परंतु महमुदानें सांगितलें कीं ईश्वराच्या दरबारीं आपण मूर्ति विक्रय करणारे म्हणून न ठरतां मूर्तिभंजक म्हणून प्रसिद्ध व्हावें अशी माझी इच्छा आहे, ही गोष्ट—गिबननें सुद्धां सांगितली आहे—फेरिस्ताची नसली तर दुसऱ्या कोणाची तरी कपोलकल्पना आहे. सोमनाथाच्या हकीकतीच्या बनावटीबद्दल टीका करतांना खुद्द ईलियटनें ज्याचा उतारा घेतला आहे तो वुइलसन म्हणतो कीं “ या मूर्तीचे अवयव छिन्न विछिन्न

करण्याबद्दल पूर्वीच्या मुसलमानांच्या लेखांत कोणताहि उल्लेख नाहीं. वस्तुतः त्या मूर्तीला अवयवच नव्हते, किंवा त्या मूर्तीतील संपत्ति असल्याबद्दलहि उल्लेख नाहीं. ती मूर्ती भरीव असल्यामुळें तींत संपत्ति लपविली असणेंहि शक्यच नव्हतें. मूर्तींत लपवून ठेवलेल्या हिऱ्यांचा व माणकांचा जो शोध फिरिस्तानें लावला आहे त्याला कशाचाहि आधार नाहीं." ही गोष्ट अगदीं उघडाउघड वेडसरपणाची आहे. कारण सोमनाथाची मूर्ति म्हणजे एक भरीव दगड असला पाहिजे. त्याचप्रमाणें एका विश्वासघातकी हिंदु वाटाड्यानें महमुदाला एका निर्जल वाळवंटांत महमुदास नेलें, परंतु ईश्वराची प्रार्थना करतांच त्यास पाणी सांपडलें ही गोष्ट; किंवा गुजराथ प्रांत सुपीक असून त्यांत सोन्याच्या खाणीं असल्यामुळें महमुदाच्या मनांतून तेथेंच राहावयाचें होतें, परंतु खोरासान ही आपली जन्मभूमि, तीच राहावयास सोईस्कर असें सांगून ती कल्पना सोडून देण्यासाठीं त्याचें मन अधिकाऱ्यांनीं वळविलें ही गोष्ट विश्वसनीय नाहीं. परत जातांना महमुदानें त्या देशाचा राज्यकारभार पळून गेलेल्या राजाच्या नातेवाईक असलेल्या व संसार सोडून विरक्त झालेल्या दाबशिलीमवर सोंपविला ही गोष्टहि—गुजराथचा त्या वेळचा राजा भीम याचा तो चुलता होता आणि तो खरोखरच सरस्वती नदीच्या तीरीं विरक्त होऊन राहिला होता असें दाखविण्यांत येत असलें तरी,—विचित्र असून विश्वास बसण्यासारखी नाहीं.

ईलियटनें या स्वारीबद्दलचे पुष्कळ इतिहासकारांचें उतारे दिले आहेत; व ज्यांना विशेष इच्छा असेल त्या वाचकांनीं ते ईलियटच्या ग्रंथांतून वाचावेत. इब्नअसीरच्या मूळच्याच अतिशयोक्तीनें भरलेल्या वृत्तांतात आणखी तिखट मीठ घालून आपलें वृत्तांत या इतिहासकारांनीं लिहिलेले असल्यामुळें त्यांचा सारांश देण्याची आम्हांस गरज दिसत नाहीं. इब्नअसीरनें दिलेल्या वर्णनाचें सार मात्र आम्ही

देत आहोंत. " सोमनाथाची मूर्ति ही अखिल हिंदुस्थानांत अत्यंत प्रसिद्ध होती. विशेषतः चंद्रग्रहणाच्या रात्रीं तेथें फार लोक जमत असत. माणसें मेल्यावर त्यांचें आत्मे त्या ठिकाणीं जातात अशी समजूत होती. त्या देवालयाला १०००० गांवें इनाम दिलेली होतीं ( ! ! ! ). त्या मूर्तीच्या अभिषेकासाठीं दररोज गंगेचें पाणी आणण्यांत येत असे. एक हजार ब्राह्मण देवाची पूजा करीत आणि यात्रेकरूंना दर्शन करवीत. यात्रेकरूंची श्मश्रू करण्यांत तीनशें न्हावी गुंतलेलें असत. देवळाच्या दरवाजांत तीनशें स्त्रिया गाणी म्हणून नाच करीत. ( कालिदासानें मेघदूतांत वर्णिल्याप्रमाणें शिवाच्या मूर्तीसमोर प्राचीनकाळीं गाणारणी गात व नाचत असत. दक्षिणेंतील शिवाचें देवालयांत ही चाल अजूनहि प्रचारांत आहे. गोवा प्रांतातील मंगेशाच्या देवळांत ती मला दृष्टीस पडली). महमुदाचा प्रतिकार त्यांनीं केला नाहीं म्हणून सोमनाथ इतर हिंदु देवांवर रागावला होता अशी समजूत प्रसृत झाली होती. ती जेव्हां महमुदाच्या कानावर गेली तेव्हां सोमनाथाची मूर्ति फोडून हिंदूंचें देव खोटे आहेत हें त्यांच्या प्रत्ययास आणल्यास ते खऱ्या धर्माचा स्वीकार करतील असा त्यानें विचार केला.

असा निश्चय करून त्यानें ३०००० घोडदळ आणि कांहीं बाजारबुणगे घेऊन साबानच्या दहाव्या तारखेस गझनी सोडली. व तो रमजान महिन्याच्या मध्यभागांत मुलतानला येऊन पोंचला. बरोबर ३०००० उंटांवर धान्य व पाणी घेऊन वाळवंटांतून अनहिलवाडला जाण्याकरितां तो निघाला. तेथील राजा भीम हा सुरक्षितपणासाठीं एका किल्ल्यावर पळून गेला. ( पुढील ग्रंथकारांनीं त्या किल्ल्याचें नांव कन्दन असें दिले आहे. बहुधा तो कच्छमधील कंथड किल्ला असावा, ). महमुद वाळवंटांतून सोमनाथाला गेला. (अनहिलवड घेतल्याचें किंवा ते लुटल्याचें वर्णन येथें

नाहीं). तो वाळवंटांतून दबलवाराला पोंचला.हे स्थळ सोमनाथापासून दहा मुक्कामांच्या अंन्तरावर होतें. सोमनाथ महमुदाचा नाश करील अशा विश्वासानें तेथील लोक पळून न जातां राहिले होते. परंतु महमुदानें तें शहर घेतलें आणि तेथील लोकांची कत्तल करून त्यानें सोमनाथाकडे कूच केलें.

जिल्काद महिन्याच्या मध्यावर एका गुरुवारीं तो सोमनाथास येऊन पोंचला आणि लाटांनीं धुतलेल्या समुद्रकिनाऱ्यावर त्यानें एक प्रबळ किल्ला पाहिला. किल्ल्यावरील तटावर उभे राहून हिंदु मुसलमानाकडे पाहून हंसत होते आणि सोमनाथ तुम्हां सर्वांचा नाश करील असें त्यांस सांगत होते. शुक्रवारीं मुसलमानानीं हल्ला चढविला; हिंदू पळून गेले. शिड्या लावून मुसलमान तटावर चढले, व किल्ल्यांत उतरले. नंतर भयंकर कत्तल सुरू झाली. पुष्कळसे हिंदू देवळांत शिरले, त्यांनीं जमिनीवर देवापुढें साष्टांग नमस्कार घातला आणि जय मिळावा म्हणून देवाची करुणा भाकली. ( येथें दुसरी तटबंदी असावी ).

दुसऱ्या दिवशीं सकाळीं लढाईला पुन: सुरवात झाली, आणि मुसलमानांनीं हिंदूंना देवळांत रेटलें. देवळाच्या दारांत दारुण कत्तल झाली. हिंदू लोक देवळांत शिरत आणि रडून आणि हात जोडून देवाची प्रार्थना करीत, आणि देवळांतून बाहेर पडून मृत्युमुखीं पडेतों लढत. कांहीं लोक नावांत बसून समुद्रांत उतरले. परंतु तेथेंहि त्यांच्यावर हल्ला करण्यांत येऊन त्यांना मारण्यांत किंवा बुडविण्यांत आलें.

शिशानें मढविलेल्या छप्पन लांकडी खांबावर सोमनाथाचें देऊळ उभारलें होतें. मूर्ति आंतल्या एका खोलींत होती. ती पांच हात उंच असून तिचा घेर तीन हातांचा होता. ती दोन हात तरी जमिनींत खोल गेलेली असावी. ती घडविलेली दिसत नव्हती. तिचा कांहीं भाग महमुदानें जाळून टाकिला व कांहीं भाग गझनीला पाठ-

विला. तेथें जामीमशीदींत दाराशींच पायरी म्हणून तो घातला गेला. देवळांत अंधार होता, परंतु तेथें रत्नजडित झुंबरांचा प्रकाश पडला होता. मूर्तीजवळ सोन्याची सांखळी असून त्याला घंटा लावल्या होत्या व ब्राह्मणांना पूजेला उठविण्यासाठीं त्या वेळोवेळीं वाजविण्यांत येत. खजिना जवळच होता,व त्यांत सोन्यारुप्याच्या मूर्ति आणि अत्यंत मौल्यवान् रत्नांनीं जडवलेलें पडदे ठेविले होते. सगळ्या लुटीची किंमत वीस लाख दिनारांपेक्षां अधिक होती, आणि पन्नास हजारापेक्षां जास्त लोक मृत्युमुखीं पडले " (ई. भा. २ पा. ४६९-७१).

हा वृत्तान्त अगदीं सरळ आणि विश्वसनीय आहे. ब्राह्मणांनीं अथवा पाहिजे तर क्षत्रियांनीं म्हणा देवळाजवळ क्रोधानें संतप्त होऊन प्रतिकार केला. पण तें केवळ मृत्यूला कवटाळणेंच होतें. गुजराथचा राजा भीम याला सोमनाथाच्या बाहेरच शत्रूला जोराचा प्रतिरोध करितां आला असता. तो आपल्या नांवाला आणि रजपूत ब्रीदाला जागता तर त्याला महमुदानें आणलेल्या सैन्याहून अधिक मोठें सैन्य, किंबहुना घोडदळ हि, रणांगणावर उभे करितां आलें असतें. परंतु हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं यावेळीं आपल्या सतत मिळविलेल्या जयांनीं महमुदाची इभ्रत नेपोलियनप्रमाणें पराकाष्ठेला पोंचली होती. एक नेपोलियन म्हणजे लाख माणसांची मदत मानली जाई. परंतु अशा नेपोलियनलाहि वॉटर्लूच्या समरांगणावर जर्मन व इंग्रज यांनीं निकराचा विरोध केला. आपत्तीच्या निराशकाळांत जोमाचा कणखरपणा हिंदुलोकांच्या अंगीं दिसत नाहीं. तात्पर्य भीमानें कच्छमधील एका किल्ल्याचा आश्रय केला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कच्छच्या रणांतील पाण्याचा अडथळा असतां व भरतीच्या वेळीं पाणी वाढावयाचा संभव असल्यामुळें त्यांतून जाणें धोक्याचें होतें तरीहि सोमनाथ घेतल्यावर महमुदानें त्याच्यावर तेथेंहि हल्ला केला असें म्हणतात. विजेता महमूद येत आहे

असें पाहिल्याबरोबर भीम तेथूनहि पळाला. तेथोन वाळवंटांतून सिंधच्या मार्गानें महमूद गझनीला परत गेला. वाळवंटांत पाणी सांपडणार नाहीं हें त्याला माहीत होतें. तो पाण्याचा मार्गच नव्हता, तेव्हां विश्वासघातकी हिंदू वाटाड्यांना त्याला फसविण्याची सोयच नव्हती. सिंधूमधील चांच्यांनीं त्याला फार त्रास दिला. हे चांचे जूड* देशांतले असावेत असा समज आहे. पुढें या जाटांविरुद्ध शेवटची स्वारी करून महमूदानें त्यांना यथायोग्य शासन केलें.

महमूद सोमनाथाला आला तो मुलतानवरून वाळवंटांतून, रस्त्यावर अजमीर आणि अनहिलवाड घेऊन, पूर्वेच्या रस्त्यानें आला आणि कच्छहून परत जातांना मार्गांत मनसूर घेऊन मुलतान, सिंधुनदी या मार्गानें गेला असें कित्येक म्हणतात. माळव्याचा परमारदेव ( भोज ) त्याच्याशीं लढाई करण्याची तयारी करीत होता व त्यानें त्याला रस्त्यांत गांठलें असतें म्हणून तो या पश्चिमेकडील मार्गानें गेला. हिंदु लोकांबरोबर लढावें लागलें तर आपली येवढी थोरली लूट कदाचित् जाईल अशी त्याला भीति वाटली असावी असेंहि कित्येकांनीं लिहिलें आहे.

## टिप्पणी—सोमनाथ.

सोमनाथपट्टण अथवा सोमनाथ शहर हें काठेवाडच्या पश्चिम किनाऱ्यावर वसलेलें आहे. हल्लीं तें जुनागडच्या राज्यांत आहे. शहर गायकवाडच्या ताब्यांत आहे. १८४३ मध्यें एका प्रवाशानें तें पाहून ज. रॉ. ए. सो. भा. १ पान १७३ वर त्यानें त्याचें वर्णन दिलें आहे तें असें, " प्राचीन देवालय नाश पावलें आहे आणि जुन्या देवळाच्या जागेजवळच अहिल्याबाईनें नवें देऊळ बांधलें आहे. परंतु त्याच्या नष्ट झालेल्या

---

* १०२४ मध्यें सोमनाथाहून परत जात असतां मिठाच्या डोंगरांतील जाटांनीं त्याला हैराण केलें असें म्हणतात; परंतु हे जाट दक्षिण सिंधूवरील असावेत ( झेलम गॅझेटिअर पा. ८३ ).

स्थितींतहि त्याचें विशाल वैभव दृष्टोत्पत्तीस येतें." आमच्या मतें हें जुनें म्हणून म्हटलेलें देवालय सिद्धराज जयसिंह व कुमारपाल यांनीं बांधलेलें देवालय असावें. व महमुदानें ज्या देवालयाचा विध्वंस केला तें बहुधा परमारांच्या एका शिलालेखांत म्हटल्याप्रमाणें माळव्याच्या भोज परमारानें बांधलेलें असावें. या कोरीव लेखाची हकीकत परमारांच्या इतिहासांत येईल. मुसलमान इतिहासकारांनीं वर्णिल्याप्रमाणें भोजानें बांधलेलें देवालय बहुधा लांकडाचें असावें. ती इमारत बहुतकरून इ. स. १०२६ मध्यें बांधण्यांत आली असावी. देवळाची नवी दगडी इमारत अनहिलवाडच्या जयसिंहानें बांधावयास सुरवात केली आणि कुमारपालानें ती पुरी केली. हें गुजराथच्या इतिहासग्रंथावरूनच दिसून येतें इतकेंच नव्हे तर सोमनाथपट्टनच्या देवालयांतील एका शिलालेखावरूनहि हें दिसून येतें. अनहिलवाडच्या इतिहासांत त्या शिलालेखाचा उल्लेख येईल. या भद्रकाली-देवालय-प्रशस्तीचा सन ११६९ इ. स. असून ती चित्ताकर्षक आहे. तिच्या सुरवातीस एका ब्राह्मणाचें वर्णन दिलें आहे. तो बनारसचा असून त्यानें नाश पावलेल्या देवालयांचा उद्धार करण्याचें काम हातीं घेतलें होतें असें वर्णन आहे. [ हीं देवालयें बहुधा महमुदानें विध्वस्त केलेलीं असावींत ]. या पुण्यकारक कार्यासाठीं तो सर्व हिंदुस्थानभर हिंडला. तो उज्जनीहून सोमनाथाला आला. पुढील काळांतील मुसलमान इतिहासकारांनीं महमुदाच्या सोमनाथाच्या स्वारीची व तेथील देवालयाच्या विध्वंसाची जी हकीकत सांगितली आहे तिला या पवित्र ब्राह्मणाच्या प्रयत्नाबद्दलच्या उल्लेखानें बळकटी येते अशी आमची समजूत आहे. या प्रशस्तींत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं आतां तें देऊळ दगडांनीं बांधण्यांत आलें आहे. हें दगडाचें देवालय चवदाव्या शतकांत गुजराथच्या मुसलमान राजांनीं फोडलें. सोमनाथाच्या देवळाचे चंदनी दरवाजे महमुदानें गझनीला नेले, ह्या आख्यायिकेवर आधुनिक विद्वानांचा कांहींचा विश्वास नाहीं. आणि अफगाणिस्थान जिंकल्यावर १८४३ सालीं इंग्रजांनीं जे दरवाजे आणले ते आग्र्याच्या किल्ल्यांत धूळ खात पडले आहेत ( सरदेसाई ).

## टिप्पणी २—सादी व सोमनाथ.

सादीनें आपल्या बोस्तानमध्यें सोमनाथाचा उल्लेख केलेला आहे, हें येथें सांगितलें पाहिजे. त्यांत त्यानें एक विचित्र गोष्ट सांगितली आहे, आणि ती बहुधा त्याच्या स्वतःचें डोक्यांतून निघालेली असावी. आपल्या फार मोठ्या प्रवासात तो सोमनाथाला आला, तेथें त्यानें एक हस्तिदंती मूर्ति पाहिली. ती सागाचें सिंहासनावर सोन्याचें चौरंगावर बसविलेली होती. तिच्या अंगावर मूल्यवान् हिरे सुंदर आकारांत बसविले होते. ब्राह्मण पुजाऱ्यानें अशी एक युक्ति केली होती कीं ती मूर्ती आपला हात वर उचली. कर्मधर्मसंयोगानें ही युक्ति सादीच्या लक्षांत मूर्तीमागें गाभाऱ्यांत शिरल्यानें आली. हे पाहून तो ब्राह्मण पळूं लागला आणि या फसवणुकीनें रागावलेला सादी त्याच्यामागें लागला; आणि त्यानें त्याला ठारहि मारलें. सर्व ब्राह्मण आतां आपला सूड घेतील या भीतीनें सादी त्या देशांतून पळून गेला. ही गोष्ट कल्पित आहे हें अगदीं उघड दिसत आहे. सादीला मुळीं त्या मूर्तीचें जवळ देखील जाणें अशक्य होते; मग तिच्या मागें जाऊं देण्याची गोष्ट कशाला? शिवाय हस्तिदंताच्या मूर्ती करण्याचा प्रघातहि पूर्वी होता असें वाटत नाहीं. तथापि इतिहासकारांनीं सादीचा हा सोमनाथाचा उल्लेख ध्यानांत घेण्याजोगा आहे. कारण त्यांत महमुदानें सोमनाथावर स्वारी केली आणि तेथील प्रसिद्ध शिवमूर्ति भंगिली याचा इषाराहि या हकीकतींत नाहीं. या स्वारीचा उल्लेख व्हावयास हवा होता असे कोणासहि वाटेल. त्या उल्लेखाचें अभावामुळें महंमुदानें सोमनाथावर स्वारी केली होती या गोष्टीचे सत्यतेबद्दल कांहीं वेळां जी शंका प्रकट करण्यांत येते; तिला दुजोरा मिळतो. सादी इ. स. ११७५ मध्यें जन्मला व तो ४० वें वर्षाच्या सुमारास म्हणजे अदमासें १२१५ मध्यें हिंदुस्थानांत आला असावा. त्यानें आपलें बोस्तान ८० व्या वर्षी म्हणजे १२५५ चे सुमारास लिहिलें. या दोन्ही सालांत गुजराथ नसलें तरी दिल्ली मुसलमानांच्या ताब्यांत होती. ज्या पहिल्या लेखकानें सोमनाथच्या स्वारीचें वर्णन केलें आहे तो इब्नअसीर होय. कितीहि लवकर म्हटले तरी त्याचें पुस्तक १२७० चे सुमारास लिहिलेलें असावे. अर्थात् सादीनंतर ही हकीकत

ठरते. परंतु कांहीं झालें तरी एखाद्या गोष्टीच्या उल्लेखाचा अभाव, तो उल्लेख असणें अपरिहार्य असल्याखेरीज किंवा तो उल्लेख करणें अत्यंत आवश्यक असल्याखेरीज, पुरेसा पुरावा नाहीं. आणि म्हणून त्यावर आपल्याला अवलंबून राहून महमुदाची सोमनाथाची स्वारी काल्पनिक आहे असें आपल्याला ठरवितां येणार नाहीं. सादीनें या स्वारीचा उल्लेख केला नाहीं हें कदाचित् काकतालीय असेल.

# प्रकरण पंधरावें.

## महमुदाचा मृत्यु आणि त्याचें स्वभावर्णन.

सोमनाथची लढाई जिंकून आणि सोमनाथाचें देवालय उध्वस्त करून आपल्या पराक्रमावर कळस चढविल्यावर महमुदानें कोणतीहि महत्त्वाची स्वारी अंगावर घेतली नाहीं. कदाचित् अलक्झांडरप्रमाणें त्याला जिंकावयास पृथ्वीवर कोणताहि प्रदेश उरला नसावा. त्याच्या शेवटल्या पराक्रमाची कीर्ति बगदादेस जाऊन पोंचली तेव्हां सर्व बगदाद सोमनाथाच्या विध्वंसाची उत्कर्षवर्धक कथा ऐकून विस्मय करीत होतें. आणि खलीफानें महमुदाला 'कैफुद्दौलत् वल् इस्लाम' म्हणजे 'महंमदी धर्माचा आणि दौलतीचा रक्षक' अशी आणखी एक पदवी समर्पण केली. ( गिबन् व ईलियट् २ पान ४७४ ). खलिफानें त्याचें मुलगे मसऊद, महंमद व यूसफ यांसहि पदव्या दिल्या. याप्रमाणें महंमदी धर्माच्या अध्वर्यूनें गौरव केलेला आणि यशाच्या परमावधीस पोंचलेला महमूद कशांतहि उणेपणा न येतां या विख्यात पराक्रमानंतर सुमारें तीन वर्षांनीं हिजरी ४२० ( इ. स. १०२९ ) मध्यें ६१ व्या वर्षीं वयस्क होऊन आणि आपल्यामागें कर्तेसवर्ते मुलगे आणि अनुभवानें मुरलेले मंत्री आणि सेनापति ठेवून मृत्युवश झाला.

तहत गिबनपासून अनेक इतिहासकारांनीं महमुदाच्या चारित्र्या-

बद्दल अत्यंत गौरवपर अनेक वर्णनें केली आहेत. गिबननें म्हटलें आहे कीं, " दुर्दैवानें इतिहास ज्यांनीं खचून भरून गेला आहे, अशा रक्तपाताच्या वृत्तांतास नजरेआड करून थोडा वेळ जगांत निस्संशय अत्यंत विख्यात राजांपैकीं होऊन गेलेल्या महमुदाच्या आंगच्या सद्‌गुणांचें विवेचन करणें आल्हाददायक आहे. पौर्वात्य देशांत त्याच्या नांवाबद्दल अजूनहि आदर व्यक्त केला जातो. त्याच्या प्रजाजनांस शांतता आणि संपन्नता याचें सुख उपभोगावयास सांपडलें. त्याचे न्यायप्रियत्व आणि औदार्य यांची अनेक उदाहरणें बखरींत दिलेलीं आढळतात, महमुदाचें उत्कृष्ट चरित्र एकाच लोभाच्या दोषानें कलंकित झालेलें आहे. सदैव वाढणारी आणि कधींहि संतोष न पावणारी तृष्णा त्याच्याच ठिकाणीं पूर्ण समाधान पावली. मृत्यु समीप आला असतां इतक्या श्रमानें मिळविलेली, येवढ्या कष्टानें रक्षिलेली आणि जगाच्या नियमाप्रमाणें कायमची सोडून द्यावी लागणारी आपली सर्व संपत्ति त्यानें आपल्या पुढें पसरविली आणि डोळ्यांत चमकणाऱ्या अश्रुबिंदूंतून ती डोळेभर पाहून घेतली. एक लक्ष पायदळ, पन्नास हजार घोडेस्वार व तेरा हजार लढाऊ हत्ती इतकें आपलें विशाल सैन्य हि त्यानें शेवटचें अवलोकन केलें."

महमूद हा अतिशय विख्यात असा सेनानायक होता हें सर्वांनींच कबूल केलें आहे. लेनपूलनें त्याचें असें वर्णन केलें, आहे कीं " महमूद हा प्रसिद्ध योद्धा होता; त्याचें शौर्य अमर्याद होतें, आणि त्याचा शारीरिक आणि मानसिक उत्साह कधींहि मंदावला नाहीं." लेनपूलनें त्याच्या सुव्यवस्थित राज्यपद्धतीची व न्यायप्रियतेचीहि तारीफ करून ' महमूद हा न्यायप्रिय, विद्वानांचा चाहता, स्वभावाचा उदार आणि धर्मशील होता ' अशारीतीनें सेलजुकच्या प्रसिद्ध वजिरानें केलेल्या त्याच्या वर्णनाचा पुनरुच्चार केला आहे. ( पान ३५ ). " ज्योतिषशास्त्रविशारद अल्बेरुनी, तत्ववेत्ता अल्-

फरीबी, शिरस्तेदार अल्उत्बी, खुशमस्कऱ्या अल्बैहकी यांचे सारखें जोरदार अरबी लेखक आणि अनसूरी, फरुकी, अस्जूडी सारखे प्रभावशाली फारशी कवि व सर्वांत फारशी वाङ्मयांत होमरप्रमाणें झळकणारा फिरदोसी हे सर्व त्याचें दरबारीं येऊन राहिले होते व त्यानें त्यांना आश्रय दिला यावरून तो विद्वान लोकांचा पुरस्कर्ता किती होता हें सिद्ध होतें." अशा तऱ्हेनें महमुदाच्या मोठेपणाची योग्य ती वाखाणणी करीत असतां लेनपूलनें शेवटीं आपलें असें मत दिलें आहे कीं, " महमुदाचें राजनीतिनैपुण्य बेताचेंच होतें. त्यानें राज्यकारभाराच्या नवीन संस्था स्थापल्या नाहींत किंवा राजशासनाची नवीन पद्धति अमलांत आणली नाहीं. त्यानें जे प्रदेश जिंकले ते एकजीव करून त्यांत सुव्यवस्था उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला नाहीं. आणि यामुळेंच तो मरण पावतांच त्यानें अव्यवस्थितपणें आपल्या राज्यछत्राखालीं दाखल केलेले प्रदेश भराभर स्वतंत्र झाले. "

महमुदाविरुद्ध केलेल्या टीकांचा विचार करण्यापूर्वीं प्रसिद्ध योद्धा, निपुणसेनापति व न्यायप्रिय राजा येवढेंच नव्हे तर एक जगद्विख्यात पुरुष म्हणून आम्हांलाहि महमुदाच्या स्तुतिपर चार शब्द काढले पाहिजेत. आमचें असें ठाम मत आहे कीं, शिवाजी, हर्ष, वॉशिंग्टन, विख्यात पीटर इत्यादि, ज्यांनीं जगाच्या इतिहासांत नांव केलें आहे व ज्यांनीं राष्ट्रांच्या भवितव्यता बदलून टाकल्या आहेत अशा विधिघटनेनेंच दीर्घ कालानें उत्पन्न होणाऱ्या असाधारण कर्तृत्वाच्या थोर पुरुषांपैकीं महमूद हा एक होता. त्याची वागणूक कडक शिस्तीची होती. त्याच्या स्वाऱ्यांच्या वर्णनांत शहरें आणि देवळें लुटण्याबद्दल, कत्तलींबद्दल व पाडाव केलेल्या लोकांना गुलाम करण्याबद्दल जीं वर्णनें आहेत त्यांत त्यानें स्त्रियांस मारल्याचा किंवा त्यांच्यावर अत्याचार झाल्याचा उल्लेख सांपडत नाहीं. त्याला न्यायाचें इतकें प्रेम आणि गुन्ह्याची इतकी चीड होती कीं व्यभि-

चार करतांना त्याचा स्वतःचा मुलगा सांपडता तरी त्यानें त्याला देहांत प्रायश्चित्त दिलें असतें. आपल्या प्रजाजनांचें सुख सर्व बाजूनीं वाढावें म्हणून त्यानें खटपट केली. त्यानें चोरांवर जरब बसवून व्यापाराचें संरक्षण केलें, आणि निरनिराळ्या प्रांतांतील दळणवळणाचे मार्ग सुरक्षित केले. यामुळें खोरासान आणि लाहोर यांच्या दरम्यान व्यापारी तांडे बिनधोक व मोकळेपणानें जात असत. ( उत्बी ). त्यानें निरनिराळ्या प्रांतांवर चांगले अधिकारी नेमले आणि त्यांच्यावर असा वचक ठेवला कीं त्यांनीं प्रजेवर कधीं जुलूम केला नाहीं. निशापूर खोरासन येथें त्याचा भाऊ नझीर हा प्रांताधिपति होता. उत्बीनें त्याचें असें वर्णन केलें आहे कीं " नझीराची राज्यव्यवस्था उत्कृष्ट होती, व तो इतका दयाळु होता कीं त्यानें कधीं कोणाला कठोर शब्द वापरला नाहीं, कधीं कुणाला दुखविलें नाहीं, किंवा कधीं कोणावर अन्याय केला नाहीं. " ( पा. ४८६ ) महमूद हा गरिबांचा उत्कृष्ट वाली होता अशी जी उत्बीनें त्याची प्रशंसा केली आहे त्यांत अतिशयोक्तीचा किंवा खुशामतीचा भाग नाहीं. " त्यानें दरिद्री विधवा आणि श्रीमंत सरदार यांस सारखेंच वागविलें, त्याच्या कारकीर्दींत गर्वाचे व जुलुमाचे दरवाजे कायमचे बंद झाले होते. " " त्यानें वजनें व मापें तपासण्यासाठीं एक अधिकारी नेमला होता. बाजारांत व्यापाऱ्यांकडे जाऊन त्यांचीं वजनें व मापें ठरीव परिमाणांचीं आहेत कीं नाहींत हें पाहण्याचें काम त्याला करावें लागे. त्यानें रस्ते व्यवस्थित व मोठे केले. दुकानांची सोय केली आणि गाढवें व उंट रस्त्यांतून स्वतंत्र जाण्याची व्यवस्था केली. पूर्वीं पेठेंतील रस्ते उघडे असल्यामुळें धूळ व पाऊस यांचा पेठेंतील लोकांस मोठा उपद्रव होत असे. त्यानें बाजारांतील रस्त्याच्या दोहों बाजूंच्या घरांचीं छपरें सारखीं करवून मधील रस्ते आच्छादून टाकण्याचा हुकुम केला व दोन महिन्यांत सर्व रस्ते आच्छादले गेले. या रस्त्यां-

तून सर्व ठिकाणीं सूर्याचे किरण येऊन बाजारांत उजेड पडण्याचीहि व्यवस्था केली होती व त्यामुळें सूर्यप्रकाशाचा आनंद कोणालाहि मिळूं शके" (उत्बी पा. ४८६). "लोकांस न्याय मिळावा व लोकांच्या सुखसोईत भर पडावी म्हणून आदरसत्काराच्या व धार्मिक देणग्यांत तो वर्षाकांठीं जवळजवळ एक लाख दिनार खर्चीत असे" (सदर). या वरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, प्रजारंजन तत्परता हें राजाचें कर्तव्य आहे ही जाणीव महमुदाच्या ठिकाणीं जिवंत होती.

महमूद हा खरा कर्तव्योत्सुक असा मुसलमान होता, हें सांगावयास नकोच. आपल्या धर्माच्या ठिकाणीं त्याची पूर्ण श्रद्धा होती. आणीबाणीच्या वेळीं लढाईच्या पूर्वीं आणि नंतर तो ईश्वराची प्रार्थना करी. "धर्मनिष्ठांच्या सहाय्याला देव तत्पर आहे" या कुराणांतील वचनावर त्याची श्रद्धा होती. इतर बाबी प्रमाणें या बाबींतहि शिवाजींत व महमुदांत साम्य आहे. शिवाजीचीहि आपल्या धर्मावर व आपल्या पवित्र कार्यावर अढळ निष्ठा होती. आणि संकटाच्या वेळीं तोहि आपल्या इष्ट देवतेची सहाय्य व मार्गदर्शन मिळण्यासाठीं आराधना करीत असे. त्या दोघांच्याहि बाबतींत अशा प्रार्थना आपल्या अनुयायांचा उत्साह व विश्वास वाढविण्यासाठीं केल्या असण्याचा संभव नाहीं असें नाहीं; परंतु बहुधा त्या श्रद्धेमुळेंच करण्यांत येत असाव्यात. शिवाजी ज्याप्रमाणें संकटसमयीं भवानीची प्रार्थना करून समाधींत देवीचे उत्साहवर्धक व मार्गदर्शक शब्द बोले त्याच प्रमाणें महंमद कुराणावरून आपले शकुन पाही. आमची अशी खातरी आहे कीं दोघेहि या गोष्टी छद्मानें करीत नसून देवावरील अढळ श्रद्धेनें व उत्कट धार्मिक भावनेमुळें करीत. मात्र शिवाजीच्या मनोरचनेंत हा फरक होता कीं त्याची आपल्या धर्मावर कितीहि श्रद्धा असली तरी दुसऱ्यांच्या धर्माबद्दल त्याच्या ठिकाणीं सहिष्णुता

होती. महमुदानें धर्मोत्साहाच्या भरांत मूर्तींचा विध्वंस केला आणि मूर्तिपूजकांचा निष्ठुरतेनें नाश केला. परंतु शिवाजीनें मशिदी व फकीर यांचें रक्षणहि केलें व त्यांचा आदरहि ठेविला. आमच्या मतें महमुदाच्या अंगचा मोठा दोष म्हणजे त्याचें इतर धर्मांबद्दल असहिष्णु असलेलें धर्मवेड होय. इतर प्रत्येक बाबतींत तो अकबरापेक्षां श्रेष्ठ होता, परंतु या बाबतींत मात्र आमच्या मतें त्याला अकबराची सर नाहीं. महमूद हा स्वभावानें क्रूर नव्हता. दोनतीन शतकांनंतर चंगीझ किंवा तैमूर यांनीं आशियांत किंवा त्याहिनंतर दक्षिणेंतील मुसलमान राजांनीं हिंदुस्थानांत जशा निरपराध व असहाय माणसांच्या निर्दयपणें कत्तली केल्या तशा त्यानें केल्या नाहींत.

आतां स्वभाव-दोषाचा विचार करतां महमुदाचा लोभ फारच अतिशयोक्तीनें वर्णिला जातो अशी आमची समजूत आहे. दुसऱ्या कोणत्याहि माणसास इतिहासांत जमवितां आली नाहीं इतकी संपत्ति त्यानें जमविली यामुळेंच तो लोभी असावा अशी लोकांची समजूत असावी. मृत्युसमयीं आपली अगणित संपत्ति पाहून आणि आतां ती आपल्याला कायमची मुकणार हें मनांत येऊन तो रडला ही गोष्ट बहुधा कल्पनानिर्मित असावी व ती खोडसाळपणानें प्रसृत करण्यांत आली असावी. तो इतका धर्मनिष्ठ होता कीं माणसाला अपरिहार्य असलेल्या मरणाबद्दल तो रडला असेल हें संभवत नाहीं. शिवाय त्याला मुलगेहि होते; आणि मनुष्याची मनोदुर्बलता आपला धनसंग्रह आपल्या मागें मुलाच्या स्वाधीन करावयास हौशीनें आणि आनंदानें तयार असते. अगणित संपत्तीचे वारस होणारे ( मिळविणारे नव्हे ) राजे जसे मुक्त हस्तानें खर्च करितात तसा तो खर्चिक नव्हता यांत संशय नाहीं. परंतु सेलजुकच्या वजिरानें म्हटल्याप्रमाणें तो उदार होता यांतहि तिळमात्र संशय नाहीं. समकालीन वजिराचें हें उद्गार मागाहून प्रसिद्ध झालेल्या गोष्टींपेक्षां अधिक विश्वसनीय आहेत.

विद्वज्जनांना उत्तेजन देण्यासाठीं दरवर्षी तो पुष्कळ द्रव्य खर्च करी. त्यानें एक पाठशाळा स्थापन केली होती. तिला मोठ्या देणग्या दिल्या होत्या. तींत पगारी अध्यापक नेमले होते. पूर्वीच सांगितल्याप्रमाणें (पान ४६६) त्यानें बांधलेल्या जागीं मशिदीच्या शेजारीं या पाठशाळेंतील विद्यार्थ्यांस सरकारी खर्चानें राहण्यासवरण्याची व्यवस्था ठेविली जात असे. फिरदोशीला त्यानें दर हजार कवितांस हजार सोन्याचे दिनार द्यावयाचें कबूल केलें असतां ६०००० कवितांचें शहानामा काव्य तयार झाल्यावर त्यास महमुदानें सोन्याचे दिनार न देतां रुप्याचे दिले अशी जी गोष्ट सांगण्यांत येते त्या गोष्टींत जरी महमुदावर लोभाचा जो आरोप करण्यांत येतो त्या आरोपाची उत्पत्ति नसली तरी त्या गोष्टीनेंच बहुधा या आरोपाला दृढता आली असावी. ही गोष्टहि कालान्तरानें नवी रचण्यांत आली असावी. कारण फिरदोसीच्या परंपरेनें चालत आलेल्या चरित्रकथांतील बराचसा भाग अर्वाचीन विद्वानांनीं अग्राह्य ठरविला आहे." (एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका). आमच्या मतें तर या प्रचलित गोष्टीनें महमुदाऐवजी फिरदोसीचेच लोभ व क्रोध हे विकार स्पष्ट दिसून येतात. कसेंहि असो, या विद्याप्रिय राजानें वाङ्मयाच्या अभिवृद्धीसाठीं आणि इराणच्या पुराण इतिहासाचें संरक्षण व्हावें म्हणून विद्वज्जनांस जें उत्तेजन दिलें त्याची या गोष्टीवरूनच साक्ष पटते. फिरदोसी हा शिया असतां व कदाचित् पाखंडी असतांहि अग्निपूजक इराणचा इतिहास चिरस्थायी करण्याकरितां हें काव्य लिहिण्याचें काम कट्टया मुसलमान महंमुदानें त्यालाच सांगितलें. यावरून महमुदाची वाङ्ममयावरील भक्ति कशी निर्हेतुक होती हें दिसून येतें. "महमूद स्वतः सुन्नी व कडवा मुसलमान असतांहि त्यानें आरबी संस्थांची आबळ करून फारशी वाङ्मयाला व विद्येला मदत करून त्यांचें संवर्धन केलें (सदर). याप्रमाणें

ज्ञान आणि विद्वत्ता यांचे ठिकाणीं महमुदाचे जसें निर्हेतुक प्रेम होतें तसें अकबराचें नव्हतें. या बाबतींत अकबराहून महमूद हा श्रेष्ठ दिसतो. अकबरानें संस्कृत विद्येला उत्तेजन दिलें खरें परंतु तो कट्टा मुसलमान नव्हता. इराणाचा पौराणिक इतिहास लिहिण्याचें सामानी राजांनीं सुरू केलेलें काम पुरें करण्यास त्याच्या कवीस महमुदानें सांगितलें होतें. परंतु फारशी कवींचें निवासस्थान जें खोरासान त्यांतील तूस गांवांत जन्म पावलेला फिरदोसी हा आपल्या अद्भुत काव्यशक्तीनें आणि इराणच्या प्राचीन कथांच्या माहितीनें तें काम करण्यास अत्यंत पात्र आहे असें दिसून आल्याबरोबर त्यानें तें काम फिरदोसीस सांगितलें. अलबिरूनीला त्यानें जें साहाय्य केलें त्यावरून तर संस्कृत वाङ्मय,तत्त्वज्ञान व शास्त्रीय ज्ञान यांविरुद्धहि त्याचा आक्षेप नव्हता असें स्पष्ट दिसून येतें. अलबिरूनी व फिरदोसी सारख्या असाधारण बुद्धिमत्तेच्या अनेक पंडितांनीं, कवींनीं व तत्त्ववेत्त्यांनी त्याचा दरबार उज्वल करून प्राचीन काळच्या विक्रमादित्याप्रमाणें किंवा अर्वाचीन काळच्या अकबराप्रमाणें महमुदाची कीर्ति अजरामर केली आहे. या कारणांमुळें महमुदावर जो लोभिष्टपणाचा सर्वप्रचलित आरोप करण्यांत येतो, त्यांत फारसें तथ्य आहे असें आम्हाला वाटत नाहीं.

**टिप्पणी.** तबकात--इ नासिरी मधलि महमुदाचें गुणवर्णन.

महंमुदानें आपल्या वीर्य, शौर्य, धैर्य, शहाणपणा, दूरदृष्टि, विवेकयुक्त सल्लामसलत व परिणामकारक उपाययोजना या गुणांनीं पूर्वदिशेला फार मोठा प्रांत जिंकून तेथें मुसलमानीराज्याचा विस्तार केला. खुरासान, ख्वारिझम, तबरिस्तान, इराक, निमरोज व फार्स हे प्रान्त व घोर व तुख्वरिस्थानचा डोंगराळ मुलुख हे सर्व त्याच्या अंमलात आले होते व त्यावर त्याचे अंमलदार अंमल करीत होते. तुर्कस्थानच्या मलिकांनीं त्याचें मांडलिकत्व कबूल केलें होतें. त्यानें जिहून ( ऑक्सस ) नदीवर पूल बांधला, व तुराणावर स्वारी केली. तुर्कस्थानच्या खाकानांनीं

त्याच्या तळावर येऊन त्याचें सम्राटत्व मान्य केलें त्याच्या विनंतीवर महमुदानें सेलजुकच्या मुलाला आपले सर्व भाऊबंद व आश्रित यांस घेऊन जिहून उतरून खुरासानमध्यें जाण्याची परवानगी दिली. त्या काळचे दूरदृष्टिचे लोकांना ही परवानगी देतांना महंमुदानें मोठी चूक केली असे वाटलें, कारण महंमदाच्या मुलाबाळांस यांत धोका आहे हें त्यांच्या ध्यानीं आलें होतें. पा. ८६.

## महमुदाचें राजनीतिनिपुणत्व.

महमूद हा राजनीतिनिपुण राजा नव्हता असें जें लेनपूलनें त्याचे बद्दल म्हटलें आहें त्याला कांहीं आधार आहे असें आम्हांस वाटत नाहीं. तो मृत्यु पावतांच त्याचें साम्राज्य ढासळूं लागलें तें तो राजनीतिनिपुण नव्हता म्हणून नव्हे. त्याचीं कारणें अगदीं निराळीं आहेत. महमुदानें राज्यकारभाराची एखादी नवीन पद्धति सुरू केली किंवा नाहीं, अथवा त्यानें हस्तगत केलेले प्रांत निगडित करून सुसंघटित करण्याचा प्रयत्न केला किंवा नाहीं, हेंच अगोदर खात्रीलायक सांगतां यावयाचें नाहीं. हें म्हणणें सिद्ध करण्यास किंवा तें खोडून टाकण्यास कोणताहि लेखी पुरावा नाहीं. अकबराचे कारकीर्दीचे सविस्तर वर्णन अबुलफझलनें आपल्या ऐने-अकबरींत लिहून ठेवलें आहें. परंतु महमुदानें आपल्या साम्राज्याचा कारभार कसा चालविला याचें वर्णन करणारा ग्रंथकार कोणी झाला नाहीं. तथापि त्याचें राज्य सुसंघटित व सुव्यवस्थित होतें याबद्दल संशय नाहीं. उत्बीनें असा उल्लेख केला आहे कीं गझनीस त्याच्या स्वाऱ्यांची हकीकतहि लिहून ठेवली जात असे आणि महमूद स्वतः लढाईच्या धामधुमींतहि आपल्या हालचालीच्या हकीकती (Dispatches) लिहून बाबराप्रमाणें घरीं पाठवीत असे. लढाईच्या धुमश्चक्रींत व लुटीच्या धांदलींतहि मथुरेच्या देवालयाच्या सौंदर्याची प्रशंसा करणारा त्यानें मथुरेहून पाठविलेल्या एका वर्णनांतील एक

पूर्वोल्लिखित उतारा उत्बीनें दिला आहे. निरनिराळ्या प्रांतांचे व त्यांच्या जमाखर्चाचे तक्ते ठेवण्यांत येत असत; व प्रांताधिपतींवर तपासणी करण्यासाठीं एक स्वतंत्र प्रधान नेमलेला असून त्याची कचेरी व्यवस्थितपणें काम करीत असे. बैहकीनें दिलेल्या ऐकीव गोष्टींवरूनहि असें स्पष्ट दिसून येतें कीं, त्याच्या राज्यकारभारांत सुयंत्रितता होती. तेव्हां त्याच्या राज्यकारभाराची पद्धति कशी होती हें आपणांस माहित नसलें तरी ती सुव्यवस्थित होती यांत संशय नाहीं. ती पद्धति नवीनच होती कीं पूर्वीं गझनीचा ज्या सामानी साम्राज्यांत अंतर्भाव होत होता त्या सामानी साम्राज्याच्या राज्यपद्धतीचें तींत अनुकरण केलें होतें हें सांगतां येण्याजोगें नाहीं. आणि जुन्याच पद्धतीचें महंमुदानें काळजीपूर्वक व सूक्ष्मपणें अनुकरण केलें, असें असलें, तरी त्यांत त्याची मुत्सद्देगिरीच दिसून येते. शिवाजीनें सुद्धां आपल्या स्वराज्याच्या व हिंदुपदपातशाहीच्या नव्या भावनेला आवश्यक असे अनेक फेरफार केले तरी बव्हंशानें विजापुरकरांची जुनीच राज्यपद्धति कायम ठेविली होती. अकबराची राज्यपद्धति नवीन आणि अपूर्व होती हें खरें; परंतु वंश व धर्म यांनीं भिन्न असलेल्या विस्तृत अशा साम्राज्यावर त्याला राज्य करावयाचें होतें आणि त्यांतील निरानिराळे प्रांत जमीन, हवापाणी आणि जनता या सर्व बाबतींत एकमेकांपासून अत्यंत भिन्न होते.

आतां लष्करी व्यवस्थे संबंधें पाहतां अकबर किंवा शिवाजी यांनीं आपल्या लष्कराची व्यवस्था कशी केली होती हें इतिहासांत प्रसिद्ध आहे, परंतु या बाबतींत महमुदाची व्यवस्था कशी होती याची माहिती उपलब्ध नाहीं. तथापि त्याच्या लष्कराची संघटना सुसंबद्ध व सुदृढ असावी; कारण कनोज किंवा सोमनाथासारख्या दूरच्या प्रदेशांत, नद्या, पर्वत, व वाळवंटें यांतून नेण्यासारखीं व तटबंदीवर मारा करण्याजोगी उत्कृष्ट साधनें व यंत्रें त्याच्या सैन्यांत

होतीं हें निर्विवाद आहे. गार्डस अथवा रक्षक यांच्या पथकांची त्यानें केलेली रचना फक्त त्याच्याच सैन्यांत दिसून येते. आपल्या लोकांतून निवडून काढलेल्या या उत्कृष्ट ५००० शरीर-रक्षकांचा (बॉडी गार्डचा) महंमुदानें ऐन वेळीं योग्य उपयोग करून घेऊन नेहमीं लढाईंत यश संपादन केलें हें प्रसिद्ध आहे.

तेव्हां महमुदानें आपल्या राज्यकारभारांत नवीन पद्धति सुरू केली नाहीं किंवा आपल्या प्रांतांना सुसंघटित व एकजीव करण्याचा प्रयत्न केला नाहीं असें म्हणण्यास कांहीं एक कारण दिसत नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याची मुलकी व लष्करी व्यवस्था सुयंत्र व सुदृढ होती असेंच म्हणणें जरूर आहे. त्याचें साम्राज्य तो मरण पावतांच विस्कळलें यांचें कारण आमच्या मतें असें आहे कीं त्याच्यामागून त्याच्या गादीवर आलेले राजे राज्यकारभार करण्यास आणि सैन्याचें नेतृत्व स्वीकारण्यास नालायक होते. सर्वच अनियंत्रित राज्यपद्धतींचा हा प्रमुख दोष आहे. मोंगल वंशाप्रमाणें मनानें आणि शरिरानें तेजस्वी असे एकामागून एक झालेले राजे क्वचितच दृष्टोत्पत्तीस येतात. त्या घराण्यांत मात्र बाबरापासून अवरंगजेबापर्यंत अनुक्रमानें सहा सम्राट् कर्तृत्वानें व सामर्थ्यानें विख्यात असे होऊन गेले. शिवाजीहि महंमदाप्रमाणेंच आपल्या वारसाच्या बाबतींत अभागी होता. आणि अठराव्या शतकांत मराठी राज्याची जी भरभराट झाली ती पेशव्यांच्या प्रभावानें झाली. त्यांच्या चार पिढ्या सारख्याच जोमाच्या झाल्या आणि ते सर्वच प्रसिद्ध मुत्सद्दी व सेनापतिहि होते. ब्रिटिश साम्राज्याची बळकटीहि त्यांच्या राज्यव्यवस्थेचा चांगुलपणा नसून वर इंग्लंडांतील शासनपद्धतीच्या असाधारणपणावर अवलंबून आहे. इंग्लंडांत अनियंत्रित राज्यपद्धति तर नाहींच, पण तेथील राज्यकारभार राजा, उमराव व लोकप्रतिनिधि यांचे हातांत असल्यामुळें जुलमी व विषयासक्त राजे राज्यावर येणें

आणि नालायख व महत्वाकांक्षी गव्हर्नर किंवा गव्हर्नरजनरल हिंदुस्थानांत राज्य करण्यास येणें अशक्य आहे. कायदे निर्दोष नसले किंबहुना चांगले नसले तरी चालतील. राज्याची बळकटी व भरभराट कायद्यांचा पूर्ण अंमल करण्यावर अवलंबून असते. इंग्लंडांतील राज्यपद्धतींत कायद्यांची अंमलबजावणी शिथिल होणार नाहीं, अशी काळजी घेतलेली असल्यामुळें कर्तृत्ववान शास्त्यांचीं व सेनानायकांची अव्यावहत परंपरा चालू आहे. अनियंत्रित राज्यपद्धतींत अनेक राजानां केवळ जन्मामुळें अमर्याद राजसत्तेचा वारसा प्राप्त होत असल्यामुळें ते चैनी निपजतात आणि सामर्थ्यहीन झाल्यामुळें त्यानां महत्वाकांक्षी सेनानायकांस अगर प्रांताधिकाऱ्यांस आपल्या कह्यांत ठेवतां न आल्यामुळें निरनिराळे प्रांत राज्यांतून फुटून बाहेर पडतात व शेवटीं राजघराणेंहि नष्ट होतें. आणखी मर्यादित राजसत्तेंत व लोकसत्तेंत राष्ट्रीय भावनेचें संवर्धन होतें व त्यामुळें राज्याची किंवा साम्राज्याची शक्ति दृढ होते. कारण मध्येंच एखादा प्रांताधिकारी किंवा सेनापति महत्वाकांक्षी निघाला तरी जोमदार राष्ट्रीय भावनेमुळें प्रजा अथवा सैन्य त्यास मदत करण्यास पुढें येत नाहीं. सारांश महमुदाच्या साम्राज्याचे त्याच्या निधनानंतर जे तुकडे तुकडे झाले, ते त्याच्या राज्यपद्धतीच्या सदोषतेमुळें नसून तिच्या अनियंत्रिततेमुळें झाले. अनियंत्रित राज्यपद्धतींत कर्तृत्ववान राजांची व लायक आणि महत्वाकांक्षाविन्मुख प्रांताधिकाऱ्यांची परंपरा राहणें कठिण असतें. त्याचप्रमाणें महत्वाकांक्षी प्रान्ताधिकाऱ्यांस स्वतंत्र गादी स्थापणें अशक्य करणारी लोकांच्या हृदयांतील राष्ट्रीय भावना त्यावेळीं उद्भूत झाली नव्हती हें हि त्याच्या साम्राज्याच्या विलयाचें कारण आहे. त्याचें साम्राज्य त्याच्या पश्चात् विस्कळित झालें यावरून महमूद हा मुत्सद्दी अथवा राज्यकार्यधुरंधर नव्हता असें ठरत नाहीं.

## टिप्पणी—महमूद किंवा शिवाजी लुटारू होता काय ?

व्हिन्सेन्ट स्मिथ यांनीं लिहिलेल्या ऑक्स्फर्ड हिस्टरी ऑफ इंडिया या ग्रंथांत महमुदाबद्दल सर्वांत अधिक निंदास्पद विधान केलेलें आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, " हिंदुस्थानच्या बाबतींत तरी महमूद हा केवळ लुटारू होता. त्याच्या लुटारूपणाचें प्रमाण प्रचंड होतें येवढेंच. पंजाब व्यतिरिक्त इतर प्रदेश त्यानें कायमचा जिंकण्याचा प्रयत्न केला नाहीं आणि अमोलिक वस्तु व चिरस्मरणीय देवालयें यांच्या विध्वंसापलीकडे त्याच्या स्वाऱ्यांचा परिणाम कांहींएक झाला नाहीं. " शिवाजीप्रमाणेंच महमुदानें हिंदुस्थानांत लुटीसाठीं केलेल्या स्वाऱ्या इतक्या अनेक आणि यशस्वी होत्या कीं कोणाचेंहि लक्ष स्वाभाविकपणेंच या लुटींवर वेधून जातें व शिवाजी काय किंवा महमूद काय प्रख्यात चोर, यशस्वी लुटारू, होता अशा दृष्टीनें त्यांच्याकडे पाहण्याची प्रवृत्ति होते. अनेक इतिहासकारांनीं महमुदाबद्दल अशाच दृष्टीनें लिहिलें आहे व त्यानें केवळ लुटालूट केली, कोणताहि प्रांत कायमचा काबीज केला नाहीं असें म्हणून त्याची किम्मत कमी लेखिली आहे. परंतु एखादा प्रांत हस्तगत करून राज्यविस्तार करणें हें लुटारूपणापेक्षां कमी निंद्य आहे काय ? आमच्या मतें तर राज्य खालसा केल्यानें दुसऱ्यांच्या स्थावर मालमत्तेचा व विशेषतः त्यांना अत्यंत मौल्यवान् वाटणाऱ्या त्यांच्या जमिनीचा अपहार करण्यांत येतो. आणि राज्य खालसा करितांना जरी जिंकलेला प्रदेश कायमचा काबीज होऊन त्यांत व्यवस्थित राज्य सुरू होतें तरी त्यानें नवीन सुखावह राज्यपद्धति अमलांत येते असें नाहीं. मुसलमानी राज्यपद्धति हिंदु राज्यपद्धतीपेक्षां अधिक चांगली कधींच नव्हती आणि तशी ती होऊंहि शकली नसती. आणि कोणतेंहि परराज्य स्वराज्यापेक्षां केव्हांहि वाईटच. कारण त्यामुळें प्रजाजनांची व्यवस्थित व कायदेशीर लूट मात्र सतत चालू होते. परकी राज्यांत अपरिहार्य जबर करबंदी झाल्यानें प्रजाजनांच्या संरक्षणास आवश्यक असलेल्या करांपेक्षां अधिक कर—वसूल होऊं लागल्यानें केवळ व्यवस्थित तऱ्हेनें लूट चालू होते असें म्हटलें पाहिजे. महमुदानें हिंदुस्थानचा कोणताहि प्रांत आपल्या राज्यांत

सामील करण्याचा किंवा कायमचा काबीज करण्याचा प्रयत्न केला नाहीं, असें म्हटलें तर खरोखरच महमुदास उच्च कोटींत नेऊन बसवावा लागेल. कारण त्यानें दुसऱ्यांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याची किंवा त्यांच्यावर परराज्याचें जूं लादण्याची हांव धरली नाहीं असें म्हणावें लागेल. परंतु हें अलौकिक यश त्याच्यागाठीं बांधतां येण्याजोगें नाहीं. कारण सामान्य राजांप्रमाणेंच त्यानें हिंदु राजांचे प्रांत खालसा करून आपल्या राज्यांत सामील करण्याचा शक्य तो प्रयत्न केला हें आपणांस दिसून येतें. ब्रिटिशांनीं ज्याप्रमाणें मुंबई, मद्रास व कलकत्ता या आपल्या केंद्रांतून राज्यविस्तार केला त्याप्रमाणेंच एखाद्या चाणाक्ष मुत्सद्याप्रमाणें किंवा राजनीतिनिपुणाप्रमाणें गझनीभोंवताली क्रमाक्रमानें आपल्या राज्याचा विस्तार करीत महमुदानें आपलें साम्राज्य कसें उभारलें तें पाहूं या.

सुरुवातीस तो झबुलिस्तानचा म्हणजे गझनीच्या भोंवतालच्या प्रांताचा राजा होता. हा प्रांत एका काळीं रजपूतांच्या ताब्यांत होता. त्यांपासून तो त्यानें घेतला. तो सामानी सम्राटांच्या वतीनें खोरासानचा प्रांताधिकारीहि होता. ऑक्झसच्या पलीकडील तुर्की टोळ्यांच्या स्वाऱ्यांनीं सामानी साम्राज्य जेव्हां खिळखिळें करून बुडविलें तेव्हां त्यानें खोरासान आपल्या राज्यांत सामील करून घेतलें; व इलेक्‌खान् तुर्काला सामानी साम्राज्यांतील ऑक्झस पलीकडील उत्तरेचा प्रांत म्हणजे मवरुन्नहर काबीज करू दिलें. याप्रमाणें या दोघां प्रबळ राजांनीं एकमेकांची सोय करून घेतली. पुढें इंग्रजांप्रमाणेंच क्रमाक्रमानें महमुदानें झाबुलिस्तानच्या पूर्व बाजूस व खोरासानच्या पश्चिम बाजूस आपल्या राज्याचा विस्तार केला. हेंहि पुनः त्यानें घाईनें एकदम केलें नाहीं. महमुदानें किंवा त्याच्या बापानें अगोदर काबुलिस्तान हस्तगत केलें; नंतर हल्लींच्या वायव्य सरहद्दी प्रांताचा खालचा भाग बन्नु व त्या लगतचा प्रदेश यांवर आपला अंमल बसविला व शेंवटीं उत्तरेकडचा भाग पेशावर व वहिंद हे आपले करून घेतले. आपल्याला हें माहितच आहे कीं हे तिन्ही प्रांत काबूलचा शाही वंशाचा ब्राह्मण राजा जयपाल याचे होते. जयपाल सर्व पंजाबावरहि राज्य करीत असे. इंग्रजांनीं ज्याप्रमाणें दक्षिणेंत मुंबईत बसून पेशव्यांचे हातून वसई वगैरे एकामागून एक जिल्हे आपल्या राज्यांत सामील

केले त्याप्रमाणेंच महमुदानें जयपालाचा एक एक प्रांत हस्तगत करण्याची युक्ति केली, त्यास एकदम निराश करून टाकलें नाहीं. बाजीरावाप्रमाणें आनंदपालाकडे सिंधूच्या पश्चिमेकडील सर्व राज्य गेल्यानंतर पंजाबचा प्रांत शिल्लक ठेवण्यांत आला होता. त्याच्याकडून त्या प्रांताबद्दल खंडणी घेण्यांत येत असे. अखेरीस अपरिहार्य असणारा शेवटचा घाव त्यावर पडला आणि बाजीराव व आनंदपाल या दोघांचींहि राज्यें नाहींशीं झालीं व तीं विजयी सत्तांनीं आपल्या राज्यांत सामील करून टाकलीं. महमुदाच्या पूर्वेकडील साम्राज्यांतील अत्यंत मोठा प्रांत जो पंजाब त्याचा अपवादानें उल्लेख करण्यांत व्हिन्सेन्ट स्मिथनें महमुदानें आपल्या निरनिराळ्या स्वाऱ्यांत मोठमोठे प्रांत कसे काबीज केले व आपल्या राज्याचा विस्तार केला याची कबुलीच दिली आहे.

इतकेंच नाहीं; जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांस जबरीनें बाटवून व मुसलमान करून आपल्या साम्राज्याचें दृढीकरण करण्याचाहि महमुदानें प्रयत्न केला. राज्याच्या एकीकरणास त्या राज्यांतील लोकांच्या धर्मभावना एकच असणें कसें जरूर आहे हें महमुदानें ओळखलें होतें. त्यानें उत्तरेस घोर प्रांतात व अफगणिस्तानच्या ईशान्य भागांत स्वात व बिजौर या प्रांतांतील लोकांस बाटविण्याचा पद्धतशीर प्रयत्न पण सुरू केला. पण सिंधूनदीच्या पश्चिमेकडील भागात जितक्या जोरानें हा उपक्रम करण्यांत आला तितक्या जोरानें तो पूर्वभागांत झाला नाहीं. पंजाबांत बाटविण्याच्या उपक्रमाचा जोम फार दिवस टिकला नाहीं. तरी सुद्धां पंजाबांत विशेषतः पश्चिमभागांत बहुतेक लोकांस सक्तीनें मुसलमान करण्यांत आलें आणि आजमितीलाहि या सक्तीच्या धर्मत्यागाचें परिणाम स्पष्ट दिसत आहेत. हिंदूंच्या दृष्टीनें ही फार मोठी आपत्ति होती. परंतु मुसलमान राजा या नात्यानें आपल्या राज्यालगतच्या व आपल्या अंमलाखालीं आलेल्या प्रांतांतलि लोकांस बाटविण्यांत महमुदाचे राजकीय धोरण दिसून येतें यांत संशय नाहीं. *

---

*सर्व लोकांस मुसलमान केल्यास पंजाबांतील पूर्वीचे हिंदु लोक मुसमानांच्या बरोबरीचें हक्क मागतील व बंडहि करतील तेव्हां सर्वांस न बाट-

याविरुद्ध असा आक्षेप काढितां येण्याजोगा आहे कीं, महमुदाच्या शेवटच्या स्वाऱ्या, म्हणजे मथुरा, कनोज व सोमनाथ यांवरील स्वाऱ्या केवळ लुटीसाठीं केलेल्या होत्या; राज्यविस्ताराची किंवा जिंकलेला प्रदेश कायमचा आपल्या अंमलाखालीं आणण्याची महमुदाची त्या स्वाऱ्यांत तरी इच्छा नव्हती. परंतु हें म्हणणें देखील सत्याला धरून नाहीं. अंतर्वेदी, औध अगर गुजराथसारखे दूर अंतरावरचे प्रदेश एकाएकीं राज्यांत सामील करून टाकतां येणें किंवा त्यांवर कायमचा अंमल बसविणें शक्य नव्हते. सुरुवातीस खंडणी अथवा कांहीं लाग वसूल करणें व शेंवटीं दरम्यानचा प्रांत सर्वस्वी पचून गेल्यानंतर पुढचा आपल्या राज्यांत सामील करून ठराविक पद्धतीनें क्रमाक्रमानेंच राज्यविस्तार करणें अवश्य होतें. याच पद्धतीनें इंग्रजांनीं बंगाल, त्यानंतर बिहार, त्यानंतर औध व शेवटीं पंजाब कायमचे आपले केले. कनोजचा राज्यपाल हा प्रथम महमुदाच्या हातून निसटला तेव्हां महमुदानें पुनः औधवर स्वारी केली, बारी हस्तगत केली आणि शेवटीं राज्यपालाला खंडणी देण्यास भाग पडलें हें ध्यानांत धरलें पाहिजे. कनोजच्या राज्यानें ही खंडणी गझनीस अनेक वर्षें पावेतो दिली असावी. कारण कोरीव लेखांत आपल्याला असा पुरावा सांपडतो कीं सर्व कनोज राज्यांत जमीन महसुलाबरोबरच हा खंडणीचा कर सर्व प्रजेकडून वसूल करण्यांत येत असे. विद्वान् लोकांस या वेळच्या ताम्रशासनांतील "तुरुष्कदंड" या शब्दाचें ( तुर्कांसाठीं वसूल केलेला कर याचें ) इंगित लक्षांत आलें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. या कालांतील कनोज प्रांतांतील कोरीव लेखांतच तुरुष्कदंडाचा उल्लेख आढळतो. त्रिलोचनपालाच्या झुशी येथील १०२६इ.च्या शिलालेखांत तुरुष्कदंडाचा उल्लेख नाहीं. परंतु या नंतरच्या कोरीव लेखांतील उल्लेखांवरून गाहडवाल राजे देखील त्यांचा गझनीच्या राज्यांशीं कोणताहि संबंध नसतां हा कर वसूल करीत असत असें दिसून येतें. बेजबाबदार राजे एकदां सुरू झालेला व फार वर्षें वसूल होत असलेला कर त्याचें प्रयोजन नाहींसें झाल्यावरहि वसूल करतात हें

---

वितां अर्ध्यांसच बाटवावें व अशा तऱ्हेनें दुही कायम राखावी म्हणून महमुदानें निम्मे लोकांसच मुसलमान केलें असावें काय ?

स्वाभाविक आहे. ते तो क्वचितच बंद करणार. असो, या तुरुष्कदंडावरून मराठ्यांच्या चौथेची आठवण होते. चौथ वसूल करण्यासाठीं मोंगलांच्या राज्यांत मराठ्यांनीं आपल्या अधिकाऱ्यांची व्यवस्थित योजना केली होती, त्याचप्रमाणें तुर्की सैनिक व अधिकारी हा दंड वसूल करण्यासाठीं कनोजच्या राज्यांत राहिले असण्याचा संभव आहे. व याच तुर्कांस भोजानें अथवा कर्णानें हांकून लाविलें असावें असें आम्हीं यांच्या वृत्तान्तांत दाखविलें आहे. तुरुष्कदंडाचा उल्लेख फक्त कनोज राज्याच्या प्रांतांतलि दानलेखांतच आहे. तो चेदी किंवा बंगाल प्रांतांतलि कोणत्याहि दानलेखांत नाहीं; त्याचप्रमाणें परमार किंवा सोलंखी राजांच्या ताब्यांतील मुलुखांतील म्हणजे माळवा व गुजराथ प्रांतांतील कोरीव लेखांत कोठेंहि त्याचा उल्लेख नाहीं, याची आम्ही खात्री करून घेतली आहे. यावरून असें निर्विवाद दिसून येतें कीं, महमूदानें कनोजवर कायमची खंडणी बसविली होती. इंग्रजांनीं एकोणिसाव्या शतकांत ज्याप्रमाणें आपलें धोरण अबाधित राखलें त्याप्रमाणें महमुदानंतर त्याच्या गादीवर आलेल्या राजांनीं जर त्याचें धोरण जोमानें पुढें चालविलें असतें तर कांहीं कालानें कनोज त्यांच्या राज्यांत सहज सामील होऊन गेले असतें. सोमनाथाची स्वारी देखील कधीं काळीं सफल होणाऱ्या राज्य-विस्ताराच्या इच्छेनेंच महमुदानें केली होती. अशा तऱ्हेच्या स्वाऱ्या केवळ लुटीसाठीं केलेल्या असल्या तरी त्यांनीं शेजारच्या राज्यांची शक्ति ढांसळते व शेवटीं राज्य-विस्ताराचा मार्ग मोकळा होतो. या कारणांनीं महमूद हा केवळ लुटारू होता, त्याला राज्य-विस्ताराची इच्छा नव्हती अशी त्याच्या बद्दल कल्पना करून घेणें इतिहासकारास शक्य नाहीं. त्यानें काबूलापासून लाहोरपर्यंतचें सर्व विस्तृत शाही राज्य आपल्या राज्यांत सामील करून टाकलें. तें काय थोडें होतें? हें स्पष्ट दिसत असतां महमुदाला राज्य-विस्ताराची कल्पना नव्हती असें म्हणणें हें मानवी स्वभाव व प्रत्यक्ष इतिहास या दोहोंच्याहि विरुद्ध आहे.

परंतु राज्य-विस्ताराचा कोणताहि हेतु मनांत न धरितां केवळ लुटीसाठीं म्हणून महमुदानें हिंदुस्थानांत स्वाऱ्या केल्या असें धरून चाललें तरी पुष्कळ इतिहासकारांनीं महमुदाचे जे डाकू, लुटारू म्हणून वर्णन केलें

आहे तें योग्य होईल काय ? हाहि प्रश्न विचारार्ह आहे. अशा तऱ्हेच्या चुकीच्या वर्णनानें अयथार्थ कल्पनांचा प्रादुर्भाव होतो व त्यामुळें कसे अनर्थकारक परिणाम होतात हें विस्तारानें सांगण्याची अवश्यकता नाहीं. आणि म्हणून इतिहासांत वापरावयाचे शब्द अधिक काळजीनें वापरले पाहिजेत व ऐतिहासिक व्यक्तींचें वर्णन वस्तुस्थितीला धरून केलें पाहिजे. इतिहासांत दोन प्रसिद्ध पुरुषाच्या बाबतींत या प्रकारचा फार मोठा अन्याय झाला आहे. महमूद व शिवाजी यांचें बहुधा दरोडेखोर किंवा लुटारू असें वर्णन बहुशा करण्यांत येतें. त्यांनीं लुटीसाठीं केलेल्या अनेक स्वाऱ्या; त्यांत त्यांस सदैव मिळालेला विजय आणि त्यामुळें त्यांना प्राप्त झालेली अमर्याद संपत्ति यामुळें वाचकांचे डोळे दिपावतात व त्यांस हें वर्णन खरें वाटूं लागतें. पण आपण हें विसरतों कीं महमूद आणि शिवाजी यांस वास्तविकपणें दरोडेखोर किंवा लुटारू म्हणणें योग्य नाहीं. आणि या शब्दांनीं जेव्हां त्यांचें वर्णन केलें जातें तेव्हां या शब्दांनीं जो नैतिक अधःपात सूचित होतो तो वगळूनच ते शब्द समजले पाहिजेत. खून आणि दरोडे हे कायद्यानेंच नव्हेत तर नैतिक दृष्टीनेंहि गर्हणीय आहेत हें विसरतां कामा नये. ' अलेक्झांडर व दरोडेखोर ' यांची गोष्ट विनोदपूर्ण आहे परंतु तिनें प्रस्थापित होणारे तत्व मात्र चुकीचें आहे. दरोडेखोर हा आपल्याच देशबांधवांची संपत्ति बळजबरीनें लुटतो तर अलेक्झांडर आपल्या शत्रूंचा प्रदेश लुटीत होता आणि तो दरोडेखोराप्रमाणें नीति-दृष्ट्या दोषी नव्हता. एखाद्या व्यक्तीनें प्रजा होऊन एखाद्या सरकारची सत्ता कबूल करणें म्हणजे कोणत्याहि प्रसंगीं आपल्या मनगटाच्या शक्तीचा उपयोग न करितां आपल्या फिर्यादींची दाद सरकारच्या मार्फत लावून कोणाचीहि वस्तु कायदेशीर रीतीनें घेईन, अन्य रीतीनें घेणार नाहीं असें मान्य करणें आहे. व आपल्या अशक्त शेजाऱ्याची स्थावर किंवा जंगम मिळकत त्याच्या स्वतःच्या संमतीशिवाय किंवा कायद्याच्या मार्गाखेरीज आपण हिरावून घेणार नाहीं, किंवा केवळ संरक्षणाच्या कायदेशीर प्रसंगाखेरीज दुसऱ्यास इजा करणार नाहीं, असा करार तो करितो; यामुळें ती व्यक्ति जेव्हां आपल्या प्रजाबन्धूंचा जीव अथवा मालमत्ता अन्यायानें हरण करिते तेव्हां ती खून किंवा दरोडा हा गुन्हा करिते आणि तिनें केलेला गुन्हा

कायद्याप्रमाणेंच नव्हे, नीति-दृष्ट्याहि मानलेला असतो. स्वतंत्र देशांचें किंवा राष्ट्रांचें संबंध या प्रमाणें व्यक्त किंवा अव्यक्त कबुलीवर अजून रचले गेले नाहींत. राष्ट्रांच्या व्यवहारांत पाशवी शक्तीचा किंवा मात्स्य-न्याय सर्व इतिहासभर चालत आलेला दिसतो. या मात्स्यन्यायानें, म्हणजे मोठ्या राष्ट्रानें लहान राष्ट्रावर केव्हांहि व कोणत्याहि कारणासाठीं झडप घालावी आणि त्याचा प्रदेश व संपत्ति यांचा अपहार करावा ही जी अनिष्ट परंपरा सुरू होते ती गेल्या युरोपीय महायुद्धानें सर्व राष्ट्रांच्या नजरेस स्पष्टपणें आल्यानें राष्ट्रसंघाची व्यवस्था अमलांत आली आहे व यापुढें अशक्त राष्ट्रास स्वतंत्र राहण्याचा हक्क आहे हे मान्य होईल. पण मागील काळांत परंपरागत रूढीनें व लोकांच्या सामान्य समजुतीप्रमाणें प्रत्येक बलिष्ठ राष्ट्राला बलहीन राष्ट्रावर स्वारी करून त्याचा प्रदेश व त्याची संपत्ति हिरावून घेण्याचा निर्विवाद हक्क असे. जरी एखादी अपवादक व्यक्ति मी बलाचा उपयोग दुसऱ्याचे राज्य हरण करण्यास करणार नाहीं अशा उच्च तत्वाची इतिहासांत सांपडेल. ‘नेशे बलस्येति चरेदधर्मम्’ या महाभारतोक्त महान् तत्वाप्रमाणें चालणारी एखादी ‘मेरीया थेरेस्सा’ पोलंडवर स्वारी करणार नाहीं. किंवा एखादा अशोक कालिंग जिंकतांना लाख मनुष्यें मारलेली पाहून तीव्र पश्चात्ताप होऊन मी यापुढें युद्ध करणार नाहीं, अशी प्रतिज्ञा करणारा राजा मिळेल. पण या अपवादानें सामान्य नियम अधिक सिद्ध होतो आणि इतिहासांत बलिष्ठ राष्ट्रें अशक्तास गिळंकृत करतानांच नेहमीं दिसतात. भारतीय दिग्विजय तरी याच तत्वावर झाले. युद्धमान राष्ट्रास लुटीचा हक्क तर पूर्वीपासून सर्वत्र मानला गेला आहे. गेल्या महायुद्धांत जर्मनीनें फ्रान्सास लुटलेलें आपण पाहिलें आहे. अशा लुटीमुळें दुर्बळ राष्ट्राची बचावाची ताकद कमी होते व प्रबल राष्ट्राची चढाईची शक्ति वाढते हें लक्षांत लिहिलें नाहीं. इंग्लंडनें ही गोष्ट कैक वेळां केली आहे. इंग्लंड व स्पेन यांचे दरम्यान युद्ध चालू असतां ड्रेक व हॉकिन्स यांनीं अमेरिकेहून सोनें भरून येणारीं स्पेनचीं जहाजें कित्येक वेळां लुटलीं आहेत. युद्धाची सबब नसतांहि ड्रेकनें चिली व पेरूचीं शहरें लुटलीं, परंतु इंग्रजी इतिहासकारांनीं त्याच्या या कृत्यावरून त्यास दरोडेखोर म्हणून संबोधिलें नाहीं. हिंदुस्थानच्या

इतिहासांत इंग्रजांनीं पाँडीचरीस फ्रेंचांस लुटलें आणि १८५७ च्या बंडांत लढाईस उभे राहून वेढ्यांत पडलेलें झांशी शहर हस्तगत झालें, तेव्हां तेथील नागरिकांची कत्तल करून तें शहर लुटण्यांत आलें. पण असें असूनहि हीं इंग्रजींचीं कृत्यें खून आणि दरोडे आहेत असें त्यांचें कायद्याच्या किंवा नीतिशास्त्राचे दृष्टीनेंहि वर्णन करितां येणार नाहीं किंवा त्यांचा अधिक्षेप करितां येणार नाहीं. महमुदानें किंवा शिवाजीनें आपल्या प्रजांस तर कधींच लुटलें नाहीं, हें ध्यानांत ठेवले पाहिजे. चोऱ्या करणाऱ्यांस त्यानें नेहमीं शासन केले आहे. शिवाजीला राजा या नात्यानें आपण करावयाच्या कर्तव्याची जाणीव इतकी जागृत होती कीं जेव्हां जेव्हां त्याच्या प्रजाजनास त्याचे किंवा शत्रूचेहि सैनिक लुटीत तेव्हां तेव्हां तो त्यांच्या नुकसानीबद्दल भरपाई करून देत असे. तात्पर्य शिवाजी किंवा महमूद यांचा इतिहासांत लुटारू किंवा दरोडेखोर म्हणून जेव्हां उल्लेख करण्यांत येतो तेव्हां त्या शब्दांचा जो स्वाभाविक निंदाव्यंजक अर्थ तो कधींहि आभिप्रेत नसतो हें पूर्णपणें ध्यानांत वागविलें पाहिजे. हे ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं शिवाजीनें स्वराज्य स्थापनेच्या उच्च उद्देशानेंहि खून कधींच केला नाहीं किंवा तो करण्यास कोणास प्रवृत्त केलें नाहीं * आणि शिवाजीनें मोगल किंवा विजापुर राज्यांतील श्रीमंत शहरें लुटलीं तीं त्या राज्यांशीं त्याचें युद्ध असतां व आपण स्वतंत्र राजे आहों अशी स्पष्ट वा प्रत्यक्ष राजसत्ता धारण केल्यावर लुटलीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. अशा रीतीचा लुटण्याचा हक्क वर सांगितल्या-

---

* चंद्रराव मोरे याचा खून शिवाजीनें करविला अशी समजूत कित्येकांची व यदुनाथ सरकारचीहि आहे. पण ती चुकीची आहे. शिवाजीनें जावळीवर स्वारी केली तेव्हां मुख्य चंद्रराव मोरे हा दत्तक आलेला अज्ञान होता व तो रायगडला निसटून गेला हें आतां सिद्ध झालें आहे. त्याचप्रमाणें त्याचा दत्तक देणारा बाप लढाईंत मारला गेला. प्रस्तुत स्थलीं ह्या विषयाचा ज्यास्त ऊहापोह न करितां चंद्रराव मोरे आणि शिवाजी हा मराठींत निबंध आम्ही लिहिला आहे. तो वाचण्याची वाचकांस शिफारस करतो.

प्रमाणें युद्धमान राष्ट्रे (Belligerents ) यांनीं नेहमीं चालविला आहे.

सारांश महमूद किंवा शिवाजी यांचे नेहमींच्या अर्थानें दरोडेखोर म्हणून वर्णन करणें ऐतिहासिक व तत्वज्ञानाच्याहि दृष्टीनें चुकीचें आहे. त्यांचीं कृत्यें राजा या नात्यानें दुसऱ्या राजाशीं प्रत्यक्ष युद्ध करीत असतां झालेलीं आहेत. अर्थात् त्यांस सामान्य कायद्याचीं किंवा नीतीचीं तत्वें लावतां येत नाहींत. राष्ट्राराष्ट्राचें व्यवहार प्राच्य देशांत व पाश्चात्य देशांत ज्या तत्त्वावर होतात, त्या तत्वानें बलिष्ट राष्ट्राचा क्षुल्लक कारणानें किंवा कारण नसतांहि बलहीन राष्ट्रावर स्वारी करण्याचा अधिकार मान्य केला आहे आणि जित राष्ट्रास लुटण्याचा त्यानें अधिकार नेहमींच चालविला आहे. हजारो लोकांस महमुदानें जबरदस्तीनें बाटाविलें हें कृत्य प्रत्येक मनुष्यास ईश्वराची भक्ति युक्त वाटेल त्या रीतीनें करण्याचा हक्क आहे त्या हक्कास बाध आणणारें असल्यानें निंद्य आहे. हिंदूंचीं देवळें किंवा मूर्ति फोडणें हें महमुदाचें कृत्यहि मानुष्यकाच्या उच्च दृष्टीनें रानटी धर्मवेडाचें म्हणून निःसंशय निंद्य आहे. पण एकाराजानें दुसऱ्या राजाविरुद्ध युद्धांत केलेलें कृत्य कायदा किंवा नीति यांच्या दृष्टीनें दूष्यम्हणतां येत नाहीं. आणि जरी या कृत्यांत कित्येक संस्मरणीय उत्तम वस्तूंचा नाश झाला तरी महमुदास सुद्धां शिवाजीची दरोडेखोर संज्ञा लावितां येणार नाहीं असें मत नमुद करणें आम्हास भाग आहे.

# प्रकरण सोळावें.

## पंजाब-काबूलचा उच्छेद-भासणारीं कारणें.

सिंधचा उच्छेद महंमद कासमच्या नेतृत्वाखालीं अरबांनीं केला. (इ. स. ७१२), पंजाबचा उच्छेद महमुदाच्या नेतृत्वाखालीं तुर्कांनीं केला (१००९), आणि उत्तर हिंदुस्थानचा उच्छेद महंमद घोरीच्या नेतृत्वाखालीं अफगाणांनीं केला ( ११९३ १२०० ), या प्रत्येक उच्छेदाचीं कारणें एकच नव्हती म्हणजे वस्तुतः फारच निरनिराळीं होती. भाग १ मध्यें आम्ही सिंधच्या ऊच्छेदाच्या कारणांचा विचार केला. आणि आपल्यास असें दिसलें कीं, सिंधचा उच्छेद मुख्यतः चचच्या कांहीं मांडलिक राजांच्या फितुरीपणामुळें आणि बौद्ध लोकांच्या मनोदौर्बल्यामुळें झाला. त्यावेळीं जसें सिंधवर एका ब्राह्मणाचें राज्य होते,त्याचप्रमाणें यावेळीं पंजाबवर एक ब्राह्मण राजा राज्य करीत होता. परंतु दाहर आणि आनंदपाल हे दोघेहि रजपुतांच्या शौर्यानें लढले. हीं दोन्ही ब्राह्मण राजकुलें आचरणानें क्षत्रियच होती, आणि प्राचीन काळापासून म्हणजे महाभारतयुद्धांत लढणाऱ्या द्रोणापासून अलीकडच्या पेशव्यापर्यंत ब्राह्मण राजे व सरदार क्षत्रियांइतकेंच शौर्यानें लढत आले आहेत. किंबहुना उत्तर हिंदुस्थानांतील पांडे वगैरे ब्राह्मण शिपाई इतर शिपायाप्रमाणेंच ब्रिटिश फौजेंत शूरत्वानें लढलें. दैवी चमत्कारानें जो अपघात दाहरवर येऊन पडला. तोच आनंदपाल याजवर त्यांच्या अत्यंत जोरानें चालविलेल्या युद्धांत येऊन पडला आणि जसा दाहरचा हत्ती रणांगण सोडून पळाला तसा आनंदपालाचाहि पळाला. दाहरचा हत्ती तर मुळींच न थांबता एका सरोवरांत जाऊन पडला, आणि त्यानें

आपला ताप पाण्यानें शमन करीत असतां, दाहरला तलावांत फेंकून दिलें. पण असले अपघात प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत घडतात. ते उच्छेदाचें खरे हेतु मानतां येत नाहींत. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें या जगताच्या घडामोडींत सर्वव्यापी आणि सर्वांवर ताबा करणारा दैवाचा धागा चाललाच आहे. यासाठीं कारणांची ऐतिहासिक मीमांसा करितांना दैवास विचारांतून वगळलें पाहिजे. सिंधच्या आणि पंजाबच्या परिस्थितींत वरील दोन गोष्टी एकच असल्या तरी पंजाबच्या उच्छेदाची खरीं कारणें सिंधच्या उच्छेदाच्या कारणांहून भिन्न आहेत. कोणी हिंदु राजानें किंवा सरदारानें दगलबाजी केली असें पजाबच्या इतिहासांत आपल्यास आढळत नाहीं. कदाचित् मुसलमान इतिहासकार उत्बी हा महमुदाचा चिटणीस असल्यानें त्यास सर्व गुह्ये ठाऊक असूनहि याचा उल्लेख त्यानें आपल्या बखरींत मुद्दाम केला नसावा. तथापि ज्याअर्थी सिंधचे मुसलमान इतिहासकार सुद्धां हिंदूंच्या फितुरी गोष्टी लिहितात त्याअर्थी असा उल्लेख पंजाबच्या इतिहासांत नसल्यानें, पंजाबच्या उच्छेदाच्या कारणांत राजद्रोहाचा समावेश करितां येणार नाहीं, असें म्हणण्यांस हरकत नाहीं. त्याचप्रमाणें पंजाबमध्यें धर्मभेद नव्हता अर्थात् त्यापासून उत्पन्न होणारें मनोदौर्बल्यहि नव्हतें. दुसऱ्या भागाच्या शेवटल्या प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें हिंदुस्थानांत यावेळीं सर्वत्र एकच धर्म म्हणजे हिंदुधर्म नांदत होता. आणि वैष्णव आणि शैव या मतांच्या भांडणानें हिंदुधर्माची जी त्रिस्थळीं धांदल पुढें उडाली, तीहि भांडणें यावेळीं नव्हती त्या भागांत सांगितल्याप्रमाणें देशांत एकच धर्म असल्याची जी अत्यंत सुखी अवस्था ती यावेळीं हिंदुस्थाना भोगीत होता. कारण बौद्धधर्म यावेळीं नष्ट झाला होता आणि मुसलमानी धर्म अद्याप दूर होता. दुसऱ्या अनेक बाबतींत या दहाव्या शतकांत भारतदेश सुखीं होता. व सामर्थ्य आणि उत्कर्ष यांच्या परमावधीस पोहोंचला होता. अर्थात् डोंगराच्या शिखरावर पोहोंचलें म्हणजे

जसा पुढें उतारच लागतो त्याप्रमाणें हिंदुस्थानाच्या वैभवास निसर्ग-नियमानेंच उतार लागला. हा उतार कोणत्या रस्त्यांनी लागला हें सांगण्याचें काम इतिहासकारांचें आहे.

या उताराची निरनिराळ्या ग्रंथकारांनीं निरनिराळीं कारणें सांगितलीं आहेत. आणि लोकहि निरनिराळी कारणें समजतात. परंतु हीं कारणें पंजाबांत बहुतेक मुळींच नव्हती, किंवा तीं खरीं कारणें होऊं शकत नाहींत, असें आमचें मत आहे. उदाहरणार्थ लेनपूल म्हणतो, " एकी आणि भांडणें, उत्तर आणि दक्षिण, वंश आणि हवापाणी या बाबतींत दोन्हीकडे विरोध असून, त्यांत आणखी मुसलमानांचा धार्मिक उत्साह आणि लुटारूंचा लोभ यांची भर पडली" फ्रेंच इतिहासकार सचाऊ म्हणतो कीं, "उत्तरहिंदुस्थानचे राजे इतके अदूरदृष्टि होते कीं, त्यांस भावी संकट दिसलें नाहीं, आणि ते एक झालें नाहींत ( अल्बेरूनीच्या भाषांतराची प्रस्तावना पहा ). सरदेसाई यांचें मत असें आहे कीं, " हिंदुस्थानांत लहान लहान राज्यें असून तीं एकमेकांत नेहमीं भांडत असतात, हें महमुदानें जाणलें. शिवाय त्याजजवळ मोठी फौज असून तिचा खर्च चालविणें, व तिचा कोठेंतरी उपयोग करणें त्यास प्राप्त होतें".पण हीं निरनिराळीं मतें साधार नाहींत असें आम्हांस वाटतें तें कसें याचा आपण विस्तारपूर्वक विचार करूं.

हिंदुस्थानांतील हिंदु राजांना भावीसंकटाची कल्पना नव्हती. आणि त्यांनीं एकीनें विरोध केला नाहीं, ही कल्पना मुळांतच अवास्तव आहे व ही गोष्ट मुसलमानांनींच लिहिलेल्या इतिहासावरून दिसते. हिंदुस्थानच्या सरहद्दीवर एक नवा भयप्रद धर्म येऊन थडकला,आणि त्यानें इ. स. ७१२ मध्यें सिंध खाल्ला, त्यावेळींच मेवाड आणि सांबर यांतील पहिल्या रजपूत वीरांच्या नेतृत्वाखाली, ( भाग दोन पान ८ यांत दाखविल्याप्रमाणें) हिंदूंनीं अरब लोकांस जोराचा

प्रतिकार केला, आणि त्यांचा पूर्वेकडील आक्रम कायमचा बंद केला. तीनशें वर्षांनंतर तुर्क लोक नव्या धर्मांतराच्या धर्मवेडानें प्रोत्साहित होऊन गझनी येथें येऊन स्थिर बसले व तेथून हिंदूस त्रास देण्यास आणि त्यांच्या देवळांचा विध्वंस करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. पण याहि पूर्वीं सुमारें ६० वर्षे भावी संकटाचा अनुभव हिंदू लोकांस आला. कारण **याकूब-ई-लेस** यानें जेव्हां जाबुलिस्थान घेतलें, तेव्हां त्याच्या अधिकाऱ्यानें सखावंद या शहरांतील एक प्रसिद्ध हिंदु देवालय पाडून टाकिलें, आणि काबूलचा ब्राह्मणशाही राजा कमलु या धर्मोच्छेदक कृत्यानें चकित झाला ( ईलि २ पा. १७२ ). तात्पर्य हिंदु राजांना बऱ्याच वर्षांच्या अनुभवानें भावी संकटाची कल्पना पूर्वींच आली होती. आणि त्यांनीं तीनदां एकत्र होऊन महमुदाच्या सैन्यापेक्षां मोठीं सैन्यें त्याच्या विरुद्ध जमविली. पण तिन्ही नामोहरम झालीं. तेव्हां हिंदु राजे संकटाज्ञानांत घोरत पडले होते, आणि त्यांनीं एकी केली नाहीं ही कल्पना ऐतिह्याच्या विरुद्ध आहे.

याहि पुढें जाऊन असें म्हणतां येतें कीं, हिंदुराजांनीं एकवटून लढण्याची अवश्यकताच नव्हती. हिंदुराज्यें यावेळीं लहान होतीं ही कल्पना अवास्तव आहे. पंजाब व काबूल मिळून शाही राज्य सबुक्तगीनाच्या किंवा खुद्द महमुदाच्या प्रारंभींच्या लहान गझनी राज्यापेक्षां कितीतरी मोठें होतें ! शाहीराज्य जर योग्य तयारींत असतें तर त्या एकटया राज्यास गझनीचा विध्वंस करण्यास शक्य झालें असतें. याहिपेक्षां कनोजचें राज्य विस्तीर्ण आणि सामर्थ्यवान् होतें. किंबहुना आरब प्रवाशांनींच लिहून ठेविलें आहे कीं, कनोजच्या राज्यांत चार फौजा नेहमीं जय्यत चार दिशास असत. आणि त्या इतक्या सामर्थ्यवान् होत्या कीं, त्यास मुलतान घेऊन सिंधमधून अरबांस हांकून देतां आले असतें. चंदेल्ल राजा धंग याचें राज्यहि कांहीं लहान नव्हतें आणि कनोजचा राजा राज्यपाल याचा प्रसिद्ध

भोज याच्या तुलनेनें त्याचा जरी अगदीं अधःपात झाला होता तरी कालंजर व ग्वालेर किल्ल्यांचा राजा धंग इतका शूर व शक्तिमान् होता कीं, त्यानें एकट्यानें महमुदाचा नाश केला असता. तात्पर्य महमुदाचेंच राज्य यावेळीं लहान होतें, आणि त्याचीच फौज यावेळीं थोडी होती याची जाणीव पुष्कळांस नाहीं. त्याची फौजहि एकाच जातीची व लोकांची नव्हती. तींतील शिपायी तुर्क, अफगाण, कुर्द, आणि पर्शियन अशा जातीचें असून या लोकांत आपसांत भांडणें नेहमीचीं असत. तात्पर्य महमूद एकाच जातीचें असंख्य लोक घेऊन जांगिसखान किंवा तैमूर लंग जसा सात किंवा चार लाख मोगल स्वार घेऊन वावटळीप्रमाणें अशियाखंडांत कास्पियन समुद्रापासून सिंधुनदापर्यंत देश उध्वस्त करीत व पांचशें वर्षांतहि दुरुस्त होणार नाहीं, इतका नाश पांच वर्षांत करीत आला, तसा आला नव्हता. महमुदाची फौज जयपालाच्या फौजेच्या मानानें पहिल्या मोठ्या लढाईंत लहानच होती. किंबहुना ती आनंदपालाच्या दुसऱ्या लढाईंतील फौजेच्या मानानेंहि लहान होती, असें मुसलमानी इतिहासावरून दिसतें. तीहि हिंदुफौजेपेक्षां जास्त एकजीवाची होती व तेणेंकरून एकी आणि भांडणें यांचा विरोध लेनपूलनें म्हटल्याप्रमाणें दोन्ही पक्षांत होता असें मानतां येत नाहीं. त्याचप्रमाणें उत्तर आणि दक्षिण हाहि विरोध नव्हता. किंबहुना काबूलच गझनीच्या उत्तरेस आहे आणि काबूलच्या जयपालाचे शिपाई अद्याप न बाटलेले असे अफगाणच होते. आणि हे न बाटलेले अफगाण मुसलमान झालेल्या अफगाणापेक्षां कमी शूर होते असें मानतां येणार नाहीं. तुर्क आणि आर्य असा वंशभेद असला तरीहि दोन्ही फौजांच्या युद्धसामर्थ्यांत कांहीं फरक पडतो असें आम्हांस वाटत नाहीं. उत्तरेकडील रानटी लोक, तुर्क व अफगाण, पंजाब आणि राजपुताना यांतील आर्यांपेक्षां जास्त शूर व कष्ट सोसणारे अशी एक भ्रांत साधारण समजूत दिसते. अब-

दालीच्या अफगाणांनीं पानिपतच्या लढाईंत मराठ्यांचा जो पराभव केला, त्याचें एक कारण अशा प्रकारचा वंशभेद होता हे संभवनीय आहे. मराठ्यांपेक्षां अफगाण शरीरबलानें, शूरत्वानें आणि क्रौर्यानें अधिक आहेत ही गोष्ट आमच्या मतें कबूल केली पाहिजे. पण सिंधूनदीपलीकडील तुर्क व अफगाण आणि पंजाब व राजपुताना यांतील आर्य यांच्यांत अशा प्रकारचा फरक पूर्वीं होता किंवा हल्लीं आहे, असें इतिहासावरून किंवा हल्लीच्या परिस्थितीवरून दिसत नाहीं. पंजाबचे जाट व रजपूत, मग ते शीख, हिंदु किंवा मुसलमान असोत, हिंदुस्थानांतीलच नव्हे तर सर्व जगांतील उत्तम शिपायांत गणले जातात. आणि हे जाट व रजपूत महमुदाच्या काळीं सर्वच हिंदु होते. ब्रिटिश हिंदी सैन्याच्या भरतीचा मुख्य प्रदेश हल्लीहि पंजाब आहे. अमृतसर गॅझेटियरमध्यें म्हटलें आहे कीं (पान ३३), "मांझा प्रदेशांतील शीख जाटांत असे लोक सांपडतात कीं, ते जगतांतील कोणत्याहि देशांत मानवी जातीचे उत्तम नमुने म्हणून मानले जातील." राजपुतान्यांतील रजपुतांविषयीं म्हणावें तर, तुर्क व अफगाण, मोगल व पर्शियन यांच्याशीं झालेल्या अनेक लढायांत त्यांनीं आपलें नांव गाजविलें आहे. जसवंतसिंगाच्या राठोडांनीं अवरंगजेबाच्या वेळीं कित्येक वर्षे अफगाणिस्तानावर ताबा चालविला आहे. तात्पर्य शारीरिक सामर्थ्य आणि शौर्य यांच्या बाबतींत जयपाल आणि आनंदपाल यांचे शिपाई महमुदाच्या तुर्क व अफगाणापेक्षां हीन होते असें कधींहि म्हणतां येणार नाहीं.

पंजाबच्या उच्छेदाची कारणमीमांसा स्पष्टपणें न करितां सर व्हिन्सेन्ट स्मिथनें पुढील वाक्यांत कांहीं कारणें सूचित केलीं आहेत. "धर्म, सामाजिक रीति, कल्पना आणि लढाईची तऱ्हा या बाबतींत अगदीं नवीन असलेली एक परकी शक्ति हिंदुस्थानच्या रंगावर या वेळीं अवतीर्ण झाली." ह्या वाक्याचा विचार करितां प्रथम

हें मान्य केलें पाहिजे कीं, शस्त्रास्त्रांचें वैशिष्ट्य आणि फौज चालविण्याच्या विशेष रीति हें एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावर वर्चस्व स्थापित होण्यास महत्त्वाचें साधन आहे. शस्त्र आणि शिस्त यांत ब्रिटिश फौज हिंदुफौजेपेक्षां अधिक सुधारली असल्याकारणानें ब्रिटनपुढें हिंदुस्थान केव्हांहि पडणारच होतें. परंतु यावेळीं मुसलमानांच्या बाजूस हें कारण अनुकूल खचित नव्हतें. महमुदानें तोफांचा उपयोग केला या फिरिस्ताच्या म्हणण्यांत अॅनक्रॉनिझम् ( कालवैपरीत्य) आहे. अशाच तऱ्हेनें तो महमुदाविरुद्ध लढण्यास दिल्ली व अजमीर येथील राजे आले होते असा कालविपरीत निर्देश करितो. ज्याप्रमाणें दिल्ली व अजमीर या राजधान्या महमुदाच्या वेळीं अस्तित्वांतच नव्हत्या, तशा तोफाहि नव्हत्या. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकामध्यें "गनपौडर" ( बंदुकीची दारू ) या शब्दाखालीं जी माहिती दिली आहे, त्यावरून पुढील विधानें करितां येतात. ( १ ) बंदुकीच्या दारूचा शोध एका जर्मनानें इ. स. १३४५ मध्यें लाविला किंवा राजर बेकननें इ. स. १२२५ मध्यें लाविला असें मानतात. ( २ ) या दारूची माहिती प्राचीन ग्रीक, हिंदु किंवा अरब लोकांस नव्हती. त्यास बभकणारी वस्तु उत्पन्न करण्याची एक रीत माहीत होती, व ते तिचा उपयोग लढाईंत करीत. पण ( एक्सप्लोजिव्ह ) स्फोटक मिश्रणाची त्यांस माहिती नव्हती आणि बंदुका किंवा तोफा त्यांजजवळ नव्हत्या. ( ३ ) हिंदुस्थानांत स्फोटक दारूचीं शस्त्रें उपयोगांत आणल्याचा पहिला दाखला इतिहासांत पानिपतच्या लढाईंत बाबरनें केल्याचा आढळतो. ( ४ ) पश्चिमेकडेहि तोफांचा प्रथम उपयोग क्रूझेडमध्यें इ. स. १०२८ पासून इ. स. १२०० पर्यंत आढळत नाहीं. यावरून आपल्यास असें खात्रीनें म्हणतां येतें कीं, महमुदाजवळ अग्न्यस्त्रें नव्हतीं आणि हिंदूप्रमाणेंच त्याचीहि भिस्त साध्या शस्त्रांवर, तलवारी, बर्च्या आणि भाले यांवरच होती. मुसलमान

बखरकार या शस्त्रांचींच वर्णनें काव्ययुक्त करितात ( इली. २ ), हें उत्बी व बैहकी यांच्या लेखांवरून दिसून येतें. किंबहुना शस्त्रांचें वर्चस्व जर असेल, तर तें हिंदूंच्या बाजूसच होतें. असें स्पष्ट दिसतें कीं, हिंदूंना उत्तम पोलाद करण्याची कला अवगत होती. दिल्ली येथील लोहस्तंभ कसा बनविला याचें अलीकडील शास्त्रज्ञांस गूढच आहे. हवा, पर्जन्य खाऊनहि तो मुळींच गंजत नाहीं, अशा बनावटीचें लोकांस आश्चर्य वाटतें. महमुदाचे शिपाई हिंदुस्थानच्या तरवारीस फार चहात. उत्बीनें काव्यमय वर्णन करतांना एका तुर्की शिपायाच्या तलवारीकडून " मी उत्तम कुळांतील एक हिंदु आहे " असें वदविलें आहे (पान २१६). अर्थात् येथें हिंदुस्थानांत केलेल्या तलवारींचें पोलाद जास्त चांगलें असें या गोष्टीकडे इशारा आहे. आपल्यास असेंहि दिसून येतें कीं, रणभूमीवरील लुटींत मारल्या गेलेल्या हिंदु शिपायांच्या तरवारी व इतर हत्यारें यांकडे मुसलमानांचें विशेष लक्ष असे. ( पंजाबांत काला-बाग येथें अद्याप लोखंड निघतें आणि भेरा व निजामाबाद या शहरांची तेथें तयार होत असलेल्या उत्तम तरवारीबद्दल अद्याप ख्याति आहे. या तरवारींचे नमुने लाहोरच्या म्युझियममध्यें पाहण्यास सांपडतात ). फौजेच्या शिस्तीचें मुसलमानाकडे वैशिष्ट्य होतें आणि हल्लींच्याप्रमाणें कवाइती पायदळ फलटणा होत्या, असें आम्हांस वाटत नाहीं. घोडे मुसलमानाकडे अधिक चांगले असतील; कारण अफगाणिस्थान व पर्शिया ह्या देशांत चांगले घोडे निपजतात हें राजशेखरानेंहि लिहिलें आहे. पण राजपुतान्यांतहि निपजलेले घोडे वाईट नसतात; आणि अरबस्थान व पर्शिया येथील घोड्यांची आयात त्या वेळींहि पुष्कळ असे. कनोजचे प्रतिहार सम्राट् राजपुतान्यांतील मूळचे असल्यानें, आपल्या घोडदळाबद्दल प्रसिद्ध होते. आणि त्यामुळेंच त्यांस हयपति ही संज्ञा होती, हें आपण पाहिलेंच आहे. या-

शिवाय हिंदूकडे सैन्याचें एक जबरदस्त अंग अधिक होतें. मुसलमानाकडे हत्ती मुळींच नसून हिंदूकडेसच ते होते. पुढच्या काळांत तुर्कांनांहि ह्या अंगाचा लोभ उत्पन्न झाला व त्यांनीं तें वाढविलें. कारण सबुक्-तगीन व महमूद यांनीं काश्गारच्या तुर्कांविरुद्ध हत्ती उपयोगांत आणल्याचा आणि फायदेशीर रीतीनें आणल्याचा दाखला आपल्यास सांपडतो (उत्बी). सांगण्यास चमत्कार वाटतो कीं, महमुदाच्या तुर्कांविरुद्ध हिंदूंस हत्तींचा उपयोग फायदेशीर रीतीनें करतां आला नाहीं; पण महमुदास त्याच हत्तींचा उपयोग इलेक्-खानाच्या तुर्कांविरुद्ध फार परिणामकारक रीतीनें करतां आला. ही गोष्ट महमुदाच्या उत्कृष्ट सैनापत्याची व हिंदु सेनापतींच्या कमी कौशल्याची साक्ष पटविण्यास पुरे आहे. महमुदानें हें हिंदु सैन्याचें अंग कसें निरुपद्रवी केलें, याचें वर्णन मुसलमानी ग्रंथकार करीत नाहींत. अलेक्-झांडरनें पोरसचें गजसैन्य कसें नामोहरम केलें, याचें वर्णन ग्रीक इतिहासकार देतात. हेंहि आणखी सांगितलें पाहिजे कीं, सबुक्-तगीन व महमूद यानीं हत्तींचा उपयोग आपल्या सैन्यांत करूं लागल्यावरहि हत्तींचे महात हिंदूच असत. गझनी येथें पुढील एका राजाच्या वेळीं हत्तींचे हिंदु महात आपल्या कामांत गाफिल राहिल्यामुळें त्यांस जबर शिक्षा केल्याचा दाखला इतिहासांत मिळतो (बैहकी). हल्लीं ही कला हिंदूंमधून नष्ट झाली असून हत्तींचे सर्व महात हल्लीं मुसलमानच असतात ही चमत्कारिक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे (इली. २ पा. १४३).

वरील सर्व हकीकतीवरून तुर्कांची लढण्याची पद्धति कशी निराळीं होतीं हें दिसून येत नाहीं. मात्र तुर्क जिंकलेल्यांना जास्त निर्दयतेनें वागवीत हा फरक दिसतो. सर्व जगतांतील लोकांत हिंदुलोक जिंकलेल्या लोकांना अत्यंत सदयतेनें वागवीत असें इतिहास निःसंशय सांगतो. महमुदाचे तुर्क जशी लढवय्ये लोकांची बहुधा

कत्तल करीत तशी कत्तल हिंदूंनीं कधींहि केली नाहीं. महमूद क्रूर नव्हता असें जें आम्ही पूर्वी म्हटलें आहे, तें इतर मुसलमान जेत्यांच्या तुलनेनें, विशेषतः मोगल जंगीजखान किंवा तैमूर यांच्या तुलनेनें म्हटलें आहे. हिंदु जेत्यांच्या तुलनेनें पाहिलें असतां, महमुदाची पद्धत हिंदुस्थानच्या अधिक सदय लोकांच्या अन्तःकरणांत धडकी भरविणारीच होती. लढणारे लोक बहुधा कत्तल केले जात, निरपराधी लोक गुलाम केले जाऊन दूर देशीं पाठविले जात आणि गांव व शहरें उध्वस्त केली जात. युरोपांतहि प्राचीन व हल्लींच्या काळींसुद्धां हिंदु कालांतील लढायांपेक्षां जास्त क्रूरतेनें युद्धें होतात असें म्हणावें लागतें. ग्रीक व रोमन लोक तर जिंकलेल्या लोकांशीं फारच क्रूरतेनें वागत आणि कत्तल व गुलामगिरी हे लढाईतील पराजयाबरोबरचे नेहमींचेच परिणाम असत. या दृष्टीनें पाहतां महमुदाची लढाईची पद्धत नवीन होती. परंतु पंजाबाच्या उच्छेदाचें कारण हें मानतां येणार नाहीं. कारण हिंदु फौजा प्रथम कां जिंकल्या गेल्या याची आपण मीमांसा करीत आहों; कदाचित् एका लढाईंत जिंकल्या गेल्यानंतर जो परिणाम हिंदूंस भोगावा लागला, त्यानें पुढील लढायांत हिंदु शिपायांचें मनोधैर्य खचणें शक्य आहे.

तुर्कांच्या व हिंदूंच्या राजकीय कल्पना एकाच तऱ्हेच्या होत्या. प्रातिनिधिक संस्थांची फार प्राचीन काळीं कदाचित् हिंदूंना कल्पना असेल. पण या वेळीं दोघांनाहि प्रातिनिधिक राज्यपद्धति, लोकांचे हक्क किंवा राजांचा जबाबदाऱ्या यांची कल्पनाच नव्हती. त्यांना एकच राज्यपद्धति ठाऊक होती, ती अनियंत्रित राजसत्ताक होय. अर्वाचीन काळांत राष्ट्र अथवा लोक यांची जी कल्पना उत्पन्न झाली आहे, त्याचा त्यांस गंधहि नव्हता. अर्थात् राष्ट्रीयत्व किंवा स्वदेशभक्ति ही भावना त्यांस मुळींच नव्हती. राजवंशांत जन्मल्यानें राज्य पद मिळे, किंवा युद्धांत जयरूपानें प्रकट झालेल्या परमेश्वरी कृपेचें

फळ राज्यपद असें मानीत. यामुळें राष्ट्रीयत्वाच्या आणि स्वदेश-प्रीतीच्या उच्च प्रेरणेनें गेल्या युरोपीय महायुद्धांत जर्मन आणि फ्रेंच जसे लढले, तसे महमुदाचे तुर्क किंवा जयपालाचे हिंदु लढले नाहींत. तात्पर्य चिकाटीची लढाई राष्ट्रीय भावनेनें प्रेरित होऊन केल्यानें तुर्कांस नेहमीं जय मिळत गेला असें म्हणतां येत नाहीं. अशी भावना तुर्कांत नव्हतीच. ते महमुदासाठीं लढत होते, राष्ट्रा-साठीं नव्हे. मुहम्मदी–धर्माचा उत्साह स्वदेशप्रीतीच्या जागीं होता हें खरें आहे. नवीन धर्मांतर केलेल्या तुर्क व अफगाण लोकांचा धर्मोत्साह महमुदाच्या विजयाचें एक कारण निःसंशय होतें. परंतु हा धर्मोत्साह म्हणजे कल्पनांचें नावीन्य नव्हे. आणि जर हिंदूंचा तितकाच प्रबळ धर्मोत्सह त्यास आडवा आला असता तर पंजा-बच्या उच्छेदाचें कारण तो होऊं शकता ना.

शेवटीं ही गोष्ट सांगावयाची कीं तुर्कांच्या चालीरीतींतहि असें कांहीं नावीन्य नव्हतें कीं तें हिंदूंच्या अपजयाचें कारण होऊं शकेल तुर्क आणि हिंदू यांच्या राजकीय कल्पना जशा सारख्या होत्या, तशा त्यांच्या चालीरीतीहि सारख्याच होत्या. पंजाब आणि काबूलचे हिंदु त्यावेळीं मांसाहारीच होते. हल्लींहि हिंदुस्थानच्या इतर प्रांतां-पेक्षां पंजाबांत मांसाहाराचा प्रघात अधिक आहे. पंजाब काबुलांतील हिंदु त्यावेळीं गोमांस–भक्षक नव्हते ही गोष्ट खरी आहे. पण काबुल–पंजाबाच्या पराजयाचें हें एक कारण असेल असें आम्हांस वाटत नाहीं.

# प्रकरण सतरावें.

## पंजाबचा-काबूलचा उच्छेद—संभवनीय कारणें.

राष्ट्रें. लोक किंवा राज्यें यांच्या नाशाचीं कारणें हा एक अत्यंत खोल विचाराचा पण मनोरंजक प्रश्न प्राचीन व अर्वाचीन इतिहासकारांपुढें असतो; आणि निरनिराळ्या प्रसंगीं इतिहासकार निरनिराळे सिद्धांत बांधतात. अर्थात् हे सिद्धांत सर्वव्यापी असूं शकत नाहींत. ग्रीसचा उच्छेद रोमनें केला, रोमचा गॉथ लोकांनीं केला, आणि कॉनस्टॅनटिनोपलचा तुर्कांनीं केला; या तिन्ही प्रसंगीं निरनिराळी परिस्थिति होती. साहजिकच तिन्ही नाशाचीं कारणें निराळीं मानलीं पाहिजेत. याचप्रमाणें हिंदुस्थानांतहि सिंधच्या इ. स. ७१२ मधील, पंजाबच्या इ. स. १०९९ मधील, उत्तर हिंदुस्थानच्या इ. स १२०० मधील. आणि दक्षिण हिंदुस्थानच्या इ. स. १३०० सुमारें झालेल्या नाशांचीं कारणें निराळीं आहेत. आणि हिंदुस्थानच्या इतिहासकारापुढें या प्रत्येक प्रसंगीं निरनिराळीं असलेलीं नाशाचीं कारणें काय आहेत हें दाखविण्याचें कठिण काम उभें असतें. असें जरी आहे तरी रोमन बादशाहीच्या ऱ्हासाचा प्रसिद्ध इतिहासकार गिबन याचे सामान्य विचार शाश्वत महत्त्वाचे आहेत. आणि त्यांत कित्येक सिद्धांत असे आहेत कीं, ते सर्वत्र लागू पडतील. पश्चिमेकडील रोमन बादशाहीच्या अंताचीं कारणें पंजाबच्या उच्छेदाला जीं कारणें सांगतां येतात त्याहून भिन्न असलीं तरी गिबनचे विचार आपल्या या मीमांसेच्या प्रसंगीं बरेच मार्गदर्शक होतील, यासाठीं ते आम्ही येथें उद्धृत करतों.

‘ रोमचे सुदैव हेंच ग्रीसच्या दुर्दैवाचें कारण ’ असें साहजिक मानण्याकडे प्रवृत्ति होते, तिचा प्रथम विरोध केला पाहिजे. तो

ग्रीक लोकांचा मोठा इतिहासकार पोलिबियस् यानें रोमच्या राज्यव्यवस्थेचें अद्वितीय गुण आणि रोमच्या मोठेपणाचीं खोल कारणें वर्णन करून केला आहे. या राज्यव्यवस्थेंत लोकांच्या सभेची स्वतंत्रता आणि सीनेटचे (वरिष्ट लोकांच्या लोकसभेचें) शहाणपण व त्याच प्रमाणें बादशहाचा अमलबजावणीचा अधिकार यांची योग्य सांगड घातलेली आहे प्रत्येक नागरिकानें दहा वर्षें देशाच्या सेवेसाठीं फौजेंत नोकरी केलीच पाहिजे अशा निर्बंधानें नेहमीं फौजेंत तरुण व स्वातंत्र्यप्रिय शिपायांचा सारखा ओघ कसा येत असे, रोमच्या फौजी शिस्तेत मॅसिडोनियन लोकांच्या फॅलँक्स पेक्षांहि रोमन लिजन् ही प्रत्यक्ष काम करण्यास अधिक क्षम कशी होती, हें त्यानें दाखविलें आहे. तात्पर्य पॉलिबियसच्या मतानें शांतता व युद्ध या दोहीं वेळीं अमलांत असलेल्या विशिष्ट राज्यव्यस्था यानींच रोमन लोकांना भीतिशून्य व आलस्यरहित करून नेहमीं विजय मिळत असे. सर्व जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा रोमन लोकांनीं धरली, आणि सिद्धीस नेली. यांत न्यायाचा जो श्वाशत नाश होत असतो, तो शहाणपणा आणि शौर्य या दोन राजकीय सद्गुणांच्या जोरानें चालविला" असें होतें तरी सुद्धां रोमन राष्ट्र लयास गेलें. "अतिशय वाढ होणें याचा हा सहज आणि अपरिहार्य परिणाम आहे. वैभवांत ऱ्हासाचीं मुळें उत्पन्न होतात. नाशाचीं कारणें नवीन नवीन विजयाच्या वाढींत वाढतात. दूरदेशाच्या लढाईंत विजयी फलटणें भाडोत्री शिपायांचे दुर्गुण शिकले. आणि त्यांनीं प्रथम रोमचें प्रजासत्ताक राज्य गाडून पुढें बादशाहीचाहि अंत केला. ज्या शिस्तीमुळें फलटणी आपल्या शत्रूस, भयप्रद होत त्याचप्रमाणें आपल्या राजास झाल्या. ती शिस्त बिघडून टाकण्याची युक्ति बादशहास अमलांत आणावी लागली. आणि फौजी राज्यव्यवस्थेचे नियम ढिले पडून रोमन बादशाही रानटी लोकांच्या पूरांत गडप झाली."

" रोमन राज्यांत ख्रिस्ती-धर्माचा शिरकाव, व निदान या वेळीं झालेला ख्रिस्तीधर्माचा ऱ्हास याचाहि कांहीं संबंध रोमन बादशाहीच्या अंताशीं आहे. ख्रिस्ती धर्मोपदेशक सहनशीलतेचा आणि मनोदौर्बल्याचा उपदेश करूं लागले. अर्थात् लोकांस कार्यक्षम करणारे सद्गुण कमी लेखण्यांत येऊं लागले. शौर्यादि स्फूर्तीचा जो थोडा अवशेष होता तो मठांत पुरला गेला. सरकारी आणि सावकारी वित्ताचा मोठा भाग भक्तीच्या व दयाधर्माच्या कामांत खर्च होऊं लागला. जो पगार शिपायांवर खर्च व्हावयाचा तो स्त्रीपुरुषांच्या भिकारी झुंडींवर खर्च होऊं लागला व त्यांस आम्ही संसार सोडून ब्रम्हचर्य बाळगून राहलों आहों या पलीकडे दुसरा गुण दयेच्या पात्रतेस दाखवितां येत नव्हता. धर्मसंस्था व राज्यसंस्था या दोन्ही धार्मिक विवादांनीं भांबांवून गेल्या व बादशहाचें लक्ष फौजेच्या कवायतीकडून धर्मसभेच्या भांडणाकडे लागलें. रोमन बादशाहींत एक नवीनच प्रकारचा जुलूम चालू झाला. आणि धर्म-मत। करितां निरनिराळ्या लोकांचा छळ होऊं लागून हे लोक साहजिकच राष्ट्राचे शत्रु बनले." (बरीचा गिबन भाग. ४ पान १७२-१७५) हा उतारा बराच लांब आहे. पण यांत आलेले विचार व याच प्रकरणांतील आणखी विचार शाश्वत महत्त्वाचे असून, व ते सर्वत्र लागू पडतात. आम्हांस येथें पंजाबच्या नाशाचींच कारणें पहावयाचीं असून पश्चिमेकडील रोमन बादशाहीच्या नाशाच्या कारणांहून तीं अगदीं भिन्न असलीं तरी या विचारांनीं दाखविलेली दिशा बिनमोल आहे. तिचा उपयोग यावेळीं जितका आहे, त्याहिपेक्षां पृथ्विराजाच्या काळीं उत्तर हिंदुस्थानचा नाश कां झाला या प्रश्नाचा आम्हांस या पुस्तकाच्या शेवटीं विचार करणें आहे, त्यावेळीं जास्त उपयोग होईल.

पंजाबांतील हिंदुलोकांची परिस्थिति आणि गझनीच्या मुसल-

मानांची परिस्थिति यांचा विचार करून राष्ट्राची शक्ति वाढविणाऱ्या कोणत्या गोष्टींत मुसलमान अधिक होते व हिंदु कमी होते हें आपण पाहिलें असतां पंजाबच्या उच्छेदाची खरी कारणें कोणतीं आहेत याचा आपल्यास निर्णय करतां येईल. हिंदूंच्या बाजूला तंटे आणि मुसलमानांच्या बाजूला एकी अशी परिस्थिति नव्हती हें आपण पूर्वीं पाहिलेंच आहे. तंटे व भांडणें हे जितके हिंदूंचें ग्रीद होतें, तितकेंच तुर्कांचेंहि होतें. ऑक्सस नदी पलीकडील तुर्कांमधील बेकीचें वर्णन करतांना उत्बी कुरणांतील पुढील वाक्य उध्दृत करतो. "ते जर एक असतील, तर त्यांची शक्ति खरोखरच मोठी आहे. पण त्यांचीं अन्तःकरणें विभिन्न आहेत. त्यांच्यामध्यें द्वेष आाण शत्रुत्व आम्ही कायमचे पाठविले आहे."दुसरें, तुर्क लोक हिंदूंच्या इतकेंच सुधारलेले किंवा रानटी होते. त्यांचीं शस्त्रें एकच होतीं. त्यांच्यांत लोकांच्या राजकीय सभा नव्हत्या. त्यांच्यांत राष्ट्रीय भावनाहि नव्हती. आणि त्यांच्यांत लिजन् अथवा फॅलॅक्स अशा प्रकारच्या शिस्ती फलटणीहि नव्हत्या. तिसरें, पंजाबचें हिंदु राज्य अवाढव्यहि झालें नव्हतें. अर्थात् रोमन बादशाहीप्रमाणें ते आपल्या भारी वजनानेंच खालीं पडलें असें म्हणतां येत नाहीं. गॉथ आणि व्हॅन्डाल् यांच्या असंख्य झुंडी रोमज राष्ट्रावर जसा कोसळल्या तशा तुर्कांच्या झुंडीहि हिंदुस्थानावर आल्या नाहींत. चौथी गोष्ट ही कीं, काबुलच्या अफगाणापेक्षां किंवा पंजाबच्या रजपुतांपेक्षां तुर्क लोक जास्त शूर किंवा शरीरसामर्थ्याचेहि नव्हते किंवा लढाईंतील मेहनतीस जास्त सरावलेलेहि नव्हते. किंबहुना महमूद व त्याचे मागचे सुलतान यानीं आपल्या लढायांत पंजाबच्या हिंदूंचा उपयोग केला आहे. महमुदाची ऑक्सस नदी पलीकडील तुर्कांचा राजा इलेक्‌खान याशीं जी लढाई झाली तींत महमुदाच्या तर्फे हिंदू मोठ्या शौर्यानें लढले असें वर्णन आहे. पांचवें पंजाबचे हिंदु राज्य वाईट

रीतीनें चाललें होतें असेंहि दिसत नाहीं. आणि यामुळें मुसलमानाकडे कांहीं हिंदु लोक फितुर झाले असेंहि वर्णन सांपडत नाहीं. शेवटची गोष्ट ही कीं, महमुदाचें गझनी येथील राज्य जयपालाच्या काबूल--पंजाब राज्यापेक्षां प्रारंभीं लहानच होतें. अर्थात् त्याचें सैन्यहि जयपालाच्या सैन्यापेक्षां प्रारंभीं थोडें असलें पाहिजे. जयपालाच्या राज्यांत धार्मिक किंवा राजकीय तंटे बखेडेहि असल्याचें दिसून येत नाहीं. तात्पर्य एक पक्ष सबळ किंवा दुर्बळ होण्याचीं हीं जीं प्रथम दर्शनी कारणें, तीं नसल्यानें आपणांस बाजूस ठेविलीं पाहिजेत. व तुर्कांचें वर्चस्व हिंदूंवर कोणत्या अन्य बाबतीनें होतें किंवा हिंदु हीन होते याचा आपणास विचार करावयास पाहिजे.

( १ ) तुर्कांची मोठी वर्चस्वाची बाब म्हणजे त्यांचा नेता महमूद याचें वैयक्तिक सामर्थ्य हें होय. आपणांस व्यक्तीच्या सामर्थ्याची नेहमीं योग्य किंमत असत नाहीं. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें निसर्गानें वेळोवेळीं बौद्धिक व शारीरिक अत्यंत सामर्थ्य असलेले पुरुष उत्पन्न होतात, व ते राष्ट्रांचे दैव किंवा मानवी जातीचें स्वरूप बदलून टाकतात. एक बुद्ध किंवा एक जीजस यांचें सामर्थ्य एवढें होतें कीं, अर्धें जग शांततेच्या मार्गाकडे त्यामुळें वळलें, तर एका महमुदानें दुसरें अर्धें जग धर्मतत्त्वाच्या प्रसारांत बलाचा उपयोग करण्याच्या तत्त्वाकडे प्रवण झालें. राजकीय घडामोडीकडे आपण पाहिलें तर एका शिवाजीनें मराठे लोकांस दोनशें वर्षें स्वातंत्र्य मिळवून दिलें आणि त्यांची कीर्ति हजारों वर्षांकरितां कायम केली. आमची अशी पक्की समजूत आहे कीं, शिवाजीच्या वैयक्तिक सामर्थ्याशिवाय मराठ्यांनीं जो पराक्रम केला तो त्यांस करतां आला नसता. आणि आमचें असें पक्कें मत आहे कीं, महमुदाच्या व्यक्तीशिवाय तुर्कांना पंजाबच्या हिंदूंचा पाडाव करितां आला नसता. महमुदाची

स्थिति शिवाजीच्या स्थितीसारखी हुबेहूब आहे. कधीं न डगमगणारें शौर्य आणि कधीं न थकणारा उत्साह दोघांसहि असून दोघांनींहि मोठीं धोरणें बांधलीं आणि दोघांसहि निश्चय व युक्तिमत्ता असल्यानें त्यांनीं आपली कल्पना सिद्धीस नेली. मुसलमानी अमलाच्या जोखडांतून जवळील विजापुरची सत्ता नाहींशी करून किंवा दूरच्या मोगल बादशाही फौजांचा पराभव करून महाराष्ट्राला सोडवितां येईल अशी कल्पना शहाजीच्या वेळीं कोणासहि झाली नसती. पण शिवाजीनें हा अशक्य दिसणारा बेत केला आणि तो आपल्याच आयुष्यांत आपल्या अद्वितीय संघटनाशक्तीनें व आपल्या आध्यात्मिक वजनानें सिद्धीस नेला. त्याचप्रमाणें गझनीचें लहानसें राज्य जवळील काबूलच्या शक्तिमान राज्यास धुळीस मिळवील, किंवा दूरच्या कनोजच्या बादशाही फौजांचा पराभव करील ही गोष्ट त्यावेळीं कोणासहि संभवनीय वाटली नसती. असें असूनहि महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन हा धाडसाचा घाट महमुदानें घातला, आणि आपल्या उत्साहानें व वैयक्तिक वजनानें तो सिद्धीस नेला. शिवाजी आध्यात्मिक दृष्ट्या महमुदापेक्षां उच्चतर पायरीवर अधिष्ठित होता यांत शंका नाहीं. कारण आपल्या लोकांस परकीय सत्तेच्या व परकीय धर्माच्या कचाटींतून सोडविण्याचें उदात्त कार्याकडे त्यानें आपलें सामर्थ्य लाविलें. या उलट महमुदानें परकी लोकांस गुलामगिरींत आणण्याचा आणि परराज्यें जिंकून त्यांवर आपला परकीय धर्म लादण्याचा उपक्रम केला व सिद्धीस नेला. असें जरी आहे तरी दोघांनींहि अशक्य दिसणारे बेत केले आणि ते आपल्या अद्वितीय गुणांनीं सिद्धीस नेले असेंच म्हटलें पाहिजे. दोघांपाशींहि प्रारंभीं एक लहान राज्य व एक लहान सैन्य होतें. पण दोघांनींहि आपल्या घटनासामर्थ्यानें व युक्तिमत्त्वानें आपलें राज्य व सैन्य वाढविलें. शिवाजीला तर बापाच्या वेळची फारच थोडी फौज मिळाली होती.

पण तिचेंच त्यानें असें सामर्थ्यवान् सैन्य बनविलें कीं, तें बादशाही मोगल फौजांना पराभूत करून धनसंपन्न मोगल शहरांना लुटीत होतें. हाच प्रकार महमुदानें केला, व त्याचें सैन्य इतकें वाढलें कीं, मरणसमयीं तें एक लाख पायदळ, पन्नास हजार घोडे आणि तेराशें हत्ती इतकें मोठें होतें. सरदेसाई म्हणतात कीं, " महमुदाजवळ प्रारंभींच मोठें सैन्य होतें; त्यास खाऊं घालून हिंदुस्थान जिंकण्यांत त्याचा उपयोग करणें त्यास भाग होतें." पण ही गोष्ट खरी दिसत नाहीं. कदाचित् महमुदाजवळ शिवाजीपेक्षां प्रारंभीं अधिक सैन्य असेल. तथापि महमुदाजवळ प्रारंभीं मोठें सैन्य होतें असें मानलें तरीसुद्धां तो जर नालायक असता तर हळू हळू फौजेस रजा देऊन सैन्य कमी करण्यास त्यास कोण आडवा आला असता? तुर्क किंवा अफगाण लढवायी माणसें पुष्कळ नोकरीस मिळण्यासारखीं असलीं तरी, त्यांस देण्यास पगार कोठून आणावयाचा? देवळें आणि मूर्ति यांची लूट मागाहून आली. शिवाजीलाहि प्रारंभीं साधनें कोठून मिळालीं? शिवाजीचें तर शिपाई प्रारंभीं शांत स्वभावाचे मावळे होते, कज्जाख तुर्क नव्हते. महापुरुषांचें महत्त्व यांतच दिसून येतें कीं, ते आपल्या शक्तीनें माणसें व द्रव्य मिळवितात, आणि माणसांस योग्य रीतीनें तयार करतात. आणि द्रव्याचा योग्य उपयोग करितात. हें मोठेंपण अढळ निश्चय आणि जळजळणारी इच्छा यांतच असतें. महाभारतांतील प्रसिद्ध विदुलाख्यानांत पराभव पावून व राज्यभ्रष्ट होऊन रडत बसलेल्या आपल्या पुत्रास विदुला म्हणते, "पुनः लढण्याचा दृढ**निश्चय** करून राज्य परत मिळविण्याचा **उद्योग** कर, ऊठ. तुला मनुष्यें व धन लागेल तें मिळालेंच पाहिजे." शिवाजी व महमूद यांचें संघटनासामर्थ्य व आध्यात्मिक वजन यांवरून स्पष्ट होतें कीं, त्यांनीं आपल्या लोकांस चिकाटीनें लढण्यास लायक करून त्यांच्यासाठीं प्राणहि देण्यास उद्युक्त केलें. इतकेंच नव्हे तर हें जें

तेजस्वी शस्त्र त्यांनीं बनविलें, तें त्यांनीं आपल्या कह्यांतहि ठेविलें. गिबननें म्हटल्याप्रमाणें लढवयी पलटणी शत्रूसच भयप्रद नसून मालकासहि भयप्रद होतात. जेथें राष्ट्रीय भावना जागृत नसून राजद्रोही अधिकारी अथवा सेनापति यांच्या महत्त्वाकांक्षेस आळा घालण्यास समर्थ असत नाहीं, तेथें धन्याच्या वैयक्तिक तेजानेंच असले महत्त्वाकांक्षी लोक ताब्यावर राहतात. धन्याची दाब ठेवणारी व्यक्ति नाहींशीं झाली म्हणजे हेंच भयप्रद सैन्य आपल्या धन्याचाच नाश करितें. महमुदाच्या मागून आलेले राजे नालायक असल्यानें असा प्रकार गझनीसच घडून आला. पुष्कळ मांडलिक स्वतंत्र झाले, आणि एक गझनीचा राजा त्याच्या सेनापतींनीं धरून आंधळा केला. तात्पर्य महमूद अथवा शिवाजी यांनीं जें सामर्थ्यवान् सैन्य तयार केलें आणि आपल्या कामाकडे त्याचा जो यशस्वी रीतीनें उपयोग केला, त्यावरूनच शिपायांच्या व फौजी अधिकाऱ्यांच्या अन्तःकरणावर त्यांच्या आध्यात्मिक वजनाचा दाब किती होता हें स्पष्ट होतें.

आतां महमुदाच्या विरुद्ध पक्षाकडे पाहिलें तर सेनापति किंवा घटक, या बाबीचें सामर्थ्य असलेलें कोणी पुरुष दिसत नाहींत. जयपाळावर जो प्रसंग येऊन पडला, तो त्यानें धैर्यानें आणि तेजस्वितेनें निभाविला. पण ज्या वेळेस त्यास भावी संकट दिसूं लागलें, तेव्हां मजबूत फौज तयार करण्यास त्यास काय हरकत होती? किंबहुना प्रारंभापासूनच कोणत्याहि प्रसंगास तोंड देण्यास समर्थ असें शक्तिमान सैन्य नेहमीं बाळगण्यास काय अडचण होती ? कोणताहि राजा किंवा राष्ट्र याचें प्रथम कर्तव्य हें आहे कीं, लोकांचें अंतस्थ व बाहेरील शत्रूपासून रक्षण करण्यास समर्थ अशी जय्यत फौज ठेवावी. जयपालाला मनुष्य किंवा धन या साधनांची उणीव मुळींच नव्हती. किंबहुना हर्षाजवळ प्रारंभीं मध्यम प्रमाणाचीच फौज होती. तिच्या जोरावर त्यानें उत्तर हिंदुस्थान जिंकलें, तेव्हां तो नेहमीं

एवढी मोठी जय्यत फौज ठेवी कीं, तिचें एक अंग ६००००हत्तींचें होतें. आणि एवढया अवाढव्य सैन्याचा खर्च कोणतीहि शहरें किंवा देवळें लुटल्याशिवाय तो चालवी. एवढें करूनहि प्रयाग येथें भरलेल्या दर पांचवार्षिक दानसमारंभांत ब्राह्मण व श्रमण यांना लाखों रुपयाचें दान करी. महमुदाच्या विरुद्ध लढणाऱ्या हिंदु राजांचा मोठा दोष असा दिसतो कीं, काबूल व कनोज या दोन्ही ठिकाणच्या राजांनीं त्यांचे प्रसिद्ध पूर्वज भीम व भोज यांच्या उदाहरणाविरुद्ध सैन्याची हयगय केली. गिबनच्या अजरामर शब्दांत बोलावयाचें तर बहुधा शिपायांचा तनखा देवळांचे भोग व मूर्तींचे अलंकार यांत खर्च झाला. कारण दोन्ही ठिकाणीं यावेळीं खड्या फौजा असल्याचें वाचण्यांत येत नाहीं. दहाव्या शतकांतील अरबी प्रवाशांनीं लिहून ठेविलें आहे कीं, हिंदुस्थानाची ख्याति तेथील फौजांविषयीं आहे. ही ख्याति अकराव्या शतकांत हिंदुस्थानांतील राज्यांनीं गमावली. काबूलपंजाबचें राज्य एक मोठी फौज बाळगण्याइतकें खचित विस्तृत होतें; आणि वास्तविकपणें शेजारील राजांची मदत मागण्याचें आणि संयुक्त सैन्य जमा करण्याचें कांहीं कारण नव्हतें. या संयुक्त सैन्यासहि कांहीं करतां आलें नाहीं. कारण तीस कोणी मोठा सेनापति—नेपोलियनच्या विरुद्ध लढण्यास समर्थ असा ड्यूक ऑफ वेलिंगटन—लाधला नव्हता. कांहीं लोकांची अशी समजूत आहे कीं, संयुक्त सैन्याचा उपयोग एकजीव फौजेसारखा होत नाहीं. पण हें बरोबर नाहीं, कारण संयुक्त फौजा फ्रान्सच्या मैदानावर मागील आणि चालू शतकांत यशस्वी रीतीनें लढल्या आहेत. एक नेता व नियामक संयुक्त सैन्यास पाहिजे यांत संशय नाहीं. हिंदुस्थानांत संयुक्त फौजा यावेळीं जयपाल किंवा आनंदपाल यांच्या

एकटयाच्याच नेतृत्वाखालीं होत्या.* त्यास जय आला नाहीं याचें कारण सैनापत्यांत ते महमुदाच्या बरोबरीचे नव्हते. असो, त्यास जय न येण्याचीं आणखीं जीं कारणें झालीं त्यांचा आपण आतां विचार करूं.

( २ ) हिंदू लोकांच्या धार्मिक भावनांचा कोमलपणा पंजाबच्या उच्छेदाचें एक कारण आहे यांत शंका नाहीं. दोन्ही बाजूला जी भावना प्रधान होती, ती राष्ट्रीय नसून पूर्वी सांगितल्याप्रमाणें निः-संशय धार्मिक होती. पण मुसलमानांची धार्मिक भावना उत्कट आणि जळजाळित होती, तर हिंदूंची धार्मिक भावना मृदु आणि बहुतेक मळमळित होती. लेनपूलच्या शब्दांत म्हणावयाचें तर मुस-लमानी धर्मोत्साह व लुटारूंचा लोभ महमुदाकडे प्रोत्साहक असला तरी या स्थितीचा प्रतिकार हिंदू-धर्माचा तितकाच प्रबल धर्मो-त्साह आणि लुटल्या जाणाऱ्या लोकांचा संताप यांनीं झाला असता तर मुसलमानांचें कांहींच चाललें नसतें. कारण देवळें लुटलीं गेलीं, मूर्तींचे दागिने काढले गेले, इतकेंच नसून शेंकडों किंबहुना हजारों हिंदू जबरदस्तीनें बाटविले गेले.अशा परिस्थितींत बाटलेल्या व लुटलेल्या लोकांच्या शौर्यानें व संतापानें हिंदु लोकांनीं लढले पाहिजे होते असें आपल्यास वाटतें. शिवाय, दोन्ही फौजांची संख्या व संस्कृति सारखीच असतां, किंबहुना हिंदूंच्या बाजूला वर्चस्व असतां, हिंदूंनीं पराभव कधींहि मान्य करावयास नको होता. परंतु हिंदूंची धर्मभावना जरी खोल असते, तरी ती अनेक कारणांनीं नेहमींच नरम असते.पहिलें

*स्मिथच्या ऑक्सफर्ड हिस्टरी ऑफ इंडिया या पुस्तकांत असें म्हटलें आहे कीं, दुसऱ्या संयुक्त सैन्याचें नेतृत्व अजमीरचा राजा बीसलदेव यानें घेतलें होतें. पण ह्या विधानाला आधार दिलेला नाहीं; आणि ही गोष्ट सत्यहि दिसत नाहीं. खरी मानली तरी सुद्धां बीसल मोठा सेनापति होता अशी त्याची ख्याति नाहीं.

गोष्ट, हिंदू नेहमीं सहिष्णु असतो. हा एक साधारण अनुभव आहे कीं, कुराणाची किंवा पैगंबराची थोडीशी निंदा ऐकून मुसलमानाला तीव्र संताप येतो, तर हिं॒ वेदांची किंवा रामकृष्णांची निंदा शांतपणें ऐकून घेतो. दुसरी गोष्ट, हिंदु स्वभावानें मारामारीवर न येणारा असतो. हिंदुधर्मांत अहिंसेचा मुख्यतः उपदेश असल्यानें हिंदूला शांततामय मार्गाची नेहमीं संवय असते. तिसरें, हिंदूंच्या मूर्तिविषयक कल्पना चुकीच्या होत्या व अजून आहेत. जेव्हां मूर्तींनां आपल्या सामर्थ्यानें मुसलमानांचा प्रतिकार करितां आला नाहीं, तेव्हां धर्मभोळेपणानें हिंदूंस असें वाटलें कीं, जर देव सुद्धां नम्र होणें योग्य समजतात, तर मनुष्यांनीं विरोध करणें निरर्थक आहे. पण ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, मूर्ति म्हणजे एक प्रतीक आहे, प्रत्यक्ष देव नव्हे. आणि या प्रतीकाचा जर अपमान झाला, तर तो मूर्तीच्या धातूचा किंवा दगडाचा अपमान नव्हे किंवा ज्या देवाची ती प्रतिमा असेल त्या देवाचा नव्हे. कारण देव अपमानाच्या कक्षेच्या वर आहे. तर जे लोक त्या मूर्तीला मानतात, त्या लोकांचा खरोखर तो अपमान आहे. मुंबईमध्यें व्हिक्टोरियाच्या पुतळ्याच्या तोंडाला जेव्हां कोणीं काळें फांसलें, तेव्हां त्या संगमरवरी दगडाचा तो अपमान नव्हता किंवा त्या चांगल्या राज्ञीचा नव्हता. पण तो अपमान ज्या ब्रिटिश राष्ट्रानें तो पुतळा उभारला होता, त्याचा तो अपमान होता, व या कृत्यांत हेतुहि त्याचाच अपमान करण्याचा होता. पण चुकीच्या समजुतीनें किंवा भोळसटपणानें हिंदूची अशी कल्पना झाली कीं, या कलियुगांत सनातन धर्माचा अवमान होणें ठरलेंच असल्यामुळें महमुदाच्या विरुद्ध देवतांचेंहि सामर्थ्य चालत नाहीं. अशा भलत्याच समजुतीचा परिणाम हिंदूंच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. आणि प्रत्यक्ष जेव्हां कित्येक अपघात महमुदाला अनुकूल असे घडले, तेव्हां तो समज दृढ झाला

आणि हिंदुलोकांनीं संतापानें व तीव्रतेनें युद्ध केलें नाहीं. ज्या लोकांचीं देवळें भ्रष्ट झालीं, आणि ज्या लोकांचीं घरें उध्वस्त झालीं त्या लोकांस अशा तऱ्हेचा संताप व तीव्र दुःख जरूर यावयास पाहिजे होतें.

( ३ ) पंजाबच्या उच्छेदाचें कारण लोकांची राजकीय उदासीन वृत्ति हेंहि एक होतें. दुर्दैवानें यापूर्वीं बारा शतकें पंजाबावर परकी राजांची सत्ता होती. किंबहुना असेंहि म्हणतां येतें कीं, पोरसच्या काळापासून तों रणजीतसिंगापर्यंत वीस शतकें पंजाबांत स्वराज्य नव्हतें. परकी म्लेच्छ किंवा हिंदु राजे एकामागून एक पंजाबावर अलेक्झांडरपासून महमुदापर्यंत राज्य करीत आले होते. मॅसिडोनियन, मौर्य, शक, बॅक्ट्रियाचे ग्रीक, कुशान, हूण, काश्मीरी, सिंधी व शेवटीं काबूलचे शाही राजे पंजाबावर राज्य करीत आले होते. आणि महमुदानंतर गझनी व दिल्लीच्या राजांनीं पंजाबावर आठशें वर्षे राज्य केलें. अर्थात् शीखांचा राजा रणजीतसिंग होईपर्यंत दोन हजार वर्षे पंजाबावर स्वदेशी राजा झाला नाहीं. महमुदानें पंजाब जिंकला त्यावेळीं पंजाबच्या लोकांच्या अंतःकरणांत स्वराज्य–भावना लुप्त होती. पंजाबचे लोक जरी आर्य आहेत, तरी त्यांना सामर्थ्य असूनहि स्वराज्य भोगण्याची इच्छा नव्हती. यामुळें गझनीहून मुसलमान तुर्कानें राज्य केलें काय किंवा काबूलहून हिंदु अफगाणानें राज्य केलें काय हें त्यांस सारखेंच होतें. राजकर्त्यांत जो यावेळीं बदल होत होता, त्याविषयीं ते उदासीन होते. स्वातंत्र्याच्या रक्षणाकरितां झगडणाऱ्या लोकांचा जोराचा प्रतिकार, अर्थात् पंजाबच्या लोकांनीं महमुदाविरुद्ध केला नाहीं; आणि पंजाब प्रांत हिंदुस्थानांतून एका लढाईंत तुटून निराळा झाला. एका लढाईंत राज्यें गेल्याचीं उदाहरणें पाश्चात्य इतिहासांत आहेत. खुद्द इंग्लंड विल्यम दि कॉंकररनें एका लढाईंत जिंकलें. पण इंग्लंडमधील लोकांनीं नॉर्मन राजे आपले

केले; याउलट गझनीच्या मुसलमान राजांनीं पंजाबचे लोक आपले केले. आणि ज्याप्रमाणें सिंध इ. स. ७१२ मध्यें मुसलमानी राज्यांत सामील झाला, त्याप्रमाणें पंजाब इ. स. १००९मध्यें हिंदुस्थानांतून निराळा पडला.

## टिप्पणी आक्षेपांचें निरसन.

येथें असा एक आक्षेप उत्पन्न होतो कीं, हीं दोन कारणें--धार्मिक भावनांचें शैथिल्य आणि राजकीय उदासीनता--पंजाबच्याच उच्छेदाचीं नव्हे तर सर्व हिंदु राज्यांच्या उच्छेदाचीं कारणें आहेत. किंबहुना बहुतेक आशियांतील राष्ट्रें याच कारणानें पडलेलीं आहेत ही गोष्ट खरी आहे. व याच भागांत सातव्या पुस्तकाच्या अंतीं उत्तर हिंदुस्थानाच्या उच्छेदाचीं कारणें काय झालीं याचा विचार करतांना या दोन कारणांचा आम्हांस उल्लेख करावा लागणार आहे. नरम धार्मिक भावना आणि राजकीय परिस्थितीविषयीं औदासीन्य हें सर्व हिंदुस्थानांतील लोकांचे प्रमुख स्वभावदोष आहेत. पण आम्हांस येथें विशेष हें सांगावयाचें आहे कीं, इ. स. १२०० च्या सुमारें झालेल्या उत्तर हिंदुस्थानांतील रजपूत राज्यांच्या विध्वंसाचीं जीं निराळीं मुख्य कारणें झालीं, तीं पंजाबांत मुळींच नव्हतीं. म्हणजे जातींचें कडकबंधन व आपसांतील लढाया या पंजाबांत मुळींच नव्हत्या. उलटपक्षीं पंजाबांत जीं दोन कारणें अस्तित्वांत होतीं, त्यांचा परिणाम इतर ठिकाणापेक्षां पंजाबांत जास्त जोराचा होत होता. तेव्हां पंजाबाच्या उच्छेदाचीं हींच दोन मुख्य कारणें आहेत असें ठरवावें लागतें. तें कसें तें आपण विस्तारानें पाहूं. लोकांच्या धार्मिक अथवा राजकीय वृत्ति त्यांच्या ऐतिहासिक परिस्थितीमुळें उत्पन्न होतात आणि त्या कशा बदलतात याचें परीक्षण इतिहासावरून करतां येतें.

पंजाब प्रारंभापासून वैदिक आर्यांचा देश आहे यांत विवाद नाहीं. येथेंच वेदाचे मंत्र बहुतेक सर्व तयार होऊन गाइले गेले. येथेंच उत्तरकालीन वैदिक संस्कृति परिणत झाली. व्याकरणाचा आचार्य पाणिनि आणि तत्त्वज्ञानाचा गुरु अश्वपति यांचे देश गांधार व मद्र होत. सिंधु-

नदीच्या पश्चिम व पूर्व बाजूच्या या देशांतील ब्राह्मण क्षत्रियांचे बहुविध उल्लेख उपनिषदांमध्यें आहेत. पण "सिंधुषष्ठ पंचनदा"चा हा देश पुढील काळांत मगधाच्या खालोखाल बौद्ध धर्माचा माहेरघर बनला. बुद्धानें खुद्द अफगाणिस्थान व पंजाब या देशांत यशस्वी रीतीनें आपला धर्मोपदेश केला. आणि याच देशांत पुढील काळांत कनिष्काच्या वेळेस महायान बौद्ध पंथ निर्माण झाला. पुरुषपुर आणि तक्षशिला हीं वैदिक काळांतील प्रसिद्ध स्थानें बौद्धधर्माचीं विद्याकेंद्रें बनलीं. तेव्हां पंजाब जरी वैदिक आर्यांचा मूळ देश असला, (आणि अजूनहि पंजाब मुख्यतः भारतीय आर्य आहे ही गोष्ट सर एच् रिस्ले यांनीं इ. स. १९०१ च्या सेन्सस वेळीं घेतलेल्या शीर्षमापावरून सिद्ध झाली आहे) तरी हिंदुस्थानच्या इतर भागांपेक्षां पंजाबची हिंदु--धर्मभावना कमी तीव्र होती. इ. स. पूर्व २५० च्या सुमारास हल्लींच्या स्वरूपांत आलेल्या महाभारताच्यावेळींहि हा फरक दिसत होता (टिप्पणी पहा). हुएनत्संग इ. स. ६३० मध्यें हिंदुस्थानांत आला, त्यानेंहि लिहून ठेविलें आहे कीं, कपिश अथवा काबूल नगर म्हणजे जलालाबादसह, व उद्यान म्हणजे स्वात तक्षशिलेसह हे देश पूर्ण बौद्ध होते. आणि पेशावर व पंजाब अर्धे बौद्ध होते. (भाग १ पान २४४ पहा.) पंजाबांत वैदिक काळांतच जातिबंधनें शिथिल होतीं, तीं बौद्ध-काळांत अधिक शिथिल झालीं. सरस्वतीच्या प्रदेशांत ब्राह्मण धर्म वाढला. आणि उत्तर हिंदुस्थानांत जातिसंस्था जोरावली; पंजाबांत मात्र जातिबंधनें शिथिल राहिलीं. "आज ब्राह्मण, उद्यां क्षत्रिय, परवां वैश्य, तेरवां नापित आणि मग पुनः ब्राह्मण पंजाबांत होतो" असें महाभारतांत वर्णन आहे. हर्षानंतर कुमारिल व शंकर यांच्या प्रयत्नानें बौद्ध धर्माचा उत्तर हिंदुस्थानांत उच्छेद झाला आणि हल्लींचा हिंदुधर्म उदय पावला, त्यावेळेस पंजाबांतूनहि बौद्धधर्म नष्ट झाला. परंतु हिंदुधर्माचीं केंद्रें दक्षिणेंत दूर असल्यानें पंजाबांत असलेल्या वर्णशैथिल्यावर त्याचा प्रभाव पडला नाहीं व खानपानादि व्यवहारहि पंजाबांत निराळा राहिला. यामुळें महमुदानें ज्या वेळेस पंजाब जिंकला त्यावेळीं लोकांची हिंदुधर्मभावना इतरत्रपेक्षां अधिक नरम होती. वर्णाश्रमधर्मावर जो दृढ विश्वास गंगायमुना-प्रदेशांतील लोकांचा आहे तो

पंजाबांत नव्हता. यामुळें पंजाबांतील लोकांनीं जबरदस्तीच्या बाटविण्यास विशेष जोराचा प्रतिबंध केला नाहीं. व महमुदानें फोडलेल्या मूर्तींची पूजा करणें, आर्यवंशाचे सर्व शारीरिक सामर्थ्य असलेल्या हिंदु जनतेंत जितकी सुलभता दिसणें शक्य नाहीं तितक्या सुलभतेनें त्यांनीं सोडून दिलें.

राजकीय औदासीन्यासंबंधीं पाहतां हिंदुस्थानच्या इतर भागांपेक्षां पंजाबांत हें औदासीन्य जास्त होतें, म्हणजे याहि बाबतींत पंजाबची स्थिति अधिक वाईट होती. फार प्राचीन काळापासून पंजाबांतच नव्हे तर सर्व हिंदुस्थानांत राजकीय भावना निद्रिस्तच आहे. बहुतेक सर्व प्राच्य लोकांच्या राजकीय कल्पना अजूनहि असंस्कृत आहेत. राष्ट्र लोकांचें आहे, राजाचें नव्हे, ही कल्पना अलीकडील काळांतच उत्पन्न होत चालली आहे. अनियंत्रित राजसत्तेखालीं नेहमींची राजकीय कल्पना म्हणजे देश राजाचा आहे, राजा देशाचा नव्हे. अर्थात् लोकांपैकींच राजा असला पाहिजे अशी आवश्यकता नाहीं. वैदिक काळांत आर्यांच्या यापेक्षां जास्त पायाशुद्ध कल्पना होत्या. आणि लोक म्हणजेच खरोखर राष्ट्र समजलें जाई. वैदिक काळांत राष्ट्राचें आणि राजाचें नांव लोकां-वरूनच असे. एकवचनी लोकांचें नांव राजार्थीं आणि अनेक वचनीं राष्ट्रार्थीं वापरीत. उदाहरणार्थ मद्र, कुरु, शाल्य, पांचाल इत्यादि शब्द पहा. अलेक्झांडरच्या काळापर्यंतसुद्धां पंजाबांत असे कांहीं लोक किंवा राष्ट्रें होतीं कीं, त्यांच्यांत राजाच नव्हता. अरायन इतिहासकारानें लिहिलें आहे कीं, "मालव, यौधेय, शाल्व वगैरे लोकांत राजा नव्हता. त्यांच्यांत राज्यव्यवस्था लोकसत्ताक होती. महाभारतांत अशा लोकांना गण संज्ञा आहे. असो, वैदिक काळांत किंवा भारतकाळांत निराळी स्थिति असली तरी त्या अलीकडच्या काळांत सर्व देशांत राजसत्ताच चालू झाली. आणि देश किंबहुना देशांतील लोक राजाची खासगी मिळकत मानूं जाऊं लागले. अर्थातच अशा राजव्यवस्थेखालीं राष्ट्रीय भावना उत्पन्न होणें शक्य नव्हतें. पण पंजाबचा व इतर प्रांतांचा फरक हा कीं, उत्तर हिंदु-स्थानांत स्वदेशी राजे असल्यानें तेथें थोडी तरी राष्ट्रीय भावना जागृत होती. परंतु पंजाबांत सारखें परकी राज्य शतकेंच्या शतकें चालू अस-ल्यानें तेथें ही थोडीहि राष्ट्रीय धुगधुगी बाकी नव्हती. यामुळें राज्य कोण

करतो आहे, याविषयीं लोक पूर्ण उदासीन असत. या कारणानें जेव्हां आनंदपाल लढाईत हरला तेव्हां साधारण लोकांनीं मुळींच विरोध केला नाहीं आणि शांतपणें महमुदाची राजसत्ता मान्य केली.

या सर्व कारणांवरून हिंदु धार्मिक भावनेचें शैथिल्य व राजकीय औदासीन्य यामुळेंच पंजाबाचा महमुदाच्या हल्ल्यापुढें सहज उच्छेद झाला. ब्रिटिश सत्तेखालीं आणि एकंदर सुधारलेल्या जगताच्या बदललेल्या परिस्थितींत पंजाबांतहि राष्ट्रीय भावना जागृत होत आहे. परंतु पंजाबांत भिन्न धर्मांच्या झगड्यांत हिंदूंना आपलें स्थान कायम ठेवणें असेल तर त्यांनीं आपली धर्मश्रद्धा, जरी ती स्थिर आहे तरी, इतकी मजबूत केली पाहिजे कीं, तिची शक्ति शीख किंवा मुसलमान यांच्या धार्मिक भावनेच्या शक्तीबरोबर होईल.

याच राजकीय कल्पनांच्या चुकीमुळें हिंदू शिपायांचा मोठा जो एक दोष दिसतो व ते पाश्चात्य आर्य लोकांप्रमाणें डांबून युद्ध करीत नाहींत तो उत्पन्न झालेला आहे. देश राजाचा, लोकांचा नव्हे अशी कल्पना असल्यानें लढाईच्या जयापजयांत आपलेपणाचें हित शिपायांना वाटत नसतें. लढाई हरली तर एक नवीन राजा येईल आणि तो जुन्या राजा इतकाच मान्य करावयास हरकत नाहीं, कारण राजा आपल्या देशाचा नसला तरी चालतो अशी समजूत असते. महाभारतकाळीं आर्यांची मनःस्थिति निराळ्या प्रकारची होती. यामुळें भारतीययुद्धांत ते चिकाटीनें शेवटपर्यंत लढले. भारतीयुद्धाच्या शेवटच्या दिवशीं जेव्हां दुर्योधन रणांगणांत दिसेनासा झाला, तेव्हां कांहीं शिपाई व फौजी अधिकारी राजा कोठें आहे म्हणून विचारूं लागले. पण इतरांनीं जबाब दिला कीं, " राजाची चौकशी कशास करितां ? तुम्ही चिकाटीनें लढा आणि जय मिळवा. मग राजाविषयीं आपण विचार करूं. " हें महर्षि व्यासांचें वर्णन मननीय आहे. अशा प्रकारची मनःस्थिति पुढील काळांत राहिली नाहीं. कारण राष्ट्र राज्य झालें, राजाची मिळकत, लोकांची नव्हे अशी कल्पना झाली. तात्पर्य हिंदु शिपायांची पळून जाण्याची प्रवृत्ति, मृत्यूच्या भीतीमुळें नव्हे तर स्वदेशभक्तीची स्वहिताची कल्पना त्यांस लढाईच्या जयापजयांत नसते, ह्यामुळें होते. बैहकीनें एक मजेची गोष्ट सांगितली

आहे. हिंदु शिपायी नाइक ऑक्सस नदी पलीकडील तुर्कांविरुद्ध झालेल्या लढाईत गझनी राजांच्या तर्फे लढत. किंबहुना त्यांच्या शौर्याची बैहकीनें तारीफ केली आहे. एके प्रसंगीं लढाईत पराजय झाला व हे लोक पळाले, गझनीस परतल्यावर त्यांच्यावर पळाल्याच्या आरोपावरून चौकशी बसून ते नोकरींतून बरखास्त केले गेले. तेव्हां कांहीं जणांनीं शिक्षा ऐकताच अपमानामुळ आपल्या पोटांत कटयारी खुपसून तेथेंच प्राण दिले. मसऊद सुलतानानें त्यांजविषयीं दुःख दाखविलें नाहीं किंवा त्यांच्या आत्मयज्ञाची प्रशंसा केली नाहीं. " या लोकांनीं याच कटयारी शत्रूवर चालवीत असतां आपला प्राण कां वेचला नाहीं ? " असें जें मसऊद म्हणाला यांत तथ्य आहे. आत्महत्त्या करण्यांत जी मृत्यूची निर्भयता दिसते ती शत्रूशीं शेवटपर्यंत लढण्यांत कां दाखविली जात नाहीं ? असो. हिंदु शिपायांचा हा स्वभावदोष त्यांच्या चुकीच्या राज्यकल्पनेमुळें व त्यांस युद्धाच्या निकालांत कांहींच स्वहित वाटत नसल्यामुळें उत्पन्न होतो, मृत्यूच्या भीतीमुळें नव्हे असें आम्हांस वाटतें.

येथें आणखी असा प्रश्न उपस्थित होईल कीं, पंजाबांत या वेळीं किंवा पूर्वकाळीं क्षत्रिय नव्हते काय ? आणि असतील तर त्यांनीं आपलें राज्य स्थापण्याचा कां प्रयत्न केला नाहीं ? पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, पंजाबांतील बहुतेक लोक आर्य आहेत. अर्थात् महमुदाच्या वेळीं व तत्पूर्वीं हजारों क्षत्रिय व वैश्य शुध्द आर्यरक्ताचे पंजाबांत होते. परंतु अलेक्झांडर व तदुत्तरचे जेते यांनीं नेहमीं लढवय्यी लोकांची कत्तल केली असल्यामुळें राज्यकरणारीं घराणीं पंजाबांत नष्ट झालीं. ज्या शूर क्षत्रिय जातींनीं अलेक्झांडरला विरोध केला, त्यांचे म्हणजे शिबि, मालव, मद्र, योधेय वगैरे यांचे वंशज अद्याप पंजाबांत आहेत व महमुदाच्या वेळीं होते. पण ते सर्व शेतकरी झाले होते. विशेषतः गांवचे पाटील बनले होते. अशा प्रकारचा आपद्धर्म क्षत्रियांकरितां स्मृत्यांमधून—मुख्यतः पराशरस्मृतींत—सांगितला आहे ( भाग २. पान ३२३ पहा ). यामुळें

पंजाबांतील क्षत्रियांना, ते शूर, सामर्थ्यवान् असूनहि त्यांचा प्राचीनकाळापासून चालत असलेला स्वभाव जो ईश्वरभाव अर्थात् दुसऱ्यावर राज्य करण्याची इच्छा व दुसऱ्यांचें राज्य सहन न करण्याचा निश्चय हा जो क्षत्रियांचें स्वभावजकर्म म्हणून भगवद्गीतेंत सांगितला आहे तो पारखा झाला होता. आपल्या गांवांत जोंपर्यंत एकाप्रकारचें अर्थस्वातंत्र्य उपभोगावयास मिळत आहे, तोंपर्यंत देशावर कोण राज्य करीत आहे ह्याकडे ते लक्ष देत नसत. राजकीय सत्ता मग ती ग्रीक, शक, कुशान, हूण किंवा तुर्क या परकीयांची असो किंवा सिंध अथवा काश्मीर येथील स्वदेशी राजांची असो, अशा जमीनदारांना कधींहि त्रास देत नसे. त्यामुळें हें गांवोगांव पसरलेले क्षत्रिय राजास त्रास देत नसत. यामुळें एक भेद, राज्य करणारे क्षत्रिय आणि शेती करणारे क्षत्रिय असा उत्पन्न झाला. हा भेद पंजाबांत अद्याप मानला जातो. राज्य करणारे क्षत्रिय म्हणजे रजपूत, प्रत्यक्ष राज्य करणारांचे पुत्रपौत्र, कधींहि शेती करीत नसत व नाहींत. एक गांव कां होईना तेवढ्यावर ते राज्य करीत. ही राज्य करण्याची क्षत्रियांची लालसा महाभारतांत युधिष्ठिरानें दुर्योधनापाशीं जी शेवटची मागणी केली तींत प्रतिबिंबित आहे. “ आम्हांला निदान पांच गांवें दे. एका भावाला एक. आणि बाकीचें राज्य तूं भोग. ” या वाक्यांत दिसणारा रजपूतांचा राज्य करणारा स्वभाव, पंजाबांत जे रजपूत शिल्लक उरले त्यांना पंजाबाच्या बाहेर पूर्व हद्दीवरील हिमालयाच्या पायथ्याचे प्रदेश किंवा राजपुतान्याचीं वाळवंटें किंवा तेथूनहि पूर्व व दक्षिण देश यांत घेऊन गेला. भाग २ यांत दाखविलेंच आहे कीं, राजपुतान्यांतील हल्लींचीं राज्य करणारीं घराणीं ग्रीक, शक, कुशान, हूण, तुर्क यांच्या स्वाऱ्यांच्या वेळीं पंजाबांतून निघालेलीं आहेत. मुख्यतः चव्हाण, परमार, भाटी किंबहुना राठोड सुध्दां पंजाबांतून आलेले आहेत, आणि पंजाबचे हिंदु तसेच मुसलमान झालेले रजपूत आपणांस

वर सांगितलेल्या रजपूत कुलांचेच मानतात. तुर्कांच्या स्वाऱ्यांमुळें झाबुलिस्थान प्रांत भाटी रजपुतांच्या कबजांतून गेला, तेव्हां ते पंजाबांत पसरले, आणि शेवटीं राजपुतान्यांत जेसलमीर येथें स्वराज्य स्थापून राहिले. मिठाच्या डोंगरांतील मुसलमान जंजुआ रजपूत हे अनूच्या वंशांतले आनव मानले जात असून पंजाबांतील अत्यंत शूर क्षत्रियांमध्यें त्यांची गणना आहे. हे व इतर लढवय्ये हल्लींचे क्षत्रिय लोक जे रजपूत गांवाचे पाटील बनून व कधीं शेतकरीहि होऊन स्वतंत्रता बाळगून राहिले त्यांचेच वंशज आहेत.

आतां हे जे क्षत्रिय गावांगावांतून राहिले त्यांनीं सुद्धां प्राचीन काळीं राज्यें स्थापण्याकडे दुर्लक्ष केलें याचें कारण असें कीं, बाहेरील जे म्लेच्छ राजे राज्य करीत ते जितांचा धर्म स्वीकारून स्वदेशीच राजे बनत. ज्याप्रमाणें नॉर्मन लोक जेते होते तरी जितांच्याच ख्रिस्तीधर्माचे असल्यानें ब्रिटन व सॅक्सन यांच्याशीं एकजीव झाले, त्याचप्रमाणें ग्रीक, कुशान, आणि हूण हे हिंदुस्थानांत आल्यावर बौद्ध किंवा वैष्णव होत ( शेवटचा मिहिरकुल हा कडकडीत शैव बनला होता ). यामुळें त्यांचें राज्य परकी राज्यासारखें भासलें नाहीं. काश्मीर, सिंध व काबूल यांचे राजे पुढें पंजाबावर राज्य करूं लागले, ते तर हिंदूच होते, आणि रितीभाती व संस्कृति यांत लोकांशीं एकजीवच होते. त्यांचें राज्य परकीय असें कधींच वाटलें नाहीं. तुर्कांनीं जेव्हां पंजाब जिंकला, तेव्हां मात्र जित व जेते यांच्या धर्मभेदामुळें, विशेषतः देवळें व मूर्ति फोडल्या गेल्यानें, हे परकी राज्य असह्य झालें असलें पाहिजे. ह्याशिवाय मुसलमानी राज्य हिंदुराज्यापेक्षां जास्त जुलमी असे हें आम्हीं पुढें दाखविणारच आहों. असें होतें तरी पंजाबांतील शूर जमीन धारण करणाऱ्या क्षत्रियांनीं आपलें राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला नाहीं. याचें दुसरें कारण झालें तें या बहुतेक जाति जबरदस्तीनें बाटविल्या गेल्या हें होय.

पंजाबच्या पश्चिमेकडील भागांतील बहुतेक लढवय्या जाति मुसलमान झाल्यामुळें पंजाब प्रांतांतील लोकांत एक मोठी फट पडली आहे. हिंदुस्थानांतील सर्व लोकांत पंजाबचे लोक शूर व सशक्त असूनहि या दुभंगामुळें सर्वांत स्वराज्य मिळविण्यास अत्यंत अशक्त झाले आहेत. या क्षत्रिय जातींनीं जबरदस्तीनें बाटविण्यास कां जोराचा विरोध केला नाहीं याची उपपत्ति अशी दिसते कीं, एक तर कत्तलींतून आपणास बचावण्याची प्रबल इच्छा, आणि दुसरें आपल्या जमिनी व आपल्या वंशपरंपरागत पाटिलक्या इत्यादि वतनें कायम ठेवण्याची लालसा. याशिवाय हिंदूंची धर्मभोळेपणाची समजूत अशी आहे कीं मनुष्य एकदां गोमांस खाऊन किंवा असेंच इतर पातक जबरदस्तीनें कां होईना करून बाटला म्हणजे तो पुन्हां हिंदू होऊं शकत नाहीं; यामुळेंहि या कायमचे मुसलमान बनलेल्या लोकांची सहानुभूति, जरी ते मूळचे क्षत्रिय होते तरी, साहजिकच मुसलमानी राजाकडेच वळणार. यामुळें या परकी अमलांतहि स्वदेशी राज्य स्थापण्याचा प्रयत्न शेवटीं शीख राजे १८ व्या शतकांत होईपर्यंत पंजाबांत झाला नाहीं. शीख धर्मानें मुसलमानी जुलमाचा प्रतिकार एका प्रकारची कॉन्स्क्रिप्शन, म्हणजे प्रत्येक मनुष्यास शिपाई शिक्षण देण्याची पद्धत, प्राचीन ग्रीस किंवा रोम अथवा अर्वाचीन जर्मनी किंवा फ्रान्स या देशांत जारी आहे तशी अंमलांत आणून केला आणि मुसलमानांस जिंकलें. गुरु गोविंदसिंगास प्रत्येक शिखास शिपाई बनविण्याची आवश्यकता कळून आली, आणि पंजाबांतील लोक जात्याच लढवय्ये असल्यानें गुरु गोविंदसिंगास मुसलमानी धर्माप्रमाणें शीख धर्मास लढवय्या धर्म बनविण्यांत यश आलें. पंजाबचा इतिहास शिखापर्यंत थोडक्यांत असा आहे व शिखांपावेतों पंजाबांत स्वराज्य कां स्थापन झालें नाहीं व तेथील लोकांत राजकीय औदासीन्य कां होतें याचें विवरण असें आहे. पुढील परिस्थितींत पंजाबच्या लोकांची

जागृत झालेली राजकीय भावना हल्लीं लोक दूभंग नसून त्रिभंग झाले आहेत अशा वेळीं काय करूं शकेल हें सांगणें या ग्रंथाच्या उद्देशाच्या बाहेरचें आहे. तें राजकीय बाबींत पुढाकार घेतलेल्या वर्तमान व भावी लोकांवर सोपविलें पाहिजे.

उत्तर हिंदुस्थानांतील हिंदू राजांनीं पंजाबावर आपलें राज्य स्थापण्याचा प्रयत्न कां केला नाहीं याचें कारण थोडक्यांत सांगूं. पंजाबचे अर्धे लोक मुसलमान झाले होते, आणि ते अशा प्रयत्नास अनुकूल झाले नसते. काश्मीर किंवा कनोज असा प्रयत्न करण्यास यावेळीं समर्थ नव्हता. सांबरचे चव्हाणांचें राज्य दूर होतें आणि त्यांच्यातहि इतका कोणी प्रबल राजा झालेला दिसत नाहीं. बीसल तिसरा हा जर आणखी कांहीं वर्षें वाचता, तर त्यानें कदाचित् हा प्रयत्न केला असता. आपल्या वंशजांनीं असा प्रयत्न करावा असा त्यानें आग्रहाचा उपदेश आपल्या एका शिलालेखांत त्यांस केला आहे त्याचा उल्लेख पुढें चव्हाणांच्या इतिहासांत येईल.

## टिप्पणी–पंजाबांतील धर्मशैथिल्य दाखविणारे महाभारतांतील उल्लेख.

कर्णपर्व अध्याय ४० ते ४६ यांत कर्ण आणि शल्य यांमधील एक जोराचा संवाद दिला आहे. त्यांत पंजाबच्या लोकांचें धार्मिक अनाचार आणि वाईट चालीचे प्रकार कर्णानें दाखविले असून शल्यानें त्याचें उत्तर फारसें दिलेलें नाहीं. यावरून त्या काळीं आर्यावर्तांचे लोक म्हणजे हल्लींच्या यू. पी. व दिल्लीचे लोक पंजाबांतील हिंदूकडे क्षुद्र दृष्टीनें कसे पहात तें दिसतें. "लोक आपल्या घरामध्यें हंसत खिदळत, गोमांस खात व दारू पीत नाचतात आणि सक्तु व मासे खातात. मद्र देशांत व सिंधुपलीकडील गांधार देशांत शुद्धता राहिली नाहीं. विंचू चावण्यावर जो मंत्र आहे त्यांत एक वाक्य असें आहे. 'मद्र देशाच्या लोकांशीं

मी व्यवहार ठेवणार नाहीं. या पुण्यानें हें तुझें विष नष्ट होवो.' (अध्याय ४३). अध्याय ४४ मध्यें आणखी असें सांगितलें आहे. "वाहिक देशांत, जेथें पांच नद्या आणि सहावी सिंधु वाहते तेथें, कोणी जाऊं नये. कारण तो देश हिमालयानें किंवा गंगा, यमुना व सरस्वतीनें पवित्र झालेला नाहीं. किंवा त्यांत खरा धर्म व शुद्धताहि राहिली नाहीं. गोमांस लशुनासह खाणारे आणि गूळ व तांदुळ यापासून केलेली सुरा पिणारे लोक शीलवर्जित आहेत. या देशाचें नांवच आरट्ट आहे. आणि तो धर्महीन आहे, मनुष्यानें तेथें जाऊं नये. तो व्रात्यांचा म्हणजे धर्मसंस्कारहीनांचा आणि यज्ञहीनांचा देश आहे. जर तुम्ही युगंधर नगरांत पाणी प्याल आणि अच्युतस्थलांत रहाल किंवा भूतलव्याच्या तलावांत स्नान कराल तर तुम्हास स्वर्ग कसा मिळेल ? आरट्ट वाहिक देशांत आर्यानें दोन दिवस राहूं नये. तेथें ब्राम्हण आज क्षत्रिय होतो, मग वैश्य, मग शूद्र आणि शेवटीं नापित होऊन पुनः ब्राम्हण होतो." शल्यानें आपल्या जबाबांत एवढेंच उत्तर दिलें आहे कीं चांगले व वाईट लोक प्रत्येक देशांत असतात.

# प्रकरण अठरावें.

## महमुदाच्या मागूनचे राजे.

महमुदानें हस्तगत केलेला पंजाब व काबूल हे प्रांत जरी यापुढें हिंदु हिंदुस्थानचे भाग उरले नाहींत तरी महमुदाच्या नंतरच्या राजांच्या कारकीर्दींतील गझनीच्या राज्याचा त्रोटक इतिहास, त्यांत आलेल्या हिंदु हिंदुस्थानच्या उल्लेखांच्या अनुसंधानानें, देणें आवश्यक आहे. गझनीच्या राजघराण्याचा संक्षिप्त इतिहास मिनाजउस्सिराजनें तबकात-इ-नासिरीमध्यें दिला आहे. मिनाजउस्सिराज हा विद्वान् गृहस्थ पुष्कळ राजांच्या कारकीर्दींत—नासिरुद्दीन व घिआसुउद्दीन यांच्या कारकीर्दींतहि—दिल्लीचा व त्याभोंवतालच्या साम्राज्याचा काझी होता ( इलिअट् २ पान २६० ). त्यानें हा इतिहास लिहून हि. स. ६५० च्या सुमारास तो नासिरुद्दीन यास अर्पण केला. बैहकीनें मसाउदच्या कारकीर्दीचा सन १०५० च्या सुमारास लिहिलेला गोष्टीरूपाचा सविस्तर वृत्तांतहि उपलब्ध आहे. त्यानें लिहिलेल्या गोष्टी बहुधा त्याच्या डोळ्यादेखत घडलेल्या आहेत. आणि हा वृत्तांत माहितीनें भरलेला आहे. ह्या दोन पुस्तकांवरून हिंदु हिंदुस्थानच्या उल्लेखांस उद्देशून जरूर असलेला महमुदानंतरच्या गझनवी राजांचा त्रोटक इतिहास या प्रकरणांत आम्ही देणार आहोंत.

महमुदाचे दोघेहि मुलगे मसाऊद व महंमद हे एकाच दिवशीं दोन मातांच्या पोटीं जन्मास आले. मसाउद हा शरीरानें असा शक्तिमान् होता कीं, त्याची गदा खुद्द महमुदासहि पेलत नसे. परंतु तो उच्छृंखल आणि भांडखोर होता. महंमद हा शांत आणि हुशार होता; आणि त्यामुळें बापाची त्याच्यावर मर्जी होती. मसा-

ऊद प्रजेला व सैन्याला पीडा देईल अशा समजुतीनें महमुदानें महंमदाला युवराज नेमिलें आणि खलिफाकडून खुतब्यांत त्याच्य नांवाचा समावेश करण्याची परवानगी मिळविली. याबद्दल एका अधिकाऱ्यानें खासगी संभाषणांत मसाउदचें सांत्वन केलें असतां मसाउदनें मुसलमानांच्या नेहमींच्या उत्साहानें उत्तर दिलें " सिंहासनाच्या निर्णयाचा अधिकार कागदाच्या भिंडोळ्यांपेक्षां तरवारींतच चांगला दिसून येतो. " आणि अपेक्षेप्रमाणेंच वस्तुस्थिति घडून आली. महमुदाप्रमाणेंच बापाच्या मृयुत्समयीं मसाऊद हा खोरासानचा प्रांताधिकारी होता. आणि गझनीच्या राज्यावर बसलेल्या महंमदावर, महमुदानें जशी आपला भाऊ इस्माएल याचेवर स्वारी केली होती तशीच, मसाउदनें तात्काळ स्वारी केली. पण मसाउदनें महमुदावरहि ताण केली. त्यानें आपल्या भावाचें डोळे काढले आणि त्याला सदैव कडक कैदेंत वागविलें. महमुदाचें प्रचंड साम्राज्य आपल्या अधिकारांत आणल्यावर त्याच्या भावानें निरनिराळ्या अधिकाऱ्यांस दिलेला पैसा त्यांचें हाल करूनहि एकूणएक मसाऊदनें वसूल केला. महमुदांत व शिवाजींत जसें साम्य होतें तसें हरएक बाबतींत त्याचा मुलगा मसाउद आणि संभाजी यांच्यातहि होतें. संभाजीहि मसाऊदप्रमाणेंच शरीरानें सामर्थ्यवान् होता; आणि त्यानेंहि बापाच्या मृत्यूनंतर आपला भाऊ राजाराम यास पदच्युत करून त्याच्या आईचा जीव घेतला. त्यानें साधारणपणें दहा वर्षे जोमानें राज्य केलें; शेवटीं अवरंगजेबानें त्यास पकडून त्याचा क्रूरपणें अंत केला. मसाउदचाहि दहा वर्षांच्या तेजस्वी कारकीर्दीनंतर असाच शोचनीय अंत झाला. संभाजी व मसाउद या दोघांचाहि आपआपल्या धर्मावर पूर्ण विश्वास होता. महमुदाप्रमाणेंच मसाऊदनेंहि धर्मसुधारकांचा छळ केला आणि हिंदुस्थानावर धर्मप्रसारार्थ कांहीं स्वाऱ्या केल्या.

महमुदानें आपल्या घराण्याच्या हातीं दिलेल्या राज्याची कारभार-पद्धति कशी व्यवस्थित होती हें बैहकीनें लिहिलेल्या तपशीलवार सरस वृत्तांतावरून दिसून येतें. प्रधानांना वस्त्रें द्यावयाचीं तीं मोठ्या समारंभानें देण्यांत येत. सर्व गोष्टींत सुलतान आपल्या प्रधानाचा शिरस्त्यानें सल्ला घेत असे व सुलतान व प्रधान यांचें दरम्यान जो खलित्यांचा व्यवहार होई तो सुलतानाच्या प्रायव्हेट सेक्रेटरीमार्फत होत असे. सर्व हुकूम लेखी सुटत असत. हिंदुस्थानांतील पंजाबप्रांताचा कारभार काझी व सेनापति यांचें मार्फत चालविण्यांत येई. ते दोघेहि लाहोरास रहात. मुलकी राज्यकारभार काझीचें हातीं असून तो कर वसूल करी व न्याय देई. आणि लढाया करण्याचें, तसेंच खंडण्या वसूल करण्याचें, आणि हत्ती पाडाव करून आणण्याचें व बंडखोर हिंदूंना जिंकून शासन करण्याचें काम सेनापतीकडे असे (ईलियट २ ,पा. ११९). अहमद निआल्तगिन याची जेव्हां हिंदुस्थानचा सेनापति म्हणून नेमणूक झाली तेव्हां त्याला सुलतानाकडून खिल्लत आणि सुलतानाचा तोंडी हुकूम मिळाला, व लगेच एक लेखी सनद देण्यांत आली. नंतर शपथेचा विधि झाला, आणि आपण सुलतानाची नोकरी एकनिष्ठपणानें बजावूं अशा अर्थाच्या करारावर त्यानें आपली सही केली. आणि मग हे सर्व कागद सुलतानास दाखवून दप्तरदाराचें हवालीं करण्यांत आले (ईलियट २ पा. ११९). निआल्तगिन हिंदुस्थानांत आला तेव्हां त्याचें बरोबर गुलामीतून मुक्त केलेले कांहीं बंडखोर सैनिक व गुलाम पाठविण्यांत आले होते. त्यांच्यावर देखरेख करून त्यांना उद्योग लावण्याचें काम निआल्तगिन यास सांगितलें होतें. मौजेची गोष्ट ही कीं, त्यांना चंद्रभागेचें पलीकडे जाऊं देऊं नये किंवा लाहोरच्या सैन्यांत मिसळूं देऊं नये असा हुकूम देण्यांत आला होता. ते लाहोरास गेल्यास त्या राजाधानीच्या शहरीं कांहीं बखेडा

उत्पन्न करतील, आणि स्वतंत्र हिंदुस्थानांत जाऊं दिल्यास ते घोटाळा माजवतील अशी समजूत असावी.

सेनापतीच्या अनेक कामांपैकीं हें एक काम असे कीं, त्यानें पंजाब-हिंदुस्थानांत स्वाऱ्या करून तेथील ठाकुरांपासून खंडण्या वसूल कराव्यात. हें ठाकुर म्हणजे लढाऊ व स्वतंत्र बाण्याचे आणि ताब्यांत ठेवण्यास कठिण असे जमीनदार होते. ते क्षत्रिय वर्णाचे असून त्यांचें वर्णन पूर्वी करण्यांत आलेंच आहे. निआल्तगीनानें हिंदुस्थानांत स्वारी केली व तो बनारसेपर्यंत चाल करून गेला. " महमूदहि इतका खालीं उतरला नव्हता " असें बैहकीनें म्हटलें आहे. यावरून असें निर्विवाद दिसून येतें कीं, महमुदानें राज्यपालाचा राहिब नदीवर पराभव केला तेव्हां तो बारीच्या अलिकडे आला नसावा. राहिब ही औंधमधील कोणती तरी ( घागरा किंवा गोमती ) असावी. निआल्तगीन व काझी यांच्यांत कांहीं बाबतींत तंटा उपस्थित झाला. (ब्रिटिश हिंदुस्थानांतहि मुलकी व फौजी अधिकाऱ्यांत तंटे होऊन अतिशय नुकसान झाल्यानें शेवटीं हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत गव्हर्नर जनरलाची हुकमत सेनापतीवर कायम झाली आहे ). मुख्य प्रधानानें निआल्तगीनला असें सांगितलें आहे कीं, तुं हिंदुस्थानचा सेनाध्यक्ष आहेस व काझीची कोणत्याहि तऱ्हेची तुझ्यावर हुकमत नाहीं ( ईलिअट २, पा. १२८ ). निआल्तगिननें काझीशीं भांडण केलें व मसाउदच्या संमतीनें हिंदुस्थानांत स्वारी केली. काझीशीं झालेल्या भांडणांत मसाउदनें निआल्तगिनाचा पक्ष उचलला होता.

या स्वारीचें वर्णन बैहकीनें पुढीलप्रमाणें केलें आहे. " निआल्तगीन गंगा उतरला आणि दक्षिण तीरानें चाल करून गेला. त्यानें आपलें सैन्य अकस्मात् बनारस पुढें उभें केलें. तें शहर गंगाच्या राज्यांत होतें. त्याचें क्षेत्र दोन चौरस फर्लांग ( ५ मैल ) होतें व त्यांत पाणी विपुल होतें. ( गंगाच्या ) भीतीमुळें सैन्य शहरांत फक्त

सकाळपासून दुपारपर्यंतच राहिलें. सैन्यांतील लोकांनीं सुगंधी विकणारे, जवाहिरे व जरतारी काम करणारे यांचीं दुकानें लुटून फस्त केलीं; व सोनें, चांदी, सुगंधी द्रव्यें आणि जवाहीर यांच्या लाभानें आभर होऊन ते सुरक्षितपणें परत गेले. " बैहकीनें हें सर्व आपल्या डोळ्यानें पाहिलें असण्याचा संभव आहे. तो त्यावेळीं हयात होता यांत तर वाद नाहीं. त्यानें या स्वारीचा काल इ. स. १०३३ दिला आहे. बनारस शहर हें त्रिपुरचा कलचूरी राजा गांगेयदेव याच्या राज्यांत या वेळीं होतें असें दिसतें.

गांगेयदेव हा सामर्थ्यवान् राजा होता. त्याचें सैन्य बहुधा जवळच कोठें तरी असावें, आणि त्याचें सामर्थ्य प्रसिद्ध असल्यामुळें तुर्क त्याला फार भीत असत. बाजारांत कापडवाले, गंधी व जवाहिरे यांचीं दुकानें होतीं. या धंद्यांची अजूनहि बनारसेंत भरभराट आहे. बनारसेंत पाणी मुबलक होतें असा जो उल्लेख आहे तो विहिरीच्या पाण्यास किंवा शहराभोंवतालच्या प्रदेशांतील पाण्यास उद्देशून असावा. खुद्द बनारस गंगेच्या तीरावरच वसलेलें आहे.

या यशस्वी स्वारीनें निआल्तगिनाचें डोकें महत्वाकांक्षेनें फिरून गेलें आणि आपलें स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या कल्पना त्याच्या मनांत घोळावयास लागून तुर्कस्थानांतून तुर्की लोकांस सैन्यांत दाखल करण्यास त्यानें सुरवात केली. परंतु ही गोष्ट काजीनें मसाउदच्या कानावर घातली. त्यानें निआल्तगिनाला बडतर्फ केलें आणि त्यास शक्यतर जिवंत पकडण्यासाठीं एका हिंदु सेनापतीस हुकूम दिला. निआल्तगिनाचा अखेर पराभव झाला आणि सिंधूनदीवर जाटांनीं त्याचा पाठलाग केला व त्याला मारून टाकलें. प्रबळ सेनापति किंवा गुलाम हे शत्रूप्रमाणेंच मालकासहि कसे पीडाकारक होतात हें या गोष्टीवरून प्रत्ययास येतें.

या महत्वाच्या व विश्वासाच्या कामगिरीवर हिंदुसैनिकांची व

सेनापतीची योजना करण्यांत आली होती, यावरून गझनीच्या मुसलमान राजांच्या अंमलाखालीं हिंदूंस जबाबदारीच्या जागांवर नेमण्यांत येत असे असें दिसून येतें. मुसलमान लेखकांनीं देखील त्यांच्या शौर्याचें वर्णन केलें आहे. हिंदु सैनिकांच्या भरतीस महमुदाच्याच कारकीर्दींत सुरवात झाली. जयपालानें २००० सैनिकांचें दळ कांहीं कालपावेतों गझनीस ठेविलें होतें. हिंदुस्थानच्या हिंदु सैनिकांनीं आपला अतिशय छळ करणाऱ्या आपल्या शत्रूकडे भाडोत्री शिपाई म्हणून राहावें हें ईलियटलाहि विचित्र वाटलें, (ई. २ पा. ४४८). परंतु हिंदुलोकांचें पूर्वीच वर्णन केलेलें धार्मिक व राजकीय औदासीन्य ध्यानांत घेतलें असतां त्यांनीं परकीय अंमलांत नोकऱ्याधरून नेहमींच आपल्या राजनिष्ठेनें व युद्ध–प्रावीण्यानें गौरव कसा संपादन केला याचें आश्चर्य वाटणार नाहीं. हिंदूंना आरंभींच मिळालेल्या या व इतर मानांचा ईलियटनें उल्लेख केला आहे. आपल्या राज्यारोहणाला विरोध करणाऱ्या आपल्या सरदारांविरुद्ध सावंद नांवाच्या हिंदूंची मसाउदनें योजना केली. (या लढाईंत सावंद हा आपल्या सैनिकांसह गारद झाला). विजयराजाला महमुदानेंच सेनापति नेमलें होतें व मसाउदच्या नंतर पुढील सुलतानांनीहि पुनः त्याला नोकरीवर बोलाविलें. अशा अनेक उदाहरणांचा ईलियटनें उल्लेख केला आहे (ई. २, पा ६०). जाटांनीं निआल्तगिनाला ठार मारलें तेंहि आपल्या राजाच्या राजनिष्ठपणें सेवेंत.

निआल्तगिनाची बनारसेवरील स्वारी यशस्वी झाली यावरून कनोजचें राज्य कसें दुर्बळ झालें होतें हें दिसून येतें. त्याला आतां साम्राज्य-पदवी उरली नव्हती. राज्यपाल मरून गेला होता. त्रिलोचनपाल त्याच्या गादीवर आला होता. प्रयागास त्यानें केलेल्या दान पत्राचा उल्लेख मागें आलाच आहे बनारस प्रमाणें प्रयागहि गांगेयाचे ताब्यांत गेलें असावें. कलचूरींच्या इतिहासांत गांगेयाचा अंत

प्रयागास झाला याचा उल्लेख येणार आहे. त्रिलोचनपालानें किती वर्षें राज्य केलें व त्याच्यामागून राजा कोण झाला हें माहीत नाहीं. कोलब्रुकनें प्रसिद्ध केलेल्या लेखांतील एका भंगलेल्या शिलालेखांत एका यशःपालाचा उल्लेख आहे ( २ पा. २७८ ). या लेखांत त्याला महाराज ही पदवी लावली आहे परंतु परमेश्वर या नेहमींच्या पदवीचा उपयोग केलेला नाहीं. त्यानें यमुनेचें दक्षिणेस व प्रयागाचें नैऋत्येस कौसंबी--मंडलांत एक दानपत्र केलें आहें. कनोजचा औधवर पूर्ण अंमल होता. परंतु निआल्तगिनाच्या स्वारीनें प्रोत्साहन मिळून तुर्क लोक औधमध्यें अधिकाधिक घुसूं लागले. महमुदाचा भाचा सालार मसऊद याच्याबद्दल जी एक असंभाव्य गोष्ट सांगण्यांत येते तीवरून असें अनुमान करावयास खास जाग आहे कीं, तुर्कांनीं विशेषतः औधमध्यें बऱ्याच स्वाऱ्या केल्या असल्या पाहिजेत;कारण या गोष्टींचा सर्व प्रसंग औध प्रान्तांतील आहे. त्यावेळीं सालार मसाउदचा तळ औध प्रांतांतील सध्याच्या बाराबांकी जिल्ह्यांत सत्रेख येथें होता व तेथून त्यानें अवधांत निरनिराळ्या भागांत स्वाऱ्या केल्या अशी समजूत आहे. औधमधील अनेक जिल्ह्यांत या साधुपुरुषाच्या जागा आहेत अशी कल्पना आहे.या स्वाऱ्या इ.स. १०३८ पासून १०५० पर्यंत झाल्या. सालारची गोष्ट अगदींच कल्पनिक नाहीं; कारण बदाऊन येथें सांपडलेल्या ( ए. इं. २, ६४ ) एका राठोड शिलालेखांत असें म्हटलें आहे कीं, राठोड राजांपैकीं मदनपाल राजानें कोणत्याहि अमिराला स्वारी करणें अशक्य करून टाकलें. या शिलालेखाबद्दल विस्तृतपणें विवेचन आम्ही दुसऱ्या एका प्रकरणांत करणार आहोंत. या शीलालेखांत काल दिलेला नाहीं व त्यामुळें मदनपालाचा काळ निश्चित करितां येत नाहीं. तथापि आमची समजूत अशी आहे कीं हा स्वाऱ्यांचा उल्लेख निआल्तगिन किंवा सालार मसाऊद यांस उद्देशून

असला पाहिजे. हिंदुस्थानांतील रजपूत राजांना विशेषतः या पवित्र तीर्थावरील स्वाऱ्यांमुळें क्रोध आला. आणि मालवाधिपति भोज ( इ. स. १०४० ), त्रिपुरचा राजा कर्ण कलचूरी व शेवटीं गाहडवाल चंद्रराजा यांनीं तुर्कांस व इतर परकीयांस उत्तर हिंदुस्थानाबाहेर हांकून लावून " परकीयांच्या जुलमांतून देशाची सुटका केली; " हा कथाभाग पुढें येणार आहे. चंद्रानें कनोज काबीज केलें व तेथें आपलें प्रबल राज्य प्रस्थापित केलें. अशा तऱ्हेनें प्रतीहारांचें दुर्बल झालेलें घराणें इ. स. १०८० त नष्ट झालें. हे अलीकडचे प्रतीहार राजे पूर्वींच सांगितल्याप्रमाणें गझनीचे मांडलिक बनले होते. त्यांनीं आपल्या राज्यांतील गांवांवर तुरुष्कदंड नांवाचा कर बसविला होता. गाहडवालहि तो दंड वसूल करीत परंतु तो त्यांनीं तुर्कांस दिला नाहीं असे दिसतें. दान दिलेल्या गांवीं तो इनामदारास मिळे.

हा वृत्तान्त आवश्यक असला तरी प्रस्तुत विषयाला सोडून केवळ प्रासंगिक असा आहे, तेव्हां आतां आपण पुनः गझनवीच्या राजांच्या वृत्तान्ताकडे वळूं. बैहकीनें असें लिहिलें आहे कीं एका वर्षी गझनी नदीला एकाएकीं पूर आला व त्यामुळें शहरांत भयंकर नुकसान झालें. नदीवरील पूल सबंधच्या सबंध वाहून गेला. याकुबइलैस व त्याचा भाऊ यांनीं बांधलेला गझनीचा किल्ला मात्र जशाचा तसा कायम राहिला. गणितांत पारंगत असलेल्या मसाउदनें नवीन एक प्रचंड एकाच कमानीचा पूल बांधला. त्यानें अनेक राजवाडेहि बांधले आणि सुंदर बागाहि लाविल्या.

परंतु सामर्थ्य, शौर्य, विद्वत्ता, प्रजाहितबुद्धि वगैरे अनेक सद्गुण अंगीं असतांहि मसाउदची कारकीर्द दुर्दैवाची झाली; व कमनशिबानें आपल्या राज्याच्या अर्ध्या अधिक भागास त्यास मुकावें लागलें. बैहकी म्हणतो ' अमीर मसाउदमध्यें वैगुण्य असें कोणतें होतें ?

त्याच्या जवळ विश्वासू नोकर, उत्तम अधिकारी, नामांकित योद्धे आणि प्रसिद्ध विद्वान् हे सर्व होते. परंतु नियतीनें असें योजिलें होतें कीं, त्याची कारकीर्द कष्टाची व त्रासाची व्हावी आणि खोरासान, ख्वारिझम, रे आणि जब्बाल हे प्रांत त्याच्या अमलांतून निघून जावेत." "या अमिरानें आपली पराकाष्ठा केली आणि मोठालीं सैन्यें उभारलीं. निरनिराळ्या योजनांचा विचार करण्यांत त्यानें झोंपेशिवाय रात्रींच्या रात्री घालविल्या. परंतु त्याची स्थिति खालावतच गेली" ( ईलियट २). कदाचित् त्याच्या विचारांचें अनिर्बद्ध स्वातंत्र्य आणि दुसऱ्याचा सल्ला ऐकून घेण्याची नाखुषी हें त्याच्या अपकर्षाचें कारण असावें. महमुदानें खोरासानमध्यें कांहीं सेल्जुकी तुर्कांस वसाहत करण्याची परवानगी चुकीनें दिली होती. आणि तेथेंच बंडाला सुरुवात झाली. मसाउदचा थोरला मुलगा शहाजादा मौदूद हा नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणें खोरासान व बल्ख या प्रांतावर अधिकारी होता. तो अधिकारी असतांना सेल्जुकी तुर्कांनीं बंडाचा झेंडा उभारिला. गझनीच्या सैन्याचा पराभव झाला.त्या प्रांतावर आक्ससच्या उत्तरेकडूनहि स्वारी करण्यांत आली. तेव्हां प्रधान व इतर अधिकारी यांनीं मसाउदाला जातीनें तुर्कांवर चालून येण्याविषयीं सल्ला दिला. हा सल्ला न जुमानतां मसाउदनें हिंदुस्थानांत धर्मप्रसार करण्याच्या हेतूनें स्वारी करून सतलजच्या दक्षिणेस सांप्रतच्या हिस्सार जिल्ह्यांत हान्सीला वेढा दिला; व अशा रीतीनें आपलें राज्य पंजाबापलीकडे वाढविण्याचा प्रयत्न केला. ही स्वारी इ. स. १०३७त झाली. त्या प्रांतावर व किल्ल्यावर ताबा कोणत्या राजाचा होता हें निश्चित झालेलें नाहीं. हिस्सार गॅझेटियर ( पा. १९ ) मध्यें असें म्हटलें आहे कीं, हान्सीचा हा प्राचीन किल्ला चाहमान विशालदेवाचा पुत्र अनुराज याच्या ताब्यांत होता. अनुराजाचा पुत्र तेष्टपाल यास तेथून

हांकून देण्यांत आलें. त्यानें पुढें बुंदीचें हाडा घराणें स्थापिलें. × परंतु पुढें चाहमानांच्या इतिहासांत आपल्याला असें दिसून येईल कीं, या काळांत त्यांचा वाक्पति राजा राज्य करीत होता आणि गौरीशंकर ओझा यांचें असें म्हणणें आहे कीं, बुंदीचें चाहमान घराणें नड्डूलच्या चाहमान घराण्याचा १२ वा राजा आसराज याचे पासून उत्पन्न झालें. किल्ल्यावरील राजाचें नांव कांहींहि असो, तो चाहमान होता व तो शौर्यानें लढला यांत संशय नाहीं. बैहकीनें या वेढयाचें वर्णन असें केलें आहें, "वारंवार अत्यंत निकराच्या लढाया होत असत. किल्ल्यावरील शिवदीनें जिवावर उदार होऊन किल्ला लढविला. विजयी सैन्यांत ( मुसलमानांत ) गुलामहि अतिशय शौर्यानें लढले. सरतेशेवटीं पांच ठिकाणीं सुरुंग खोदण्यांत आले व रबिउल अव्वल पूर्वी १० दिवस एका सोमवारीं किल्ल्याच्या भिंती कोसळल्या. किल्यावर मारा करून तो पाडाव करण्यांत आला. ब्राह्मण व इतर प्रमुख लोकांस ठार मारण्यांत येऊन त्यांच्या बायका पकडून नेण्यांत आल्या. सांपडलेला सर्व खजिना सैन्यांत वांटण्यांत आला. हा किल्ला हिंदुस्थानांत विशुद्ध किल्ला म्हणून प्रसिद्ध आहे." ( इ. २, १४० )

वरील वर्णनावरून दोन नवीन अशा गोष्टी दृष्टोत्पत्तीस येतात. पहिली सुरुंगाची. त्या काळीं बंदुकीच्या दारूचा शोध लागला नव्हता अशी हल्ली समजूत आहे. तेव्हां दुसरे कोणतें तरी स्फोटक द्रव्य वापरण्यांत आलें असलें पाहिजे खास. तें काय होतें हें सांगणें मात्र कठिण आहे. ब्राह्मणांची कत्तल ही दुसरी गोष्ट होय. महमुदाच्या लढाईंतील क्रौर्यांत यामुळें पुढें पाऊल पडलें. ( उत्बीनें आपल्या सविस्तर वर्णनांत या गोष्टीचा उल्लेख केला नाहीं. कदाचित् हा

× हा मजकूर कोठून घेतला आहे हें समजणें कठीण आहे.

उल्लेख चुकून राहिला असावा. ). पंजाबातील क्षत्रिय व चाहमान वगैरे उत्तर हिंदुस्थानांतील रजपूत यांच्या स्वभावांत फरक होता. या रजपुतांनीं राज्यें केली होती, त्यांना दुसऱ्याच्या अंमलाखालीं राहण्याचें माहित नव्हतें. यामुळें लवकरच दिल्लीच्या तोमरांनीं हा किल्ला व त्या भोंवतालचा प्रांत तुर्कांच्या ताब्यांतून सोडवून घेतला असें दिसून येतें. फिरिस्तानें लिहिल्याप्रमाणें इ. स. १०४३ मध्यें हे तोमर चांहमानांच्या आश्रयाखाली उदयास येत होते.

गझनीस परत आल्यावर आपण मोठी चूक केली असें मसाऊदला आढळून आलें. अग्नेयीकडे आपलें राज्य वाढवीत असतां वायव्येकडील अत्यंत महत्त्वाचा खोरासान प्रांत तो गमावून बसला होता. महमुदालाच फक्त पूर्व व पश्चिम या दोहों दिशांस अनुसंधान राखतां आलें. मसाउदचें लष्कर दूर हिंदुस्थानांत लढाईंत गुंतलें आहे असें पाहून सेलजुकी तुर्कांनीं खोरासानवर स्वारी केली आणि त्या प्रांताला खालसा केलें. ते आतां गझनीवर चालून येण्याची तयारी करीत होते; आणि त्यामुळें मसाऊद भांबावून गेला. आपलें सर्व कुटुंब व खजिना घेऊन हिंदुस्थानांत निघून जाण्याचा त्यानें निश्चय केला व त्याप्रमाणें हुकूमहि सोडले. त्याचें सरदार, सेनापति, सैन्यांतील अधिकारी व त्याची आईहि यामुळें संतापून गेली व त्या सर्वांनीं त्याचा क्रोधपूर्ण निषेधहि केला. परंतु नेहमीप्रमाणेंच मसाउदवर त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. त्याला उपदेश करण्याची किंवा सल्ला देण्याची सोयच नव्हती. मौज ही कीं, त्या शूर राजाचा हा निश्चय ज्योतिषावर उभारलेला होता. + महंमदानें जरी आपल्या धर्मांत ज्योतिष पाहण्याचा तीव्र निषेध केला आहे, तरी तुर्क आणि अरब यांचा हिंदूप्रमाणेंच ज्योतिषावर विश्वास असे "त्याच्या मुख्य प्रधा-

---

+ अल्बिरुनी हा गणितज्योतिषी व फलज्योतिषी होता.

नानें मसाउदच्या या निश्चयाचा निषेध करून त्यास असें कळविलें कीं, आपली बायका माणसें व खजिना घेऊन उत्तर हिंदुस्थानांत निघून तुम्ही गेलात तर ही बातमी शत्रूंत व मित्रांत पसरल्याबरोबर प्रत्येकाला आपली सत्ता वाढविण्याची हांव असल्यामुळें संकट ओढवल्याखेरीज राहाणार नाहीं. " परंतु तो निरोप ऐकून तो दुर्दैवी मसाऊद उत्तरला कीं, " या वेडयाला आपण काय म्हणतों आहोंत हेंच कळत नाहीं.मी जें जें ठरविलें आहें तेंच योग्य आहें. तूं प्रेमानें लिहिलें आहेस हें मला कबूल आहे. स्वस्थ रहा आणि माझें हुकुम पाळ. कारण मला जें दिसतें आहे तें तुला दिसूं शकणार नाहीं. " मसाउदनें शहर व किल्ला कोतवाल बुअल्ली याचे हवालीं केला व त्याला सांगितलें कीं, " युवराज मौदूद, प्रधान व बरेंचसे सैन्य हीं सर्व दूर राहतील. कांहींहि होवो, उन्हाळ्यांत सर्व नीट जुळवून घेईन. **ज्योतिषांनीं असें सांगितलें आहे कीं हिंवाळा मला अनुकूल नाहीं.** " कोतवालानें त्याला विनवून सांगितलें कीं, झनाना व व खजिना कोठें तरी बळकट किल्लयांत सुरक्षित ठेवावा व तुम्ही येथें रहावें; परंतु सुलतानानें त्याला उत्तर केलें हीं, " आपल्या बरोबरच बाळगावयाचीं."असें म्हणून हिंदुस्थानच्या प्रवासांत आपल्याला शांति व सुख मिळावें यासाठीं त्यानें देवाची प्रार्थना केली. ( बैहकी ई० २ पा० १६२ ).

हिंदुस्थानांत जाऊन आपल्या ग्रहांची अनिष्टता टाळावी असा सुलतानाचा हेतु होता. आजच्याप्रमाणें त्या काळींहि वाहिंद, मार्मिनारा (?) बरशौर (पेशावर) व किरिल(१) हीं शहरें व त्याभोंवतालचा सिंधूच्या पश्चिमेकडील प्रांत हिंदुस्थानांत मोडत होते (ई. २ पा. १५० ). असो, हिंदुस्थानांतहि अनिष्ट ग्रहांनी मसाउदचा नाश करावयास कमी केलें नाहीं. मार्गीलन घाटांतून ( हसन–अबदालच्या पश्चिमेस थोड्या मैलावर रावलपिंडी व अटक यांच्या दरम्या-

नच्या डोंगरांत ) तो जात असतां मुसलमान व हिंदु बंडखोर गुलामांनींच त्याला पकडून कैद केलें. त्यांनीं अंध महंमदाला कैदेंतून बाहेर काढलें आणि त्याला राज्यावर बसविलें व मसाउदला गिरीच्या किल्ल्यावर नेऊन मारून टाकण्यांत आलें. मसाउदच्या या शोचनीय अंतानें संभाजीच्या करुणास्पद मृत्यूची आठवण होते. त्यानेंहि मसाउदप्रमाणेंच आपल्या बापानें कमाविलेल्या राज्यांतील फार मोठा मराठी भाग घालवून दूर कर्नाटकांत लहानसा प्रान्त शिल्लक ठेविला आणि तो भाग गझनीच्या राजांना हिंदुस्थान जसा आश्रयास उपयोगी पडला त्याप्रमाणें राजारामास आश्रयस्थान झाला. दोघेहि अत्यंत शूर, विद्वान् व धर्मोत्साही असूनहि आपल्या हट्टानें आणि सदुपदेशाचा अव्हेर करून दुःखांत बुडाले. विपुल साधनसामुग्री असून तिचा उपयोग करण्याची पात्रता नसेल तर ती कुचकामाची ठरते हें दोघांच्याहि चरित्रावरून स्पष्ट दिसून येतें. सुरुवातीस पुरेशी साधन संपत्ति नसतांहि महमूद व शिवाजी हे मोठेपणास चढले ( यांतच त्यांचा थोरपणा आहे ) आणि मसउद आणि संभाजी विपुल साधनें असून हि राज्यनाश होऊन मारले गेले.

आम्ही मसाउदच्या कारकीर्दीचा इतिहास इतका साविस्तर दिला आहे तो अशासाठीं कीं, त्याच्या सान्निध्यानें महमुदाचें महत्व स्पष्ट होतें आणि शिवाय त्याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत आणखी प्रांत काबीज करण्याच्या हेतूनें बनारसच्या व हान्सीच्या दोन * महत्वाच्या स्वाऱ्याहि झाल्या. आतां गझनीच्या इतर राजांचा इतिहास हिंदुस्थानशीं संबंध येणाऱ्या गोष्टींचा उल्लेख करून थोडक्यांत देऊं.

---

* सरदेसाई यांच्या ग्रंथांत तिसऱ्या एका स्वारीचा उल्लेख आढळतो त्या स्वारींत त्यानें काश्मीरांत सरस्वती नदीवरचा एक किल्ला हस्तगत केला. परंतु बैहकीनें या स्वारीचा उल्लेख केला नाहीं, काश्मीरांत सरस्वती नांवची नदी नाहीं, आणि तरंगिणीतहि या स्वारीचें नांव नाहीं-

महंमदानें सहा महिनेच राज्य उपभोगिलें. मसादउचा मुलगा मौदूद हा आपल्या बापाचा सूड उगविण्याकरितां बल्ख मधून तांतडीनें निघाला. तो बल्ख प्रांताचा सुभेदार होता. त्यानें अफगाणिस्थान आपल्या ताब्यांत घेतलें आणि हिंदुस्थानांत येऊन आपल्या चुलत्याचा पराभव केला व त्याला व त्याच्या सर्व मुलांना कैद केलें. त्यांचा व आपल्या बापास कैद करणाऱ्या तुर्की व हिंदु गुलामांचा त्यानें वध करविला. नंतर तो गझनीस परत गेला व तेथें त्यानें नऊ वर्षें राज्य केलें. त्याचे मुलगे कर्तृत्वहीन होते. त्याच्या सरदारांनीं व अधिकाऱ्यांनीं त्याचा एक मुलगा व चुलता अली या दोघांस एकदम राज्यावर बसविलें. परंतु ते दोघेहि दुर्बल निघाले व त्यांच्या कारकीर्दींत सर्वत्र गोंधळ माजला. दोन महिन्यानंतर त्यांना एका किल्ल्यावर पाठविण्यांत आलें व इ. स. १०५०मध्यें महमुदाचा तिसरा मुलगा अबदूल रशीद यास राज्यावर बसविण्यांत आलें. इराण व खोरासानचा सेलजुक राजा अल्प अर्स्लान हा गझनविर चाल करून आला; परंतु महमुदाचा एक सरदार तुघ्रील यानें त्याचा पराभव केला. तुघ्रील हा महमुदाच्या शिस्तींत वाढलेला निधड्या छातीचा गुलाम होता व महंमदानें त्याला गझनीच्या सैन्याचा सेनापति केलें होतें. जय मिळवून परत आल्यावर त्यानें अबदुल रशीदला ठार मारून त्याची गादी बळकावली. त्यानें आणखी अकरा राजकुमारांचा वध केला आणि फार निष्ठुरपणानें राज्य चालविलें. त्यानें चाळीस दिवस जुलमानें राज्य केल्यावर एका तुर्की शिलेदारानें त्याचा सिंहासनावरच खून केला.

एका किल्ल्यांत दोनच राजपुत्र न मरतां बंदींत शिल्लक राहिले होते. तुघ्रीलानें त्यांचीहि व्यवस्था लावण्याचा हुकूम सोडला होता. पहारेकऱ्यानें एकच दिवस हुकुम अंमलांत आणण्याला उशीर केला, इतक्यांत तुघ्रीलच्या खुनाची बतामी येऊन पोंचली. सुदैवानें अशा

रीतीनें त्या राजपुत्रांचे प्राण वांचले आणि हे राजपुत्र मसाउद व इब्राइम दोघेहि अनुक्रमानें सुलतान झाले. दोघांनींहि न्यायानें आणि दयाशीलतेनें राज्य केलें. इब्राइम हा अत्यंत धर्मशील होता. त्यानें कुराणाचें फारशींत भाषांतर केलें. त्याला चाळीस मुली व छत्तीस मुलगे होते. यामुळें राजघराणें पुनः एकदां राजपुत्रांनीं गजबजून गेलें. सुलतानानें आपल्या मुलींचीं विद्वान लोकांशीं लग्नें लाविलीं. त्यांपैकीं एक मुलगी प्रसिद्ध ग्रंथकार नासिरी याच्या पणजास दिली होती. इब्राइम हा शाहूसारखा होता. शांतींत व वैभवांत ४२ वर्षे राज्य करून तो इ. स. ११००मध्यें मरण पावला. त्याचा मुलगा मसाउद यानें बापापेक्षांहि अधिक न्यायानें आणि उदारपणें राज्य केलें. त्यानें सर्व महमुदी प्रांतांतील त्रासदायक कर बंद केले (आणि सर्व साम्राज्यांतील) व झाबुलिस्तानांतील हे कर अजिबात उडवून टाकले. त्याच्या कारकीर्दीत त्याच्या हेजिबानें हिंदुस्थानावर धार्मिक स्वारी केली व तो गंगा उतरून "महमुदाखेरीज दुसरा कोणी जेथवर गेला नव्हता अशा ठिकाणापर्यंत हिंदुस्थानांत आला होता." या स्वारीच्या स्थलाचा व कालाचा उल्लेख आढळत नाहीं. परंतु यामुळें सालार मसाउदाच्या स्वारीची असंभमनीयता दिसून येते; कारण महमूद औधमधील बारीच्या अलिकडे आला नव्हता. १७ वर्षें राज्य करून हा राजा ५०९ हि. (इ. स. १११८) मध्यें मृत्युवश झाला. यावरून याचीच औधमधील स्वारी अमीराची शेवटची स्वारी असावी, आणि बहुधा बदाउनच्या शिलालेखांत जिचा उल्लेख आहे ही हीच स्वारी असावी.

त्याचा वडील मुलगा अर्स्लान हा त्याच्या नंतर गादीवर आला, परंतु अर्स्लानचा धाकटा भाऊ बेहराम यानें त्यास हांकून लाविलें. या कामीं त्याला त्याचा मामा संजर सुलतान याची फार मदत

झाली. त्यानें पुष्कळ वर्षें ( ४१ ) राज्य केलें परंतु त्याची कारकीर्द त्याला सुखाची झाली नाहीं. हिंदुस्थानांतील प्रांताधिकाऱ्यानें दोनदां बंड केलें व दोनदां सुलतानाला त्याच्यावर स्वारी करावी लागली, एकदां मुलतानाजवळ व दुसऱ्यांदा शिवालिक डोंगरांत. त्या बंडखोराचा अखेर नाश झाला. घोरी ( गोरच्या ) सरदारांनीं बेहराम हिंदुस्थानांत गेला असतां तिकडे गझनी हस्तगत केली आणि ती जाळून नष्ट केली. त्याचा इतिहास पुढें घोरीच्या वृत्तांतात येईल. बेहराम हिंदुस्थानांत कांहीं दिवस राहिला व घोरी सरदारांनीं गझनी सोडून दिल्यानंतर परत गेला. त्याचा मुलगा खुश्रू हा त्याच्या मागून हि. ५५२ इ. स.११ ५९) मध्यें राजा झाला. घोरी सरदारांनी गझनीच्या राज्याचा पायाच डळमळीत केला असल्यामुळें आणि खुश्रू हा दुर्बल राजा असल्यामुळें गॉझ् तुर्कांच्या टोळ्यांनीं गझनीवर हल्ला केला व तें शहर हस्तगत करून, गिआसउद्दीन घोरीनें त्यांना घालवून देईतों, बारा वर्षें पावेतों तें आपल्या कबजांत ठेविलें. मागील वहिवाटीप्रमाणें खुश्रू हा लाहोरास येऊन राहिला व तेथें त्यानें सात वर्षें राज्य केलें. त्याचा मुलगा शांत खुश्रू यानें पुढें थोडी वर्षें राज्य केल्यावर, त्यास हि. ५८७ इ. स. ११९१ मध्यें महंमद घोरीनें कैद केलें व त्याला व त्याच्या मुलाला घीआसउद्दीन घोरीच्या हुकुबावरून हि. ५९८ इ. स. १२०६ मध्यें मारून टाकण्यांत आलें. अशा तऱ्हेनें महमुदाच्या वंशाचा अंत झाला.

बेजबाबदार राज्यपद्धतीला आळा घालणारी राष्ट्रीय भावना प्रजेंत उत्पन्न झाली नसली म्हणजे अशा राज्यपद्धतींत कसे भयंकर अनर्थ घडतात हें गझनीच्या राजांच्या इतिहासावरून ठळकपणें दिसून येतें. प्रत्येक देशांत राज्याच्या वारशाबद्दल कांहीं तरी नियम असतात. ( पाश्चात्य देशांत हे नियम स्पष्ट व व्यवस्थित स्वरूपाचे आतां झाले आहेत ). परंतु महत्वाकांक्षी व पापपुण्याचा विचार न करितां

निःशंकपणें वागणाऱ्या लोकांस ताळ्यावर आणणाऱ्या राष्ट्रीय भावनेचा उदय प्रजेंत झालेला नसतो तेव्हां राजे व राज्यघराण्यांतील राज्यपदावर येण्यासारखे कोणतेहि नातलग या सर्वांचे अशा घोर तऱ्हेनें व इतक्या मोठ्या प्रमाणांत खून करण्यांत येतात कीं राजघराण्यांत जन्माला येणें ही एक मोठी आपत्तिच होते. हिंदु राज्यांतहि जरी ही राष्ट्रीयत्वाची भावना अस्तित्वांत नव्हती तरी असे प्रसंग क्वचित आढळून येतात. बहुधा हिंदु लोकांच्या स्वभावांत कायद्यांचीं बंधनें पाळण्याची इच्छा अधिक व क्रूरता कमी असल्यामुळें असें झालें असें म्हणतां येतें.

हें पुस्तक येथें संपलें पुढच्या पुस्तकांत गझनवी राजघराण्याला खो देणाऱ्या घोरी राजांचा इतिहास पृथ्वीराजाच्या वृत्तांताबरोबर देण्याचें योजिलें आहे. कारण त्यांनीं पृथ्वीराजाचा पराभव केला आणि हिंदुस्थान कायमचें जिंकिलें. येथें हेंहि आणखी नमूद केलें पाहिजे कीं, वर वर्णिलेल्या स्वारी व्यतिरिक्त अनेक लहान सहान स्वाऱ्या साहसप्रिय व महत्वाकांक्षी तुर्कांनीं हिंदस्थानांत केल्या असल्या पाहिजेत. त्यांचा उल्लेख मुसलमान ग्रंथकारांनीं केला नसला तरी पुढील पुस्तकांत येणाऱ्या अनेक रजपूत राज्यांच्या इतिहासांत ही गोष्ट निदर्शनास येईल.

## टिप्पणी—गझनवी राजांची नाणी.

जर्नल रॉयल एशिआटिक सोसायटी भाग ९ पान ६७ व भा. १७ पान १५७ मध्यें मि. थॉमस् यांनीं लिहिलेल्या निबंधांत पुढील मनोरंजक माहिती आढळते. आपल्या राज्याभिषेकाची आठवण राहण्यासाठीं गझनीच्या प्रत्येक राजानें आपल्या नांवाचीं नाणीं पाडलीं होतीं. हिंदुस्थानांतील बहुतेक राजे अशा तऱ्हेनें नांणीं पाडीत असत. आपल्याला अल्पतगिन, सबुक्तगिन व इस्माइल यांचीं नांणीं सांपडतात व त्यांवरून ते या अनुक्रमानें गझनीच्या गादीवर बसले असें दिसून येतें. परंतु या सर्व नाण्यांवर सामानी बादशाह मनसूर अथवा नूह यांचीहीं नावें कोरलेली आहेत व त्यावरून हे गझनीचे राजे सामानी सम्राटांचे मांडलिक होते

असें दिसून येतें. महमूद हि. ३८९ (इ. स. १०००) मध्यें स्वतंत्र झाला असावा. कारण त्यासालच्या नाण्यांत सामानी राजाचे नांव पहिल्यानेंच वगळलेलें दिसतें. त्याच्या सुरवातीच्या नाण्यांवर महमुदाला सैफुद्दौला असें म्हटलें आहे.ही पदवी नूहनें त्याला हि.३८४ (इ.९९५) मध्यें दिली. नंतरच्या नाण्यांत खलिफानें दिलेल्या अलअमीर--यमीन-उदौलत व अमीन—उल्मिल्लत या पदवीचा उल्लेख आढळतो. त्या नंतरच्यांत "मलीक उल् ममालिक" (राजांचा राजा) असा उल्लेख आहे. शेवटी तो विख्यात होऊन पदवीची कोणतीच जरूर नसल्यामुळें नुसतें महमूद येवढेंच नाण्यांवर खोदलेलें आहे. त्यानें आपल्याला सुलतान किंवा गाझी असें कोठेंच म्हटलेलें नाहीं. सुलतान ही पदवी प्रथम इब्राइमच्या नाण्यांवर आढळते (हि ४६१ इ. स. १०६९).

महमुदाचीं फारशी व संस्कृत अशा दोन्ही भाषांत खोदलेलीं नाणींहि सांपडलीं आहेत. तीं हिंदुस्थानांतील प्रजेकरितां होतीं. त्यांतील देवनागरी लिपींतील छाप मनोरम असून त्यावरून महमुदाच्या दरबारीं हिंदी पंडित असावेत असें दिसतें. तो छाप असा आहे:—"अव्यक्तमेक महम्मद-अवतार नृपति महमूद." त्यांनीं महमुदाला पैगंबर महंमदाचा अवतार बनविला असून पैगंबराला अव्यक्त असें म्हटलें आहे. कांहीं वेळा अयं टंक महमूद संवत् ४१२ येवढेंच लिहिलेलें आहे. हीं नाणीं लाहोरास पाडलीं होतीं. लाहोर, निशापूर व पश्चिमेस आणखी तीन चार ठिकाणीं येथें टांकसाळी होत्या. काबुलांस टांकसाळ नव्हती.

सामंतदेवाच्या नांवाचीं जीं काबूलच्या शाही राजांची नाणीं आहेत त्यांचें अनुकरण आपल्या नाण्यांत गझनवी राजांनीं केलेलें आहे. त्यांत एका बाजूला कुशीवर पडलेला नंदी असून दुसऱ्या बाजूला घोडेस्वार व महमूद किंवा मसाउद याचें नांव आहे. मौदूदच्या व पुढें इब्राइमच्या हि. ४३२ (इ. स. १०४१) नाण्यांवरहि नंदी कोरलेला आहे. सबुक्तगिन व महमूद यांच्या नाण्यांचें वजन काबूलच्या हिंदु राजांच्या नाणांच्या वजना इतकें आहे. शाही ब्राह्मणराजांची नाणीं रुप्याचीं होतीं(दिऱ्हाम-द्रम्म) गझनी व निशापूर टांकसाळींतील नाणीं सोन्याचीं होतीं (दिनार). हिंदु व मुसलमान राजांची तांब्याचीं व लहान चांदीचीहि नाणीं होती.

# परिशिष्ट

## हिंदूंची मूर्तिपूजा.

सोमनाथाच्या मूर्तिभंगाच्या व लुटीच्या हकीकतीवरून वरील विषयावर कांहीं सुचलेले विचार गिबनप्रमाणें इतिहासाचा क्रम थांबवून न देतां ते येथें परिशिष्टरूपानें आम्हीं देत आहों. दहाव्या शतकाच्या अंतीं मूर्तिपूजेसंबंधानें बराच भोळसटपणा हिंदुस्थानांत वाढून त्यापासून मुसलमानी धर्माच्या लोकांस फायदा घेण्यास साधन झालें होतें. महमुदाच्या मूर्तिभंजक स्वाऱ्या हिंदु लोकांच्या या भोळेपणाच्या प्रकारासंबंधें डोळे उघडण्याकरितांच झाल्या असें म्हणतां येईल. या स्वाऱ्यांपासून निघणारा बोध अद्याप हिंदूंनीं घेतला नाहीं असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. मूर्तिपूजा वेदांत सांगितली आहे कीं नाहीं, किंवा ती बुद्धीस पटते किंवा नाहीं, हा धर्मविषयक प्रश्न आम्ही येथें विवेचित नाहीं. हल्लीच्या हिंदुधर्मांत मूर्तिपूजा निःसंशय मान्य आहे आणि ईश्वर-प्रणिधानाच्या दृष्टीने ती योग्य तऱ्हें मान्य आहे असें म्हणतां येतें. पण मूर्तिपूजेपासून कांहीं भ्रांत समजुती मनुष्याच्या मनांत रूढ होतात. विशेषतः मूर्तींतच त्या देवतेची शक्ति आहे ही चुकीची समजूत उत्पन्न होते. ही गोष्ट हिंदूंनाच लागू नसून प्राचीन काळापासून जेथें जेथें मूर्तिपूजा चालू होती तेथें तेथें होती. बौद्ध धर्म आरंभीं ईश्वराचेंच अस्तित्व आहे कीं नाहीं ह्या विषयीं मुग्ध होता. पण पुढें तो भयंकर मूर्तिपूजेंत शिरला आणि बुद्धाच्याच मूर्ति चोहोंकडे पुजूं लागल्या. हुएनत्संग कितीहि विद्वान् व तत्त्वज्ञानी असला तरी बुद्धाच्या शरीराचे अवशेष किंवा बुद्धाच्या मूर्ति यांत चमत्कारांचें सामर्थ्य होतें असें मानी, हें पाहून आपल्यास आश्चर्य वाटतें. (भा. १, पा. १–१५० ). हिंदु लोकांत मूर्तिपूजा पूर्वींच थोडीबहुत रूढ होती, ती बौद्ध धर्म उच्छेदिल्यावर त्याच्या अनुकरणानें अधिकच वाढली आणि मूर्तींचें पावित्र्य व त्यांच्या ठिकाणीं असलेलें अद्भुत सामर्थ्य या विषयींच्या कल्पना इतक्या वाढल्या कीं कनोजचे प्रतिहार सम्राट् मुलतान घेण्यास

समर्थ होते तरी ज्या ज्या वेळेस ते मुलतान घेण्यास जात त्या त्या वेळीं तेथील मुसलमान अधिकारी 'सूर्याची येथील प्रसिद्ध मूर्ति तुम्ही पुढें याल तर आम्ही फोडून टाकूं' अशी धमकी देऊन त्यांस मागें परतवीत ( भा. २ पा. २६९ ). पश्चिमेकडे सुद्धां रोमन व ग्रीक इतर लोकांपेक्षां तत्त्वज्ञानांत पुढें होते तरी त्यांचा कांहीं मूर्तींच्या अद्भुत सामर्थ्यावर विश्वास असे. ख्रिस्तीधर्मांत प्रारंभीं निराकार देवाचा उपदेश केला गेला आणि त्याचा प्रसार मूर्तिपूजक रोमन व ग्रीक लोकांत मूर्तींत कांहीं सामर्थ्य नाहीं असें सिद्ध करूनच झाला. सोमनाथाच्या पुजाऱ्यांच्या मूर्तीचा अनादर करणाऱ्या महमुदाचा नाश करण्याविषयीं सोमनाथाच्या मूर्तीस केलेल्या निरर्थक केंविलवाण्या प्रार्थना वाचतांना आपल्यास अलेक्झांड्रिया शहरांत अशाच प्रकारचा देखावा त्यापूर्वीं सहाशें वर्षें झालेला गिबननें हुबेहुब वर्णन केला आहे त्याची आपल्यास आठवण होते. थिओडोशियस बादशहाच्या ( ३८९ इ. ) हुकुमानें अलेक्झांड्रिया येथील सिरॅपिसची मूर्ति फोडली गेली, त्यावेळचें वृत्त वर्णन करतांना गिबन म्हणतो, "अलेक्झांड्रिया सिरॅपिस् देवतेच्या मूर्तीच्या विशेष संरक्षणाखालीं आहे अशी समजूत असल्यानें सिरॅपिसचें शहर असें नांव घेण्यांत या नगरास भूषण वाटे. त्याचें देऊळ रोमच्या कॅपिटल भागांत असलेल्या इमारती पेक्षांहि विस्तीर्ण आणि वैभवशाली होतें. शहरच्या सपाटीवर शंभर फूट उंच केलेल्या एका कृत्रिम प्रशस्त उंचवट्यावर हें देऊळ बांधलें होतें. थिओडोशस् बादशहानें मूर्तिपूजकांचे यज्ञ सर्वत्र बंद केले होते तरी सिरॅपिसच्या शहरांत व देवळांत चालू होते. कारण अशी भोळसट समजूत ख्रिश्चन लोकांची सुद्धां होती कीं, हे विधि जर बंद झाले तर नाईल नदीला पूर येणार नाहीं, इजिप्तमध्यें पिकें येणार नाहींत आणि कॉनस्टॅनटिनोपल राजधानीस खावयास मिळणार नाहीं. परंतु शेवटीं सिरॅपिसचें देऊळ व मूर्ति तोडण्याविषयीं बादशहाचा सक्तीचा हुकुम आला. निरनिराळ्या धातूंचे अनेक पत्रे एका ठिकाणीं ठोकून सिरॅपिसची भव्य मूर्ति बनविली होती. ती एवढी प्रचंड होती कीं, गाभाऱ्याच्या दोन्ही भिंतीस ती लागली होती. उजव्या हातांत राक्षसस्वरूपी एका सर्पाचें डोकें व धड असून त्याच्या शेंपटीला तीन

फांट्यांच्या शेवटीं कुत्रा, सिंह आणि लांडगा यांची डोकीं होतीं. या मूर्तीचा उपमर्द करण्यास कोणी हात उठवील, तर लागलीच आकाश व पृथ्वी एक होऊन एकदम सृष्ट्यारंभीचा कल्लोळ माजेल असा विश्वास होता. एक निधड्या छातीचा शिपाई हातांत कुऱ्हाड घेऊन शिडी लाऊन वर चढला. पाहणाऱ्यांच्या गर्दींतील ख्रिस्ती लोकसुद्धां या उपमर्दाच्या भयंकर परिणामाच्या भीतीनें गांगरून गेले. सिरॅपिसच्या मूर्तीच्या गालावर शिपायानें एक जोराचा प्रहार केला आणि तो तुटून खालीं पडला, पण आकाश व पृथ्वी यांत कांहीं एक गडबड न होतां तीं नेहमीच्या शांत, निश्चल व व्यवस्थित स्थितींत राहिलीं. कांहीं एक झालें नाहीं, यामुळें तो शिपाई जास्त जोरांत येऊन त्यानें अनेक प्रहार मारून मूर्तीचे तुकडे तुकडे केले. आणि ते तुकडे अलेक्झँड्रिया शहरांतून अपमानास्पद रीतीनें ओढून नेले. नाईल नदीला उशीरानें कां होईना नेहमीप्रमाणें पूर येऊन इजिप्तच्या सपाट प्रदेशांत पुष्कळ पीक आलें, आणि भावी वर्तविणाऱ्यांचें भयंकर भविष्य खोटें झालें. पुष्कळ लोक अलेक्झँड्रियाचें रक्षण करणाऱ्या मूर्तींत कांहीं सामर्थ्य नाहीं असें पाहून ख्रिस्ती झाले. ”

गिबननें या ठिकाणीं विषयांतर करून मूर्तींच्या अद्भुत सामर्थ्यावर धर्माची सत्यासत्यता मानणें कसें अयोग्य आहे हें दाखविलें आहे. मूर्ति धातु किंवा दगड किंवा लाकुड यांच्याच बनलेल्या असून त्यांत अद्भुत सामर्थ्य असणें शक्य नाहीं, असें सामर्थ्य आपल्या भक्तींत आहे. असो, ख्रिस्ती धर्महि बौद्ध धर्माप्रमाणें पुढें मूर्तिपूजेंत शिरून जो भोळसटपणा त्यानें प्रारंभीं निषेध केला,त्याच भोळसटपणांत शिरून जिसस व मेरी यांच्या मूर्ति पुजूं लागला. याच्या विरोधानें त्याचा सहज परिणाम मुसलमानी धर्माचा उदय झाला. याच प्रकारचे मूर्तींविषयीं असलेले भोळसर समज दूर करण्यास महमुदाच्या स्वाऱ्या झाल्या असें म्हणतां येईल. पण आणखीहि एक दुसरी भोळसर समजूत दूर करण्यासाठीं या स्वाऱ्या झाल्या असें म्हणतां येतें. देवळें व मूर्ति यांत सोनें आणि जवाहीर अतिशय लादणें हा वेडसर प्रकार आहे असें लोकांच्या निदर्शनास या स्वाऱ्यांनीं आणलें. कारण मूर्तिभजकांच्या धार्मिक समजुतीस त्या द्रव्याविषयींच्या लोभाची आणखी

भर पडते. सबंध सोन्याची मूर्ति बनविण्यांत गुण कोणता ? किंवा त्याजवर अमोल जवाहिर घालण्यांत पुण्य कोणतें ? केवळ सोन्याची पांच हाताची मूर्ति ईश्वर-प्रणिधान करण्यास जास्त साधनीभूत होत नाहीं. हिंदुधर्माचे प्राचीन आचार्य लहान लहान निरनिराळे साहजिक स्थितींत असलेले दगड शिव, विष्णु, गणपति व सूर्य यांचे प्रतीक मानतात आणि वैदिक ऋषि तर प्रत्यक्ष सूर्य व वायु यांची उपासना करीत. परंतु सुंदर मूर्ति बनविणें हें मनुष्याच्या मनास साहजिक आवडतें, व त्याजवर बिनमोल जवाहीर लादण्याकडेहि मनाची प्रवृत्ति होते. शिवपूजेंतहि मुख्य लिंगपूजा म्हणजे दगडांच्या कांहीं सहज आकृतींची पूजा प्रशस्त मानली आहे. पण तेथेंहि वैभवशाली राजे स्वयंभू लिंगाच्यावर सोन्याचे मुकुट हिरे माणकांनीं सुशोभित केलेले घालतात; आणि मूर्तिभंजक मुसलमानासच नव्हे तर हिंदू चोरांस किंबहुना भावी लोभी राजांस किंबहुना पुजाऱ्यांसहि लोभ उत्पन्न करून देवाचा अपमान करण्यास प्रवृत्त करतात. हिंदुस्थानच्या इतिहासांत नवीं देवळें बांधून त्यांस मौल्यवान् देणग्या देण्याची अनेक उदाहरणें आहेत. विशेषत: मथुरा, कोटकांगडा, सोमनाथ व उज्जयिनी वगैरे पुण्यस्थानांत शेकडों वैभवशाली राजे आणि हजारो श्रीमंत व्यापारी यांच्या देणग्यांनीं संपत्ति भरून गेली होती. इतिहासकार व शासनशास्त्रवेत्ते असें म्हणूं शकतात कीं, या संपत्तीचा उपयोग राजांनीं समर्थ सैन्यें ठेवण्यांत व श्रीमंतांनीं समाजाची सुस्थिति वाढविण्यांत करावयास पाहिजे होता. पण त्याकडे दुर्लक्ष होऊन देवळांत व मूर्तींवर संपत्ति अमोप जमा झाली, व यामुळें देशाच्या ऱ्हासास दोन्ही रीतीनें मदत झाली. एकीकडे बाहेरील विजेत्यास लोभ उत्पन्न होऊन त्यांचें आर्थिक सामर्थ्य वाढलें आणि दुसरीकडे आमच्या राजांचें व लोकांचें विरोधाचें सामर्थ्य कमी झालें. अद्यापहि या दोन गोष्टीकडे हिंदु लोकांचें लक्ष जितकें वेधावें तितकें वेधत नाहीं. मूर्तिपूजा सोडणें जरूर नाहीं; पण विशिष्ट मूर्तींत अद्भुत सामर्थ्य आहे अशी भोळसर भावना वाढूं न देतां आपल्या भावनेंत सामर्थ्य आहे ही कल्पना दृढ झाली पाहिजे. त्याचप्रमाणें मंदिरास किंवा मूर्तीस द्रव्य ज्यास्त देण्यांत विशेष पुण्य आहे हीहि कल्पना कमी झाली पाहिजे. कारण अशा द्रव्यापासून महंत किंवा

पुजारी यांची नीतिमात्र बिघडते आणि चोरांच्या किंवा मूर्तिभंजकांच्या देवतेचा उपमर्द करण्याच्या इच्छेस जोर येतो.

तथापि मनुष्यस्वभाव एकाच तऱ्हेनें मनुष्यास एकच कृत्य करावयास प्रवृत्त करतो हे शेवटीं सांगण्यासारखें आहे. मूर्तिभंजक व देवळें लुटणारा महमुद यालाहि याच स्वभावाच्या प्रवृत्तीनें गझनी येथें एक प्रचंड मशीद बांधून लुटून आणलेल्या सोन्यानें व हिरे माणकांनीं तिच्या भिंती शृंगारण्याची इच्छा झाली. आणि ज्या लोभानें तो प्रवृत्त झाला होता तोच लोभ पुढील विजेत्यांस त्यानें उत्पन्न करून ठेवला. ऐतिहासिक लेखांवरून असें दिसतें कीं, ही मशीद तेथील मौल्यवान् शृंगाराच्या लोभानें चीनच्या मूर्तिपूजक प्रचंड टोळ्यांनीं विध्वंसिली. जंगिसखानानें बुखारा येथील जामी मशीदीची केलेली अवमानना जुवैनीच्या जहानकुशाग्रंथांत (इलियट भा. २ पा. ३८८) वर्णिलेली आहे. आणि बुखारा येथील हें त्याचें कृत्य तेथून पळून आलेल्या एका मुसलमानानें पुढील लहान पण जोरदार वाक्यांत केलें. " मोंगल आले व खोदून, जाळून, कत्तल करून, लुटून परत गेले." हाच जंगिसखान जलालुद्दीन याचा पाठलाग करून ६१८ हिजरी (१२२६ इ.) मध्यें परतला तेव्हां गझनिवर आला. त्यानें सर्व रहिवाशांस बाहेर काढलें व मोजिलें आणि त्यांतील कारागीर निराळे करून बाकीच्या सर्वांची कत्तल करण्याचा हुकूम दिला. त्यानें शहरहि उध्वस्त केलें व ओगताई मेलेल्यांची प्रेतें पुरून हिरातेकडे निघून गेला (इलियट २. पा. ३९०). दुसऱ्या एका उताऱ्यांत असें सांगितलें आहे कीं ओगताईनें चार महिने वेढा दिल्यानंतर हल्ला करून गझनी शहर घेतलें व पायासह खोदून तें त्यानें जाळून टाकलें व सुमारें दोन लक्ष लोक त्यानें कत्तल केले (इलि. २. पा. ५६९).

मराठी ... २८७५

# परिशिष्ट २

## कांहीं मुसलमानी नांवांचे बरोबर उच्चार व अर्थ.

कित्येक मुसलमानी नांवें चुकीच्या प्रकारानें लिहितात, तसें न हो-ण्याचा या पुस्तकांत प्रयत्न केला आहे आणि त्या नांवाचा अर्थ पुढें दिल्याप्रमाणें कोशावरून मिळतो.

| नांव | अर्थ |
|---|---|
| १ अल्प तगीन ( तुर्की ) | अल्प = सशक्त तगीन, तिगीन, = पेहलवान. |
| २ सबुक्तगीन ,, | सबुक=चपळ, तगीन=पेहेलवान. |
| ३ महमूद ( आरबी ) | स्तुति केलेला. |
| ४ मुहम्मद ,, | स्तुतिकरणारा ( हें नांव पैगंबराचेंहि आहे ) |
| ५ शिहाबुद्दीन ,, | शिहाब = उल्कातारा, उत = चा, दीन = धर्म. |
| ६ कुतुबुद्दीन ,, | कुतुब = ध्रुवतारा, उत = चा, दीन-धर्म. |
| ७ घियासुद्दीन ,, | धर्माचा मदतगार |
| ८ ( यिएल्तामिश ) अल्तमष | फौजेचा सरदार |
| ९ अल्बैरूनी. | अल् = तो, बेरूनी = बाहेरचा. |

कित्येक प्रांतांची व शहरांची नांवें शुध्दरीतीनें पुढीलप्रमाणें लिहिलीं आहेत. खोरासान, सीस्तान, बल्ख, बगदाद ( बाग = उपवन, दाद = न्याय ), निशापूर, बुखारा.

# सालवारी.

इ. स.

७१२ सिंध प्रांतांचा उच्छेद.

९०३ इस्माइल पहिला, बुखाऱ्याचा सामानी वंशीय बादशहा.

९०३-१०१५ सामानी साम्राज्य.

९१२ याकूब--इ--लेस कासारहा प्रथम हिंदुस्थानांत गझनीवर येतो.

९४३ तुर्की गुलाम सामानी राजांचे संरक्षक म्हणून राहतात.

९५९ मनसूर सामानी बादशहा होतो व ह्याच्या कारकीर्दीत तुर्की गुलाम सरदार बनून लहान राज्यें स्थापन करतात.

९६७ सप्तंबर ३० } महमुदाचा जन्म. ( या विषयीं
९७१ आक्टोबर २ } मतभेद आहे )

९७७--९९७ सबुक्तगीन.

९८० सबुक्तगिनाची वहिंडचा व काबूलचा राजा जयपाल यावर स्वारी.

९८६--१००१ दुसरा नूह पातशहा.

१००१ महमुदाची जयपाळ राजावर पेशावरचे मैदानांत स्वारी.

१००४ ,, भाटियावर स्वारी.

१००८ ,, संयुक्त हिंदूराजांसह आनंदपालाची लढाई.

१००९ ,, नगरकोटची स्वारी.

१०१३ ,, त्रिलोचनपालाची शेवटली लढाई.

१०१४ ,, ठाणेश्वरची लढाई.

१०१८ ,, मथुरा व कनोजवर स्वारी.

१०१९ महमुदाची कनोजवर पुनः स्वारी.
१०२१ राहिब नदीवरील लढाई.
१०२२ महमुदाची स्वात वगैरेवर स्वारी.
१०२३ महमुदाची कालंजरवरील स्वारी.
१०२५ महमुदाची सोमनाथावरील स्वारी.
१०२९ महमुदाचा मृत्यु.

---

१०३० अल्बेरुनी आपला ग्रंथ संपवितो.

---

९१०-९४० राजशेखर कवि.
९५०--१००० धंगराजा.
९६०-१००१ जयपाल.
१००१-१००९ आनंदपाल.
१०१० त भोजराजा माळव्याचे गादीवर येतो.
१००९-१०२१ त्रिलोचनपाल.
१०२१-१०२६ भीम.
१०३० गांगेयदेव ( चेदीचा राजा ).

REFBK-0002816

२८१६